**MAPOL 2.1M**

# एम. ए. राज्यशास्त्र

## सत्र - II

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सुधारित अभ्यासक्रम

# राजकीय सिद्धांत - II

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य (डॉ.) अजय भामरे**
प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक शिवाजी सरगर**
संचालक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक आणि प्रमुख मानव्यविद्या शाखा**
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

: **डॉ. क्षिप्रा वासुदेव**
सहायक प्राध्यापक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **डॉ. बालासाहेब चंद्रप्रकाश किलचे**
सहायक प्राध्यापक
श्रीनाथ कॉलेज ऑफ एज्युकेशन, पैठण
छत्रपति संभाजीनगर

: **डॉ. मल्हारी गुरुनाथ शिंदे**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
छत्रपती शिवाजी महाविद्यालय कळंब ता कळंब
जि. धाराशिव

**फेब्रुवारी २०२५, मुद्रण - १** ISBN 978-93-6728-351-6

**प्रकाशक**
**संचालक,** दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय. विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १ | राज्याचे सिद्धांत | १ |
| २ | हक्क /अधिकार | ५६ |
| ३ | समता | १०५ |
| ४ | न्याय | १३० |

# एम. ए. राज्यशास्त्र

## सत्र - II

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सुधारित अभ्यासक्रम

## राजकीय सिद्धांत - II

## अभ्यासक्रम (मराठी)

**अभ्यासक्रमाची उद्दिष्टे:**

१. विद्यार्थ्यांना राज्याच्या विविध सिद्धांतांची ओळख करून देणे

२. विद्यार्थ्यांना मानक मूल्यांभोवती होणाऱ्या वादविवादांची ओळख करून देणे

३. हक्क, समानता आणि न्याय यासारख्या कल्पनांची व्याप्ती वाढवणे

**प्रकरण १: राज्याचे सिद्धांत**

अ) उदारमतवादी

ब) मार्क्सवादी

क) स्त्रीवादी

**प्रकरण २: हक्क**

अ) हक्कांचे सिद्धांत

ब) गट आधारित हक्क विरुद्ध वैयक्तिक हक्क

क) हक्कांवरील टीका आणि वादविवाद

**प्रकरण ३: समानता**

अ) अर्थ आणि स्वरूप

ब) समानतेचे प्रकार

क) समानता आणि त्याविषयीची स्पर्धा

**प्रकरण ४: न्याय**

अ) प्रक्रियात्मक आणि वितरणात्मक

ब) न्याय निष्पक्षता म्हणून (जॉन रॉल्स), हक्क म्हणून (रॉबर्ट नोझिक)

क) सामाजिक न्यायाची कल्पना (अमर्त्य सेन आणि डॉ. बी. आर. आंबेडकर)

# SYLLABUS

**Course Objectives:**

1. To introduce students to different theories of state
2. To acquaint students to debates around normative values
3. To widen the scope of the ideas like Rights, Equality and Justice

**Module 1: Theories of State**

a) Liberal
b) Marxist
c) Feminist

**Module 2: Rights**

a) Theories of rights
b) Group based vs individual rights
c) Critique and Debates around Rights

**Module 3: Equality**

a) Meaning and Nature
b) Types of equality
c) Contestations around Equality

**Module 4: Justice**

a) Procedural and Distributive
b) Justice as Fairness (John Rawls), as Entitlement (Robert Nozick)
**c)** Idea of Social Justice (Amartya Sen and Dr. B. R. Ambedkar)

**Course Outcomes:**

1. The students will be able to understand major approaches and paradigms to understand the political theory
2. It will enable students to build a strong theoretical foundation for research in the discipline of political science

**Reading List:**


1. Berlin Isaiah, Four Essays on Liberty, Oxford University Press, Oxford, 2002
2. Dworkin, R. (1981). What is equality? Part 1: Equality of welfare. Philosophy & public affairs, 185-246.
3. Dworkin, R. (1981). What is equality? Part 2: Equality of resources. Philosophy & public affairs, 283-345.
4. Burchell, Graham, Gordon, Colin, and Miller, Peter (Eds.), The Foucault Effect: Studies in Governmentality, University of Chicago Press, Chicago, 1991.
5. Young, I. M. (2014). Five faces of oppression. Rethinking power, 174-195.
6. Rawls, J. (2020). A theory of justice: Revised edition. Harvard university press.
7. Sandel, M. J. (2000). What money can't buy: the moral limits of markets. Tanner Lectures on Human Values, 21, 87-122.

# SYLLABUS


8. Sandel, M. J. (1984). The procedural republic and the unencumbered self. Political theory, 12(1), 81-96.
9. Quijano, A. (2007). Coloniality and modernity/rationality. Cultural studies, 21(2-3), 168-178
10. Mignolo, W. D., & Walsh, C. E. (2018). On decoloniality: Concepts, analytics, praxis. Duke University Press.
11. Dryzek, J. S., Honig, B., & Phillips, A. (2008). The Oxford handbook of political theory. Oxford University Press.
12. Farrelly, C. (Ed.). (2003). Contemporary political theory: a reader. Sage.
13. Gaus, G. F., & Kukathas, C. (Eds.). (2004). Handbook of political theory. Sage.
14. Delanty, G., & Turner, S. P. (Eds.). (2011). Routledge international handbook of contemporary social and political theory (p. 510). New York, NY: Routledge.
15. Held, D. (2013). Political theory and the modern state. John Wiley & Sons.
16. Barry, N. P. (1989). An introduction to modern political theory. Springer.
17. भोगले शांताराम ,'आधुनिक राजकीय सिद्धांत 'विद्या प्रकाशन, पुणे 1990
18. लोखंडे भगवान, ‘ राजकीय सिद्धांत ‘ दुर व मुक्त अध्ययन केंद्र मुंबई विद्यापीठ मुंबई 2022

# १

# राज्याचे सिद्धांत

**घटक रचना:**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

१.३.१ राज्याच्या निर्मितीची पार्श्वभूमी

१.३.२ राज्याचा उदारवादी सिद्धांत

१.३.३ राज्याचा मार्क्सवादी सिद्धांत

१.३.४ राज्याचा स्त्रीवादी सिद्धांत

## १.१ उद्दिष्टे

**राज्याचे सिद्धांत** या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. राज्य निर्मितीची पार्श्वभूमी सांगता येईल.

२. राज्याच्या वेगवेगळ्या सिद्धांताची ओळख होईल.

## १.२ प्रास्ताविक

आधुनिक राजकीय व्यवस्थेत राज्य, व्यक्ती व समाज यांचे संबंध हे परस्परांवर अवलंबून असतात. या परस्परसंबंधात्वाला नियंत्रीत करणारी राज्य ही एक संकल्पना आहे. त्यामुळे राज्याच्या संबंधाची चर्चा करताना आपल्याला राज्याच्या निर्मितीची पार्श्वभूमी अभ्यासणे गरजेचे आहे. कारण राज्याचा संबंध हा व्यक्तीच्या राजकीय व्यवहाराशी असल्यामुळे हे राजकीय व्यवहार वेगवेगळ्या राजकीय संघटना, राजकीय संस्था, राजकीय पक्ष इत्यादींच्या माध्यमातून व्यक्ती पूर्ण करत असतात. त्यामुळे राज्य, व्यक्ती व समाज यांचे परस्पर संबंध पाहताना राज्याचा उदय कसा झाला याचाही विचार आपल्याला करणे गरजेचे आहे. त्या दृष्टिकोनातून राज्य निर्मितीच्या संदर्भात वेगवेगळी विचारप्रवाह समोर आलेले आहेत. त्या दृष्टिकोनातून विचार करता राज्याचे सिद्धांत हे राज्यशास्त्राचा मूलभूत भाग आहेत, ज्यामध्ये राज्याच्या उगम, स्वरूप, स्वरचना आणि उद्दिष्टांची चर्चा केली जाते. हे सिद्धांत राज्याच्या अस्तित्वामागील कारणे आणि त्याची कार्यपद्धती स्पष्ट करतात. त्यामुळे या घटकात आपण राज्याच्या संदर्भातील उदारवादी सिद्धांत, मार्क्सवादी सिद्धांत आणि स्त्रीवादी सिद्धांताची चर्चा या पुस्तकात करणार आहोत.

## १.३ विषय विवेचन

व्यक्ती व समाज यांचा विचार करता व्यक्तींचा मिळून समाज तयार झालेला आहे. त्यातून निर्माण झालेला समाज एका भूप्रदेशात वास्तव्य करतो. या समाजातील वेगवेगळ्या संबंधामुळे त्या समाजात व व्यक्तीमध्ये ऐक्य ते निर्माण होते. एकंदरीतच मानवी जीवनाच्या विकासाचा विचार करता राज्याच्या निर्मितीची पार्श्वभूमी ही मानवाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय गरजांशी संबंधित आहे. राज्य हे समाजातील सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी आणि सामूहिक जीवनाचे व्यवस्थापन करण्यासाठी निर्माण झालेले एक साधन आहे. त्यामुळे राज्याची निर्मिती ही राजकीय जागृतीतून झालेली आहे. एकंदरीतच राज्याच्या निर्मितीसाठी भूप्रदेश, लोकसंख्या, सरकार आणि सार्वभौमितिक चार घटकाची आवश्यकता असते. त्याशिवाय राज्य निर्माण होऊ शकत नाही. राज्य ही राजकीय संस्था आहे, त्याची निर्मिती ही विधीनियमानुसार होत असली तरीही राज्याची उत्पत्ती कशी झाली याविषयी अनेक विचारवंतांमध्ये एकमत नाही, त्यामुळे राज्याच्या उत्पत्तीच्या संदर्भात वेगवेगळ्या विचारवंतांनी वेगवेगळी भूमिका मांडलेली आहे.राज्याची निर्मिती ही एक नैसर्गिक आणि ऐतिहासिक प्रक्रिया आहे. ती मानवाच्या गरजा, सामाजिक विकास, आणि राजकीय संघटनांच्या परस्परसंवादातून झाली आहे. राज्याचे अस्तित्व हे समाजातील शिस्त, सुरक्षा, आणि कल्याणासाठी अपरिहार्य आहे. त्यामुळे राज्याच्या निर्मिती संदर्भातील वेगवेगळे विचार पाहणे आपल्याला क्रत्म प्राप्त आहेत.

### १.३.१ राज्याच्या निर्मितीची पार्श्वभूमी

व्यक्ती व समाज यांच्या परस्पर संबंधातून निर्माण झालेल्या राज्यसंस्थेने आज मानवी जीवनाची सर्वच क्षेत्रे व्यापलेली आहेत. आजच्या आधुनिक राजकीय व्यवस्थेत प्रत्येक व्यक्तीचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे राज्यसंस्थेशी संबंध येत असतो. व्यक्तीचे आर्थिक, सामाजिक, राजकीय जीवनातील सर्व व्यवहार हे राज्यसंस्थेच्या नियंत्रणाखाली येतात. एकंदरीतच राज्यसंस्थेचा विचार करता संपूर्ण समूहाला सुव्यवस्थित आणि संघटित जीवन जगण्यासाठी ही राज्यव्यवस्थेची आवश्यकता असते. प्राचीन काळापासून राजकीय व्यवस्थेचा विकासावर नजर टाकल्यास असे लक्षात येते की अतिप्राचीन काळी माणूस रानटी अवस्थेत होता. या रानटी अवस्थेत मनुष्य हा टोळ्या करून राहत असे. तो टोळी अवस्थेत अन्नासाठी इतरत्र भटकत असे. अन्नासाठी या टोळ्यांमध्ये अनेक वेळा संघर्ष होत. पण अगदी सुरुवातीच्या काळात जर आपण पाहिलं तर पृथ्वीवर मत्स्य न्याय अस्तित्वात होता. म्हणजेच जसा समुद्रातील मोठा मासा छोट्या माशाला खाऊन टाकतो तसेच या अवस्थेत शक्तिशाली टोळ्या व शक्तिशाली माणसे हे कमकुवत टोळ्यांना व माणसांना संपवून टाकत होते. त्यामुळे सुरुवातीच्या या अवस्थेत कमकुवत असणाऱ्या माणसाला व टोळ्याना जीवनाची सुरक्षितता वाटत नव्हती. या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी तत्कालीन लोकांनी मनुला सर्वप्रथम राजा म्हणून घोषित केले. राजाला राज्यपती हा असा पर्यायी शब्द वापरला गेला. त्यातूनच या राजाला किंवा राज्यपतीला राज्य चालवण्यासाठी शेती उत्पन्नाचा एकशष्टांस भाग धान्याच्या रूपाने आणि व्यापार उत्पन्नाचा एक दशांश भाग सुवर्ण अथवा पैशाच्या रूपाने देण्याची व्यवस्था करण्यात आली. या मोबदल्यात राज्यपतीने प्रजेच्या संरक्षणाची हमी स्वीकारली असे प्राचीन इतिहासावरून कौटिल्याच्या विचारात आपल्याला ह्या गोष्टी पहावयास मिळतात. कालांतराने जसजसा समाजाचा विकास होत गेला तस तसा मानवाने समूहात

राहण्यासाठी विविध सामाजिक संस्था निर्माण केल्या त्यात कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, धर्मसंस्था अशा विविध सामाजिक संस्थामुळे मानवी गरजांची पूर्तता होऊ लागली. या संस्थांच्या माध्यमातून सहकार्य भावना मानवी समूहात निर्माण झाली. परंतु या सहकार्याच्या भावनेतही काही वेळेला या मानवी समूहात संघर्ष निर्माण होत असतात आणि त्या संघर्षाला नियंत्रित करण्यासाठी आणि सुरक्षित जीवन जगण्यासाठी राज्यसंस्था विकसित झालेली आहे. प्राचीन आणि आधुनिक काळातील मानवी जीवनाच्या विकासाच्या वेगवेगळ्या अवस्था पाहता या राज्यसंस्थेने मानवी विकासाला एका वेगळ्या उच्च टोकावर नेऊन ठेवलेले आहे. राज्याशिवाय आपण सुव्यवस्थित व सुसंघटित मानवी समाजाची कल्पनाच करू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे.त्यामुळे आधुनिक राजकीय व्यवस्थेत राज्यसंस्थेचे महत्त्व नाकारता येत नाही. एकंदरीतच ही राज्यसंस्था जर विकसित झाली नसती तर मोठ्या प्रमाणात अराजकता निर्माण झाली असती आणि मत्स्यन्याय हा कायम राहिला असता. त्यामुळे राज्याच्या निर्मितीमध्ये विविध टप्प्यांचाही आपल्याला विचार करावा लागतो तो पुढील प्रमाणे.

**राज्याच्या निर्मितीचे विविध टप्पे**

राज्यसंस्थेचा उदय हा मानवाच्या ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय गरजांमुळे झाला. मानवाच्या जीवनातील स्वाभाविक मागण्या आणि समस्यांमुळे समाजात एक संघटित व्यवस्थेची गरज निर्माण झाली, ज्यामुळे राज्यसंस्थेचा उदय झाला.

**राज्यसंस्थेचा उदय कसा झाला?**

राज्यसंस्थेचा उदय मुख्यतः स्वाभाविक गरजांमधून आणि समाजाच्या विकासामधून झाला आहे. त्याचे मुख्य टप्पे खालीलप्रमाणे आहेत

**१. <u>प्रारंभिक अवस्थेत मानवाचे जीवन</u>**

१. **प्राकृतिक स्थिती (State of Nature):**

- प्रारंभी मानव प्राकृतिक अवस्थेत राहायचा.
- कोणतेही नियम, कायदे किंवा सत्ता नव्हती.
- मानव स्वसंरक्षणासाठी आणि जीवनावश्यक वस्तूंसाठी संघर्ष करायचा.

२. **अराजकतेची स्थिती:**

- नैसर्गिक संसाधनांवर ताबा मिळवण्यासाठी संघर्ष वाढला.
- अराजकता, असुरक्षितता आणि हिंसाचार निर्माण झाला.

**प्राकृतिक आणि अराजकतेची स्थिती पाहता**

- सुरुवातीला मानवाचे जीवन नैसर्गिक परिस्थितींवर अवलंबून होते.
- मानवी समाज आदिम अवस्थेत होता, ज्यामध्ये कुठलेही संघटित राज्य किंवा कायदा नव्हता.

- नैसर्गिक अवस्था (State of Nature) थॉमस हॉब्सनुसार ही अवस्था अराजक आणि संघर्षपूर्ण होती, कारण प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या अस्तित्वासाठी लढत होती.
- जॉन लॉकच्या मते, ही अवस्था तुलनेने शांत होती, परंतु मालमत्तेच्या सुरक्षेसाठी नियमांची आवश्यकता होती.
- जीन-जॅक रूसोच्या मते, नैसर्गिक अवस्था स्वातंत्र्यपूर्ण आणि आनंदी होती, पण सभ्यतेच्या प्रगतीमुळे स्पर्धा आणि असमतोल निर्माण झाला.

**२. <u>समाजाच्या गरजेतून राज्यसंस्थेचा उदय</u>**

**१. सुरक्षिततेची गरज:**

- स्वतःचे संरक्षण आणि संपत्तीच्या सुरक्षिततेसाठी मानवाला संघटित व्हावे लागले.
- यामुळे पहिल्या प्रकारच्या सामूहिक व्यवस्था तयार झाल्या.

**२. कायद्याची आवश्यकता:**

- नियम आणि कायद्यांच्या अभावामुळे संघर्ष वाढले.
- सुव्यवस्था राखण्यासाठी कायद्यांची गरज भासली.

**३. सामूहिक जीवन:**

- शेती, व्यापार, आणि एकत्रित राहण्यामुळे मानवाला संघटनेची गरज भासली.
- यामुळे एक निश्चित सत्ता किंवा राज्याची निर्मिती झाली.

**३. सामाजिक गरजांची जाणीव**

जसा समाज वाढला, तसा व्यक्तींमध्ये सहकार्य आणि संघटनेची गरज निर्माण झाली.अन्न, पाणी, सुरक्षितता आणि संसाधनांचे व्यवस्थापन यासाठी लोक एकत्र आले.

**४. कुटुंब, कुळ, आणि जमातींची निर्मिती**

मानवाने कुटुंब निर्माण केले, त्यानंतर कुळ (Clan) आणि जमाती (Tribe) तयार झाल्या.या संघटनांमधून नेतृत्वाची गरज निर्माण झाली, ज्यामुळे प्रमुख किंवा नेत्यांचा उदय झाला.

**५. सत्तेचे केंद्रीकरण आणि शासनव्यवस्थेचा उदय**

संसाधनांच्या ताब्यासाठी स्पर्धा आणि संघर्ष वाढल्यामुळे सत्तेचे केंद्रीकरण होऊ लागले.

सामूहिक संरक्षणासाठी आणि सुव्यवस्था टिकवण्यासाठी नियम आणि कायदे तयार करण्यात आले.हळूहळू एक स्थिर शासनव्यवस्था उभी राहिली.

## ३.<u>विचारवंतांच्या मते राज्यसंस्थेचा उदय</u>

१. **थॉमस हॉब्ज (Thomas Hobbes):**

- प्राकृतिक स्थिती ही “सर्वांचा सर्वांवर युद्ध” अशी होती.
- मानवाने स्वतःच्या सुरक्षिततेसाठी करार करून सार्वभौम सत्ता निर्माण केली.

२. **जॉन लॉक (John Locke):**

- प्राकृतिक स्थिती शांत होती, पण संपत्तीच्या हक्कावरून संघर्ष निर्माण झाला.
- मानवाने आपले नैसर्गिक अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी राज्यसंस्थेची स्थापना केली.

३. **जीन जॅक रुसो (Jean Jacques Rousseau):**

- प्राकृतिक स्थिती आनंददायक होती, परंतु मालकी हक्कामुळे संघर्ष निर्माण झाला.
- राज्यसंस्थेचा उदय लोकांच्या करारातून झाला.

## ४. <u>सिद्धांतांद्वारे राज्यनिर्मितीची मांडणी</u>

**दैवी सिद्धांत:** राज्य ईश्वराच्या इच्छेने निर्माण झाले.

**शक्तिसिद्धांत:** बलवान लोकांनी इतरांवर वर्चस्व प्रस्थापित करून राज्य निर्माण केले.

**सामाजिक करार सिद्धांत:** लोकांनी सामूहिक निर्णयाने राज्य निर्माण केले.

**ऐतिहासिक व विकासवादी सिद्धांत**: कुटुंब, कुळ, जमात, वंश आणि शेवटी राज्य अशा वेगवेगळ्या टप्प्यांद्वारे राज्याची निर्मिती झाली.

## ५. <u>राज्यसंस्थेचा उदय होण्यामागील कारणे</u>

**(अ) प्राकृतिक कारणे:**

१. **संरक्षणाची गरज:**

- वन्य प्राणी, शत्रू, आणि नैसर्गिक संकटांपासून संरक्षणासाठी संघटन गरजेचे होते.

२. **सामाजिक जीवनाची आवश्यकता:**

- मानव हा स्वभावतः समाजप्रिय प्राणी असल्याने त्याला संघटित जीवन हवे होते.

**(ब) आर्थिक कारणे:**

१. **शेती आणि संपत्तीचे नियोजन:**

- शेती आणि व्यापारामुळे संपत्ती निर्माण झाली, ज्यामुळे तिचे संरक्षण आवश्यक झाले.

२. **संसाधनांचे व्यवस्थापन:**

- संसाधनांचे योग्य वाटप करण्यासाठी शासन आवश्यक बनले.

**(क) राजकीय कारणे:**

१. **सत्तेची गरज:**

- समाजामध्ये सत्ता आणि नियंत्रण ठेवण्यासाठी संस्थेची गरज निर्माण झाली.

२. **कायद्याचा अंमल:**

- न्यायव्यवस्था आणि सुव्यवस्थेसाठी राज्यसंस्थेची निर्मिती झाली.

**(ड) सांस्कृतिक आणि धार्मिक कारणे:**

१. **धार्मिक प्रभाव:**

- प्रारंभीच्या काळात राज्यसंस्था धर्माच्या आधारे चालवली जात होती.
- उदा. राजा हा देवाचा प्रतिनिधी मानला जायचा.

२. **सांस्कृतिक विकास:**

- शिक्षण, कला, आणि संस्कृतीच्या विकासासाठी संघटित राज्यसंस्था निर्माण झाली.

**इ) राज्यनिर्मितीचे इतर प्रमुख कारणे**

राज्याच्या निर्मितीसाठी काही महत्त्वाचे कारणे होती

**सुरक्षा**: बाह्य आक्रमण आणि अंतर्गत संघर्ष टाळण्यासाठी राज्याची आवश्यकता होती.

**संपत्तीचे व्यवस्थापन:** संसाधनांच्या वाटपासाठी नियंत्रण आवश्यक होते.

**सामाजिक सुव्यवस्था:** लोकांमध्ये शिस्त प्रस्थापित करण्यासाठी नियम आणि कायदे.

**सामाजिक करार:** लोकांनी एकत्र येऊन सामाजिक कराराच्या माध्यमातून राज्य निर्माण केले, ज्यामुळे प्रत्येक व्यक्तीचे अधिकार संरक्षित राहतील.

कृषी क्रांतीनंतर स्थायिक जीवनाची सुरुवात झाली, ज्यामुळे गाव आणि नगरांचा विकास झाला.व्यापार, उद्योग, आणि संस्कृतीच्या प्रगतीमुळे अधिक संघटित राज्यव्यवस्थांची गरज

भासली.प्राचीन काळातील राज्ये राजेशाहीवर आधारित होती, तर आधुनिक राज्य लोकशाही आणि स्वातंत्र्याच्या तत्त्वांवर आधारित आहेत.

एकंदरीतच राज्य निर्मितीच्या वेगवेगळ्या टप्प्यांचा विचार करता राज्याची निर्मिती ही एक नैसर्गिक आणि ऐतिहासिक प्रक्रिया आहे. ती मानवाच्या गरजा, सामाजिक विकास, आणि राजकीय संघटनांच्या परस्परसंवादातून झाली आहे. कारण राज्याचे अस्तित्व हे समाजातील शिस्त, सुरक्षा, आणि कल्याणासाठी अपरिहार्य राहिले आहे.

**राज्यसंस्थेचा विकासक्रम**

**(अ) प्रारंभिक टप्पा:**

- टोळ्यांमध्ये राहण्याची पद्धत.
- प्रमुख किंवा नेत्यावर आधारित व्यवस्थापन.

**(ब) ग्रामव्यवस्था:**

- स्थिर जीवन आणि शेतीमुळे गाव तयार झाले.
- गावप्रमुख किंवा पंचायत व्यवस्थेचा उदय झाला.

**(क) राज्यसंस्थेचा उदय:**

- मोठ्या समाजाला नियंत्रित करण्यासाठी शक्तिशाली सत्तेची गरज निर्माण झाली.
- राजा किंवा शासक यांची स्थापना झाली.

**(ड) आधुनिक राज्यसंस्था:**

- राज्यघटना, लोकशाही, आणि कायद्यांच्या आधारावर चालणाऱ्या राज्यसंस्थेचा विकास.

**राज्य म्हणजे काय ?**

राज्य हे इंग्रजी भाषेतील 'State' या शब्दाचे मराठीतील भाषांतर होय. 'State' हा शब्द लॅटिन शब्द 'स्टेट्स-रे-पब्लिक' यापासून घेतला आहे. आणि याचा अर्थ 'नागरिकता' असा होतो. इंग्रजी भाषेतील 'State' या शब्दाची उत्पत्ती इटालियन भाषेतील 'Stato' या शब्दापासून झालेली आहे असे अनेक विचारवंताचे मत आहे. प्राचीन ग्रीक विचारवंतांनी नगर राज्यासाठी 'पोलीस' हा शब्द वापरला होता. आधुनिक काळात मॅकियाव्हेली यांनी 'राज्य' या शब्दाचा अर्थ आपल्या 'प्रिन्स' या ग्रंथात स्पष्ट केला आहे. त्यानंतर हा शब्द राज्यशास्त्रात व्यापक अर्थाने रुळल्या गेला आहे. आज आधुनिक काळात 'राज्य' हा शब्द विविध अर्थाने वापरला जातो.

**राज्याच्या व्याख्या**

समाजात जीवन जगणाऱ्या व्यक्तीच्या जीवनाच्या विकासाचे वेगवेगळे अंग असतात. त्या वेगवेगळ्या अंगांचा अभ्यासही वेगवेगळ्या शास्त्रांच्या माध्यमातून केला जातो. मनुष्याच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो, तसेच मनुष्याच्या आर्थिक

जीवनाचा अभ्यास हा अर्थशास्त्रात केला जातो, मानवी जीवनाच्या नैतिक व्यवहाराचे अध्ययन हे नीतिशास्त्रात केल्या जाते, त्याचप्रमाणे मानवाच्या राजकीय जीवनाचा अभ्यास हा राज्यशास्त्रात केला जातो. एकंदरीतच वेगवेगळ्या शास्त्रांचा आणि मानवी जीवनाचा सहसंबंध पाहता आधुनिक काळात मनुष्याने आपल्या विकासासाठी अनेक संस्था निर्माण केल्या आहेत. मनुष्याने निर्माण केलेल्या वेगवेगळ्या संस्था आणि व्यक्ती यांचे संबंध कसे असावेत याबाबत कायदे नियमांची आवश्यकता भासू लागली. या कायदे नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी पुन्हा एकदा मनुष्याला वेगवेगळ्या प्रकारच्या संस्थांची गरज भासू लागली त्यातूनच राज्यसंस्थेचा विकास झाला हे आपल्या लक्षात येते.

एकंदरीतच राज्यसंस्थेच्या राज्य या शब्दाच्या संदर्भात वेगवेगळ्या विचारवंतानी आपली मते मांडली आहेत ती पुढील प्रमाणे.

**ऑरिस्टॉटल**

"अनेक कुटुंबे आणि खेडी एकत्र येऊन त्यांनी आपले जीवन सुखी व स्वयंपूर्ण करण्यासाठी स्थापित केलेला संघ म्हणजे राज्य."

**प्रा. लास्की**

"विशिष्ट भूप्रदेशातील सरकार आणि प्रजा यामध्ये विभागलेला आणि त्याच भूप्रदेशात स्वतःला सर्वश्रेष्ठ समजून त्या प्रदेशातील सर्व संस्थांवर सत्ता गाजवू पाहणारा समाज म्हणजे राज्य होय."

**सिसेरो**

"अधिकारांची जाणीव होऊन ते प्राप्त करण्याच्या दृष्टिकोनातून समान सहभाग या भावनेने एकत्रित आलेला समुदाय म्हणजे राज्य होय."

**बोडीन**

"समान उद्दिष्ट आणि सर्वश्रेष्सत्तेने नियंत्रित केलेल्या अनेक कुटुंबांची संस्था म्हणजे राज्य होय."

**ब्लंटश्लीने**

" निश्चित अशा भूभागावर राजकीयदृष्ट्या सुसंघटित झालेला लोकांचा समुदाय म्हणजे राज्य होय"

**विलोबी**

“मनुष्यांचा एकत्रित आलेला असा समाज की, ज्यात एक कायम सत्ता असते. जी स्वतः नियंत्रणापासून मुक्त राहून आपल्या अंतर्गत व्यक्ती व व्यक्तिसमूहाच्या कार्यांवर नियंत्रण ठेवतेती संस्था म्हणजेच राज्यसंस्था.”

**गार्नर**

“एखाद्या विशिष्ट भूप्रदेशावर कायमस्वरूपी वास्तव्य करणारा कमी अधिक लोकांचा असा समूह की जो , कोणत्याही बाह्य नियंत्रणापासून पूर्णतः स्वतंत्र असणारा व त्यातील बहुसंख्य लोक सरकारच्या आज्ञांचे, सवयींचे पालन करतात असा समाज म्हणजे राज्य होय”.

### गेटेल

“निश्चित अशा भूप्रदेशात कायमस्वरूपी वास्तव्य करणाऱ्या व बाह्य नियंत्रणापासून मुक्त असणाऱ्या आणि स्वतःचे कायदे निर्माण करून आपल्या अधिकार क्षेत्रातील सर्वांवर शासन करणारा सुसंघटित असलेला समाज म्हणजे राज्य होय.”

### प्रो. वुड्रो विल्सन

"राज्य म्हणजे निश्चित अशा भूप्रदेशात कायद्याद्वारा सत्ता चालविण्यासाठी संघटित झालेला समाज होय."

### A Dictionary of American Politics

"निश्चित अशा भूप्रदेशात राहणारा आणि बाह्य नियंत्रणापासून संपूर्णपणे स्वतंत्र अगर जवळजवळ स्वतंत्र असलेला व त्या प्रदेशात राहणाऱ्या सर्व व्यक्तींकडून सहजगत्या आज्ञापालन करून घेण्याची सत्ता असलेल्या सरकारच्या अमलाखाली असलेला, राजकीयदृष्ट्या सुसंघटित असा लोकसमूह म्हणजे राज्य होय."

वरील सर्व व्याख्यांच्या विवेचनावरून असे लक्षात येते की, राज्य या संस्थेत सुखी व स्वयंपूर्ण जीवन जगण्यासाठी एकत्रित आलेला समूह, विशिष्ट भूप्रदेश, सरकार, प्रजा आणि बाह्य नियंत्रणापासून मुक्त असलेला समाज स्वतः शासनाची निर्मिती करून त्या शासनाच्या सर्व आज्ञांचे पालन करणारा लोकसमूह म्हणजे राज्य या संस्थेकडे पाहिल्या जाते.म्हणून राज्य या संकल्पनेकडे पाहताना राज्य म्हणजे एक विशिष्ट भूभागावर स्थायिक झालेला असा राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक व्यवस्था असलेला संघ होय. तसेच राज्याला स्वायत्तता असते आणि त्याचे स्वतःचे एक शासन असते.

### राज्याचे मूलभूत घटक

### १. लोकसंख्या:

राज्याचा मूलभूत घटक म्हणजे लोकसंख्या हा आहे. राज्य ही मानवनिर्मित संस्था असल्यामुळे लोकसंख्या हा राज्याचा आत्मा आहे. त्यामुळे लोकसंख्या हा कोणत्याही राज्याच्या अस्तित्वासाठी सर्वात महत्त्वाचा घटक आहे. राज्याला योग्य प्रकारे चालवण्यासाठी, विकासकामे आखण्यासाठी, आणि प्रशासन व्यवस्थित राबवण्यासाठी लोकसंख्येचे स्वरूप, त्याचे वितरण, आणि विविध घटक समजुन घेणे गरजेचे असते.

राज्य निर्मितीसाठी किती लोकसंख्या असावी याबाबत राजकीय विचारवंतामध्ये एकमत नाही. प्लेटोला ५०४०, तर रुसोला १०००० दहा हजार इतकी लोकसंख्या राज्य निर्मितीसाठी महत्त्वाची वाटते. तर ऑरिस्टॉटलच्या मते राज्याची लोकसंख्या ही मर्यादित स्वरूपाची असावी अधिक स्वरूपाची लोकसंख्या असेल तर त्याचे त्या राज्याचे प्रभावीपणे शासन करण्यास अडचणी निर्माण होतील. त्या दृष्टिकोनातून राज्याची लोकसंख्या ही उत्तम शासन होण्यासाठी मर्यादित आणि स्वयंपूर्ण असावी असे सुचविले आहे. वरील विचारवंताची मते पाहता लोकसंख्या किती असावी हा एक चिंतनाचा विषय आहे. आज जगात मोठी लोकसंख्या असलेली चीन, भारत, अमेरिकेसारखी राज्य आहेत, तर कमी लोकसंख्येची

व्हॅटिकन सिटी हे रोम शहरातील स्वातंत्र्य सार्वभौम राज्य आहे. या राज्याची २०२३ मधली अधिकृत लोकसंख्या केवळ ही ७६४ एवढी आहे. याशिवाय कमी लोकसंख्या असलेली स्विझरलँड, इस्त्राइल सारखी अनेक छोटी राज्य या जगात आजही कायम आहेत.

लोकसंख्या म्हणजे एका विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या व्यक्तींची एकत्रित संख्या. ही व्यक्ती राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या त्या राज्याशी जोडलेली असते.

**लोकसंख्येचे महत्त्व**

**राज्याच्या अस्तित्वासाठी:** लोकसंख्या नसल्यास राज्य अस्तित्वात राहू शकत नाही. लोकच शासन आणि प्रशासन चालवण्यासाठी आवश्यक असतात.

**आर्थिक प्रगतीसाठी:** राज्याची अर्थव्यवस्था मुख्यतः लोकसंख्येवर अवलंबून असते. श्रमशक्ती, ग्राहक, आणि उत्पादक हे सर्व लोकसंख्येतूनच निर्माण होतात.

**राजकीय स्थैर्यासाठी:** राज्याची लोकसंख्या राजकीय व्यवस्थेला चालना देते आणि त्याला समर्थ बनवते.

**लोकसंख्येची वैशिष्ट्ये**

**संख्या:** लोकसंख्येचे एकूण प्रमाण राज्याच्या ताकदीचे आणि गरजांचे द्योतक असते.

**घनता:** विशिष्ट प्रदेशात किती व्यक्ती राहतात यावरून त्या प्रदेशाचा विकास आणि संसाधनांचा वापर ठरतो.

**वयाची रचना:** राज्यातील बालकं, युवक, प्रौढ आणि वृद्ध यांची टक्केवारी राज्याच्या विकासासाठी महत्त्वाची असते.

**लिंग गुणोत्तर:** पुरुष आणि महिलांचे प्रमाण राज्याच्या समाजाच्या समतोलावर परिणाम करते.

**शिक्षण:** लोकसंख्येतील साक्षरतेची पातळी राज्याच्या विकासाचे मूलभूत आधार आहे.

**आर्थिक स्थिती:** लोकसंख्येतील गरिबी, बेरोजगारी, आणि उत्पन्न याचे स्वरूप राज्याच्या धोरणांवर परिणाम करते.

**लोकसंख्येवर आधारित राज्यापुढील वेगवेगळी आव्हाने**

**संसाधनांचा ताण:** अधिक लोकसंख्या असलेल्या राज्यात अन्न, पाणी, निवारा, शिक्षण, आणि आरोग्य सेवा यासारख्या संसाधनांवर ताण येतो.

**बेरोजगारी: वाढती** लोकसंख्या रोजगाराच्या संधी कमी करते.

**शहरीकरण:** ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतर झाल्याने झोपडपट्टी समस्या निर्माण होतात.

**पर्यावरणीय प्रभाव:** लोकसंख्येच्या वाढीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो.

**संरक्षण**

**लोकसंख्येचे फायदे आणि तोटे**

**फायदे:**

श्रमशक्तीचा विकास

बाजारपेठ विस्तार

सांस्कृतिक विविधता

**तोटे:**

संसाधनांची टंचाई

आर्थिक ताण

पर्यावरणीय समस्या

लोकसंख्या राज्याच्या विकासासाठी मूलभूत असली तरी ती नियंत्रित आणि संतुलित असणे गरजेचे आहे. राज्याने लोकसंख्येवर आधारित धोरणे तयार करून त्याचा योग्य तो फायदा उचलला पाहिजे. योग्य नियोजनाने लोकसंख्या राज्याच्या प्रगतीचा भाग होऊ शकते. त्यामुळे राज्याच्या निर्मितीसाठी किती लोकसंख्या असावी याबद्दल जी मत मतांतर आहेत त्याबद्दल पाहिल्यास लोकसंख्या किती असावी हा एक दुय्यम प्रश्न आहे. एकंदरीतच लोकसंख्या ही अशी असावी राजाचा भूप्रदेश व साधन सामग्री याचा विचार करता योग्य प्रमाणात त्या त्या राज्याची लोकसंख्या असावी. राज्याची लोकसंख्या कमी आणि जास्त असेल राज्यांपुढे अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण होताना दिसून येतात. एकंदरीतच राज्य पुढचा लोकसंख्येच्या बाबतीतला सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे लोकसंख्या किती असावी यापेक्षा कशी असावी याचा विचार राज्याने केला पाहिजे.

## २. भूप्रदेश

राज्य निर्मितीसाठी भूप्रदेश हा एक महत्त्वाचा आणि मूलभूत घटक आहे. कोणत्याही राज्याचे भौगोलिक स्वरूप, संसाधने, सीमा, आणि निसर्गसंपत्ती या राज्याच्या सक्षमता व स्वावलंबनावर थेट परिणाम करतात. त्यामुळे राज्य निर्मितीतील भूप्रदेशाची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची ठरलेली आहे.

भूप्रदेश म्हणजे राज्याच्या भौगोलिक हद्दीत येणारा भूभाग. या भूभागाला राज्याच्या सार्वभौमतेची ओळख मिळते. राज्याचे नियंत्रण त्या भूभागावर असते आणि तोच भूभाग राज्याच्या आर्थिक, राजकीय, आणि सांस्कृतिक विकासाचा पाया ठरतो.

कोणत्याही समूहाला निश्चित अशा भूप्रदेशाशिवाय स्वतःचे राज्य निर्माण करता येत नाही. वेगवेगळ्या प्रदेशात वास्तव्य करणारे तसेच नेहमी स्थलांतर करणारे लोक राज्य निर्माण करू शकत नाही. राज्य निर्मितीच्या पार्श्वभूमीचा विचार करता पूर्वी लोक टोळ्या करून राहत होते. ह्या टोळ्या नेहमीच वेगवेगळ्या प्रदेशात वास्तव्य करत असल्यामुळे त्यांना स्वतःचे राज्य

निर्माण करता आले नाही. कालांतराने ज्या टोळ्या एका निश्चित अशा विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करून राहिल्या त्या टोळ्यांचे पुढे राज्य निर्माण झाले आहेत.

राज्य अस्तित्वात येण्यासाठी किती प्रदेश असावा याबाबतीतही विचारवंतामध्ये एकमत नाही. राज्याचा प्रदेश किती असावा यापेक्षा कसा असावा ह्याला महत्व दिले जाते. त्यामुळे

राज्य निर्मितीत भूप्रदेशाच्या महत्त्वाच्या विविध पैलूची चर्चा करताना पुढील बाबींना प्राधान्य दिले जाते.

**भूप्रदेशाचे घटक**

**डोंगराळ भाग:** संरक्षण, नैसर्गिक अडथळा, आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा. उदाहरण: नेपाळ, स्वित्झर्लंड.

**समुद्रकिनारे:** व्यापार, नौकानयन, आणि मच्छीमार व्यवसायासाठी उपयुक्त. उदाहरण: भारत, जपान.

**नदीखोऱ्याचा प्रदेश:** शेती आणि जलविद्युत उत्पादनासाठी उपयुक्त. उदाहरण: गंगेचे खोरे, नाईल नदीचे खोरे.

**वाळवंट:** नैसर्गिक अडथळा, परंतु तेलसंपत्ती असलेल्या भागांसाठी महत्त्वाचे. उदाहरण: सौदी अरेबिया.

**पठार:** खनिजसंपत्तीच्या दृष्टीने महत्त्वाचे. उदाहरण: दक्कन पठार.

**जंगलप्रदेश:** जंगलसंपत्ती आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी उपयुक्त. उदाहरण: ब्राझीलमधील ॲमेझॉन क्षेत्र.

**राज्य निर्मितीत भूप्रदेशाचे महत्त्व**

**संपूर्ण हद्दीचे अस्तित्व:** राज्याच्या अस्तित्वासाठी एक निश्चित भूभाग असणे अनिवार्य आहे. हा भूभाग राज्याचे राजकीय आणि प्रशासकीय व्यवहार पार पाडण्यासाठी उपयुक्त ठरतो.

**नैसर्गिक संसाधने:** राज्याच्या भूप्रदेशावर उपलब्ध असलेली नैसर्गिक संपत्ती (माती, पाणी, खनिजे, अन्नस्त्रोत) राज्याच्या आर्थिक स्थैर्याला आधार देते.

**संरक्षणात्मक भूमिका:** राज्याचा भूप्रदेश भौगोलिकदृष्ट्या सुरक्षेसाठी उपयुक्त असतो. उदाहरणार्थ, डोंगराळ प्रदेश संरक्षणासाठी उपयुक्त ठरतो, तर समुद्रकिनारे व्यापारासाठी महत्त्वाचे ठरतात.

**आर्थिक व्यवहार:** राज्याच्या भूप्रदेशावर आधारित शेती, उद्योग, आणि व्यापाराच्या शक्यता ठरवल्या जातात.

**जलस्त्रोत आणि नद्या:** पिण्याचे पाणी, सिंचन, आणि ऊर्जा निर्मिती यासाठी भूप्रदेशावर जलस्त्रोतांची उपलब्धता महत्त्वाची असते.

### भूप्रदेशाचा राज्याच्या विकासावर परिणाम

**आर्थिक विकास:**

- खनिज संपत्तीने उद्योगधंद्यांना चालना मिळते.
- शेतीसाठी सुपीक जमीन महत्त्वाची आहे.
- व्यापारासाठी जलमार्ग आणि बंदरांची उपलब्धता आवश्यक असते.

**राजकीय स्थैर्य:**

- नैसर्गिक सीमा (उदा. पर्वत, नद्या) संरक्षणासाठी उपयुक्त ठरतात.
- खुल्या सीमा असलेल्या राज्यांना आक्रमणाचा धोका जास्त असतो.

**सांस्कृतिक प्रभाव:** भूप्रदेशावर आधारित लोकसंस्कृती निर्माण होते. उदाहरणार्थ, हिमालयातील लोकांचे जीवनशैली डोंगराळ भागावर आधारित आहे.

**पर्यावरणीय प्रभाव:** राज्याचा भूप्रदेश पर्यावरणीय संवेदनशीलतेला ठरवतो. उदा. ज्वालामुखीप्रवण भाग, वाळवंट.

### राज्यनिर्मितीतील भूप्रदेशाशी निगडीत आव्हाने

**संसाधनांचा तुटवडा:** वाळवंटी किंवा वाळूची जमीन शेतीसाठी अयोग्य ठरते.

**प्राकृतिक आपत्ती:** भूंकप, पूर, ज्वालामुखी, आणि वादळामुळे राज्याचा भूप्रदेश धोक्यात येऊ शकतो.

**सीमावाद:** अनिश्चित सीमेमुळे शेजारील देशांसोबत वाद निर्माण होऊ शकतो.

**जलस्रोतांचे योग्य नियोजन:** नद्यांचा अयोग्य वापर राज्याच्या आर्थिक प्रगतीला अडथळा निर्माण करू शकतो.

भूप्रदेश हा राज्याच्या स्थैर्य, विकास, आणि संरक्षणाचा कणा आहे. योग्य भौगोलिक स्थिती असलेले राज्य वेगाने विकसित होऊ शकते, तर प्रतिकूल भूप्रदेश असलेल्या राज्यांना विविध आव्हानांना सामोरे जावे लागते. राज्याने आपल्या भूप्रदेशाचा उपयोग करून संसाधनांचे शाश्वत नियोजन करणे महत्त्वाचे आहे.

### ३. शासन किंवा सरकार

राज्यनिर्मितीमध्ये शासन (Government) किंवा सरकार हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. राज्य हे अमृत संकल्पना आहे तर शासन ही संकल्पना हे मूर्त स्वरूपात आहे.शासन म्हणजे त्या संस्था, यंत्रणा, आणि पद्धतींची एकत्रित रचना आहे, जी राज्याच्या प्रशासनासाठी जबाबदार असते. यामध्ये कायदे बनवणे, न्यायदान करणे, संरक्षण, आणि राज्याच्या संसाधनांचे व्यवस्थापन यांचा समावेश होतो.शासन हा राज्याचा तो घटक आहे जो राज्याचे प्रशासन चालवतो, कायद्याची अंमलबजावणी करतो, आणि राज्यातील नागरिकांच्या

कल्याणासाठी काम करतो. म्हणजेच राज्याचे उद्देश पूर्ण करण्याचे काम शासन या घटकाच्या माध्यमातून केल्या जाते.

राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम ही शासनामार्फत केल्या जाते. राज्यातील विविध संघटना, संस्था, मनुष्याचे वर्तन यावर शासन व्यवस्था नियंत्रण ठेवत असते. शासनाशिवाय लोक संघटित राहू शकत नाहीत.प्रत्येक शासनाचे स्वरूप वेगवेगळ्या राज्यांमध्ये त्यांच्या राजकीय प्रणाली आणि राज्यघटनेनुसार बदलत असते ते पुढील प्रमाणे

**लोकशाही शासन (Democratic Government):**

- नागरिकांना प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार असतो.
- उदा. भारत, अमेरिका.

**राजेशाही शासन (Monarchy):**

- राज्याचा राजा किंवा राणी हा सर्वोच्च नेता असतो.
- उदा. सऊदी अरेबिया, इंग्लंड(प्रतीकात्मक).

**तानाशाही शासन (Dictatorship):**

- सर्व अधिकार एका व्यक्तीच्या हातात असतो.
- उदा. उत्तर कोरिया.

**साम्यवादी शासन (Communist Government):**

- उत्पादनाचे व संपत्तीचे नियंत्रण सरकारच्या हातात असते.
- उदा. चीन, क्युबा.

शासन संस्थेचे स्वरूप वेगवेगळ्या पद्धतीने जरी असले तरी कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ, न्याय मंडळ यातून अंगांच्या माध्यमातून शासन संस्था आकार घेते. शासन संस्थेच्या हाती सत्ता असल्यामुळे या सत्तेचा प्रभाव आणि त्या प्रभावाच्या माध्यमातून निर्माण केलेले कायदे व त्या कायद्याची लोकांकडून पालन करण्यासाठी नियंत्रण ठेवली जाणारी व्यवस्था म्हणून शासनाकडे पाहिल्या जाते.

**शासनाचे महत्त्व**

**कायदा व सुव्यवस्था निर्माण करणे:**

- शासन राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम करते.

**नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण:**

- शासनाच्या माध्यमातून राज्य नागरिकांना त्यांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण देते.

**संसाधनांचे व्यवस्थापन:**

- शासन राज्यातील नैसर्गिक व मानवी संसाधनांचे नियोजन आणि व्यवस्थापन करते.

**सामाजिक कल्याण:**

- शासन आरोग्य, शिक्षण, रोजगार, आणि इतर कल्याणकारी योजना राबवते.

**राष्ट्रीय संरक्षण:**

- राज्याच्या संरक्षणासाठी शासन लष्कर, पोलीस, आणि सुरक्षा यंत्रणा उभारते.

**आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मैत्री व तह करार करणे**

- दोन राज्यांमध्ये संबंध कसे असावे यांचे नियंत्रण हे शासन व्यवस्थेमार्फत केल्या जाते.

**चांगल्या शासनासाठी आवश्यक तत्त्वे**

**पारदर्शकता (Transparency):** शासनाचे कार्य पारदर्शक असावे.

**उत्तरदायित्व (Accountability):** शासनाने जनतेपुढे उत्तरदायित्व स्वीकारले पाहिजे.

**नागरिकांचा सहभाग (Public Participation):**

**शासनाच्या धोरणांत नागरिकांचा सक्रीय सहभाग आवश्यक आहे.**

**न्याय आणि समानता:सर्व नागरिकांना समान हक्क व न्याय मिळाला पाहिजे.**

**एकंदरीतच शासनाची निर्मिती आणि बरखास्ती ही त्या त्या राज्याच्या प्रचलित नियमानुसार होत असते. राज्याच्या अस्तित्वावरच शासनाचे भवितव्य ठरत असल्यामुळे** शासन हा राज्याच्या अस्तित्वाचा कणा आहे. त्याचे स्वरूप, कार्यपद्धती, आणि उद्दिष्टे राज्याच्या प्रगतीसाठी निर्णायक ठरतात. चांगले शासन केवळ कायद्यांची अंमलबजावणी करत नाही तर सामाजिक कल्याण साधून मूलभूत तत्त्वांचे पालन करत असते.

**४. सार्वभौमत्व**

राज्याचा सार्वभौमत्व हा एक मूलभूत आणि अपरिहार्य घटक आहे. सार्वभौमत्व म्हणजे राज्याची संपूर्ण स्वतंत्रता आणि सर्वोच्चता, ज्याद्वारे राज्य स्वतःच्या हद्दीत कोणत्याही बाह्य हस्तक्षेपाविना स्वायत्तपणे शासन करते. सार्वभौमत्वाच्या आधारे राज्या अंतर्गत सर्व नागरिक, संस्था, संघटना यावर राज्याची पूर्णपणे नियंत्रण असते. राज्यांतर्गत लोकांचे हित साधने व कायदे करण्याचा अधिकार हा सार्वभौमत्वामुळे त्या राज्याला प्राप्त होतो. त्यामुळे सार्वभौम ही त्या त्या राज्याची सर्वोच्च आणि सर्वश्रेष्ठ सत्ता असते. त्यामुळे सार्वभौमत्वाच्या संदर्भात अंतर्गत सार्वभौमत्व आणि बाह्य सार्वभौमत्वाचा विचार हा केला जातो.

**अंतर्गत सार्वभौमत्व:** राज्याच्या आत कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेपेक्षा शासन हे सर्वोच्च असते.

उदा. कायद्याची अंमलबजावणी, शासन यंत्रणा.

**बाह्य सार्वभौमत्व:**इतर कोणत्याही परकीय शक्तीपासून स्वतंत्रता.उदा. राज्याच्या बाह्य व्यवहारांमध्ये स्वायत्तता.

**सार्वभौमत्वाचे मुख्य तत्त्वे**

**सर्वोच्चता:**

- राज्याच्या हद्दीत कोणताही व्यक्ती, संस्था किंवा संघटना राज्याच्या कायद्यापेक्षा वरचढ ठरत नाही.

**अखंडता:**

- सार्वभौमत्व राज्याच्या हद्दीत संपूर्ण प्रभावशील असते.

**स्वतंत्रता:**

- कोणत्याही बाह्य शक्तीच्या हस्तक्षेपाशिवाय निर्णय घेण्याचा अधिकार.

**अखंड सार्वभौमत्व:**

- राज्याचा सार्वभौमत्व अंशतः किंवा पूर्णतः हस्तांतरित करता येत नाही.

सार्वभौमत्वाची मुख्यत्वे पाहता राज्याचे सार्वभौमत्व हे त्या त्या भूप्रदेशापुरते मर्यादित असते. राज्यातील व्यक्ती, संस्था, संघटना यावर राज्याची अंतिम सत्ता असते. राज्यातील या सर्वांना राज्याची सत्ता आणि अधिमान्यता पाळावीच लागते. त्यामुळे सार्वभौमत्वचा विचार सार्वभौमत्व हा राज्याचा आत्मा ठरतो.

**सार्वभौमत्वाचे महत्त्व**

**राज्याचे अस्तित्व:**

- सार्वभौमत्वाशिवाय राज्य अस्तित्वात राहू शकत नाही.

**स्वतंत्र निर्णयक्षमता:**

- राज्याला त्याच्या धोरणांसाठी बाह्य दबावाशिवाय निर्णय घेण्याचा अधिकार मिळतो.

**नागरिकांवरील नियंत्रण:**

- नागरिकांनी राज्याच्या कायद्यांचे पालन करणे अनिवार्य ठरते.

**राष्ट्रीय सुरक्षा:**

- सार्वभौमत्वामुळे राज्याला स्वतःचे संरक्षण यंत्रणा उभारण्याचा अधिकार मिळतो.

**आंतरराष्ट्रीय ओळख:**

- सार्वभौमत्व असलेले राज्यच आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळखले जाते.

**सार्वभौमत्वाशी निगडीत आव्हाने**

**देशांतर्गत बंडखोरी:** उदा. विभाजनवादी चळवळी.

**विदेशी हस्तक्षेप:** उदा. लष्करी किंवा आर्थिक दबाव.

**जागतिक संकटे:** उदा. हवामान बदल, साथीचे रोग.

**आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन: आंतरराष्ट्रीय कायदे सार्वभौमत्वावर मर्यादा घालतात.**

सार्वभौमत्व हा राज्याच्या अस्तित्वाचा कणा आहे. परंतु, आधुनिक युगात जागतिकीकरण, मानवी हक्कांचे रक्षण, आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यामुळे सार्वभौमत्वाच्या संकल्पनेत बदल होत आहे. या बदलांमुळे सार्वभौमत्व आणि जागतिक उत्तरदायित्व यामध्ये संतुलन राखणे आवश्यक झाले आहे.

राज्य म्हणजेच एका विशिष्ट भूभागावर लोकांची संघटना, जी त्यांच्या कल्याणासाठी कायदे तयार करते, त्यांची अंमलबजावणी करते आणि न्याय देते. राज्य एक वैधानिक संस्था म्हणून काम करते. राज्य निर्मितीसाठी लोकसंख्या, भूप्रदेश, शासन आणि सार्वभौमत्व हे चार घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत.

**राज्यसंस्थेच्या उदयाचा परिणाम**

१. **सुव्यवस्था:**

- राज्यसंस्थेमुळे समाजात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित झाली.

२. **सुरक्षितता:**

- संरक्षणासाठी एक सुसज्ज लष्कर आणि पोलीस व्यवस्था उभारली गेली.

३. **न्याय आणि कायदा:**

- नागरिकांना न्याय देण्यासाठी न्यायालय आणि कायद्यांची निर्मिती झाली.

४. **आर्थिक प्रगती:**

- व्यापार, शेती, आणि संसाधनांचे नियोजन सोपे झाले.

५. **सामाजिक विकास:**

- शिक्षण, आरोग्य, आणि कला यांचा विकास झाला.

राज्यसंस्थेचा उदय हा मानवाच्या गरजा आणि समस्यांमधून झाला आहे. समाजाच्या सुरक्षितता, सुव्यवस्था, आणि विकासासाठी राज्यसंस्था अपरिहार्य ठरली. राज्यसंस्थेचा विकास हा एक ऐतिहासिक प्रवास आहे, जो आजही चालू आहे, आणि त्याने मानवी जीवनात स्थैर्य आणि प्रगती आणली आहे.

## १.३.२ राज्याचा उदारमतवादी सिद्धांत

राज्यसंस्थेचा उदय मुख्यतः स्वाभाविक गरजांमधून आणि समाजाच्या विकासामधून झाला असला तरीही राज्याची उत्पत्ती कशी झाली याबाबतीत विचारवंता मध्ये एकमत नाही. राज्य निर्मितीची प्रक्रिया ही दैवी सिद्धांतापासून सांगितल्या गेलेली आहे. या सिद्धांतामध्ये राज्य एक दैवी संस्था आहे हे मान्य केल्या गेले आहे. कारण जनतेच्या हितासाठी ईश्वराने राज्याची निर्मिती केली आहे हा विचार या सिद्धांताने पुढे आणला आहे. हा सिद्धांत काही काळाने मागे पडल्यानंतर राज्याचा उत्पत्तीचा शक्ती सिद्धांत पुढे आला. या सिद्धांतात बळाचा वापर करून राज्य निर्माण केल्या गेले आहे हा विचार मांडण्यात आला आहे. कालांतराने हाही विचार मागे पडला गेला आणि सतराव्या व अठराव्या शतकात युरोपामध्ये राज्याच्या निर्मितीचा सामाजिक कराराचा सिद्धांत पुढे आला. या सिद्धांतानुसार लोकांनी एकत्र येऊन करार करून राज्य निर्माण केले आहे हा विचार प्रतिपादित केलेला आहे. त्यानंतर राज्याच्या ऐतिहासिक आणि विकासवादी सिद्धांत पुढे येऊन राज्याची निर्मिती ही दैवी सिद्धांत किंवा सामाजिक कराराच्या माध्यमातून झाली नाही राज्य हे विकासाचा परिणाम आहे, राज्याची उत्पत्ती क्रमिक विकासातून झाली आहे हा विचार या सिद्धांतात मांडला गेला आहे. पुढे राज्याच्या विकासाचा पितृसत्ताक आणि मातृसत्ताक सिद्धांत पुढे आला.

पुढे सतराव्या व आणि अठराव्या शतकात युरोपात मोठ्या प्रमाणात प्रबोधन झाले. या प्रबोधनाच्या माध्यमातून व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, समानता आणि तर्कशुद्ध विचारसरणीवर आधारित अनेक विचारवंतांनी राजकीय व सामाजिक विचारांच्या माध्यमातून व्यक्तीच्या मूलभूत हक्कांना प्राधान्य दिले. त्यातून उदारमतवाद हा विचार पुढे येऊन स्वातंत्र्य, समता, मानवाधिकार, आणि सकलमानव कल्याण या तत्त्वांवर आधारित राजकीय, आर्थिक, आणि सामाजिक विचारसरणीचा आहे, उदारमतवाद (Liberalism) हा विचार प्रवाह रूढ झाला.

Liber हा इंग्रजी शब्द 'Liberalise' या लॅटिन शब्दापासून निर्माण झाला आहे. Liberal, Liberty, Liberation, Libertine, Liberalism अशा अनेक नावाने ओळखला जातो ज्याचा मूळ अर्थ 'स्वातंत्र्य' किंवा 'बंधनातून मुक्ती' असा होतो. 'Liberal' हे विशेषण अशा व्यक्ती किंवा सिद्धांताशी जोडला जाते जे व्यक्ती स्वातंत्र्याचे समर्थन करतात.

उदारमतवादी दृष्टिकोनाने राज्याकडे पाहण्याची महत्त्वपूर्ण दृष्टी विकसित केली आहे. ज्यामध्ये स्वतंत्रता, व्यक्तिस्वातंत्र्य, विवेकशीलता व सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक स्वातंत्र्याचे समर्थन करून आधुनिकता व प्रगतीचे समर्थन करतात.

व्यक्ती स्वातंत्र्यास सर्वोच्च मूल्य देणारी व व्यक्तीस जास्तीत जास्त स्वातंत्र्य मिळेल या दृष्टिकोनातून राज्याची निर्मिती करणे हे या विचाराचे मूलभूत तत्व आहे.

उदारमतवादी विचार हा व्यक्तीच्या प्रतिष्ठा व नैतिक मूल्यांना महत्त्व देतो. या विचारात व्यक्ती स्वातंत्र्यास अंतिम मूल्य मानल्यामुळे सामाजिक राजकीय, आर्थिक, संस्थांचे व्यक्तीवर लादण्यात येणार येणारी बंधन या विचाराला मान्य नाहीत. त्या दृष्टीने उदारमत्व त्यांनी राज्यसंस्था, धर्मसंस्था व परंपरागत सत्ता आहेत त्या सत्तेला विरोध केल्याचे दिसून येते.

उदारमतवादी विचाराचा मूळ आधार हा व्यक्ती आहे आणि ते व्यक्तीला साध्य मानतात तर राज्याला ते साधन म्हणतात. उदारमतवादा नुसार व्यक्तीचा भौतिक, बौद्धिक आणि

अध्यात्मिक कल्याण हे व्यक्तीच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण अंग आहे त्या दृष्टिकोनातून समाज आणि राज्य हे साधन आहेत कारण व्यक्तीच्या विकासासाठी उपयुक्त पडणाऱ्या सर्व बाबींची पूर्तता करण्याच्या संदर्भात ते सहाय्यक ठरणारे आहेत.

**उदारमतवादी विचारांचे मूलभूत आधार**

- व्यक्ती स्वातंत्र्य व नागरी अधिकाराला जास्तीत जास्त महत्त्व देणे.
- व्यक्तींना नैसर्गिक अधिकार प्राप्त झालेले आहेत त्याचे रक्षण केले पाहिजे.
- नैसर्गिक हक्कांवर मर्यादा आणून नयेत.
- व्यक्तीच्या अधिकार आणि हक्काचे संरक्षण करण्याची जबाबदारी ही राज्याची आहे.
- व्यक्ती विकासासाठी राज्य हे निर्माण झालेले आहे.
- जगातील सर्व मानवांचे हक्क आणि कर्तव्य समान आहेत त्यामुळे हक्क आणि कर्तव्याची जाणीव करून दिली पाहिजे.

**उदारमतवादाचे राज्यविषयक तत्वज्ञान**

१. **व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार:** प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याने विचार, मत आणि कृती करण्याचा अधिकार असावा. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी व्यक्ती स्वातंत्र्याची आवश्यकता असते. राज्याने कोणत्याही विशिष्ट वर्गाचे हितसंबंधना महत्व न देता व्यक्तीच्या जीवनात कमीत कमी हस्तक्षेप करावा हा विचार मांडला आहे.

२. **लोकशाही आणि कायद्याचे राज्य:** सरकार लोकांच्या सहमतीने चालले पाहिजे आणि प्रत्येकाला कायद्यापुढे समान वागणूक मिळाली पाहिजे. तसेच शासनामध्ये व्यक्तीला महत्त्व न देता कायद्यांना महत्त्व दिले पाहिजे यावर भर देतात. शासक वर्ग हा कायद्यांना मानणारा असला पाहिजे. तसेच व्यक्तीच्या विकासासाठी व प्रतिष्ठेसाठी प्रत्येक व्यक्तीला राजकारणात सहभागी होण्याची संधी दिली पाहिजे. शासनात जास्तीत जास्त लोकांचा सहभाग करून घेऊन सरकार निवडण्याचा व त्यांना परत बोलण्याचा अधिकार हा जनतेला दिला पाहिजे.

३. **अर्थव्यवस्थेतील स्वातंत्र्य:** उदारमतवादी विचारानुसार राज्याचा व्यक्तीच्या आर्थिक क्षेत्रातील हस्तक्षेप कमी असावा. प्रत्येक व्यक्तीला आपल्या आवडीप्रमाणे व्यवसाय करण्याचे तसेच त्याच्या कुवतीप्रमाणे उत्पन्न प्राप्त करण्याची संधी ही राज्यांने उपलब्ध करून दिली पाहिजे.

४. **समानता:** राज्याने जाती, लिंग, धर्म इत्यादींमध्ये भेदभाव न करता सर्वांना समान हक्क द्यावेत.

५. **धार्मिक सहिष्णुता:** प्रत्येकाला आपल्या आवडीनुसार धर्माची निवड करण्याचे स्वातंत्र्य असावे. राज्याने धर्मनिरपेक्षतवादाचा विचार स्वीकारला पाहिजे हा विचार मांडला आहे. उदरमत्वानुसार राज्याचा कोणताही धर्म नसला पाहिजे. राज्याने

आपल्या सर्व नागरिकांना पूर्णपणे धार्मिक स्वातंत्र्य दिले पाहिजे. धर्माच्या आधारावर राज्याने नागरिकांमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये.

६. **राज्य हे नैसर्गीक नाही तर कृत्रिम आहे:** उदारमतवादी समाज आणि राज्याला नैसर्गिक न मानता समाज आणि राज्याची निर्मिती व्यक्तींनीच आपल्या विशेष आवश्यक बाबींच्या पूर्ततेसाठी केलेली आहे. राज्य हे व्यक्तीच्या विकासाचे साधन आहे. जनतेने आपल्या उद्देशांच्या पूर्ततेसाठी राज्याची निर्मिती केलेली आहे त्यामुळे राज्यांचा उद्देश हा व्यक्तीच्या विकास करणे हा असला पाहिजे यावर भर दिला आहे. त्यामुळे राज्याचे स्वरूप हे नैसर्गिक नाही तर कृत्रिम असल्याचे उदारमतवादी सांगतात.

७. **व्यक्तीच्या नैसर्गिक अधिकारांचे रक्षण:** उदारमत्वादानुसार व्यक्ती हे जन्मताच स्वातंत्र आहेत आणि त्या व्यक्तींना जन्मतःच काही अधिकार प्राप्त होतात. त्यामध्ये जीवन जगण्याचा, संपत्तीचा अधिकाराचा प्रामुख्याने समावेश होतो. त्यातूनच जॉन लॉकने नैसर्गिक अधिकाराचा सिद्धांत मांडलेला आहे. राज्याची उत्पत्ती ही नैसर्गिक अधिकारांच्या रक्षणासाठी झाली आहे हा विचार उदारमतवाद्यांनी पुढे आणला आहे.

८. **राज्य हे व्यक्ती विकासाचे साधन आणि अहस्तक्षेप धोरण:** राज्य हे व्यक्तीच्या विकासाचे साधन असल्यामुळे राज्याचने व्यक्तीच्या व्यक्तिगत, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व इतर क्षेत्रात हस्तक्षेप करण्याची गरज नाही. राज्याचे प्रमुख काम हे व्यक्तीच्या जीवनाचे व संपत्तीचे रक्षण करणे एवढ्या पुरतेच मर्यादित आहे. त्यासाठी राजाने कायदे करावे व आपल्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली पाहिजे असे उदारमतवाद्यांना वाटते.

९. **आंतरराष्ट्रीय आणि जागतिक शांततेचा विश्वास:** आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राज्याने इतर राष्ट्रांशी सामंजस्याची व सहकार्याने वागण्याची भूमिका घेतली पाहिजे. प्रत्येक राज्याने आपली शांततापूर्वक प्रगती केली पाहिजे व त्याच दृष्टिकोनातून इतर राज्यांनाही सहकार्य केलं पाहिजे. वैमनस्यत्वाची भावना ही कोणत्याही राज्यांमध्ये नसली पाहिजे त्यासाठी आंतरराष्ट्रीय नैतिकता आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांचा स्वीकार हा राज्यांनी स्वीकारला पाहिजे.

### राज्याच्ये उद्देश आणि कार्यासंबंधी उदारमतवादी विचार

राज्याच्या स्वरूपाविषयी आणि कार्याविषयी उदारमतवाद्यांचा एकदृष्टिकोन कायमस्वरूपी राहिलेला नाही. स्थळ परिस्थितीनुसार उदारमतवाद्यांच्या विचारांमध्ये काही बदल झालेले आहेत. त्या दृष्टिकोनातून पारंपारिक उदारमतवाद आणि आधुनिक लोकशाही उदारमतवाद हे दोन विचार पुढे आलेले आहेत.

### पारंपारिक उदारमतवाद

पारंपरिक उदारमतवादाचे स्वरूप हुकूमशाही शासन आणि व्यवस्थेच्या विरोधातील एक स्वतंत्र आंदोलनाच्या स्वरूपात राहिलेले आहे. जॉन लॉक आणि जॉन स्टुअर्ट मिल हे पारंपारिक उदारमतवादाचे प्रतिनिधिक विचारवंत म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. तर

हॉब्जहाऊस यांनी **उदारवाद** या ग्रंथात पारंपारिक उदारमतवादाचे नऊ मूलभूत सिद्धांत सांगितले आहेत ते पुढील प्रमाणे.

नागरिक स्वातंत्र्य Civil Liberty, वित्तीय स्वातंत्र्यCivil Liberty, व्यक्तिगत स्वातंत्र्य, सामाजिक स्वातंत्र्य social Liberty, आर्थिकस्वातंत्र्य economic Liberty, पारिवारिक स्वातंत्र्य Domestic Liberty, जातीय किंवा राष्ट्रीय स्वातंत्र्य R and national Liberty, आंतरराष्ट्रीय स्वातंत्र्य International Liberty , राजनीतिक स्वातंत्र्य Political Liberty.

पारंपारिक उदारमतवादाची ही तत्त्वे डोळ्यांसमोर ठेवून, याला ब-याच अंशी व्यक्तिवादाचे समर्थन करणारे सहयोगात्मक तत्त्वज्ञान म्हणता येईल. उदारमतवादी दृष्टिकोनात, राज्य नागरिकांच्या स्वातंत्र्याचे रक्षक असतो. राज्य व्यक्तीच्या स्वातंत्र्याला संरक्षण देण्यासाठी, न्यायाचे प्रशासन करण्यासाठी आणि कायद्याचे राज्य राखण्यासाठी अस्तित्वात असते. राज्य नागरिकांना त्यांच्या हक्कांचा आणि स्वातंत्र्याचा पुरवठा करण्याचे काम करते. परंतु, राज्य हे व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे अतिक्रमण न करता हे काम करण्याचे ध्येय ठेवते.

**आधुनिक उदारमतवादाचा विकास**

उदारमतवादाच्ये पारंपारिक स्वरुपात १९व्या शतकाच्या मध्यापर्यंत प्रचलित राहिले, परंतु त्यानंतर बदलत्या परिस्थितीनुसार उदारमतवादाचे स्वरूप बदलत गेले. १८६० पर्यंत, बहुतेक उदारमतवादी लोकशाही आणि आर्थिक आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप या धोरणांवर विश्वास ठेवत होते,

परंतु तोपर्यंत परिस्थिती काही प्रमाणात बदलली होती आणि वेगाने बदलत होती. आर्थिक क्षेत्रातील अहस्तक्षेप नीतीच्या परिणामाचा विचार करता ज्यांच्याकडे ज्याच्याकडे संपत्ती नाही अशा कामगार वर्गांसाठी हे धोरण अत्यंत वाईट राहिले त्यातूनच गरीब लोकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी राज्याने आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप करणे अत्यंत आवश्यक बनले. याशिवाय दुसरी गोष्ट अशी होती की ब्रिटन हे उदारमतवादाचे माहेरघर आहे. ब्रिटनमध्ये मतदानाच्या अधिकाराचा हळूहळू विस्तार होत असल्याने तेथील राजकीय पक्षाला राजकीय वर्चस्व मिळवणे गरीब वर्गांकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक झाले होते. गरीब, संसाधनहीन आणि अशिक्षित लोक त्यांच्या हिताचे रक्षण करू शकत नाहीत आणि श्रीमंत वर्ग त्यांचे शोषण करण्याचा प्रयत्न करतो, असे या नवउदारमतवाद्यांकडून सांगण्यात आले. त्यामुळे सार्वजनिक हिताची सर्व शक्य कामे सरकारी क्षेत्रांतर्गत यायला हवीत. या दृष्टिकोनातून, उदारमतवाद्यांनी सरकारी शाळा, दारूबंदी, बाल आणि कामगार मजुरांचे नियमन, कामगारांसाठी भरपाई प्रणाली इत्यादींना पाठिंबा देण्यास सुरुवात केली. यानंतर त्यांनी राज्याने व्यवसाय, वृद्धापकाळासाठी निवृत्ती वेतन योजना आणि बेरोजगारी व आजार विमा योजना अंगीकारल्या पाहिजेत यावर भर दिला. अशा प्रकारे, १९व्या शतकाच्या मध्यापर्यंत, उदारमतवाद राज्याचे कार्यक्षेत्र हे मर्यादित असले पाहिजे या बाजूने होते परंतु त्यानंतर, उदारमतवादाने राज्याच्या कार्यक्षेत्रामध्ये हळूहळू वाढ करण्याचा पुरस्कार केला. उदारमतवादी विचाराच्या या नवीन मॉडेलची सुरुवात थॉमस हिल ग्रीन यांच्यापासून झाली.

**थॉमस हॉब्ज (Thomas Hobbes)** एक इंग्लिश विचारवंत होते, ज्यांनी आपल्या "लेविअथन" (Leviathan) या प्रसिद्ध ग्रंथामध्ये राज्य आणि सत्तेविषयी आपले विचार

मांडले. त्यांच्या राज्यविषयक विचारांना "सामाजिक कराराचा सिद्धांत" (Social Contract Theory) म्हणून ओळखले जाते. सामाजिक कराराचा सिद्धांतात हॉब्जने राज्याच्या अधिकार व कर्तव्याची चर्चा केलेली केली होती.

हॉब्सच्या मते, मानवी स्वभावात स्वार्थीपणा असतो, आणि प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या हितासाठी कार्य करते. त्यांनी मानवाच्या नैसर्गिक अवस्थेला (State of Nature) "सर्वांशी सर्वांचे युद्ध" (War of All Against All) असे संबोधले.या अवस्थेत "जीवन दारिद्र्यपूर्ण, दु:खदायक, क्रूर आणि अल्पायुषी" (nasty, brutish, and short) होते.

हॉब्सच्या मते, नैसर्गिक अवस्थेतील असुरक्षिततेपासून वाचण्यासाठी लोक एकमेकांशी करार करतात आणि आपले काही अधिकार एका सार्वभौम सत्तेकडे हस्तांतरित करतात. हा करार म्हणजेच राज्याची स्थापना होय.हॉब्सने एका मजबूत आणि केंद्रीकृत सत्तेची कल्पना केली, सार्वभौम सत्ता ही अमर्याद असावी, म्हणजेच या सत्तेवर कोणतेही बंधन किंवा नियंत्रण नसावे. ही सत्ता लोकांची सुरक्षा सुनिश्चित करते आणि कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करते.हॉब्जच्या मते, राज्याचे मुख्य उद्दिष्ट लोकांचे जीवन, संपत्ती, आणि स्वातंत्र्य यांचे संरक्षण करणे आहे.लोकांनी सार्वभौम सत्तेच्या आज्ञा पाळल्या पाहिजे, कारण केवळ तीच त्यांना नैसर्गिक अवस्थेतील असुरक्षिततेपासून वाचवू शकते.हॉब्जने लोकशाहीपेक्षा राजेशाहीला किंवा एकाधिकारशाहीला (Absolute Monarchy) प्राधान्य दिले. त्याच्या मते, लोकशाहीमुळे अस्थिरता येऊ शकते. हॉब्जने धार्मिक आणि राजकीय सत्तेचे एकत्रीकरण समर्थित केले, कारण वेगवेगळ्या सत्तांमुळे गोंधळ निर्माण होऊ शकतो हा विचार मांडतांना हॉब्जने व्यक्तिगत स्वातंत्र्याला मर्यादा घातली, कारण सार्वभौम सत्तेच्या आदेशाला न जुमानल्यास अराजकता निर्माण होऊ शकते.थॉमस हॉब्जने राज्याला एक अपरिहार्य संस्था मानले, जी मानवाच्या स्वार्थी आणि अस्थिर स्वभावावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक आहे. त्यांचे विचार एकाधिकारशाहीला पाठिंबा देणारे होते, पण त्याच वेळी त्यांनी राज्याची एक आधुनिक संकल्पना मांडली, जी आजही महत्त्वाची मानली जाते.

**जॉन लॉक (John Locke)** हा इंग्लंडमधील एक प्रख्यात विचारवंत होता, ज्याला "आधुनिक उदारमतवादाचा जनक" (Father of Modern Liberalism) म्हणून ओळखले जाते. त्याचे राज्यविषयक विचार मुख्यतः "सामाजिक कराराचा सिद्धांत" (Social Contract Theory) आणि "नैसर्गिक हक्कांचे तत्वज्ञान" (Natural Rights Philosophy) यावर आधारित आहेत. जॉन लॉक ने राज्यसंबंधीचा हॉब्जचे विचार नाकारत राज्यसंबंधी पुढील विचार मांडले आहेत.

लॉकच्या मते, मानवाचे नैसर्गिक स्वभाव तर्कसंगत (Rational), स्वतंत्र (Free), आणि समान (Equal) आहे.लोक नैसर्गिक अवस्थेत (State of Nature) स्वाभाविकपणे शांततामय आणि स्वातंत्र्यप्रिय असतात, परंतु काही वेळा स्वार्थामुळे संघर्ष होऊ शकतो.लॉकने सांगितले की प्रत्येक व्यक्तीकडे जीवन (Life), स्वातंत्र्य (Liberty), आणि संपत्ती (Property) हे नैसर्गिक हक्क असतात.हे हक्क कोणत्याही राज्याने किंवा व्यक्तीने हिरावून घेऊ नयेत.लॉकच्या मते, लोक नैसर्गिक अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी एकमेकांशी करार करतात.हा करार स्वतंत्र व्यक्तींमध्ये होतो, ज्यामध्ये ते एकत्र येऊन राज्य निर्माण करतात, जे त्यांचे नैसर्गिक हक्क सुरक्षित ठेवेल.राज्याचे मुख्य उद्दिष्ट लोकांचे नैसर्गिक

हक्कांचे संरक्षण करणे आहे.जर राज्य लोकांचे हक्क काढून घेते किंवा अत्याचार करते, तर लोकांना राज्याविरुद्ध उठाव करण्याचा अधिकार आहे.लॉकच्या मते, राज्याला सत्ता लोकांच्या सहमतीने (Consent of the Governed) मिळते.

सत्तेचा आधार लोकच असतात, आणि त्यामुळे राज्य लोकांसमोर जबाबदार असते.त्यातूनच लॉकने राज्यासाठी प्रतिनिधीक लोकशाही (Representative Democracy) चा आधार दिला, जिथे लोक निवडलेल्या प्रतिनिधींमार्फत आपले सरकार चालवतात.लॉकच्या मते, संपत्ती हा नैसर्गिक हक्क आहे, जो व्यक्तीच्या श्रमावर आधारित असतो.संपत्तीचे संरक्षण हे राज्याचे एक महत्त्वाचे कार्य आहे.

राज्याचे अधिकार मर्यादित असावे, राज्याने लोकांच्या मूलभूत हक्कांमध्ये हस्तक्षेप करू नये.राज्याचे अस्तित्व हे लोकांच्या भल्यासाठीच असावे. असे विचार राज्यविषयक मांडले आहेत

लॉकचे हे विचार आधुनिक लोकशाही व्यवस्थेचे आधारस्तंभ मानले जातात.अमेरिकेचा स्वातंत्र्य घोषणापत्र (American Declaration of Independence) आणि फ्रेंच राज्यक्रांतीचा लॉकच्या विचारांचा मोठा प्रभाव

होता.त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्य, मानवाधिकार, आणि लोकशाही मूल्यांना अधोरेखित केले.

जॉन लॉकच्या मते, राज्य ही लोकांच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणारी संस्था आहे. लोकशाही, सत्तेचे विभाजन, आणि मर्यादित सरकार या त्यांच्या कल्पना आधुनिक राज्यव्यवस्थेच्या मुळाशी आहेत. त्यांच्या विचारांनी लोकांच्या हक्कांचे संरक्षण आणि राज्याच्या जबाबदारीवर जोर दिला, ज्यामुळे ते उदारमतवादाचे एक महत्त्वाचे आधारस्तंभ ठरले.

**जेरेमी बेंथम (Jeremy Bentham)** हा एक इंग्लिश तत्त्वज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, आणि कायदेपंडित होता. त्याला "उपयोगितावादाचा जनक" (Father of Utilitarianism) म्हणून ओळखले जाते. त्याचे राज्य आणि उदारमतवादाविषयी विचार प्रामुख्याने "उपयोगितावाद" (Utilitarianism) या तत्त्वज्ञानावर आधारित आहेत, ज्यामध्ये त्याने व्यक्तीचे सुख आणि आनंद हे राज्याचे सर्वोच्च उद्दिष्ट मानले गेले आहे.

बेंथमच्या मते, राज्याचे कार्य "जास्तीत जास्त लोकांसाठी जास्तीत जास्त सुख" (Greatest Happiness for the Greatest Number) प्राप्त करणे आहे.राज्याच्या सर्व कृती आणि धोरणांचे मोजमाप सुख-आनंद (Pleasure) आणि दु:ख-वेदना (Pain) याच्या आधारावर केले पाहिजे.राज्य हे लोकांच्या सुखाचा वाढ करण्यासाठी आणि दु:ख कमी करण्यासाठी अस्तित्वात आहे.राज्याने अशा कायद्यांची अंमलबजावणी करावी जे बहुजनांच्या भल्यासाठी उपयुक्त असतील.

बेंथमच्या मते, कायदे हे समाजातील सुव्यवस्था आणि नैतिकता प्रस्थापित करण्याचे साधन आहेत.

योग्य कायद्यांद्वारे लोकांचे वर्तन सुखदायक दिशेने नियंत्रित केले जाऊ शकते.बेंथमने लोकशाहीचे समर्थन केले, कारण ती बहुसंख्याकांच्या हिताचे रक्षण करते.प्रत्येक व्यक्तीचे मत महत्त्वाचे असून सार्वभौम सार्वत्रिक मताधिकार (Universal Suffrage) असावे, असे त्याने सुचवले.

बेंथमने राज्याचा मर्यादित हस्तक्षेप मान्य केला, परंतु राज्याचा हस्तक्षेप आवश्यक असेल तेथे त्याचे समर्थनही केले.राज्याला "न्यूनतम हस्तक्षेपाच्या" (Minimal State) तत्त्वाचे पालन करावे, परंतु लोकांच्या सुखासाठी हस्तक्षेप करणे अपरिहार्य असल्यास ते करू शकते.

बेंथमने व्यक्तिस्वातंत्र्याचा (Individual Liberty) मोठा पुरस्कार केला.व्यक्तींना त्यांच्या इच्छेनुसार वागण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे, परंतु त्याचा समाजावर नकारात्मक परिणाम होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

बेंथमने संपत्तीच्या न्याय्य आणि समतोल वितरणावर भर दिला, कारण विषमता ही समाजातील दु:ख वाढवते.त्याने सामाजिक आणि आर्थिक सुधारणांचे समर्थन केले.

बेंथमच्या मते, कायद्यांचा मुख्य उद्देश व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करणे आहे.राज्याने शिक्षण, आरोग्य, आणि गरिबांसाठी योजनांमध्ये सक्रिय भूमिका बजावावी.बेंथमने शिक्षणाला अत्यंत महत्त्व दिले. त्याच्या मते, शिक्षण समाजातील अज्ञान आणि गैरसमज दूर करण्याचे प्रभावी साधन आहे.त्याने कैद्यांच्या सुधारणा आणि कारागृह व्यवस्थापनासाठीही उपयोगितावादाची तत्वे मांडली.

जेरेमी बेंथमच्या राज्यविषयक विचारांचा पाया उपयोगितावादावर आधारित आहे. त्याच्या मते, राज्य हे लोकांच्या सुखासाठी आहे, आणि राज्याने आपल्या धोरणांद्वारे बहुजनांसाठी सुखदायक आणि न्याय्य परिस्थिती निर्माण केली पाहिजे. बेंथमने व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, आणि न्याय्य संपत्ती वितरण यांना प्राधान्य दिले, ज्यामुळे त्याचे विचार आधुनिक उदारमतवादासाठी महत्त्वाचे आहेत.

**जॉन स्टुअर्ट मिल (John Stuart Mill)** हा एक प्रसिद्ध इंग्लिश तत्त्वज्ञ आणि उदारमतवादी विचारवंत होता. त्याने उदारमतवादाच्या (Liberalism) संकल्पनेला प्रगत आणि व्यापक स्वरूप दिले. त्याच्या राज्यविषयक विचारांमध्ये स्वातंत्र्य, व्यक्तिवाद, लोकशाही, आणि राज्याच्या मर्यादित हस्तक्षेपावर भर दिला गेला आहे. त्याच्या प्रमुख ग्रंथांपैकी "ऑन लिबर्टी" (On Liberty) आणि "युटिलिटेरिअनिझम" (Utilitarianism) यामध्ये त्याचे विचार स्पष्टपणे व्यक्त झाले आहेत.

जॉन स्टुअर्ट मिल यांचे राज्यविषयक विचार पुढील प्रमाणे सांगता येतील.

मिलच्या मते, प्रत्येक व्यक्तीला आपले जीवन आपल्या इच्छेनुसार जगण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे, परंतु त्याच्या कृतींनी इतरांना हानी पोहोचू नये.त्याने "नुकसान सिद्धांत" (Harm Principle) मांडला, ज्यात म्हटले आहे की, राज्याचा हस्तक्षेप फक्त तेव्हाच योग्य आहे, जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या कृतीमुळे दुसऱ्याला नुकसान पोहोचते.

राज्याने व्यक्तीच्या खाजगी जीवनात अनावश्यक हस्तक्षेप करू नये.व्यक्ती स्वतःसाठी काय योग्य आहे हे ठरवण्यास अधिक सक्षम असते.राज्याचे कार्य फक्त "न्याय, सुव्यवस्था, आणि लोकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे" इतकेच मर्यादित असावे.

मिलने मतस्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला अत्यंत महत्त्व दिले. त्याच्या मते, "मतांचे मोकळे आदानप्रदान हे सत्य शोधण्यासाठी आवश्यक आहे."त्याने दडपशाहीला (Censorship) कडाडून विरोध केला.

मिलने लोकशाहीचा पाठिंबा दिला, परंतु तो अत्यंत लोकानुनयवादी लोकशाहीला विरोधी होता.त्याच्या मते, लोकशाहीमध्ये बहुमताचा अत्याचार (Tyranny of the Majority) टाळला पाहिजे, कारण बहुसंख्यकांचे मत अल्पसंख्याकांवर अन्याय करू शकते.

मिलने स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला. त्याच्या "द सबजेक्शन ऑफ विमेन" (The Subjection of Women) या ग्रंथात त्याने स्त्रियांच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्यासाठी आवाज उठवला.

मिलने शिक्षणाला समाजाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक मानले.त्याच्या मते, लोकशाहीला योग्य प्रकारे कार्य करण्यासाठी लोकांना शिक्षण असणे आवश्यक आहे.शिक्षणाद्वारे लोक स्वातंत्र्य आणि त्यांच्या जबाबदाऱ्या समजून घेऊ शकतात.

मिलच्या मते, सार्वजनिक जीवनात राज्याचा हस्तक्षेप आवश्यक आहे, परंतु खाजगी जीवनात तो मर्यादित असावा.खाजगी जीवनात व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असावे.

मिलने जेरेमी बेंथमच्या उपयोगितावादाचा विस्तार केला, पण त्याला अधिक नैतिक आधार दिला.

त्याच्या मते, "गुणवत्तापूर्ण आनंद" (Qualitative Pleasure) अधिक महत्त्वाचा आहे.राज्याने जास्तीत जास्त लोकांसाठी जास्तीत जास्त चांगल्या जीवनमानाची पूर्तता करावी.

मिलने मतदारांमध्ये शिक्षण आणि ज्ञान असावे असे सुचवले.त्याने "प्रशिक्षित मतदाते" (Educated Electorate) या संकल्पनेचा पुरस्कार केला.त्याच्या मते, सर्व व्यक्तींना समान मतदानाचा अधिकार असावा, परंतु अधिक जबाबदाऱ्या असलेल्या व्यक्तींना अधिक महत्त्व दिले जाऊ शकते.

मिलने संपत्तीच्या न्याय्य वितरणावर भर दिला.तो मुक्त बाजारपेठेचा समर्थक होता, परंतु समाजातील दुर्बल घटकांना मदत करण्यासाठी राज्याने सक्रिय भूमिका बजावावी, असे त्याचे मत होते.

मिलचे राज्यविषयक विचार व्यक्तिवाद आणि सामूहिक हित यांचा समतोल राखतात.त्याने व्यक्तिस्वातंत्र्यावर भर दिला, पण त्याच वेळी त्याला सामाजिक जबाबदाऱ्यांचे महत्त्वही मान्य केले.त्याच्या विचारांनी आधुनिक उदारमतवाद (Modern Liberalism) अधिक सुसंस्कृत आणि व्यापक बनवले.

जॉन स्टुअर्ट मिलने व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, आणि राज्याच्या मर्यादित भूमिकेचे तत्त्वज्ञान प्रभावीपणे मांडले. त्याच्या मते, राज्याचे प्रमुख कार्य लोकांच्या मूलभूत स्वातंत्र्याचे संरक्षण करणे आणि त्यांच्या जीवनाचा दर्जा उंचावणे हे आहे. त्याचे विचार आजही लोकशाही, स्वातंत्र्य, आणि मानवाधिकारांच्या विकासासाठी आधारस्तंभ ठरतात.

**थॉमस हिल ग्रीन**

ग्रीन यांना आधुनिक लोकशाही उदारमतवादी विचारसरणीचे प्रातिनिधिक विचारवंत म्हणता येईल. राज्याच्या हस्तक्षेप न करण्यावर भर देणारा पारंपारिक उदारमतवाद आणि राज्याला दैवी दर्जा देणारा हेगेलियन आदर्शवाद या दोन्ही गोष्टी नाकारून त्यांनी औद्योगिक क्रांतीमुळे उद्भवणारी परिस्थिती लक्षात घेऊन लोकशाही उदारमतवादाचा प्रतिपादन केला.

ग्रीन हे आदर्शवादी तसेच उदारमतवादी या अर्थाने आहेत त्याने कधी कधी राज्याला साध्य मानले नाही. ग्रीनच्या मते, राज्य हे केवळ साध्य प्राप्त करण्याचे साधन आहे. राज्याचे अस्तित्व व्यक्तींसाठी अस्तित्त्वात असते, व्यक्ती संस्थांसाठी अस्तित्वात नसतात हे राज्यासाठी महत्त्वाचे विधान ठरते.ग्रीनची स्वातंत्र्याची संकल्पनाही हेगेलपेक्षा वेगळी आहे. त्याने ग्रीनने व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. ग्रीन यांचे मत असे आहे की एखादी व्यक्ती आपल्या विवेकाच्या मागणीवर राज्याच्या सत्तेचा विरोध देखील करू शकते. ग्रीनची ही कल्पना उदारमतवादी विचारांशी सुसंगत आहे.अशा प्रकारे, ग्रीन हा उदारमतवादी आहे, परंतु तो अशा प्रकारचा पारंपारिक उदारमतवादी विचारवंत नाही जो सामाजिक आणि आर्थिक जीवनात राज्याच्या प्रत्येक हस्तक्षेपाला 'आवश्यक वाईट' मानून विरोध करतो. राज्याला आवश्यक वाईट मानण्याऐवजी, ग्रीन ती एक नैतिक संस्था मानते. उदारमतवाद आणि आदर्शवाद या दोन्हीतील दोष दूर करून त्यांनी समन्वित आणि संतुलित विचारसरणी मांडली. उदारमतवादाला नवा धार्मिक विश्वास दिला आणि बदलत्या परिस्थितीत लोकहित आणि लोकशाही व्यवस्थेशी सुसंगत बनवले हे ग्रीनचे कर्तृत्व होते. उदारमतवादाला नवे स्वरूप देऊन, ग्रीनने केवळ उदारमतवादाला निरंकुशतेपासून संरक्षण देण्याचे काम केले आहे.

**उदारमतवादी विचारांचा प्रभाव आणि महत्व**

राज्याच्या उदारमतवादी विचारांचे प्रभाव आणि महत्त्व याचा विचार करताना, उदारमतवादाच्या (Liberalism) प्रमुख तत्त्वांवर आधारित राज्यसंस्थेची वैशिष्ट्ये आणि त्याचा समाजावर होणारा प्रभाव लक्षात घ्यावा लागतो. उदारमतवाद ही एक तत्त्वज्ञानात्मक आणि राजकीय विचारसरणी आहे, जी व्यक्तिस्वातंत्र्य, मानवी हक्क, समानता, आणि कायद्याच्या राजवटीला (Rule of Law) प्राधान्य देते. त्या दृष्टिकोनातून उदारमतवादाचा लोकांच्या जीवनावर पडलेल्या प्रभाव पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. **व्यक्तिस्वातंत्र्याचा विकास (Development of Individual Liberty):** उदारमतवादी विचारांनी व्यक्तिस्वातंत्र्याला प्रोत्साहन दिले.प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे विचार, मत, आणि जीवनशैली निवडण्याचा अधिकार असल्याचे मान्य केले गेले.

२. **लोकशाहीचा प्रसार (Promotion of Democracy):** उदारमतवादी तत्त्वज्ञानामुळे लोकशाही व्यवस्थांचा विकास झाला.सार्वत्रिक मताधिकार, प्रतिनिधी

शासन प्रणाली, आणि लोकांचा शासनावर प्रभाव यासाठी उदारमतवाद महत्त्वाचा ठरला.

३. **मानवी हक्कांचे संरक्षण (Protection of Human Rights):** उदारमतवादी विचारांमुळे मूलभूत मानवी हक्कांचा प्रसार झाला.अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, आणि कायद्यापुढील समानता यांसारखे अधिकार मान्य झाले.

४. **कायद्याच्या राजवटीचा पाया (Foundation of Rule of Law):** उदारमतवादाने कायद्याच्या राजवटीला प्रोत्साहन दिले, ज्यामुळे कोणतीही व्यक्ती किंवा संस्था कायद्यापेक्षा वरचढ ठरू शकत नाही.

५. **समानतेचा प्रचार (Promotion of Equality):** सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय समानतेचा विचार उदारमतवादामुळे पुढे आला.वर्ण, लिंग, आणि धर्माच्या आधारावर होणारे भेद दूर करण्यासाठी उदारमतवादी विचारांचा मोठा प्रभाव पडला.

६. **सामाजिक आणि आर्थिक सुधारणा (Social and Economic Reforms):** उदारमतवादाने सामाजिक आणि आर्थिक सुधारणा घडवून आणल्या. शिक्षण, आरोग्यसेवा, आणि श्रमिक हक्क यासारख्या क्षेत्रांमध्ये सुधारणा झाली.

७. **सत्तेचा मर्यादित उपयोग (Limited Government Authority):** राज्याच्या अधिकारांवर मर्यादा घालण्याचे उदारमतवादाचे तत्त्व महत्त्वाचे ठरले.यामुळे व्यक्तीच्या खाजगी क्षेत्राचे संरक्षण झाले.

८. **संपत्ती आणि बाजारपेठ स्वातंत्र्य (Property and Market Freedom):** व्यक्तीच्या संपत्तीवरील अधिकार आणि मुक्त अर्थव्यवस्थेचा प्रचार उदारमतवादाने केला.या विचारांनी उद्योजकता आणि आर्थिक विकासाला चालना दिली.

९. **स्त्री-पुरुष समानता (Gender Equality):** उदारमतवादी विचारांनी स्त्रियांच्या राजकीय, सामाजिक, आणि आर्थिक हक्कांचा आग्रह धरला.

स्त्रियांना मतदानाचा हक्क, शिक्षण, आणि संपत्तीवरील अधिकार प्राप्त झाले.

१०. **आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांतता (International Cooperation and Peace):** उदारमतवादाने आंतरराष्ट्रीय सहकार्य, व्यापार, आणि शांततेला महत्त्व दिले.विविध राष्ट्रांमधील परस्पर संवाद आणि करारांची संकल्पना यामुळे पुढे आली.

राज्याच्या उदारमतवादी विचारांचा प्रभाव समाजाच्या सर्वच क्षेत्रांवर दिसून येतो. व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, मानवी हक्क, आणि सामाजिक न्याय यासाठी उदारमतवादी विचार मोलाचे ठरले आहेत. आजच्या आधुनिक जागतिक व्यवस्थेत उदारमतवाद हा समतेचा, विकासाचा, आणि शांततेचा मार्गदर्शक सिद्धांत आहे.

## उदारमतवादी विचारांचे महत्त्व

१. **स्वतंत्र आणि न्याय्य समाजाचा पाया:** उदारमतवादी विचारांमुळे स्वतंत्र, न्याय्य, आणि समताधिष्ठित समाज निर्माण होतो. हे विचार व्यक्तीच्या विकासाला आणि समाजाच्या प्रगतीला प्रोत्साहन देतात.

२. **लोकशाही मूल्यांचा पाया:** लोकशाहीच्या विकासासाठी उदारमतवादी विचार हे मूलभूत आधार आहेत. व्यक्तिस्वातंत्र्य, समानता, आणि मताधिकार यांसारख्या संकल्पना लोकशाही व्यवस्थेत राबवल्या जातात.

३. **मानवाधिकारांचे रक्षण:** उदारमतवादामुळे जागतिक स्तरावर मानवाधिकारांची जाणीव वाढली आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवी हक्कांच्या घोषणापत्रावरही उदारमतवादाचा प्रभाव दिसून येतो.

४. **आर्थिक विकासाला चालना:** बाजारपेठ स्वातंत्र्य, खाजगी मालमत्ता, आणि उद्योगधंद्यांना चालना देणाऱ्या उदारमतवादी तत्त्वांमुळे आधुनिक आर्थिक विकास शक्य झाला.

५. **अत्याचार आणि दडपशाहीला विरोध:** उदारमतवादी विचारांनी एकाधिकारशाही, दडपशाही, आणि निरंकुश राज्यसत्तेचा निषेध केला. त्यातून लोकशाही आणि स्वतंत्र विचारांचा प्रसार केला गेला.

६. **आधुनिक शिक्षणाची संकल्पना:** उदारमतवादाने शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाला प्रोत्साहन दिले. व्यक्तीच्या तर्कशक्तीचा विकास आणि ज्ञानवृद्धीसाठी शिक्षणाला महत्त्व दिले.

७. **वैचारिक प्रगल्भता:** उदारमतवादी तत्त्वज्ञानामुळे समाजात वैचारिक विविधता आणि खुलेपणाला चालना मिळाली.

व्यक्तींना त्यांच्या मतांचा स्वातंत्र्यपूर्वक प्रचार करण्याचा हक्क दिला गेला.

८. **सामाजिक शांतता आणि स्थिरता:** उदारमतवादी विचारांनी सामाजिक शांतता आणि स्थिरता प्रस्थापित करण्यासाठी तटस्थतेचा आणि संवादाचा मार्ग दाखवला.

## उदारमतवादी सिद्धांतावर झालेल्या प्रमुख टीका

उदारमतवादी सिद्धांत जरी व्यक्तिस्वातंत्र्य, मानवी हक्क, आणि लोकशाही यासाठी महत्त्वाचा मानला जातो, तरी त्यामध्ये काही मर्यादा आणि दोष असल्याचे टीकाकारांनी दाखवून दिले आहेत.

१. **अत्याधिक व्यक्तिवाद (Excessive Individualism):** उदारमतवाद व्यक्तिस्वातंत्र्यावर खूप भर देतो, ज्यामुळे समूह आणि समाजाच्या हिताला कमी महत्त्व मिळते.काही विचारवंतांच्या मते, समाजातील परस्परावलंबन आणि सामूहिकतेचा विसर पडतो.व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या अतिरेकामुळे नैतिकतेचे, जबाबदारीचे, आणि सामाजिक ऐक्याचे प्रश्न निर्माण होतात.

२. **सामाजिक विषमतेचे समर्थन (Support for Social Inequality):** उदारमतवादी अर्थव्यवस्था बाजारपेठ स्वातंत्र्यावर भर देते, ज्यामुळे संपत्तीची असमान वाटप आणि श्रीमंत-गरीब दरी वाढते.मुक्त बाजारपेठेत स्पर्धा प्रोत्साहन मिळते, परंतु ही स्पर्धा नेहमीच न्याय्य संधी देत नाही.गरीब आणि दुर्बल घटकांचे शोषण होण्याची शक्यता निर्माण होते.

३. **बहुसंख्याकांचा अत्याचार (Tyranny of the Majority):** उदारमतवाद लोकशाहीचा आधारस्तंभ मानला जातो, परंतु लोकशाहीत बहुसंख्याकांचे वर्चस्व (Majoritarianism) निर्माण होऊन अल्पसंख्याकांचा अधिकार डावलला जातो.लोकशाहीत बहुसंख्याक लोकांचा निर्णय अल्पसंख्यांकांवर लादला जाऊ शकतो.

४. **राज्याच्या मर्यादित हस्तक्षेपावर टीका:** उदारमतवाद राज्याच्या मर्यादित हस्तक्षेपावर भर देतो, पण यामुळे काही समस्यांवर प्रभावी उपाय होण्यास अडथळा निर्माण होतो.गरिबी, आरोग्य, आणि शिक्षण यांसारख्या क्षेत्रांत राज्याचा सक्रिय हस्तक्षेप आवश्यक असल्याचे अनेक टीकाकारांचे मत आहे.

५. **सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरांचा अनादर (Disregard for Cultural and Historical Traditions):** उदारमतवादी तत्त्वज्ञान सार्वत्रिक तत्त्वांना प्राधान्य देते, परंतु स्थानिक सांस्कृतिक, ऐतिहासिक, आणि पारंपरिक मूल्यांची उपेक्षा करते.यामुळे विविध संस्कृतींच्या वैशिष्ट्यांवर संकट येते.

६. **अती तर्कशुद्धता (Excessive Rationalism):** उदारमतवाद व्यक्तीच्या निर्णयक्षमता आणि तर्कशक्तीवर अधिक भर देतो, परंतु मानवी भावना, नैसर्गिक प्रेरणा, आणि सांस्कृतिक घटक दुर्लक्षित होतात.काही वेळा तर्कशुद्धतेचा अतिरेक मानवी गरजा आणि सामाजिक संवेदनशीलतेच्या विरोधात जातो.

७. **अराजकतावादी कल (Tendency Toward Anarchy):** व्यक्तिस्वातंत्र्याच्या अतिरेकामुळे कायद्याचे पालन आणि सार्वजनिक सुव्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो.व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली अनियमितता आणि सामाजिक अशांतता उद्भवू शकते.

८. **वास्तविकतेपासून दूर (Detached from Reality):** उदारमतवादी विचारांना काही विचारवंतांनी "आदर्शवादी" (Idealistic) म्हटले आहे, कारण ते वास्तविक सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीशी पूर्णपणे सुसंगत नसतात.सर्व व्यक्तींना समान संधी उपलब्ध आहे, हा उदारमतवादाचा दावा अनेकदा खरा ठरत नाही.

९. **सामाजिक जबाबदारीचा अभाव (Lack of Social Responsibility):** उदारमतवाद व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवतो, ज्यामुळे सामाजिक जबाबदारीचे महत्त्व कमी होते.व्यक्तिस्वातंत्र्यावर भर दिल्यामुळे सार्वजनिक हितासाठी आवश्यक असलेल्या बंधनांबद्दल उदासीनता दिसते.

१०. **स्त्रीवादी आणि पर्यावरणवादी टीका:** स्त्रीवादी विचारवंतांनी उदारमतवादावर टीका केली आहे की, हा विचार पुरुषप्रधान (Patriarchal) मूल्यांना पाठिंबा देतो आणि स्त्रियांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करतो.पर्यावरणवाद्यांनी म्हटले आहे की उदारमतवाद भौतिक प्रगतीवर अधिक भर देतो, ज्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होते.

११. **भांडवलशाहीची विकृती (Flaws of Capitalism):** उदारमतवादाने भांडवलशाही व्यवस्थेला चालना दिली, परंतु यामुळे संपत्तीची असमानता, कामगारांचे शोषण, आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनाश घडला. त्यामुळे उदारमतवादाच्या नावाखाली भांडवलदारांचा अतिरेक सुरू झाला.

**उदारमतवादावरील प्रमुख विचारवंतांची टीका**

१. **कार्ल मार्क्स (Karl Marx):** मार्क्सने उदारमतवादावर टीका केली की, हा विचार फक्त भांडवलदार वर्गाच्या हितासाठी आहे आणि तो श्रमिक वर्गाला दुय्यम स्थान देतो.

त्याच्या मते, उदारमतवाद सामाजिक वर्गांतील विषमता वाढवतो.

२. **एफ. एच. ब्रॅडली (F. H. Bradley):** ब्रॅडलीने उदारमतवादावर टीका केली की, तो व्यक्तिवादावर इतका भर देतो की समाजाच्या व्यापक हिताचे दुर्लक्ष करतो.

३. **महात्मा गांधी:** गांधीजींनी उदारमतवादी भौतिक प्रगतीला आणि उपभोगवादाला विरोध केला.त्यांच्या मते, उदारमतवाद आत्मसंयम आणि साधेपणाला प्रोत्साहन देत नाही.

४. **राष्ट्रवादी विचारवंत:** उदारमतवादाला राष्ट्रवादाच्या विरोधात मानले गेले, कारण त्यामध्ये व्यक्तीचे हित राष्ट्राच्या हितापेक्षा अधिक महत्त्वाचे मानले जाते.

उदारमतवाद हा व्यक्तीच्या अधिकारांवर आणि स्वातंत्र्यावर आधारित विचारसरणी आहे. त्याने आधुनिक लोकशाही, मानवाधिकार, आणि आर्थिक विकासाला मोठे योगदान दिले आहे. तरीही, सामाजिक न्याय, पर्यावरणीय शाश्वतता, आणि आर्थिक समता यांसाठी त्याला अधिक संतुलित दृष्टिकोन आवश्यक आहे.

उदारमतवादावर झालेल्या टीकांमुळे या तत्त्वज्ञानाच्या मर्यादा स्पष्ट होतात. व्यक्तिस्वातंत्र्याला महत्त्व देतानाच सामाजिक, आर्थिक, आणि पर्यावरणीय समतोल साधण्याची गरज या टीकांमधून अधोरेखित होते. उदारमतवादाने दिलेली मूल्ये महत्त्वाची असली तरी, त्याला सुधारणा आणि नवीन आव्हानांशी जुळवून घेण्याची आवश्यकता आहे.

### १.३.३ राज्याचा मार्क्सवादी सिद्धांत

राज्याच्या मार्क्सवादी विचाराचे प्रतिपादन हे कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानात दिसून येते.कार्ल मार्क्स (१८१८–१८८३) हे जर्मन तत्त्वज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, इतिहासकार, समाजशास्त्रज्ञ, आणि राजकीय तत्त्वज्ञ होते. त्यांनी आधुनिक समाजवादी आणि कम्युनिस्ट विचारसरणीची मूलतत्त्वे विकसित केली. मार्क्सचे विचार प्रामुख्याने वर्गसंघर्ष, भांडवलशाहीची चिकित्सा, आणि श्रमिकांच्या मुक्तीवर आधारित होते.

**कार्ल मार्क्सच्या जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या प्रमुख गोष्टी:**

१. **औद्योगिक क्रांतीचे युग:** मार्क्सचा कालखंड हा औद्योगिक क्रांतीचा होता. या काळात युरोपातील आर्थिक आणि सामाजिक बदलांनी त्यांना प्रभावित केले. भांडवलशाहीचा उदय, कामगारांची दुरवस्था, आणि मोठ्या प्रमाणावर आर्थिक विषमता या गोष्टींनी त्यांच्या विचारांवर खोल परिणाम केला.

२. **फ्रेंच क्रांतीचे तत्त्वज्ञान:** फ्रेंच क्रांतीमधील स्वातंत्र्य, समता, आणि बंधुत्व या मूल्यांनी मार्क्सच्या राजकीय आणि सामाजिक विचारांना आकार दिला. त्यांनी मानवी स्वातंत्र्य आणि समानतेसाठी एक नवा समाजरचनेचा प्रस्ताव मांडला.

३. **जर्मन तत्त्वज्ञान: जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल:** हेगेलच्या भौतिकवादी द्वंद्ववाद (Dialectical Materialism) तत्त्वज्ञानाचा मार्क्सच्या विचारांवर मोठा प्रभाव होता.

**लुडविग फायरबाख:** फायरबाखच्या भौतिकवादाने मार्क्सला धार्मिक आणि आध्यात्मिक विचारांऐवजी भौतिक आणि सामाजिक वास्तवावर लक्ष केंद्रित करण्यास प्रवृत्त केले.

४. **ब्रिटिश अर्थशास्त्र: ॲडम स्मिथ आणि डेव्हिड रिकार्डो:** भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील मूल्य सिद्धांत, श्रम, आणि उत्पादनावर त्यांनी केलेली मांडणी मार्क्सच्या आर्थिक विचारांना आधारभूत ठरली.

५. **युरोपातील राजकीय परिस्थिती:** मार्क्सच्या काळातील राजकीय चळवळी, क्रांती, आणि दडपशाहीने त्यांना कामगारवर्गाच्या संघटन आणि संघर्षांवर लक्ष केंद्रित करण्यास प्रवृत्त केले. त्यांनी प्रस्थापित व्यवस्थेला संपुष्टात आणण्यासाठी वर्गसंघर्षाला महत्त्व दिले.

**प्रमुख मार्क्सवादी विचारवंत:**

कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानावर आधारित विचार मांडणारे आणि त्याच्या सिद्धांतांचा विकास करणारे मार्क्सवादी विचारवंत म्हणून ओळखले जातात. त्यांनी विविध क्षेत्रांतून (राजकारण, अर्थशास्त्र, साहित्य, समाजशास्त्र, आणि इतर) मार्क्सवादाला पुढे नेले.

१. **फ्रेडरिक एंगेल्स (१८२०–१८९५):**

- कार्ल मार्क्सचे सहकारी आणि जवळचे मित्र.
- मार्क्सवादाच्या विकासात मोठी भूमिका.
- महत्त्वाचे कार्य:"द कम्युनिस्ट मॅनिफेस्टो" (मार्क्ससोबत सहलेखन),"डायलेक्टिक्स ऑफ नेचर",भौतिकवाद, वर्गसंघर्ष, आणि ऐतिहासिक भौतिकवाद यावर विस्तार केले.

२. **व्लादिमीर लेनिन (१८७०–१९२४):**

- रशियन क्रांतीचा नेता आणि बोल्शेविक पक्षाचा प्रमुख.मार्क्सवादाचा विकास आधुनिक औद्योगिक परिस्थितीला अनुकूल करण्यासाठी केला.

- महत्त्वाचे कार्य:"स्टेट अँड रिव्हॉल्युशन","व्हॉट इज टू बी डन? या ग्रंथाचे लेखन त्यांनी "मार्क्सवाद-लेनिनवाद" हा नवा विचार पुढे नेला.

३. **लिओन ट्रॉट्स्की (१८७९–१९४०):**

- रशियन क्रांतीतील महत्त्वाचा नेता.
- "कायमस्वरूपी क्रांती" (Permanent Revolution) सिद्धांताचा विकास.
- स्टालिनच्या विरोधातील प्रमुख विचारवंत.
- महत्त्वाचे कार्य:"हिस्टरी ऑफ द रशियन रिव्हॉल्युशन". हा ग्रंथ लिहिला.

४. **जोसेफ स्टालिन (१८७८–१९५३):**

- लेनिननंतरच्या सोव्हिएत युनियनचे नेते.
- "मार्क्सवाद-लेनिनवाद" पुढे नेणारा आणि "सोशलिझम इन वन कंट्री" हा सिद्धांत मांडणारा.
- भांडवलशाहीविरोधातील त्यांची धोरणे महत्त्वाची ठरली, पण त्यावर मोठ्या प्रमाणावर टीका झाली.

५. **अँटोनियो ग्राम्शी (१८९१–१९३७):**

- इटालियन मार्क्सवादी विचारवंत आणि कम्युनिस्ट पार्टीचे सहसंस्थापक.
- "सांस्कृतिक वर्चस्व" (Cultural Hegemony) सिद्धांत मांडला.
- महत्त्वाचे कार्य:"प्रिझन नोटबुक्स" (कारावासातील लिखाण).

६. **रोजा लक्झेंबर्ग (१८७१–१९१९):**

- जर्मन-पोलिश मार्क्सवादी नेत्यांपैकी एक.
- क्रांतिकारक समाजवादाचा प्रचार आणि रशियन क्रांतीच्या काही पैलूंवर टीका केली.

७. **जॉर्ज लुकाच (१८८५–१९७१):**

- हंगेरीतील तत्त्वज्ञ आणि मार्क्सवादी.
- त्यांनी "वस्तुनिष्ठीकरण" (Reification) आणि वर्गसंघर्ष यावर विस्तृत विचार मांडले.
- महत्त्वाचे ग्रंथ:"हिस्ट्री अँड क्लास कॉन्शसनेस".

८. **लुई अल्थुसर (१९१८–१९९०):**

- फ्रेंच तत्त्वज्ञ.

- "स्ट्रक्चरल मार्क्सिजम" या विचारसरणीचा विकास.
- आर्थिक परिस्थितीव्यतिरिक्त इतर सामाजिक संरचनाही वर्गसंघर्षाला प्रभावित करतात हा विचार मांडला.

**९. हरबर्ट मार्क्यूझ (१८९८–१९७९):**

- फ्रँकफर्ट शाळेतील एक महत्त्वाचा विचारवंत.
- मार्क्सवाद आणि आधुनिक समाजातील तांत्रिक परिस्थिती यांचा अभ्यास केला.

**१०. झिजेक (स्लावोय झिजेक) (जन्म** १९४९**):**

- स्लोव्हेनियन तत्त्वज्ञ आणि समकालीन मार्क्सवादी.
- मार्क्सवाद, सायकोअनालिसिस, आणि सांस्कृतिक विश्लेषण यांचा अभ्यास करतो.

**मार्क्सवादी विचारांचा प्रभाव:**

- राजकीय चळवळी: रशियन, चिनी, क्युबन क्रांती.
- साहित्य आणि कला: मार्क्सवादी साहित्य समीक्षा आणि सांस्कृतिक विश्लेषण.
- आधुनिक तत्त्वज्ञान: मार्क्सवादाचा विविध शाखांमध्ये उपयोग, जसे की सामाजिक न्याय, श्रमिक अधिकार, आणि पर्यावरणीय चळवळी.
- मार्क्सवादी विचारवंतांनी जागतिक राजकारण, समाजशास्त्र, आणि मानववंशशास्त्रावर मोठा प्रभाव टाकला आहे आणि त्यांचे विचार आजही अभ्यासले जातात.

**मार्क्सचे राज्या संबंधीचे विचार**

मार्क्सने 'Introduction to a Critique of Hegel's Philosophy of Right' या ग्रंथात 'राज्य' संकल्पनेवर भाष्य केलेले आहे.

मार्क्सच्या मते राज्य हे वैश्विक आहे. त्याला अस्थायी स्वरूपात पाहिल्या पाहिजे. मार्क्सवादी लेखनामध्ये इतिहास आणि वर्ग संघर्षाचा अंत साम्यवादी व्यवस्थेत आहे. या दृष्टिकोनातून मार्क्स वर्गविहीन व राज्यविहीनतेवर भर देतो.राज्याची उत्पत्ती ही वर्गसंघर्षातून झाली आहे. राज्यात वर्ग भेद हा कायम असतो त्यामुळे जोपर्यंत वर्ग आहेत तोपर्यंत राज्य राहील असा दावा मार्क्स करतो.

मार्च समाज जीवनाचे विविध रंग हे इतिहासाच्या माध्यमातून उलगडून दाखवताना मार्क्सचा ऐतिहासिक वाद (Historical Materialism) हा कार्ल मार्क्सने मांडलेला एक मूलभूत सिद्धांत ठरतो, जो मानवी इतिहासाचा विकास आणि समाजाच्या रचनेची प्रक्रिया समजावून सांगतो. हा वाद "भौतिकवादी दृष्टीकोन" (Materialist Perspective) वापरून ऐतिहासिक घटनांचा अभ्यास करतो, जिथे उत्पादनाच्या साधनांचा ताबा आणि आर्थिक संबंध समाजाच्या संरचना आणि विकास ठरवतात.

**मार्क्सच्या ऐतिहासिक वादाची प्रमुख तत्त्वे:**

१. **आर्थिक पायाभूत रचना (Base) आणि अधिरचना (Superstructure):** समाजाचे आर्थिक जीवन म्हणजे उत्पादनाच्या साधनांचा ताबा आणि उत्पादनाचे संबंध (Base) हे समाजाची राजकीय, सांस्कृतिक, आणि सामाजिक अधिरचना (Superstructure) ठरवतात. उदाहरण: जर उत्पादनाचे साधन भांडवलदारांच्या हातात असेल, तर समाज भांडवलशाही असतो.

२. **वर्गसंघर्ष:** प्रत्येक ऐतिहासिक युगात वर्गसंघर्ष हा समाजाच्या बदलाचा मूळ प्रेरक घटक आहे. उदाहरण: भूदास विरुद्ध भूपती (जमिनीवर आधारित समाजव्यवस्था). कामगार (प्रोलेटेरियट) विरुद्ध भांडवलदार (बुर्जुआ) (औद्योगिक समाज).

३. **इतिहासाचा विकास:** समाजाचा विकास आर्थिक पायाभूत संरचनेतील बदलांवर अवलंबून असतो. मार्क्सच्या मते, इतिहास हा वेगवेगळ्या टप्प्यात प्रगतिशील बदल अनुभवतो त्यामध्ये आदिम साम्यवाद,गुलामगिरी,सामंती समाज,भांडवलशाही, कामगार वर्गांची सत्ता, समाजवाद (आणि शेवटी कम्युनिझम).

**आदिम साम्यवादी अवस्थेत** मार्क्सच्या मते आदिम साम्यवादी व्यवस्थेत जनतेमध्ये कोणताही संघर्ष नव्हता. या व्यवस्थेत संपूर्ण समाज आपल्या प्रश्नांची सोडवणूक करीत होता. त्यामुळे त्या काळात राज्याचे कोणतेही अस्तित्व त्यांना भासत नव्हते.

**गुलामगिरीच्या काळात** माणसांच्या वाढलेल्या अपेक्षा आणि त्यातून निर्माण झालेली शेती व पशुपालन ह्या व्यवसायातून काही व्यक्तींनी जमिनीची मालकी संपादित केली. त्यातून शेतीवर राबवण्यासाठी त्यांना कामगारांची आवश्यकता होती ही आवश्यकता ज्या व्यक्तींकडे जमीन नाही त्या व्यक्तीच्या माध्यमातून जमीन मालकांनी दुसऱ्याच्या श्रमांवर उत्पन्न काढले. या काळात परिस्थिती बदलली व मालकांच्या हातात भूमी, संपत्ती आणि उत्पादनाच्या संपूर्ण साधनांचे एकीकरण झाले आणि गुलामांच्या खऱ्या अर्थाने शोषणाला सुरूवात झाली. यातून समाज दोन वर्गात विभागला गेला तो म्हणजे या ठिकाणचा जमिनीचा मालक हा शोसक बनला तर ज्याच्याकडे जमीन नाही असा तो निर्धन हा गुलाम रूपात हा शोषित झाला.

**सामंतवादी युगात** उत्पादनाच्या साधनांवर जमीनदाराचा अधिकार असतो. राजा जमिनीचे वाटप सरदार व आपल्या सहकारी वर्गात करत असतात. जमीनदार शेतमजुराकडून आपल्या शेतीची कामे करून घेतात व त्यांच्या मोबदल्यात त्यांना अत्यल्प वेतन दिल्या जाते. या अवस्थेत शेतकऱ्यांवर जमीनदाराचे नियंत्रण होते परंतु ते गुलामगिरीच्या प्रमाणात कमी होते त्यातून शेतकरी शेतमजुरांचा जमीनदाराशी संघर्ष निर्माण झाला.

**भांडवलवादी अवस्थेत** औद्योगिक क्रांतीमुळे जुनी उत्पादनाची पद्धती बदलल्या गेली आणि या अवस्थेत व्यापारी वर्गाने उत्पादनाच्या साधनांवर ताबा मिळविला. उत्पादनाच्या साधनांचे भांडवलदाराकडे केंद्रीकरण झाले. उत्पादनाच्या साधनाच्या केंद्रीकरणामुळे निर्माण झालेल्या मोठ्या मोठ्या उत्पादनात अनेक लोक मजूर म्हणून या ठिकाणी काम करू लागले. परंतु याही अवस्थेत संख्येने कमी असलेले भांडवलदार

जास्त प्रमाणात असणाऱ्या मजुरांची आर्थिक श्रमिक शोषण मोठ्या प्रमाणात करत होते. मजुरांकडे उत्पन्नाचे दुसरे साधन नसल्यामुळे त्यांनी हे शोषण सहन केले. या व्यवस्थेबद्दल मजुरांच्या मनात एक प्रकारची घृणा निर्माण झाली होती आणि त्यातूनच भांडवलदार विरुद्ध मजूर कामगार यांच्यामध्ये जो असंतोष निर्माण झाला त्यातून एक प्रकारची क्रांती घडून परिवर्तन होते असे मार्क्स म्हणतो.

**कामगार वर्गाची सत्ता** या अवस्थेत भांडवलदार आणि मजूर यातील संघर्ष अटळ आहे. त्यातून भांडवलदाराकडून मजुरांचे जे शोषण केल्या जाते त्यावेळी भांडवलदार राजकीय संस्था ही आपल्या नियंत्रणात ताब्यात घेत असतात. अशावेळी भांडवलदार आणि मजुरांतील संघर्ष तीव्र होऊन या ठिकाणी मजूर एक नव्या प्रकारची क्रांति करून भांडवलशाहीचा अंत करून राज्याची सत्ता आपल्या हाती घेतील असे मार्क्सला वाटते. या अवस्थेला मार्क्स श्रमिकांची किंवा कामगार वर्गाची सत्ता संबोधतो.

श्रमिक वर्गांची सत्ता आल्यानंतर मानवी विकासाच्या शेवटचा टप्पा **हा साम्यवादी अवस्थेचा मानतो** या अवस्थेत उत्पादनाच्या सर्व साधनांवर वर समाजाची मालकी प्रस्थापित होऊन समाजामधील धनिक व भांडवलदारांचे अस्तित्व संपुष्टात येऊन केवळ या ठिकाणी एकच वर्ग राहील तो म्हणजे कामगारांचा श्रमिकांचा. त्यामुळे या अवस्थेत समाजात दोन वर्ग नसल्यामुळे या ठिकाणी वर्ग संघर्ष राहणार नाही. वर्ग संघर्ष संपुष्टात आल्यामुळे राज्यसंस्थेची आवश्यकता राहणार नाही. त्यातून वर्ग विहीन व राज्य विहीन समाज रचना निर्माण होईल असे मार्क्सला वाटते.

४. **उत्पादन शक्ती (Forces of Production):** उत्पादन शक्ती म्हणजे तंत्रज्ञान, श्रम कौशल्य, आणि उत्पादनाचे भौतिक साधने.जेव्हा उत्पादन शक्ती आणि उत्पादन संबंध यामध्ये संघर्ष होतो, तेव्हा सामाजिक बदल घडतो.

५. **ऐतिहासिक अनिवार्यता:** मार्क्सच्या मते, वर्गसंघर्ष आणि भांडवलशाहीतील अंतर्गत विसंगतीमुळे समाजवादाचा आणि नंतर कम्युनिझमचा उदय अनिवार्य आहे.

कार्ल मार्क्सचे राज्याबद्दलचे विचार त्याच्या ऐतिहासिक भौतिकवाद (Historical Materialism) आणि वर्गसंघर्षाच्या सिद्धांतावर प्रामुख्याने आधारित आहेत. मार्क्सच्या मते, राज्य (State) हे वर्गीय शोषण आणि भांडवलशाही व्यवस्थेला टिकवून ठेवण्यासाठी एक साधन आहे. त्याने राज्याची भूमिका आणि त्याचा शेवट याबाबत आपले स्पष्ट विचार मांडले आहेत ते पुढील प्रमाणे.

१. **राज्य हे वर्गसंघर्षाचे साधन आहे:** मार्क्सच्या मते, राज्य ही एक वर्गीय संस्था आहे जी नेहमीच शोषक वर्गाच्या (उदा., भांडवलदार) हिताचे संरक्षण करते.राज्य हे संपत्ती आणि संसाधनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि शोषित वर्गाला (उदा., कामगार) दबावाखाली ठेवण्यासाठी कार्य करते. त्यामुळे राज्यामध्ये दोन प्रकारचे आहे रे आणि नाही रे हे प्रवर्ग आढळतात. त्या दोन प्रवर्गातील संघर्षाचे साधन म्हणून राज्याकडे पाहिल्या जाते. त्यातूनच मार्क्स राज्याकडे एक वर्गीय संस्था म्हणून पाहतो.

२. **राज्याचा उदय:** मार्क्सच्या मते, राज्याचा उगम उत्पादनाच्या साधनांवरील मालकीमुळे झाला.जेव्हा समाजात वर्गविभाजन झाले (उदा., शोषक आणि शोषित),

तेव्हा राज्याची स्थापना झाली.राज्य हे शोषक वर्गासाठी तयार केलेले एक साधन आहे, जे वर्गसंघर्षात त्यांना वर्चस्व प्रस्थापित करण्यास मदत करते.

३. **राज्याचे स्वरूप:** भांडवलशाहीत राज्य हे भांडवलदारांच्या हातात असते आणि ते नफा वाढवण्यासाठी कामगारांचे शोषण करते.सामंती व्यवस्थेत राज्य हे सामंतशाहीतील उच्चवर्गाच्या हितासाठी कार्य करते. या राज्याच्या स्वरूपात अहिरे आणि नाही रे या मधला संघर्ष हा राज्याच्या अंताकडे जाणारा असतो.

४. **राज्य आणि शासन हे शोषणाचे यंत्र आहे:** राज्याचा उदयच हा वर्गभेदाच्या कारणातून झाला असल्यामुळे राज्यसंस्था ही सदैव शोषक वर्गाला मदत करण्यासाठी निर्माण झालेली व्यवस्था आहे. मार्क्सने इतिहासाच्या जे विकासाची जी संकल्पना मांडली त्या प्रत्येक अवस्थेमध्ये अहिरे आणि नाही रे या दोन वर्गाच्या माध्यमातून अहिरे वर्गांनी नाही रे वर्गाचे मोठ्या प्रमाणात शोषण केलेले आहे. त्यामुळे राज्य आणि शासन हे शोषणाचे यंत्र आहेत असे मार्क्स म्हणतो.

५. **कामगार वर्गाची सत्ता:** वर्ग संघर्षाच्या सिद्धांतून भांडवलदारांची सत्ता या ठिकाणी संपुष्टात येऊन शासनाची सर्व सूत्रे कामगार वर्ग आपल्या हाती घेईल अशी आशा मार्क्सला वाटते. कामगारांची सत्ता येण्यासाठी कामगाराला या ठिकाणी क्रांती करावी लागेल. या क्रांतीच्या माध्यमातून भांडवलशाहीचा अंत घडेल आणि भांडवलदार स्वतः आपल्या हातातील सत्ता सोडून बाहेर जातील त्यावेळी खऱ्या अर्थाने कामगाराची सत्ता या ठिकाणी येईल असे मार्क्सला वाटते.

६. **राज्याचा अंत:** मार्क्सच्या मते, राज्याचा अंत अनिवार्य आहे.जेव्हा कामगार वर्ग (प्रोलेटेरियट) क्रांतीद्वारे शोषणकारी व्यवस्थेचा अंत करतो, तेव्हा वर्गविरहित समाजाची (Communism) स्थापना होईल.अशा स्थितीत राज्याची गरज उरणार नाही आणि ते नष्ट होईल.

७. **अस्थायी कामगार राज्य (Dictatorship of the Proletariat):** वर्गविरहित समाजाच्या स्थापनेसाठी, मार्क्सने कामगार वर्गाचे राज्य (Proletarian State) सुचवले, ज्याला "Dictatorship of the Proletariat" म्हणतात.हे राज्य भांडवलदार वर्गाला नष्ट करेल, आणि एक वेळ अशी येईल की राज्याची आवश्यकता उरणार नाही.

८. **राज्य ही कृत्रिम संस्था आहे :** मार्क्सचा ऐतिहासिक विकासवाद पाहता त्यांनी सांगितलेले विकासाचे वेगवेगळे टप्पे आणि राज्यसंबंधीच्या विवेचनावरून असे निदर्शनास येते की राज्य हे संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी शक्तीच्या आधारावर हितसंबंधी लोकांनी निर्माण केलेले एक कृत्रिम साधन आहे. राज्यात केवळ एकाच वर्गाचे हित साधल्या जाते ते म्हणजे आहिरे या वर्गाचे. त्यासाठी कामगार वर्गाच्या माध्यमातून कामगारांची क्रांती ज्यावेळेस घडेल त्यावेळेस कामगारांची सत्ता निर्माण होईल अधिक मार्क्सला वाटते.

**मार्क्सच्या राज्यविषयक विचारांचे महत्त्व:**

कार्ल मार्क्सच्या राज्यविषयक सिद्धांताचे महत्त्व राजकीय विज्ञान, समाजशास्त्र, आणि आर्थिक विचारसरणीच्या विकासामध्ये अमूल्य ठरले आहे. राज्याची उत्पत्ती, स्वरूप, आणि त्याच्या ऐतिहासिक भूमिकेबद्दल त्याने मांडलेले विचार वर्गसंघर्ष आणि समाजाच्या बदलाच्या प्रक्रियेसोबत जोडलेले आहेत. त्याचा सिद्धांत समजून घेणे वर्गीय संबंध, क्रांती, आणि सामाजिक न्याय यांचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वाचे आहे.

१. **राज्याची उत्पत्ती आणि ऐतिहासिक भूमिका:** राज्याच्या उगम, स्वरूप, आणि कार्याचा भौतिकवादी आणि ऐतिहासिक विश्लेषण दिले.

   राज्याची निर्मिती ही उत्पादन प्रणालीतील बदलांमुळे (उदा., जमीन मालकी, भांडवलशाही) झाली, हे मार्क्सने स्पष्ट केले.उत्पादन पद्धतीत बदल झाल्यामुळे राज्याचे स्वरूपही बदलत जाते, ही संकल्पना ऐतिहासिक भौतिकवादाच्या चौकटीत महत्त्वाची ठरते.

२. **राजकीय विचारसरणीवर प्रभाव:** मार्क्सच्या विचारांनी समाजवादी आणि कम्युनिस्ट चळवळींना प्रेरणा दिली.आधुनिक काळातील राज्यशास्त्रावर आणि राजकीय चळवळींवर त्याचा मोठा प्रभाव आहे.

३. **राज्याचा वर्गीय दृष्टिकोन:** मार्क्सने राज्याचा अभ्यास वर्गसंघर्षाच्या चौकटीत केला.त्याने सांगितले की राज्य ही एक वर्गीय संस्था आहे जी नेहमी शोषक वर्गाच्या (भांडवलदार, सामंत) हितसंबंधांचे संरक्षण करते.हा दृष्टिकोन राज्याच्या तटस्थतेच्या पारंपरिक कल्पनेला आव्हान देतो.

४. **राज्याचा अंत आणि वर्गविरहित समाज:** राज्याचा शेवट हा वर्गविरहित समाज (कम्युनिझम) स्थापन करण्याच्या प्रक्रियेचा एक भाग आहे.राज्याचा शेवट होणे ही एक क्रांतिकारक संकल्पना आहे जी आधुनिक समाजवाद आणि साम्यवादाच्या विचारसरणीच्या केंद्रस्थानी आहे.

५. **कामगार वर्गाच्या मुक्तीसाठी दिशादर्शन:** मार्क्सच्या सिद्धांताने कामगार वर्गाच्या क्रांतीसाठी एक वैचारिक आधार दिला.

"Dictatorship of the Proletariat" या संकल्पनेद्वारे त्याने भांडवलशाही व्यवस्थेच्या अंताची प्रक्रिया मांडली.त्यामुळे श्रमिक चळवळींना दिशा आणि प्रेरणा मिळाली.

६. **राज्याचा भौतिकवादी दृष्टिकोन:** राज्याच्या कार्याचे मूल्यांकन भौतिक परिस्थिती आणि आर्थिक संरचनेच्या अनुषंगाने केले.यामुळे राज्याच्या राजकीय, आर्थिक, आणि सामाजिक भूमिकांचा सांस्कृतिक किंवा भावनिक दृष्टिकोनाऐवजी भौतिकवादी विश्लेषण करण्याची प्रेरणा मिळाली.

७. **राजकीय चळवळींवर प्रभाव:** मार्क्सच्या सिद्धांतामुळे रशियन, चिनी, आणि अन्य समाजवादी-क्रांतिकारक चळवळींना मार्गदर्शन मिळाले.त्याच्या विचारांवर आधारित अनेक देशांमध्ये क्रांती घडून आली, जसे की रशियन क्रांती (१९१७).

८. **आधुनिक राज्यशास्त्राला योगदान:** मार्क्सच्या विचारांनी आधुनिक राज्यशास्त्राला तात्त्विक आणि व्यावहारिक दोन्ही स्तरांवर योगदान दिले.त्याने राज्याचे स्वरूप आणि कार्य याचे वर्गीय विश्लेषण दिले, ज्याचा आजही अभ्यास केला जातो.

९. **राजकीय आणि आर्थिक संरचनेतील संबंध:** राज्य आणि अर्थव्यवस्थेतील परस्पर संबंध स्पष्ट केले.त्याने दाखवले की राज्याचे स्वरूप उत्पादन साधनांवर नियंत्रण ठेवणाऱ्या वर्गाच्या हितसंबंधांशी जोडलेले आहे.

**समकालीन संदर्भातील महत्त्व:**

१. **सामाजिक न्यायाचा विचार:** मार्क्सच्या सिद्धांताचा उपयोग करून सामाजिक न्याय आणि समानतेच्या कल्पनांचा विकास केला जातो.आजही राज्याचा अभ्यास शोषित वर्गाच्या बाजूने कसा करावा, याबद्दल मार्गदर्शन मिळते.राज्याने वर्ग संघर्ष संपवून एक समतावादी आणि न्याय्य समाज निर्माण करण्यासाठी कार्य केले पाहिजे, असे त्यांनी सुचवले.

२. **राजकीय व्यवस्थेचे मूल्यांकन:** मार्क्सचे विचार आधुनिक भांडवलशाही आणि जागतिक आर्थिक व्यवस्थेच्या दुष्परिणामांचे मूल्यमापन करण्यासाठी उपयोगी ठरतात.आर्थिक विषमता आणि शोषणावर प्रकाश टाकण्यासाठी मार्क्सवादी सिद्धांत प्रभावी ठरतो.

३. **ग्लोबलायझेशन आणि राज्य:** जागतिकीकरणाच्या काळात राज्याची भूमिका आणि आर्थिक शोषण यांचा अभ्यास करण्यासाठी मार्क्सच्या विचारांचा उपयोग होतो.

४. **उत्पादन व्यवस्थांमधील बदल:** मार्क्सच्या राज्यविषयक सिद्धांतामुळे उत्पादन व्यवस्थेतील बदलांमुळे राज्याचे स्वरूप कसे बदलते, हे समजण्यास मदत होते.

**मार्क्सच्या विचारांवरील टीका:**

१. **राज्याचा भौतिकवादी दृष्टिकोन मर्यादित आहे:** काही विचारवंतांच्या मते, राज्य केवळ वर्गीय स्वार्थांसाठी नसते; ते सामाजिक सुव्यवस्था राखण्यासाठी देखील कार्य करते.

२. **राज्याचा अंत होण्याची शक्यता कमी:** राज्य नेहमीच अस्तित्वात राहील, कारण मानवी समाजात सुव्यवस्था राखण्यासाठी काही प्रकारच्या संस्थेची गरज असते.

३. **प्रशासन आणि स्वातंत्र्याचा प्रश्न:** "Dictatorship of the Proletariat" ही कल्पना तात्पुरती असली तरी ती एक नवीन दडपशाही प्रणाली ठरू शकते, असे काही टीकाकारांचे मत आहे.

मार्क्सच्या मते, राज्य हे वर्गसंघर्षातून उदयास आलेले एक साधन आहे, जे भांडवलदार वर्गाच्या हितसंबंधांचे संरक्षण करते. त्याने राज्याच्या समाप्तीची आणि वर्गविरहित समाजाची संकल्पना मांडली, जी क्रांतिकारक समाजशास्त्रीय आणि राजकीय विचारसरणीला मूळ प्रेरणा देते. मार्क्सच्या राज्यावरील सिद्धांताने राज्यशास्त्र आणि सामाजिक विचारसरणीमध्ये मूलगामी बदल घडवले. त्याने राज्याचा वर्गीय दृष्टिकोन, त्याचे उत्पत्तीचे कारण, आणि राज्याच्या अंताची कल्पना मांडून सामाजिक-आर्थिक परिवर्तनासाठी दिशादर्शन केले. त्याचा विचार राजकीय चळवळी, क्रांती, आणि समतावादी समाज निर्माण करण्यासाठी आजही महत्त्वाचा ठरतो.

## १.३.४ राज्याचा स्त्रीवादी सिद्धांत



राज्याचा स्त्रीवादी दृष्टिकोन हा स्त्रीवादाच्या तत्त्वांवर आधारित राज्याचे विश्लेषण करणारा दृष्टिकोन आहे. पारंपरिक राज्यशास्त्रात राज्याला मुख्यतः तटस्थ, वर्गीय किंवा भौतिकवादी दृष्टिकोनातून पाहिले गेले, परंतु स्त्रीवादाने राज्याच्या कार्यप्रणालीचा आणि संरचनेचा लिंगाधारित (gender-based) अभ्यास मांडला. स्त्रीवादी दृष्टिकोनानुसार, राज्य हे केवळ वर्ग किंवा भौतिक स्वरूपाचे नसून, ते लिंगाधारित भेदभाव आणि पितृसत्ताक (patriarchal) व्यवस्थेला प्रस्थापित करणारे एक साधन आहे. त्यामुळे समकालीन राजकीय व्यवस्थेत राज्याचा स्त्रीवादी दृष्टिकोन हा अत्यंत महत्त्वाचा आहे. या विचाराच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय क्षेत्रात स्त्री पुरुष समानता निर्माण करण्यासाठी स्त्रीवादी विचाराचा व्यापकदृष्टीने विचार करणे गरजेचे आहे.

**राज्याचा स्त्रीवादी दृष्टिकोन:**

**स्त्रीवादी विचारांचा उदय:**

१९६० आणि ७० च्या दशकातील स्त्रीवादी चळवळींनी राज्याच्या तटस्थतेच्या कल्पनेवर आक्षेप घेतला.त्यांनी राज्याच्या संरचनेचा आणि धोरणांचा अभ्यास केला, ज्यातून समजले की राज्य हे महिलांच्या शोषणाला आणि लिंगाधारित असमानतेला बळकटी देते.राज्याचा पितृसत्ताक दृष्टिकोन हा स्त्रीवादी दृष्टिकोनाचा मुख्य आधार आहे.राज्याच्या स्त्रीवादी समीक्षेनुसार, राजकीय सिद्धांत मूलभूतपणे पुरुष-पक्षपाती, मानक आणि ॲन्ड्रोसेंट्रिक आहेत. राजकारण आणि लिंग यांच्यातील संबंध विवादास्पद आहे, जो राज्याच्या स्त्रीवादी समीक्षेमध्ये आणखी निहित आहे. स्त्रीवादी दृष्टिकोन राजकीय तत्त्वज्ञानाच्या पारंपारिक सिद्धांतांकडे संशय आणि अविश्वासाने पाहतो.राज्याच्या स्त्रीवादी समीक्षेनुसार, राज्याच्या सत्तेचे वर्चस्ववादी स्वरूप राज्य, समाज, संस्कृती आणि राजकारणातील स्त्रियांना अशक्त आणि अधीन करतात.विशेषत: राज्यातील सत्ताकेंद्रे ही संस्थात्मकदृष्ट्या लिंगानुसार असतात. परिणामी, राज्यात लैंगिक असमानता आणि महिलांची शक्तीहीनता कायम राहते.

**कॅथरीन मॅककिननने तिच्या पुस्तकात "राज्याच्या स्त्रीवादी सिद्धांताकडे",** १९८९**. या ग्रंथात**“ स्त्रीवादी अर्थाने राज्य हे पुरुष आहे. कायदा महिलांकडे पुरुषांप्रमाणेच पाहतो आणि वागतो.” असे विवेचन केलेले आहे. एकंदरीतच राज्याच्या स्त्रीवादी दृष्टिकोनाबद्दल पाहता स्त्रीवादी राज्याला कायदेशीर अस्तित्व म्हणून ओळखतात. स्त्रीवाद्यांची राज्याबद्दल द्विधा वृत्ती आहे. एकीकडे ते राज्य ही पितृसत्ताक संस्था मानतात तर दुसरीकडे त्यांचा असा विश्वास आहे की केवळ राज्यच स्त्रियांची स्थिती सुधारू शकते.

मेरी वॉलस्टोनक्राफ्ट, शार्लोट पर्किन्स गिलमन आणि सिमोन डी ब्युवॉइर यांच्यासह पूर्वीच्या लेखकांनी लिंगवादावर लिखाण केलेले असले तरीही राज्याचा सामान्य सिद्धांत तयार केला नव्हता.**या समस्येचे उत्तर म्हणून मॅककिननने** राज्याच्या स्त्रीवादी सिद्धांताकडे पाहिले आहे. मॅककिनन मार्क्सवादाला तिच्या सिद्धांताचा केंद्रबिंदू मानतात. तिने असा युक्तिवाद केला की उदारमतवादी सिद्धांतांच्या विपरीत, "मार्क्सवाद एखाद्या राज्यात संघटित सामाजिक आणि लैंगिक वर्चस्वाचा सामना करतो."

**राज्याची पारंपरिक भूमिका:** राज्याचा अभ्यास पारंपरिकपणे वर्गीय संघर्ष, सत्ताकेंद्रे, आणि आर्थिक संबंधांवर आधारित होता.राज्य तटस्थ असल्याचे मानले जात होते, जे समाजातील सर्व घटकांचे हित जपते.मात्र, स्त्रीवादाने हे स्पष्ट केले की राज्याच्या निर्णय प्रक्रियेपासून ते धोरणात्मक अंमलबजावणीपर्यंत, पितृसत्ताक संरचना काम करते.

**स्त्रीवादी राज्यतत्त्वाचा आधार:** राज्य ही एक पितृसत्ताक संस्था आहे, जी पुरुषसत्तेला (male dominance) कायम ठेवण्यासाठी कार्य करते.महिला, लिंग अल्पसंख्याक, आणि वंचित घटकांचे प्रश्न राज्याच्या धोरणांमध्ये दुय्यम मानले जातात.राज्याची धोरणे आणि कायदे हे स्त्रीविरोधी असण्याची शक्यता अधिक असते.

**स्त्रीवाद आणि राज्य:** स्त्रीवादाने राज्याचे स्वरूप, त्याची कार्यपद्धती, आणि त्याचा प्रभाव या सर्व गोष्टी लिंगाधारित परिप्रेक्षातून तपासल्या.राज्याच्या सामाजिक धोरणांमध्ये महिलांच्या भूमिकेला महत्त्व न मिळणे, महिलांच्या श्रमाचे अवमूल्यन, आणि त्यांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्याकडे होणारे दुर्लक्ष हे मुद्दे समोर आले.

**राज्य आणि महिलांचे शोषण:**

**पितृसत्ताक धोरणे:** राज्याच्या कायद्यात आणि धोरणांमध्ये पुरुषांचे वर्चस्व दिसून येते.

**महिलांचा वंचितपणा:** धोरणांमध्ये महिलांच्या गरजांना कमी महत्त्व दिले जाते, जसे की प्रसूतीसाठी आर्थिक मदत, कुटुंबीय हिंसाचाराविरोधातील संरक्षण, किंवा समान वेतनाचे हक्क.

**पुरुषप्रधान समाजरचना:** राज्याच्या राजकीय, प्रशासकीय, आणि सामाजिक संस्थांमध्ये पुरुषसत्तेचे वर्चस्व असल्याने महिलांना दुय्यम भूमिका दिली जाते.

**स्त्रीवादी दृष्टीकोन राज्याच्या स्वरूपाच्या दोन महत्त्वपूर्ण पैलूंशी संबंधित आहे:**

**१. सार्वजनिक क्षेत्राचे नियमन करण्याचे साधन म्हणून राज्य:**

- राज्याने हस्तक्षेप करून खाजगी जीवनात पुरुषांचे वर्चस्व रोखले पाहिजे. खऱ्या अर्थाने स्त्रियांची घरातूनच अत्याचार आणि वंचितेची मालिका सुरू होत असते.
- राजकीय पातळीवर राज्यात सामान्यतः पुरुषांचे वर्चस्व राहिले आहे.
- स्त्रीला न्याय मिळवून देण्यासाठी, स्त्री आणि पुरुष यांच्यातील निव्वळ वैयक्तिक संबंधांचे क्षेत्र देखील राज्याद्वारे नियंत्रित केले पाहिजे .
- स्त्रिया गृहिणी आणि माता म्हणून त्यांच्या भूमिकेत नाखूष असतात ही कल्पना खाजगी समस्या म्हणून पाहिली जात होती. स्त्रियांच्या वैयक्तिक ह्या समस्या (उदा. लिंग, बालसंगोपन, घरी काळजी प्रदाते) या सर्व राजकीय समस्या आहेत ज्यांना बदल घडवून आणण्यासाठी राजकीय हस्तक्षेप आवश्यक आहेत.

**२. शक्तीचे साधन म्हणून राज्य:**

- राज्याचे तत्त्वज्ञान सत्ताकेंद्रित असते आणि सत्ता बहुधा पुरुष किंवा त्याच्या प्रातिनिधिक संरचनांद्वारे चालविली जाते.

- स्त्रियांना सत्तेतून वगळून, राज्य लष्करी सामर्थ्यावर आपली ताकद वाढवते. त्याचा परिणाम राष्ट्रांमध्ये तणाव वाढत आहे.

- स्त्रीवादी राष्ट्रांच्या सैन्यीकरणावर टीका करतात. त्यांनी स्त्रिया शांतताप्रिय असल्याचे नमूद केले आहे आणि त्यांनी राष्ट्रांमध्ये सहकार्य वाढवण्यास प्रोत्साहन दिले असते यावर विश्वास करतात.

**स्त्रीवादांचे सिद्धांत**

**राज्याचा उदारमतवादी स्त्रीवादी**

राज्याचा उदारमतवादी स्त्रीवादी सिद्धांत हा स्त्रीवादी विचारधारांपैकी एक महत्त्वाचा दृष्टिकोन आहे, जो समानतेच्या हक्कांवर, स्वातंत्र्यावर, आणि कायद्याच्या आधारे महिलांना समान संधी देण्यावर आधारित आहे. हा सिद्धांत प्रामुख्याने राज्यातील असमानता आणि भेदभावाला आव्हान देत, सुधारणावादी दृष्टिकोनातून महिलांच्या अधिकारांसाठी लढा देतो.

उदारमतवादी स्त्री व्यक्तिवादी विचार हे जॉन स्टुअर्ट मिल यांच्या विचारात पाहायला मिळतात. म्हणूनच त्याला या उदारवादी स्त्रीवादाचे जनकही म्हणून संबोधले जाते.१८६१ मध्ये सब्जेक्शन ऑफ वुमन हा ग्रंथ लिहून स्त्री वादावर भाष्य केलेले आहे.

**उदारमतवादी स्त्रीवादी सिद्धांताची वैशिष्ट्ये:**

१. **समानतेचा आग्रह:** पुरुष आणि महिलांना कायदेशीर, राजकीय, आर्थिक, आणि सामाजिक समान हक्क मिळावेत, असा या सिद्धांताचा आधार आहे.महिलांसाठी समान वेतन, मतदानाचा हक्क, आणि शिक्षणाच्या संधींवर भर दिला जातो.

२. **सुधारणावादी दृष्टिकोन:** उदारमतवादी स्त्रीवाद क्रांतिकारक बदलांऐवजी सुधारणावादी दृष्टिकोनातून राज्यातील असमानतेला आव्हान देतो.कायद्यांमध्ये सुधारणा आणि धोरणात्मक बदलांद्वारे समानता प्रस्थापित करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

३. **व्यक्तिस्वातंत्र्य:** महिलांनी स्वायत्त आणि स्वतंत्र नागरिक म्हणून जीवन जगावे, यावर भर दिला जातो.समाजातील पितृसत्ताक बंधनांपासून मुक्त होऊन महिलांना स्वतःच्या निवडी करण्याचे स्वातंत्र्य मिळायला हवे.

४. **राज्याच्या भूमिकेवर विश्वास:** उदारमतवादी स्त्रीवाद राज्याला एक प्रभावी साधन मानतो, ज्याद्वारे महिलांच्या अधिकारांसाठी कायदे लागू केले जाऊ शकतात.समानतेसाठी राज्याची धोरणे आणि कायदे महत्त्वाची भूमिका बजावतात.

५. **कायद्याच्या आधारे हक्क:** राज्याच्या कायद्यांमध्ये सुधारणा करून लिंगाधारित भेदभाव कमी करता येतो, असे या सिद्धांताचे मत आहे.उदा., समान वेतन कायदा, महिला आरक्षण, आणि लैंगिक शोषणाविरोधातील संरक्षण कायदे.

**उदारमतवादी स्त्रीवादी सिद्धांताची प्रमुख मागणी:**

१. **कायदेशीर आणि राजकीय समानता:** महिलांना समान मताधिकार आणि राजकीय प्रतिनिधित्व मिळावे.राज्याच्या निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढावा.

२. **आर्थिक समानता:** पुरुषांच्या बरोबरीने महिलांना समान वेतन, कामाचे तास, आणि श्रमाचे मूल्यमापन व्हावे.महिलांच्या कामाची सामाजिक व आर्थिक मान्यता असावी.

३. **शिक्षण आणि रोजगार:** महिलांसाठी शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देणे.महिलांना कौशल्यविकास आणि रोजगारात समान स्थान मिळावे.

४. **कुटुंब आणि वैयक्तिक जीवन:** कुटुंबामध्ये महिलांना समान निर्णय घेण्याचा अधिकार असावा.विवाह, घटस्फोट, आणि संपत्तीच्या हक्कांमध्ये समानता प्रस्थापित करावी.

५. **लैंगिक हिंसाचाराविरोधात संरक्षण:** महिलांना लैंगिक शोषण, बलात्कार, आणि छळवणुकीपासून संरक्षण मिळण्यासाठी प्रभावी कायदे आणि त्यांची अंमलबजावणी केली जावी.

**उदारमतवादी स्त्रीवादी विचारवंत**

उदारमतवादी स्त्रीवादी विचारवंत हे समानतेच्या तत्त्वांवर आधारित आहेत आणि त्यांनी पुरुष आणि महिलांमध्ये राजकीय, आर्थिक, सामाजिक, आणि कायदेशीर समानता प्रस्थापित करण्यासाठी योगदान दिले आहे. या विचारवंतांनी महिलांच्या अधिकारांसाठी सुधारणावादी दृष्टिकोनातून कार्य केले.

**प्रमुख उदारमतवादी स्त्रीवादी विचारवंत आणि त्यांचे योगदान:**

१. **मेरी वोलस्टोनक्राफ्ट (Mary Wollstonecraft)**

- महत्त्वाचे लेखन: "A Vindication of the Rights of Woman" (१७९२)
- **मुख्य विचार:**महिलांना शिक्षणाच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत.महिलांना स्वायत्ततेचा हक्क असावा आणि त्यांनी समाजात समान स्थान मिळवावे.महिलांचे शारीरिक, मानसिक, आणि वैचारिक स्वातंत्र्य महत्वाचे आहे.

**योगदान:** तिला आधुनिक स्त्रीवादी चळवळीची जननी मानले जाते.महिलांच्या शिक्षणावर भर दिला आणि त्यांना बुद्धिमत्ता सिद्ध करण्यासाठी समान संधी मिळावी हा मुद्दा प्रामुख्याने पुढे आणला.

२. **जॉन स्टुअर्ट मिल (John Stuart Mill)**

- **महत्त्वाचे लेखन:** "The Subjection of Women" (१८६९)
- **मुख्य विचार:**महिलांवर लादलेल्या सामाजिक बंधनांना संपवून त्यांना समानता आणि स्वातंत्र्य मिळाले पाहिजे.महिलांना मतदानाचा हक्क आणि राजकीय समानता असावी.विवाह आणि कुटुंबातही समानतेची गरज आहे.
- **योगदान:**महिलांच्या मताधिकार चळवळीचा प्रभावी समर्थक.पुरुषप्रधान कायदे आणि परंपरांना आव्हान देऊन स्त्रियांच्या समानतेचा विचार पुढे नेला.

### ३. हॅरिएट टेलर मिल (Harriet Taylor Mill)

- **महत्त्वाचे लेखन: "The Enfranchisement of Women"**
- **मुख्य विचार:** महिलांना राजकीय, सामाजिक, आणि आर्थिक समानता मिळाली पाहिजे.शिक्षण, रोजगार, आणि मालमत्तेच्या बाबतीत महिलांना समान हक्क दिले पाहिजेत.
- **योगदान:** जॉन स्टुअर्ट मिल यांच्यासोबत काम करून स्त्रियांच्या समानतेसाठी ठोस भूमिका मांडली.

### ४. सिमोन डी बुव्हार (Simone de Beauvoir)

- **महत्त्वाचे लेखन: "The Second Sex" (१९४९)**
- **मुख्य विचार:**महिलांच्या दुय्यम स्थानाला पितृसत्ताक संरचना जबाबदार आहे.महिलांनी स्वतःची ओळख आणि अस्तित्वासाठी संघर्ष करायला हवा."स्त्री जन्मत: स्त्री नसते, तिला बनवले जाते" हा तिचा प्रसिद्ध सिद्धांत आहे.
- **योगदान:**आधुनिक स्त्रीवादाला दिशा दिली आणि महिलांच्या स्वायत्ततेबाबत जागृती केली.

### ५. बेट्टी फ्रीडन (Betty Friedan)

- **महत्त्वाचे लेखन: "The Feminine Mystique" (१९६३)**
- **मुख्य विचार:**गृहिणींच्या समस्या आणि त्यांच्या स्वप्नांची दडपशाही यावर प्रकाश टाकला.महिलांना घराबाहेर काम करण्याचे स्वातंत्र्य आणि संधी मिळायला हवी.पितृसत्ताक सामाजिक संरचनेचा महिलांवर होणारा मानसिक परिणाम अधोरेखित केला.
- **योगदान:**दुसऱ्या स्त्रीवादी लाटेचा (Second Wave Feminism) पाया घातला.अमेरिकन स्त्रीवादी चळवळीतील महत्त्वाचा आवाज.

### ६. ग्लोरिया स्टायनम (Gloria Steinem)

- **महत्त्वाचे लेखन: "Outrageous Acts and Everyday Rebellions"**
- **मुख्य विचार:**महिलांच्या हक्कांसाठी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात व्यापक सुधारणा व्हायला हव्यात.महिलांच्या शरीरावर केवळ त्यांचा अधिकार आहे; पितृसत्ताक नियंत्रणाला विरोध.
- **योगदान:**National Organization for Women (NOW) च्या स्थापनेत मोलाचे योगदान.प्रगतिशील स्त्रीवादी विचारांचे प्रचारक.

उदारमतवादी स्त्रीवादी विचारवंतांनी महिलांच्या हक्कांसाठी एक मजबूत पाया घातला. त्यांनी कायदे आणि धोरणांमध्ये सुधारणा घडवून महिलांना शिक्षण, रोजगार, आणि राजकीय क्षेत्रात समान स्थान मिळवून दिले. त्यांच्या सुधारणावादी दृष्टिकोनामुळे समाजात मोठे सकारात्मक बदल घडले, ज्याचा प्रभाव आजही दिसून येतो.

**उदारमतवादी स्त्रीवादी सिद्धांताचे योगदान:**

१. **महिला हक्कांबद्दल जनजागृती:** १९व्या आणि २०व्या शतकातील महिला मताधिकार चळवळींवर या सिद्धांताचा मोठा प्रभाव पडला.महिला मताधिकार, समान वेतन, आणि शिक्षणाच्या हक्कांसाठी प्रभावी चळवळी सुरू झाल्या.

२. **सुधारणात्मक कायदे:** उदारमतवादी स्त्रीवादामुळे लैंगिक समानतेसाठी अनेक देशांमध्ये कायदेत सुधारणा घडून आल्या.

   उदा., १९६३ चा समान वेतन कायदा (Equal Pay Act) आणि लैंगिक भेदभाव कायदा (Sex Discrimination Act).

३. **राजकीय प्रतिनिधित्व:** या सिद्धांताने महिलांना राजकीय अधिकार आणि निर्णयप्रक्रियेत स्थान मिळवून दिले.महिलांच्या आरक्षणासाठी कायदे करण्यात आले.

४. **शिक्षण व रोजगारात सुधारणा:** महिलांना शिक्षण व रोजगारात समान हक्क मिळवून देण्याच्या चळवळींना या सिद्धांताचा पाठिंबा आहे.

**उदारमतवादी स्त्रीवादी सिद्धांतावर टीका:**

१. **पुरुषसत्तेच्या मूळ समस्येकडे दुर्लक्ष:** हा सिद्धांत सुधारणांवर भर देतो; परंतु पितृसत्ताक व्यवस्थेच्या मूळ समस्येवर क्रांतिकारक तोडगा सुचवत नाही.

२. **क्रांतिकारक बदलाची आवश्यकता:** रेडिकल स्त्रीवादी विचारवंतांच्या मते, उदारमतवादी स्त्रीवाद पितृसत्ताक व्यवस्थेला पूर्णतः संपवण्याची मागणी करत नाही.

३. **केवळ कायद्यांवर अवलंबित्व:** कायदे आणि धोरणे महिलांना समानता देण्यासाठी पुरेशी नाहीत; समाजातील मानसिकता बदलण्यासाठी अधिक व्यापक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

४. **वर्गीय आणि वांशिक मुद्द्यांकडे दुर्लक्ष:** हा दृष्टिकोन प्रामुख्याने मध्यमवर्गीय महिलांच्या समस्यांवर केंद्रित आहे, आणि वर्गीय, वांशिक, किंवा आर्थिक दृष्टिकोनातून भेदभावाचा अभ्यास करत नाही.

उदारमतवादी स्त्रीवादी सिद्धांताने महिला हक्क, समानता, आणि स्वातंत्र्य यासंदर्भात मोठे योगदान दिले आहे. राज्यातील कायदे आणि धोरणांमध्ये महिलांसाठी सुधारणा घडवून आणण्याचे श्रेय या सिद्धांताला आहे. तथापि, पितृसत्ताक व्यवस्थेच्या मूळ समस्यांवर अधिक व्यापक आणि क्रांतिकारक उपायांची आवश्यकता असल्याची त्यावर टीका होते. तरीही, महिलांच्या कायदेशीर आणि राजकीय समानतेसाठी या सिद्धांताचा ऐतिहासिक व आधुनिक काळात महत्त्वाचा वाटा आहे.

## जहाल स्त्रीवाद

जहाल स्त्रीवाद (Radical Feminism) हा स्त्रीवादाच्या प्रमुख विचारप्रवाहांपैकी एक आहे. हा सिद्धांत पितृसत्ताक व्यवस्थेला महिलांच्या शोषणाचे मूळ मानतो आणि या व्यवस्थेच्या संपूर्ण नाशासाठी क्रांतिकारक बदलांची मागणी करतो. जहाल स्त्रीवादाच्या मते, समाजातील लिंगाधारित असमानता ही इतर सर्व असमानतेच्या मूळाशी जोडलेली आहे, आणि ती पितृसत्ताक व्यवस्थेमुळे प्रस्थापित झाली आहे.

### जहाल स्त्रीवादाचा आधार:

जहाल स्त्रीवादाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे पितृसत्ताक व्यवस्थेचे समूळ उच्चाटन करून महिलांसाठी स्वायत्त आणि समानतेवर आधारित समाजाची स्थापना करणे.

१. **पितृसत्ताक व्यवस्थेचा निषेध:** जहाल स्त्रीवादाच्या मते, पितृसत्ताक व्यवस्था ही महिलांच्या दमनासाठी जबाबदार आहे. पितृसत्ताकतेचा प्रभाव सर्व सामाजिक, राजकीय, आर्थिक, आणि सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये पसरलेला आहे.

२. **महिलांचा शारीरिक आणि लैंगिक शोषण:** जहाल स्त्रीवादाचे मानणे आहे की महिलांवरील अत्याचार, बलात्कार, कौटुंबिक हिंसा, आणि लैंगिक छळ हे पितृसत्ताकतेचे परिणाम आहेत. पुरुषांनी महिलांच्या शरीरावर वर्चस्व ठेवण्यासाठी लैंगिकतेचा वापर केला आहे.

३. **स्त्री-पुरुष भूमिकांवर प्रश्न:** पारंपरिक लिंग भूमिका आणि स्त्री-पुरुषांच्या समाजातील स्थानावर जहाल स्त्रीवादाने प्रश्न उपस्थित केले आहेत. पुरुषप्रधान मूल्यव्यवस्था मोडीत काढून महिलांना स्वातंत्र्य मिळावे, यावर भर दिला जातो.

४. **महिला स्वायत्ततेची मागणी:** महिलांनी सामाजिक, आर्थिक, आणि लैंगिक बाबतीत स्वायत्तता मिळवावी, यासाठी जहाल स्त्रीवाद आग्रही आहे. यासाठी महिला समुदाय किंवा महिलांसाठी स्वतंत्र संस्थांची उभारणी केली जावी, असे सुचवले जाते.

### जहाल स्त्रीवादी विचारवंत

जहाल स्त्रीवादी विचारवंत हे स्त्रीवादाच्या त्या विचारप्रवाहाशी संबंधित आहेत जो पितृसत्ताक व्यवस्थेच्या पूर्ण नाशाची आणि लिंग आधारित असमानतेच्या समूळ उच्चाटनाची मागणी करतो. जहाल स्त्रीवाद महिलांच्या शोषण, हिंसा आणि पितृसत्ताक सत्ताधिकारांवर तीव्र टीका करतो आणि क्रांतिकारक बदलांची आवश्यकता व्यक्त करतो. यामध्ये पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचे नायकत्व ठरवणारी क्रांतिकारी विचारधारा आहे.

### प्रमुख जहाल स्त्रीवादी विचारवंत आणि त्यांचे योगदान:

१. **केट मिलेट (Kate Millett)**

- **महत्त्वाचे लेखन: "Sexual Politics" (१९७०)**

**मुख्य विचार:**

- केट मिलेटने पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचे जतन करणाऱ्या संपूर्ण सामाजिक, सांस्कृतिक, आणि राजकीय संरचनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

- "लैंगिक राजकारण" या तत्त्वाचा विकास करून, त्यांनी लैंगिक संबंध आणि पितृसत्ताक व्यवस्थेच्या संबंधी विचार केला.

**योगदान:**

- लैंगिकता आणि पितृसत्ताक व्यवस्थेतील असमानतेची स्पष्ट टीका करणारी पहिली प्रमुख विचारवंत होती.

२. **शुलामिथ फायरस्टोन (Shulamith Firestone)**

- **महत्त्वाचे लेखन: "The Dialectic of Sex" (१९७०)**

**मुख्य विचार:**

- फायरस्टोनने असे मत मांडले की पितृसत्ताक समाज व्यवस्थेच्या सुरूवातीस महिलांच्या शारीरिक आणि प्रजनन स्वातंत्र्याचा शोषण करण्याच्या आधारे स्थापन झाला.
- प्रजनन प्रक्रियेचे तंत्रज्ञान सुधारल्यास महिलांचे शारीरिक बंधन समाप्त होईल आणि त्या पद्धतीने पितृसत्ताक नियंत्रणाचे उच्चाटन होईल.

**योगदान:**

- स्त्रीच्या शरीराच्या शोषणावर आणि प्रजननाचे अधिकार सुधारण्यावर तिचा ठोस विचार होता.
- स्त्रीवादी विचारवंतांमध्ये शारीरिक स्वातंत्र्य आणि लैंगिक समानतेसाठी संघर्ष करणारी एक महत्त्वाची दृष्टीकोन उचलली.

३. **एरिका जॉन्सन (Erica Jong)**

- **महत्त्वाचे लेखन: "Fear of Flying" (१९७३)**

**मुख्य विचार:**

- जॉन्सनने स्त्रीच्या लैंगिक स्वातंत्र्य आणि यौनाचाराच्या प्रश्नांवर स्पष्ट विचार मांडले.
- पुरुषप्रधान समाजाच्या बंधनांतून मुक्त होण्यासाठी महिलांना स्वतःच्या शरीरावर अधिकार असावा, हा तिचा मुख्य दृष्टिकोन होता.

**योगदान:**

- तिच्या लेखनाने लैंगिक स्वातंत्र्याची आणि महिलांच्या यौन-स्वातंत्र्याची महत्त्वपूर्ण चर्चा सुरू केली.

४. **जोआन डिडिओ (Joan Didion)**

- **महत्त्वाचे लेखन: "Slouching Towards Bethlehem" (१९६८)**

**मुख्य विचार:**

- डिडिओने स्त्रीचे अस्तित्व आणि तिच्या संघर्षाचे साहित्यिक विश्लेषण केले, विशेषतः पितृसत्ताक समाजातील स्त्रियांच्या भावनात्मक आणि मानसिक अवस्थेवर.

**योगदान:**

- ती अमेरिकन समाजातील पितृसत्ताक संरचनांमधील महिला शोषणावर तीव्र समर्पण असलेल्या लेखिका होती.

५. **अलिस वॉकर (Alice Walker)**

- **महत्त्वाचे लेखन: "The Color Purple" (**१९८२**)**

**मुख्य विचार:**

- वॉकरने अमेरिकन समाजातील आफ्रिकन अमेरिकन महिलांच्या जीवनावर लक्ष केंद्रित केले.
- तिच्या लेखनात, महिलांच्या जखमांवर, शारीरिक, मानसिक आणि लैंगिक शोषणावर चर्चा केली आहे.

**योगदान:**

- ती अशा लेखिका होती जिने पितृसत्ताक, वांशिक आणि सामाजिक शोषणावर लढण्यासाठी आपले साहित्य दिले.

जहाल स्त्रीवादी विचारवंतांनी पितृसत्ताक व्यवस्थेच्या विरोधात आणि महिलांच्या स्वातंत्र्याच्या समर्थनार्थ सशक्त आवाज उठवला आहे. त्याने महिलांच्या शोषण, हिंसा आणि शारीरिक स्वातंत्र्याच्या मुद्द्यांवर खोल विचार केला आहे. तसेच, समाजातील आणि कायदेशीर संरचनांमध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणण्यासाठी तीव्र आणि स्पष्ट संघर्षाची आवश्यकता मानली आहे.

**जहाल स्त्रीवादाची वैशिष्ट्ये:**

१. **पितृसत्ताक व्यवस्थेचे विरोधक:** जहाल स्त्रीवाद पितृसत्ताकतेच्या मूळ समस्येवर लक्ष केंद्रित करतो आणि ती व्यवस्था पूर्णतः नष्ट करण्याची मागणी करतो.

२. **लिंगाधारित भेदभावाचा नाश:** स्त्री-पुरुष असमानता संपवून समाजात लिंग समानता आणणे हे मुख्य उद्दिष्ट आहे.

३. **स्त्री-स्वातंत्र्यावर भर:** महिलांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता मिळावी, आणि त्यांचे शरीर व मनावर कोणत्याही प्रकारचे बंधन नसावे.

४. **लैंगिकतेचे पुनर्मूल्यांकन:** जहाल स्त्रीवाद लैंगिकतेचा अभ्यास पितृसत्ताकतेच्या प्रभावाच्या संदर्भात करतो.विवाहसंस्था, मातृत्व, आणि लैंगिक संबंधांवर आधारित शोषणाला आव्हान दिले जाते.

५. **क्रांतिकारक दृष्टिकोन:** जहाल स्त्रीवाद प्रस्थापित सामाजिक आणि सांस्कृतिक संरचनेत क्रांतिकारक बदलांची मागणी करतो.

**जहाल स्त्रीवादाच्या प्रमुख मागण्या:**

१. **पितृसत्ताक व्यवस्थेचा नाश:** समाजातील सर्व पितृसत्ताक संरचना नष्ट करण्याची मागणी.महिलांना नियंत्रित करणाऱ्या सामाजिक प्रथांवर बंदी घालावी.

२. **लैंगिक हिंसाचाराविरोधात कठोर उपाय:** बलात्कार, लैंगिक छळ, आणि कौटुंबिक हिंसाचार याविरोधात कठोर कायद्यांची अंमलबजावणी करावी.

३. **स्त्री-पुरुष समानता:** महिलांना सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय क्षेत्रात समान संधी मिळाव्यात.

४. **महिला स्वायत्तता:** महिलांना स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची संधी मिळावी, जसे की मातृत्वाबाबत निर्णय घेणे.

५. **महिला समुदाय:** जहाल स्त्रीवाद काही वेळा "महिला समुदाय" किंवा पुरुषवर्चस्वापासून मुक्त अशा समाजाच्या निर्मितीची वकिली करतो.

**जहाल स्त्रीवादाचे योगदान:**

१. **लिंगविषयक असमानतेला आव्हान:** जहाल स्त्रीवादाने लैंगिक भेदभावाचे मूळ पितृसत्ताक व्यवस्थेत असल्याचे स्पष्ट केले.

२. **महिला चळवळींना प्रेरणा:** बलात्कारविरोधी, कौटुंबिक हिंसाचारविरोधी, आणि लैंगिक शोषणाविरोधी चळवळींना जहाल स्त्रीवादाने मोठे योगदान दिले आहे.

३. **लैंगिकतेवर चर्चा:** लैंगिकता, मातृत्व, आणि विवाहसंस्थेसारख्या विषयांवर खुलेपणाने चर्चा केली आणि महिलांना नव्याने विचार करायला प्रवृत्त केले.

४. **महिला सशक्तीकरण:** महिलांना स्वायत्तता आणि सशक्तीकरण मिळवून देण्यासाठी जहाल स्त्रीवाद महत्त्वाची भूमिका बजावतो.

**जहाल स्त्रीवादावर टीका:**

१. **अतिशयोक्त विचारसरणी:** जहाल स्त्रीवाद अनेकदा पुरुषविरोधी असल्याचे आरोप होतात.सर्व समस्या पितृसत्ताक व्यवस्थेशी जोडणे ही अतिशयोक्ती मानली जाते.

२. **सर्वसमावेशकतेचा अभाव:** जहाल स्त्रीवाद प्रामुख्याने पांढऱ्या, मध्यमवर्गीय महिलांच्या अनुभवांवर आधारित आहे.विविधता आणि अन्य सामाजिक समस्यांना पुरेसे स्थान दिले जात नाही.

३. **पुरुष-स्त्री सहकार्यासाठी जागा नाही:** जहाल स्त्रीवाद सहकारी दृष्टिकोन न स्वीकारता महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्यावर भर देतो, यावर टीका होते.

४. **व्यवहार्यता:** जहाल स्त्रीवादाने सुचवलेले क्रांतिकारक उपाय प्रत्यक्षात अमलात आणणे अवघड आहे.

जहाल स्त्रीवाद हा स्त्रीवादाचा अत्यंत क्रांतिकारक प्रवाह आहे, जो पितृसत्ताक व्यवस्थेच्या संपूर्ण उच्चाटनासाठी प्रयत्नशील आहे. त्याने महिलांच्या स्वातंत्र्याच्या मुद्द्याला व्यापक आणि ठोस स्वरूप दिले आहे. तथापि, त्याच्या अतिशयोक्त दृष्टीकोनावर टीका झाली असली, तरीही लैंगिक हिंसा, समानता, आणि महिला सशक्तीकरणासाठी जहाल स्त्रीवादाने केलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे.

## मार्क्सवादी स्त्रीवादी सिद्धांत

मार्क्सवादी स्त्रीवादी सिद्धांत हा एक सामाजिक आणि राजकीय दृष्टीकोन आहे जो आर्थिक आणि वर्ग संरचनांच्या संदर्भात लैंगिक असमानतेवर भाष्य करतो. हा सिद्धांत कार्ल मार्क्सच्या वर्ग संघर्षाच्या सिद्धांतावर आणि भांडवलशाही समाजातील कामगारांच्या स्थानावर आधारित आहे.

मार्क्सवादी स्त्रीवाद असे मानतो की स्त्रियांच्या अत्याचाराचे मुख्य कारण भांडवलशाही व्यवस्था आहे, जी स्त्रियांना त्यांच्या श्रमाची योग्य किंमत देत नाही आणि त्यांना घरगुती कामात गुंतवते. यानुसार लैंगिक असमानतेचे कारण केवळ सामाजिक आणि सांस्कृतिक नसून आर्थिक आधार आहे.

अँजेला डेव्हिस, क्लारा झेटकिन आणि सिल्व्हिया फेडेरिकी यांसारख्या मार्क्सवादी स्त्रीवादी विचारवंतांनी हा दृष्टिकोन पुढे आणला आहे. स्त्रियांवर होणारे अत्याचार हे केवळ त्यांच्या लिंगामुळे नसून ते त्यांच्या आर्थिक स्थितीशी आणि कामगार वर्गाच्या दडपशाहीशी निगडीत आहेत, असा सिद्धांत त्यांनी मांडला.या तत्त्वाचा उद्देश केवळ महिलांच्या हक्कांचे संरक्षण करणे नाही तर वर्गीय असमानता दूर करणे हा आहे, जेणेकरून समान आणि न्याय्य समाजाची स्थापना करता येईल.

मार्क्सवादी स्त्रीवादी दृष्टिकोनानुसार, राज्य ही एक सामाजिक संस्था आहे जी मुख्यतः पुरुषप्रधान पद्धतीचे समर्थन करते आणि स्त्रियांच्या शोषणाचे कारणीभूत ठरते. मार्क्सवादी स्त्रीवादाच्या मते, राज्य ही भांडवलशाही व्यवस्थेची एक उपकेंद्र आहे, जी पुरुषप्रधान संस्कृतीला बळकट करते आणि स्त्रियांच्या शोषणाला चालना देते.

मार्क्सवादी स्त्रीवादी राज्य सिद्धांताच्या क्षेत्रात काही प्रमुख विचारवंतांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यापैकी काही विचारवंत पुढीलप्रमाणे आहेत:

### फ्रेडरिक एंगेल्स (Frederick Engels)

- 'दि ओरिजिन ऑफ दि फॅमिली, प्रायव्हेट प्रॉपर्टी अँड द स्टेट' या ग्रंथात एंगेल्स यांनी कुटुंब संस्था, खाजगी मालमत्ता आणि राज्य यांच्या उत्पत्तीचे विश्लेषण केले. त्यांच्या मते, खाजगी मालमत्तेची निर्मिती आणि राज्य संस्थेचा उदय हे स्त्रियांच्या शोषणाचे कारणीभूत ठरले.

### क्लारा झेटकिन (Clara Zetkin)

- झेटकिन यांनी स्त्रीवादी आणि साम्यवादी चळवळींचे एकत्रीकरण केले. त्यांनी स्त्रियांच्या मुक्तीसाठी राज्याच्या क्रांतिकारी बदलांची आवश्यकता असल्याचे मानले.

**सिल्विया फेडेरिची (Silvia Federici)**

- फेडेरिची यांनी 'कॅलिबान' या ग्रंथात घरगुती श्रमाचे मूल्य आणि त्याचे शोषण यावर चर्चा केली. त्यांच्या मते, घरगुती श्रम हे राज्य आणि भांडवलशाही व्यवस्थेचे समर्थन करणारे आहे.

**लुस इरिगेरे (Luce Irigaray)**

- इरिगेरे यांनी स्त्रीचे शरीर आणि लेखन यांचे विश्लेषण केले आणि पुरुषप्रधान संस्कृतीच्या विरोधात स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व मांडले.

**मार्क्सवादी स्त्रीवादी राज्य सिद्धांताचे मुख्य मुद्दे:**

१. **राज्य आणि पितृसत्ताक पद्धतीचे संबंध:** मार्क्सवादी स्त्रीवादी विचारक मानतात की राज्य ही पितृसत्ताक पद्धतीचे समर्थन करणारी संस्था आहे. राज्याच्या कायदे, धोरणे आणि संस्था पुरुषप्रधान संस्कृतीला बळकट करतात, ज्यामुळे स्त्रियांचे शोषण आणि दमन वाढते.

२. **राज्य आणि वर्ग संघर्ष:** मार्क्सवादी स्त्रीवादाच्या दृष्टीकोनानुसार, राज्य ही भांडवलशाही व्यवस्थेची उपकेंद्र आहे, जी श्रमिक वर्गाच्या हितांना नकार देऊन भांडवलदार वर्गाच्या हितांचे रक्षण करते. या संदर्भात, स्त्रियांचे शोषण केवळ लिंगाच्या आधारेच नाही, तर त्यांच्या वर्गीय स्थितीच्या आधारेही होते.

३. **राज्य आणि कुटुंब संस्था:** मार्क्सवादी स्त्रीवादी विचारक मानतात की राज्य कुटुंब संस्थेला बळकट करते, ज्यामुळे स्त्रियांचे घरगुती काम आणि मातृत्वाचे कार्य अनवांछित आणि अवैतनिक राहते. या पद्धतीमुळे स्त्रिया आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून राहतात, ज्यामुळे त्यांचे शोषण वाढते.

४. **राज्य आणि क्रांतिकारी बदल:** मार्क्सवादी स्त्रीवादाच्या दृष्टीकोनानुसार, स्त्रियांच्या मुक्तीसाठी राज्याच्या क्रांतिकारी बदलांची आवश्यकता आहे. केवळ कायदेशीर सुधारणा पुरेशी नाहीत; राज्याच्या संरचनेत मूलभूत बदल आवश्यक आहेत, ज्यामुळे स्त्रियांचे शोषण आणि दमन संपुष्टात येईल.

मार्क्सवादी स्त्रीवादी राज्य सिद्धांतानुसार, राज्य ही पितृसत्ताक पद्धतीचे समर्थन करणारी संस्था आहे, जी स्त्रियांच्या शोषणाचे कारणीभूत ठरते. स्त्रियांच्या मुक्तीसाठी राज्याच्या संरचनेत मूलभूत बदल आवश्यक आहेत, ज्यामुळे स्त्रियांचे शोषण आणि दमन संपुष्टात येईल.

**समाजवादी स्त्रीवाद**

राज्याचा समाजवादी स्त्रीवादी सिद्धांत हा स्त्रीवादाचा एक महत्त्वाचा प्रवाह आहे, जो स्त्रियांच्या स्थितीचे विश्लेषण करण्यासाठी समाजवाद आणि स्त्रीवाद यांचे तत्वज्ञान एकत्रित करतो. हा सिद्धांत मुख्यतः स्त्रियांच्या शोषणाचा उगम केवळ पितृसत्ताक व्यवस्थेत नसून, तो वर्गीय, आर्थिक, आणि सामाजिक व्यवस्थेतही खोलवर रुजलेला आहे, असे मानतो.

## समाजवादी स्त्रीवादाचे आधार



१. **वर्गीय वर्चस्व आणि पितृसत्ता:** समाजवादी स्त्रीवाद मानतो की पितृसत्ताक व्यवस्थेची मुळे आर्थिक शोषणात आहेत. भांडवलशाही व्यवस्थेत स्त्रियांना कमी कामाचे पैसे दिले जातात, आणि त्यांचे श्रम विनामूल्य (जसे की घरकाम, मुलांचे संगोपन) वापरले जातात.त्यामुळे स्त्रियांचे शोषण केवळ लिंगाधारित नसून, वर्गाधारितही आहे.

२. **श्रमाचै विभाजन:** भांडवलशाहीत श्रमाचे विभाजन "सार्वजनिक" (उदा. ऑफिसमध्ये काम) आणि "खाजगी" (घरकाम, कुटुंबाची काळजी घेणे) असे केले गेले आहे.महिलांना प्रामुख्याने खाजगी क्षेत्रात रोखून ठेवले गेले आहे, ज्यामुळे त्यांच्या प्रगतीला अडथळा निर्माण होतो.

३. **स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य:** स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य ही स्त्री-पुरुष समानतेसाठी महत्त्वाची पूर्वशर्त मानली जाते.समाजवादी स्त्रीवाद आर्थिक संसाधनांमध्ये समान वाटपावर भर देतो, जेणेकरून स्त्रियांना आर्थिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळेल. तसेच खाजगी मालमत्तेच्या अधिकारामुळे स्त्री पुरुष विषमता निर्माण झाली आहे, तेव्हा स्त्री स्वातंत्र्यासाठी खाजगी मालमत्तेचे उच्चाटन झाले पाहिजे असे या समाजवादी स्त्रीवादाचे धोरण आहे.

४. **समाजवादी बदलाचा आग्रह:** केवळ पितृसत्तेचा विरोध करून स्त्री-मुक्ती शक्य नाही; यासाठी वर्गीय आणि आर्थिक शोषणालाही संपवणे गरजेचे आहे.भांडवलशाही व्यवस्थेच्या ऐवजी समतोल समाजरचनेचा पुरस्कार केला जातो.

५. **संघर्षाचा आंतरसंबंध:** समाजवादी स्त्रीवाद जात, धर्म, वर्ग, आणि लिंग यांचा आंतरसंबंध मान्य करतो. या सर्व घटकांच्या एकत्रित परिणामामुळे स्त्रियांच्या समस्यांचे स्वरूप ठरते.

### उद्दिष्टे:

### स्त्री-पुरुष समानता:

- आर्थिक, सामाजिक, आणि राजकीय पातळ्यांवर स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार समाजवादी स्त्रीवादी विचारवंत करतात.

### घरकामाचे पुनर्मूल्यांकन:

- घरकाम आणि संगोपनाच्या श्रमाला आर्थिकदृष्ट्या महत्त्व देणे.

### सर्वसमावेशक धोरणे:

- कामगार हक्क, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण यामध्ये स्त्रियांचा समावेश करणे.

## समाजवादी स्त्रीवादी विचारवंत

समाजवादी स्त्रीवादाशी संबंधित अनेक विचारवंत आणि कार्यकर्ते आहेत, ज्यांनी स्त्रियांच्या शोषणाचे आर्थिक, सामाजिक, आणि सांस्कृतिक कारणे मांडत या सिद्धांताला विकसित केले. काही प्रमुख समाजवादी स्त्रीवादी विचारवंत खालीलप्रमाणे आहेत:

**१. अलेक्झांड्रा कोलोंताई (Alexandra Kollontai) (देश: रशिया)**

**योगदान:**

- कोलोंताई या पहिल्या स्त्रीवादी नेत्यांपैकी एक होत्या, ज्यांनी भांडवलशाहीच्या आणि पितृसत्तेच्या संयुक्त शोषणावर जोर दिला.
- श्रमिक महिलांसाठी समर्पित धोरणांची मांडणी केली आणि स्त्रियांसाठी आर्थिक स्वातंत्र्याची गरज अधोरेखित केली.
- विवाहसंस्थेवर पुनर्विचार करीत, त्यांनी प्रेम, लैंगिकता, आणि घरगुती जीवनातील समानतेवर भर दिला.

२**. रोजा लक्झेंबर्ग (Rosa Luxemburg) (देश: पोलंड-जर्मनी)**

**योगदान:**

- लक्झेंबर्ग यांनी वर्ग संघर्ष आणि स्त्रियांच्या शोषणातील संबंधावर प्रकाश टाकला.
- महिलांच्या श्रमिक चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली.

३**. सिल्व्हिया फेडेरिसी (Silvia Federici) (देश: इटली)**

**योगदान:**

- फेडेरिसी यांनी भांडवलशाही आणि पितृसत्ताक यामधील संबंधांवर प्रकाश टाकला.
- त्यांच्या पुस्तक "Caliban and the Witch" मध्ये त्यांनी भांडवलशाहीत महिलांच्या श्रमाचे विनामूल्य शोषण कसे होते, हे स्पष्ट केले.
- त्यांनी घरकामाला श्रम मानून त्याला आर्थिकदृष्ट्या महत्त्व देण्याची मागणी केली.

४**. ज्यूलियट मिशेल (Juliet Mitchell) (देश: इंग्लंड)**

**योगदान:**

- स्त्रियांवरील पितृसत्ताक दबावांचा सखोल अभ्यास केला आणि सामाजिक बदलांच्या माध्यमातून महिलांची स्थिती सुधारण्यावर भर दिला.
- स्त्रियांचे शोषण आर्थिक, सांस्कृतिक, आणि मानसिक स्तरावर असल्याचे स्पष्ट केले.

**५. एन फर्ग्युसन (Ann Ferguson) (देश: अमेरिका)**

**योगदान:**

- भांडवलशाहीतून निर्माण झालेल्या वर्गीय आणि लिंगाधारित शोषणावर चर्चा केली.
- त्यांच्या मते, महिलांची मुक्ती केवळ आर्थिक स्वातंत्र्यावर अवलंबून नाही तर सांस्कृतिक आणि वैयक्तिक स्वातंत्र्यालाही महत्त्व आहे.

**६. लिसा वोगेल (Lise Vogel) (देश: अमेरिका)**

**योगदान:**

- वोगेल यांनी स्त्रियांच्या पुनरुत्पादक श्रमाचे महत्त्व समजावून सांगितले.
- त्यांच्या मते, पुनरुत्पादक श्रम (म्हणजे मुलांचा सांभाळ, घरकाम इ.) भांडवलशाहीच्या टिकवण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे.

**७. नॅन्सी फ्रेजर (Nancy Fraser) (देश: अमेरिका)**

**योगदान:**

- फ्रेजर यांनी सामाजिक न्याय, वर्गीय समानता, आणि स्त्रीवादी चळवळी यांचा परस्परसंबंध मांडला.
- त्यांनी स्त्रियांच्या समस्यांकडे केवळ ओळख-राजकारणाच्या (identity politics) दृष्टिकोनातून न पाहता आर्थिक व सामाजिक न्यायावर भर दिला.

समाजवादी स्त्रीवादी विचारवंतांनी महिलांच्या शोषणाची कारणे सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक पैलूंमध्ये शोधून त्यावर तोडगा सुचवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी वर्ग संघर्ष, भांडवलशाही, आणि पितृसत्ता यांना एकत्रित समजून स्त्रियांच्या मुक्तीसाठी समग्र दृष्टिकोन मांडला.समाजवादी स्त्रीवाद मानतो की स्त्रियांची मुक्ती केवळ पितृसत्तेचा विरोध करून नाही तर आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थेत मूलभूत बदल करूनच साध्य होऊ शकते. या विचारधारेचा उद्देश असा समाज निर्माण करणे आहे, जिथे वर्ग, लिंग, आणि आर्थिक शोषण पूर्णतः नष्ट झालेले असेल.

**स्त्रीवादी दृष्टिकोनाचे महत्त्व:**

१. **राजकीय आणि सामाजिक सहभाग:** राज्यातील राजकीय प्रतिनिधित्वामध्ये महिलांची संख्या खूप कमी आहे. स्त्रीवादी दृष्टिकोन यावर आक्षेप घेतो आणि समान सहभागाची मागणी करतो.

२. **कायदा आणि महिलांचे हक्क:** स्त्रीवादी अभ्यासाने दाखवले की कायद्यांमध्ये अनेकदा महिलांना दुय्यम स्थान दिले जाते.उदा., कौटुंबिक कायदे, कामगार कायदे, आणि जमीन मालकीविषयक कायदे हे पुरुषांना अधिक फायदेशीर ठरतात. त्यामुळे स्त्रीवादाने स्त्रियांच्या कायदे आणि महिलांच्या हक्काच्या बाबतीत आवाज उठवला.

३. **आर्थिक असमानता:** राज्याच्या धोरणांमध्ये महिलांच्या आर्थिक योगदानाची कधीही योग्य दखल घेतली जात नाही.

अनौपचारिक कामगार महिलांचे श्रम दुर्लक्षित केले जाते, ज्यामुळे आर्थिक असमानता निर्माण होते. त्यामुळे स्त्री स्वातंत्र्यासाठी खाजगी मालमत्तेची उच्चाटन करण्यावर स्त्रीवाद्यांचा प्रामुख्याने भर आहे.

४. **महिलांच्या सुरक्षिततेचे मुद्दे:** राज्याच्या सुरक्षाविषयक धोरणांमध्ये महिलांच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याचा विचार कमी होतो.बलात्कार, कौटुंबिक हिंसा, आणि सार्वजनिक ठिकाणी होणारी छळवणूक याविरोधातील उपायांमध्ये राज्याचे अपयश स्पष्ट दिसते. त्यामुळे स्त्रीवादी विचारवंत महिलांच्या सुरक्षिततेच्या मुद्दे याला महत्त्वाचे स्थान देतात.

राज्याचा स्त्रीवादी दृष्टिकोन पितृसत्ताक व्यवस्थेच्या मूळावर प्रहार करतो आणि राज्याच्या धोरणात्मक भूमिकेत महिलांचे स्थान आणि योगदान मान्य करण्यावर भर देतो. स्त्रीवादाने राज्याचा विचार एका नवीन दृष्टिकोनातून मांडून महिलांच्या हक्कांसाठी आणि सामाजिक न्यायासाठी प्रभावी भूमिका बजावली आहे. राज्याचे स्वरूप अधिक समावेशक आणि न्याय्य बनवण्यासाठी हा दृष्टिकोन आजही महत्त्वाचा आहे.

**आपली प्रगती तपासा**

**१. राज्य निर्मितीची पार्श्वभूमी सांगा सांगा ?**

____________________

____________________

____________________

____________________

**२.राज्याच्या उदारमतवादी सिद्धांताचे महत्त्व सांगा?**

____________________

____________________

____________________

____________________

**३. राज्याच्या मार्क्सवादी सिद्धांताची चर्चा करा?**

____________________

____________________

____________________

____________________

**४. राज्याच्या स्त्रीवादी सिद्धांताच्या प्रकाराची चर्चा करा?**

____________________

____________________

____________________

____________________

## अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

1. Althusser, L. (1971). Lenin and philosophy and other essays. Monthly Review Press.

2. Engels, F. (1884). The origin of the family, private property and the state. International Publishers.

3. Kollontai, A. (1977). Selected writings of Alexandra Kollontai. W. W. Norton & Company.

4. Mill, J. S. (1869). The subjection of women. Longmans, Green, Reader, and Dyer.

5. Mitchell, J. (1974). Psychoanalysis and feminism: Freud, Reich, Laing, and women. Pantheon Books.

6. Marx, K., & Engels, F. (1848). The Communist Manifesto. Progress Publishers.

7. Pateman, C. (1988). The sexual contract. Stanford University Press.

8. Poulantzas, N. (1978). State, power, socialism. Verso.

9. Federici, S. (2004). Caliban and the witch: Women, the body and primitive accumulation. Autonomedia.

10. Fraser, N. (2013). Fortunes of feminism: From state-managed capitalism to neoliberal crisis. Verso.

❄❄❄❄❄❄❄

# २

# हक्क /अधिकार

**घटक रचना:**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.३.१ हक्क/अधिकाराची पार्श्वभूमी

२.३.२ हक्क/अधिकाराचे सिद्धांत

२.३.३ समूह आधारित आणि वैयक्तिक हक्क

२.३.४ हक्क/अधिकारावरील चर्चा आणि टीका

## २.१ उद्दिष्टे

**हक्क/अधिकार** या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. अधिकारांची पार्श्वभूमी, अधिकाराचे स्वरूप, प्रकार, महत्त्व सांगता येईल.

२. अधिकाराच्या वेगवेगळ्या सिद्धांताची ओळख होईल.

## २.२ प्रास्ताविक

अधिकार हा समाजशास्त्र, राजकारण, आणि तत्त्वज्ञानातील एक मूलभूत संकल्पना आहे, जी व्यक्तीला दिलेल्या कायदेशीर, नैतिक, किंवा नैसर्गिक हक्कांचे प्रतिनिधित्व करते. अधिकार म्हणजे एखाद्या व्यक्तीला किंवा समूहाला समाजात समानता, न्याय, आणि स्वातंत्र्य मिळवण्यासाठी दिलेले अधिकार किंवा स्वातंत्र्याचा उपयोग करण्याची मुभा होय. त्यामुळे अधिकार हे प्रत्येकाच्या सामाजिक जीवनासाठी आवश्यक आहेत.त्याशिवाय व्यक्ती आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करू शकत नाही. तसेच समाजासाठी उपयुक्त कार्य करू शकत नाही. खरे तर मानवी जीवनाच्या अस्तित्वाची कल्पनाच अधिकारांशिवाय करता येत नाही. त्यामुळे सध्याच्या काळात, प्रत्येक राज्य आपल्या नागरिकांना जास्तीत जास्त अधिकार प्रदान करण्यावर भर देत असते.अधिकार हे व्यक्तीच्या जीवनाचे आणि सामाजिक व्यवस्थेचे केंद्रबिंदू आहेत. ते केवळ व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी महत्त्वाचे नाहीत, तर एक न्याय्य आणि समतोल समाज निर्माण करण्यासाठीसुद्धा अपरिहार्य आहेत. अधिकारांच्या योग्य अंमलबजावणीमुळे समाजात शांतता, समृद्धी, आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण होऊ शकते. अधिकाराविषयी लास्कीच्या शब्दात असे म्हणता येईल की "एखादे राज्य आपल्या नागरिकांना ज्या प्रकारचे अधिकार प्रदान करते त्या आधारावर ते राज्य चांगले किंवा वाईट आहे हे ठरवता येईल."

## २.३ विषय विवेचन

व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास करणे हे राज्याचे सर्वोत्तम ध्येय आहे. त्यासाठी निसर्गाने मानवाला विविध प्रकारच्या शक्ती प्रदान केल्या आहेत, परंतु या शक्तींचा योग्य वापर स्वतःच्या आणि समाजाच्या हितासाठी करण्यासाठी, व्यक्तींना काही बाह्य सुविधा आवश्यक असतात. त्या सुविधा राज्याद्वारे व्यक्तीला पुरविल्या जातात आणि राज्याद्वारे व्यक्तीला प्रदान केलेल्या या बाह्य सुविधांना अधिकार या संकल्पनेद्वारे ओळखले जाते.

**हक्क/अधिकाराच्या अर्थ व व्याख्या**

अधिकार (Right) हा समाजशास्त्र, राजकारण, आणि तत्वज्ञानातील एक महत्त्वाची संकल्पना आहे. वेगवेगळ्या विचारवंतांनी अधिकाराच्या व्याख्या वेगवेगळ्या दृष्टिकोनातून केल्या आहेत.

अधिकारांचा अर्थ एखाद्या व्यक्तीला काही काम करण्यासाठी राज्याने दिलेले स्वातंत्र्य किंवा सकारात्मक सुविधा प्रदान करणे, जेणेकरून व्यक्ती त्याच्या शारीरिक, मानसिक आणि नैतिक शक्तींचा पूर्ण विकास करू शकेल अशी परिस्थिती निर्माण करून देणे .

**लास्कीच्या मते,** "अधिकार म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती ज्यांच्या अनुपस्थितीत कोणीही सामान्यपणे जीवन जगू शकत नाही."

**वाइल्डच्या मते,** "काही गोष्टी करण्याच्या स्वातंत्र्यासाठी विवेक पूर्ण मागणी केली जाते तिला हक्क असे म्हणतात."

**प्रो. बोझांके,** “हक्क ह्या अशा मागण्या आहेत की या मागण्यास समाजाद्वारे मान्यता दिली जाते आणि राज्याद्वारे ती प्रत्यक्षात आणली जाते”

**टी. एच. ग्रीन,**“व्यक्तीच्या आंतरिक विकासासाठी बाह्य परिस्थिती निर्माण करणे म्हणजेच हक्क होय”

**हॉलंड, “**एका व्यक्तीद्वारे व्यक्तीच्या कार्यावर स्वतः आपल्या शक्तीने नाही तर समाजच्या बळाचा आधारे प्रभावित करण्याची क्षमता म्हणजे अधिकार होय”

वरील विचारवंतांच्या वेगवेगळ्या व्याख्यावरून असे निदर्शनास येते की, व्यक्तीचा व्यक्तिमत्व विकास हा राज्यात होतो. त्यासाठी व्यक्तीच्या अंतरिक आणि बाह्य विकासासाठी ज्या गोष्टी राज्याकडून उपलब्ध करून दिल्या जातात त्यांना हक्क असे म्हटले जाते.

**हक्क/ अधिकाराविषयी वेगवेगळ्या विचारवंतांची मते**

**१. जॉन लॉक (John Locke)**

- लॉकच्या मते, "हक्क हे नैसर्गिक आहेत आणि व्यक्तींना जन्मजातच मिळतात."
- जीवन (Life), स्वातंत्र्य (Liberty), आणि संपत्ती (Property) हे व्यक्तीचे मूलभूत नैसर्गिक हक्क आहेत. राज्याचे कर्तव्य हे हक्क संरक्षित करणे आहे.

### २. थॉमस पेन (Thomas Paine)

- पेनच्या मते, "हक्क हे नैसर्गिक कायद्यांवर आधारित असतात आणि ते सर्व व्यक्तींना समानपणे लागू होतात."
- हक्कांचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि सन्मान यांचे रक्षण करणे.

### ३. जेरेमी बेंथम (Jeremy Bentham)

- बेंथमने हक्कांना उपयोगितावादी दृष्टिकोनातून परिभाषित केले आहे.
- हक्क हे केवळ कायद्याने दिले जातात. नैसर्गिक हक्कांची कल्पना निरर्थक आहे.
- हक्कांचे अस्तित्व समाजाच्या कल्याणासाठी असते.

### ४. कार्ल मार्क्स (Karl Marx)

- मार्क्सच्या मते, "हक्क ही आर्थिक आणि सामाजिक संरचनेचे परिणाम आहेत."
- व्यक्तींच्या सामाजिक-आर्थिक हक्कांवर भर दिला आणि समानतेवर आधारित समाजव्यवस्थेची मागणी केली.
- "स्वातंत्र्याचे हक्क" हे भांडवलशाहीच्या संदर्भात तो मर्यादित मानतो.

### ५. इमॅन्युएल कांट (Immanuel Kant)

- कांटच्या मते, "हक्क म्हणजे व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा सार्वभौम नियम, जो इतरांच्या स्वातंत्र्याला हानी पोहोचवणार नाही."
- नैतिकतेच्या तत्त्वज्ञानावर आधारित हक्क हे नैतिक कर्तव्यांशी संबंधित आहेत.

### ६. एच. एल. ए. हार्ट (H.L.A. Hart)

- हार्टच्या मते, "हक्क हे व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी असणारे मानवी हक्क आणि कायद्याने दिलेले विशेषाधिकार आहेत."
- हक्क हे व्यक्तीच्या सामाजिक नात्यांवर आधारित असतात.

### ७. रॉबर्ट नॉजिक (Robert Nozick)

- नॉजिकच्या मते, "हक्क म्हणजे नैसर्गिक स्वातंत्र्यावर आधारित व्यक्तीचे अधिकार."
- तो "किमान राज्य" (Minimal State) तत्त्वावर भर देतो, जिथे व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि मालकीचे हक्क संरक्षित केले जातात.

### ८. जॉन रॉल्स (John Rawls)

- रॉल्सच्या मते, "हक्क म्हणजे सामाजिक न्यायासाठी असलेली तत्त्वे."
- "न्यायाचे दोन तत्त्व" (Two Principles of Justice):
- प्रत्येकाला मूलभूत हक्कांमध्ये समानता हवी.

- सामाजिक आणि आर्थिक असमानता फक्त त्या स्थितीत मान्य केली जाऊ शकते, जी सर्वात दुर्बल गटासाठी फायदेशीर ठरेल.

### ९. हर्बर्ट स्पेन्सर (Herbert Spencer)

- स्पेन्सरच्या मते, "हक्क म्हणजे व्यक्तीचे स्वतःचे स्वातंत्र्य आणि मालकी यांचे संरक्षण करणारे नैतिक नियम."
- "हक्कांचा उद्देश म्हणजे नैसर्गिक निवडीत व्यक्तीला वाव देणे."

### १०. मार्टिन ल्यूथर किंग ज्युनियर (Martin Luther King Jr.)

- किंगने हक्कांना समानता आणि सामाजिक न्यायाशी जोडले.
- "हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तीला रंग, जात, धर्म किंवा लिंग भेद न करता समान स्वातंत्र्य आणि संधी देण्याची हमी."

हक्कांचे स्वरूप नैसर्गिक, कायदेशीर, आर्थिक, सामाजिक, आणि नैतिक असे वेगवेगळ्या दृष्टिकोनांमध्ये विभागलेले आहे. प्रत्येक विचारवंताने हक्कांचे विशिष्ट परिमाण आणि उद्देश स्पष्ट केले आहेत.

### हक्क / अधिकार निर्माण होण्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

हक्क आणि अधिकारांचा विकास हा मानवी सभ्यतेच्या उगमापासून सामाजिक, राजकीय आणि आर्थिक संघर्षांशी संबंधित आहे. व्यक्तीच्या सन्मान, स्वातंत्र्य, आणि सुरक्षिततेसाठी असलेल्या हक्कांची जाणीव कालांतराने विकसित झाली.

### प्राचीन काळ (Ancient Era) (प्राचीन ग्रीक आणि रोमन काळ)

- ग्रीक विचारवंत प्लेटो आणि अरिस्टॉटल यांनी "न्याय" आणि "कर्तव्य" यावर भर दिला.
- रोमन साम्राज्यात "नागरिक हक्क" (Civil Rights) संकल्पना विकसित झाली.
- रोमन कायदा (Roman Law) व्यक्तीच्या मालमत्ता आणि कुटुंबाशी संबंधित हक्कांसाठी महत्त्वाचा मानला जातो.

### भारतीय परंपरा:

- धर्मशास्त्र आणि स्मृती ग्रंथांत व्यक्तीच्या कर्तव्यांवर भर दिला गेला, परंतु त्यामध्ये न्याय आणि समानतेचे तत्व होते.
- उपनिषदांमध्ये "सर्वे सुखिनः सन्तु" सारख्या विचारांमुळे समतावादी दृष्टिकोनाची कल्पना आढळते.

**मध्ययुग (Medieval Era)**

- हक्क मुख्यतः राजे, सामंत, आणि धार्मिक संस्थांकडे केंद्रीत होते.
- सामान्य जनतेला त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवले गेले.

**मॅग्ना कार्टा (Magna Carta, १२१५):**

- इंग्लंडमध्ये राजकीय आणि सामाजिक अधिकारांच्या चळवळीचा प्रारंभ.
- राजाला सामंती सरदारांच्या अधिकारांचा आदर करण्यास भाग पाडणारी ऐतिहासिक घटना होती.
- व्यक्तीच्या न्याय आणि स्वातंत्र्याच्या हक्कांना सुरुवात झाली.

**प्रबोधन काळ आणि ज्ञानयुग (Renaissance and Enlightenment)**

- व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा आणि सर्जनशीलतेचा आदर वाढला.
- थॉमस हॉब्स: समाजाच्या सुरक्षिततेसाठी राजसत्तेला अधिकार आवश्यक आहेत.
- जॉन लॉक: नैसर्गिक हक्क (Natural Rights) म्हणजे जीवन, स्वातंत्र्य, आणि संपत्तीचे अधिकार.

**इंग्लंडमधली गौरवमय क्रांती (१६८८)**

- इंग्लंडमधील गौरवमय क्रांती ही १६८८-१६८९ दरम्यान घडलेली एक महत्त्वपूर्ण राजकीय घटना आहे, जिच्यामुळे इंग्लंडमधील राज्यसत्तेच्या स्वरूपात मूलभूत बदल घडून आले. या क्रांतीने इंग्लंडमध्ये लोकशाही, संसदीय व्यवस्थेचा पाया रचला आणि राजेशाहीला मर्यादित केले.
- संसदेने विल्यम आणि मेरी यांना १६८९ चा हक्काचा विधेयक (Bill of Rights) मान्य करायला भाग पाडले.
- या विधेयकाने संसदेच्या अधिकारांना मान्यता दिली आणि राजेशाहीला मर्यादित केले.

**अमेरिकन स्वातंत्र्य घोषणा (१७७६):**

- "सर्व माणसं समान जन्माला येतात" आणि त्यांना जीवन, स्वातंत्र्य, आणि आनंद मिळवण्याचा अधिकार आहे.

**फ्रेंच राज्यक्रांती (१७८९):**

- "मानव आणि नागरिकांच्या हक्कांची घोषणा" (Declaration of the Rights of Man and Citizen).

स्वातंत्र्य, समानता, आणि बंधुत्व ही मूलभूत तत्त्वे स्वीकारली गेली.

**औद्योगिक क्रांती आणि सामाजिक हक्क (१९वे शतक)**

- औद्योगिक क्रांतीनंतर कामगारांच्या शोषणामुळे श्रमिक हक्कांसाठी चळवळी झाल्या.
- कार्ल मार्क्स: आर्थिक समानता आणि वर्गसंघर्षावर भर दिला.
- महिला आणि मुलांसाठी विशेष कामगार हक्क मंजूर करण्यात आले.

**आधुनिक युग (२०वे शतक)**

- युनायटेड नेशन्स आणि मानवी हक्क
- जागतिक मानवी हक्कांची घोषणा (Universal Declaration of Human Rights, १९४८):
- सर्व व्यक्तींना जात, धर्म, लिंग, आणि राष्ट्राच्या भेदभावाशिवाय समान हक्क.
- नागरी, राजकीय, सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक हक्कांचा समावेश.

**स्वातंत्र्य चळवळी:**

- जगभरातील वसाहती देशांनी हक्कांसाठी लढा दिला.
- भारताच्या संविधानात मूलभूत हक्कांचा (Fundamental Rights) समावेश.
- भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ नुसार मूलभूत अधिकार देण्यात आले आहेत.

**समकालीन काळ (२१वे शतक)**

- मानवी हक्कांचा विस्तार
- पर्यावरणीय हक्क, लिंग समानता, LGBTQIA+ समुदायाचे हक्क, आणि डिजिटल हक्क यावर भर.
- जागतिकीकरणामुळे हक्कांचे सार्वत्रिकीकरण झाले आहे.

हक्क आणि अधिकार हे ऐतिहासिक संघर्षांचे फळ आहेत. त्यांचा विकास कालानुसार मानवजातीच्या गरजांनुसार आणि समाजाच्या बदलत्या स्वरूपानुसार झाला आहे. हक्क आजही मानवी सभ्यतेच्या प्रगतीसाठी आवश्यक भूमिका बजावत आहेत.

**हक्कांची प्रमुख वैशिष्ट्ये:**

हक्क (Rights) म्हणजे व्यक्तींना मिळालेल्या त्या संकल्पना, अधिकार किंवा स्वातंत्र्य जे समाज, कायदा किंवा मानवी नैतिकतेच्या आधारावर मान्य केले जातात. हक्क हे

समाजाच्या, व्यक्तीच्या आणि राज्याच्या परस्पर संबंधांमध्ये संतुलन राखण्यासाठी महत्त्वाचे असतात. हक्कांची काही प्रमुख वैशिष्ट्ये सविस्तरपणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

**काही हक्क हे नैसर्गिक व जन्मसिद्ध असतात**

- प्रत्येक व्यक्तीला जन्मापासूनच काही हक्क मिळतात.
- ते राज्याने निर्माण केलेले नसून ते नैसर्गिक हक्क असतात. उदा. जीवन जगण्याचा स्वातंत्र्याचा, संपत्तीचा
- राज्य या हक्कांना केवळ मान्यता देऊन उपभोग घेण्यासाठी अनुकूल अशी परिस्थिती निर्माण करून देते.

**हक्काची निर्मिती ही समाजाकडून केली जाते**

- मानवी गरजांच्या आवश्यकतेनुसार समाजाकडून हक्कांची निर्मिती केली जाते.
- हक्कासाठी सामाजिक स्वीकृती आवश्यक असते.
- समाज जीवन एकसंघ व सुसंघटित राहण्यासाठी समाजाकडून मान्य केलेल्या वेगवेगळ्या बाबींची अंमलबजावणी करण्याचे काम राज्याकडून केले जाते.

**कायदेशीर आधार (Legal Basis)**

- हक्क हे कायद्याने संरक्षित असतात.
- राज्याच्या संविधान, कायदे किंवा आंतरराष्ट्रीय करारांद्वारे हक्क निश्चित केले जातात.
- उदा.भारतात मूलभूत हक्क (Fundamental Rights) संविधानाद्वारे संरक्षण प्राप्त आहेत.

**नैतिक व आधारभूत स्वरूप (Moral and Natural Basis)**

- हक्क नैतिक आणि मानवी स्वभावाशी संबंधित असतात.
- ते मानवाच्या नैसर्गिक हक्कांच्या (Natural Rights) स्वरूपात मानले जातात, जसे की जीवनाचा अधिकार आणि स्वातंत्र्याचा अधिकार.

**व्यक्तिगत आणि सामाजिक संदर्भ (Individual and Social Context)**

- हक्क हे व्यक्तीचे अधिकार असले तरी ते समाजाशी संबंधित असतात.
- व्यक्तीचे हक्क समाजाच्या कल्याणाशी ताळमेळ राखून वापरले जातात.
- उदा.अभिव्यक्ती स्वातंत्र्य (Freedom of Expression) आहे, पण त्याचा उपयोग इतरांच्या हक्कांना बाधा आणण्यासाठी करता येत नाही.

**सर्वव्यापकता (Universality)**

- हक्क हे सर्व व्यक्तींना समानपणे लागू होतात, भेदभावाशिवाय.
- ते लिंग, जात, धर्म, वंश, आर्थिक स्थिती यावर आधारित नसतात.
- उदा.जागतिक मानवी हक्कांची घोषणा (Universal Declaration of Human Rights, १९४८) सर्व मानवजातीसाठी लागू आहे.

**मर्यादा आणि जबाबदारी (Limitations and Responsibilities)**

- हक्कांचा वापर करताना जबाबदारीची जाणीव ठेवावी लागते.
- व्यक्तीचे हक्क हे इतरांच्या हक्कांशी ताळमेळ राखूनच वापरण्याची आवश्यकता असते.
- उदा. स्वातंत्र्याचा अधिकार आहे, पण तो इतरांच्या स्वातंत्र्यास बाधा आणण्यासाठी वापरता येत नाही.

**राज्याशी संबंधितता (State Relation)**

- हक्कांची अंमलबजावणी ही राज्याच्या संरक्षणावर अवलंबून असते.
- हक्क हे व्यक्ती आणि राज्यामधील परस्परसंबंधांवर आधारित असतात.
- उदा.मतदानाचा अधिकार (Right to Vote) राज्याच्या कायद्याने दिला जातो.

**अमूल्यता (Inalienability)**

- काही हक्क हे व्यक्तींच्या मूलभूत अस्तित्वाशी निगडीत असल्याने काढून घेता येत नाहीत.
- उदा.जीवनाचा अधिकार (Right to Life) हा जन्मजात अधिकार असून कोणत्याही परिस्थितीत हिरावला जाऊ शकत नाही, शिवाय कायदेशीर कारण असेल तरच अपवाद होतो.

**समानता आणि न्याय (Equality and Justice)**

- हक्क हे समानतेवर आधारित असतात.
- प्रत्येक व्यक्तीला त्याचे हक्क न्यायाने दिले जातात.
- उदा.शिक्षणाचा अधिकार (Right to Education) सर्वांसाठी आहे.

**परस्परावलंबित्व (Interdependence)**

- वेगवेगळ्या प्रकारचे हक्क परस्परावलंबी असतात.
- उदा. जीवनाचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार आणि समानतेचा अधिकार हे एकमेकांशी जोडलेले आहेत.

**बदलशीलता (Dynamic Nature)**

- हक्क हे स्थिर नसून समाजाच्या बदलत्या परिस्थितीनुसार विकसित होत असतात.
- नवीन तंत्रज्ञान आणि सामाजिक गरजांमुळे नवीन हक्कांचा उगम होतो, उदा.: डिजिटल गोपनीयतेचा अधिकार (Right to Digital Privacy).

**आंतरराष्ट्रीय संरक्षण (International Protection)**

- हक्कांचे संरक्षण आंतरराष्ट्रीय संस्थांद्वारे देखील केले जाते, जसे की संयुक्त राष्ट्र संघ (United Nations) आणि मानवी हक्क आयोग (Human Rights Commission).
- जागतिकीकरणामुळे हक्कांचे सार्वत्रिकीकरण वाढले आहे.

**हक्क वेगवेगळ्या स्वरूपाचे असतात**

- **नागरी हक्क (Civil Rights):** स्वातंत्र्य, न्याय आणि सुरक्षा सुनिश्चित करतात.
- **राजकीय हक्क (Political Rights):** मतदान, निवडणूक लढविण्याचा अधिकार.
- **सामाजिक आणि आर्थिक हक्क (Social and Economic Rights):** शिक्षण, आरोग्य, रोजगाराचे हक्क.
- **सांस्कृतिक हक्क (Cultural Rights):** सांस्कृतिक आणि भाषिक स्वातंत्र्याचा अधिकार.

हक्क हे मानवी जीवनाचे मूलभूत घटक असून ते व्यक्तीच्या स्वातंत्र्य, सन्मान, आणि कल्याणासाठी महत्त्वाचे आहेत. त्यांचे स्वरूप नैतिक, कायदेशीर, सामाजिक, आणि आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्यात बदलत राहते. योग्य हक्कांचे रक्षण आणि पालन समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे.

**हक्कांचे प्रकार**

हक्काचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात.

१. नैतिक हक्क

२. कायदेशीर हक्क/ वैधानिक हक्क

**१. नैतिक हक्क:**

नैतिक हक्क (Moral Rights) हे नैतिकतेवर आधारित हक्क आहेत, जे एखाद्या व्यक्तीला तिच्या मानवी स्वभावामुळेच प्राप्त होतात. हे कायद्याने दिलेले नसतात, पण मानवी सन्मान, स्वातंत्र्य, आणि न्याय यावर आधारित असतात. नैतिक हक्क हे व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांचे आणि कर्तव्यांचे नैतिक आधारभूत तत्त्व आहेत. नैतिक हक्काच्या संदर्भात चर्चा करताना हे हक्क मानवी जीवनातील वाटचालीच्या संदर्भातील नैतिक आचरणाशी संबंधित आहेत.

नैतिक हक्क हे  समाजाच्या नीती आणि अनितिच्या तत्वावर आधारित असतात. अनेक विचारवंत या हक्कांच्या स्वरूपाला स्वीकारत नाहीत कारण या हक्कांना राज्याकडून संरक्षण मिळत नाहीत.

**नैतिक हक्कांचे सैद्धांतिक स्वरूप:**

**नैसर्गिकता (Natural Basis):**

- नैतिक हक्क मानवी अस्तित्वाशी संबंधित आहेत.
- जसे, जीवनाचा अधिकार (Right to Life) किंवा स्वातंत्र्याचा अधिकार (Right to Liberty).
- हे हक्क व्यक्तीला समाज, कायदा, किंवा राज्यापेक्षा आधीपासूनच मिळालेले आहेत.

**सार्वत्रिकता (Universality):**

- नैतिक हक्क हे सर्व मानवांना समानपणे लागू होतात.
- यामध्ये कोणत्याही प्रकारचा लिंग, जात, धर्म, वंश, किंवा राष्ट्राभेद होत नाही.
- उदा. समानतेचा नैतिक हक्क.

**कायद्यापेक्षा वरचढ (Supremacy Over Law):**

- नैतिक हक्क कायद्याच्या मर्यादेपलीकडे असतात.
- जरी एखाद्या कायद्यात हक्क नसेल तरी तो नैतिकदृष्ट्या ग्राह्य मानला जातो.
- उदा. गुलामगिरी कायद्याने मान्य असली तरी ती नैतिकदृष्ट्या चुकीची होती.

**कर्तव्याशी संबंध (Linked to Duties):**

- नैतिक हक्क हे फक्त अधिकार नसून त्यासोबत कर्तव्येही येतात.
- जर एका व्यक्तीला नैतिक हक्क मिळाला असेल, तर इतरांवर तो हक्क सन्मानाने पाळण्याचे नैतिक कर्तव्य येते.
- उदा.स्वातंत्र्याचा हक्क असल्यास इतरांना ते न नाकारण्याचे कर्तव्य आहे.

**राज्याच्या किंवा समाजाच्या मान्यतेवर अवलंबून नाहीत:**

- नैतिक हक्क हे राज्याच्या कायद्याने दिलेले नसतात, त्यामुळे ते कोणत्याही मान्यता प्रक्रियेसाठी अवलंबून नसतात.
- उदा. भाषणस्वातंत्र्य नैतिक हक्क आहे, जरी एखाद्या ठिकाणी त्यावर बंदी असली तरी.

**मूलभूत नैतिक मूल्यांशी निगडित (Based on Ethical Values):**

- नैतिक हक्कांचा आधार न्याय, समानता, करुणा, आणि सन्मान यांसारख्या नैतिक मूल्यांवर असतो.
- उदा. गरजूंना मदत करणे हा नैतिक हक्क आणि कर्तव्य मानला जातो.

**नैतिक हक्कांचे प्रकार**

नैतिक हक्क हे व्यक्तीच्या नैसर्गिक, सामाजिक, आणि नैतिक गरजांवर आधारित हक्क आहेत. ते मानवी अस्तित्वाशी निगडित असून समाजात न्याय, समानता, आणि सन्मान यासाठी महत्त्वाचे आहेत. नैतिक हक्कांचे प्रकार खालीलप्रमाणे आहेत:

**१. नैसर्गिक नैतिक हक्क (Natural Moral Rights):**

- हे हक्क व्यक्तीला जन्मतःच प्राप्त होतात आणि त्यांचा आधार नैसर्गिक न्याय व नैतिकता असतो. हे हक्क राज्य किंवा समाजाच्या मान्यतेवर अवलंबून नसतात.

**उदाहरणे:**

- जीवनाचा हक्क (Right to Life): प्रत्येक व्यक्तीला सुरक्षितपणे जगण्याचा नैतिक अधिकार आहे.
- स्वातंत्र्याचा हक्क (Right to Freedom): व्यक्तीला तिच्या विचारांचे व कृतीचे स्वातंत्र्य असावे.
- समानतेचा हक्क (Right to Equality): कोणत्याही प्रकारचा भेदभाव न होता सर्वांना समान वागणूक मिळावी.

**सामाजिक नैतिक हक्क (Social Moral Rights):**

- हे हक्क समाजात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला योग्य सन्मान व गरजा मिळण्यासाठी असतात. यामध्ये व्यक्तीच्या कल्याणावर भर दिला जातो.

**उदाहरणे:**

- शिक्षणाचा हक्क (Right to Education): व्यक्तीला शिकण्याचा व शिक्षण मिळवण्याचा नैतिक अधिकार आहे.
- आरोग्यसेवेचा हक्क (Right to Healthcare): प्रत्येकाला आरोग्याच्या सुविधा मिळाल्या पाहिजेत.
- सामाजिक सुरक्षा (Right to Social Security): गरजूंना मदत व संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे.

**३. वैयक्तिक नैतिक हक्क (Personal Moral Rights):**

- हे हक्क व्यक्तीच्या वैयक्तिक जीवन, स्वातंत्र्य, आणि व्यक्तिमत्त्वाशी संबंधित असतात.

**उदाहरणे:**

- स्वत:च्या मालमत्तेचा हक्क (Right to Property): व्यक्तीला तिच्या मालमत्तेवर नैतिक अधिकार असावा.
- आत्म-अभिव्यक्तीचा हक्क (Right to Self-expression): व्यक्तीला आपले विचार व भावना मोकळेपणाने व्यक्त करण्याचा अधिकार आहे.
- गोपनीयतेचा हक्क (Right to Privacy): व्यक्तीच्या खाजगी जीवनाचा सन्मान केला जावा.

**सांस्कृतिक नैतिक हक्क (Cultural Moral Rights):**

- हे हक्क व्यक्तीच्या सांस्कृतिक ओळख, परंपरा, आणि सामाजिक वारशाचे रक्षण करण्यासाठी महत्त्वाचे आहेत.

**उदाहरणे:**

- भाषेचा आणि परंपरेचा हक्क (Right to Language and Tradition): व्यक्तीला तिच्या भाषेचा व परंपरेचा सन्मान मिळावा.
- सांस्कृतिक स्वातंत्र्याचा हक्क (Right to Cultural Freedom): व्यक्तीला तिच्या सांस्कृतिक क्रियाकलापांमध्ये भाग घेण्याचा अधिकार आहे.

**आर्थिक नैतिक हक्क (Economic Moral Rights):**

- हे हक्क व्यक्तीच्या आर्थिक कल्याणाशी संबंधित आहेत.

**उदाहरणे:**

- कामाचा हक्क (Right to Work): प्रत्येकाला रोजगाराच्या संधी मिळाव्यात.
- कष्टाचे योग्य फळ (Right to Fair Wages): व्यक्तीला तिच्या कष्टानुसार योग्य वेतन मिळावे.
- समृद्धीचा हक्क (Right to Prosperity): व्यक्तीला तिच्या श्रमाने संपत्ती निर्माण करण्याचा अधिकार आहे.

**पर्यावरणीय नैतिक हक्क (Environmental Moral Rights):**

- हे हक्क व्यक्तीच्या शुद्ध व सुरक्षित पर्यावरणात जगण्याच्या नैतिक अधिकाराशी संबंधित आहेत.

**उदाहरणे:**

- **स्वच्छ पर्यावरणाचा हक्क (Right to a Clean Environment):** व्यक्तीला प्रदूषणमुक्त व सुरक्षित पर्यावरण मिळावे.
- **निसर्गाचे संरक्षण (Right to Conservation of Nature):** पर्यावरण व निसर्गाचा समतोल राखण्यासाठी नैतिक अधिकार आहेत.

**आंतरराष्ट्रीय नैतिक हक्क (International Moral Rights):**

- हे हक्क सर्व मानवजातीसाठी लागू होतात आणि आंतरराष्ट्रीय नैतिक तत्त्वांवर आधारित असतात.

**उदाहरणे:**

- मानवतेचा हक्क (Right to Humanity): युद्ध, दुष्काळ किंवा अन्य आपत्तीच्या वेळी मदत मिळण्याचा अधिकार.
- मानवी हक्कांचे संरक्षण (Right to Protection of Human Rights): कोणत्याही परिस्थितीत मानवी हक्कांचे उल्लंघन होऊ नये.

**नैतिक कर्तव्यांशी निगडित हक्क (Rights Linked with Duties):**

- नैतिक हक्क हे कर्तव्यांशी जोडलेले असतात. व्यक्तीला हक्कांचा उपभोग घेताना इतरांच्या हक्कांचा सन्मान राखणे अपेक्षित आहे.

**उदाहरणे:**

- स्वातंत्र्याचा हक्क: इतरांच्या स्वातंत्र्यास बाधा न आणता उपभोगावा.
- अभिव्यक्ती स्वातंत्र्य: इतरांच्या भावना दुखावण्याशिवाय विचार मांडावे.

नैतिक हक्कांचे प्रकार हे व्यक्तीच्या गरजांशी आणि समाजाच्या कल्याणाशी निगडित असतात. हे हक्क व्यक्तीच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि समाजात न्याय व समानतेचे तत्त्व प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वाचे आहेत. यामुळे व्यक्ती आणि समाज यांच्यात संतुलन राखले जाते.

**नैतिक हक्कांचे महत्त्व:**

**मानवी सन्मानाचे रक्षण (Preservation of Human Dignity):** नैतिक हक्क हे व्यक्तीच्या सन्मानासाठी महत्त्वाचे आहेत.ते व्यक्तीचे स्वातंत्र्य, सुरक्षितता, आणि स्वावलंबन सुनिश्चित करतात.

**न्यायाची ग्वाही (Guarantee of Justice):** नैतिक हक्क समाजात न्यायाचे तत्व प्रस्थापित करतात.उदा.: समानतेचा नैतिक हक्क सामाजिक आणि आर्थिक अन्यायाविरुद्ध लढतो.

**कायद्याच्या निर्मितीचा आधार:** नैतिक हक्क हे कायद्याच्या निर्मितीचे मार्गदर्शक ठरतात.उदा.: अनेक नैतिक तत्त्वे पुढे जाऊन कायद्याच्या स्वरूपात लागू केली गेली आहेत, जसे की व्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार.

**सामाजिक बदलांचा पाया:** नैतिक हक्कांनी अनेक सामाजिक आणि राजकीय क्रांत्यांना प्रेरणा दिली आहे.उदा.: गुलामगिरी निर्मूलन चळवळ, स्त्रियांचे हक्क, आणि मानवी हक्क चळवळी.

**नैतिक हक्कांची काही उदाहरणे:**

**जीवनाचा हक्क (Right to Life):**

- कोणत्याही व्यक्तीला जिवंत राहण्याचा नैतिक अधिकार आहे, जो कायद्याने मान्य नसला तरीही आहे.

**समानतेचा हक्क (Right to Equality):**

- सर्व व्यक्तींना जात, धर्म, लिंग, किंवा वंशाच्या आधारावर भेदभावाशिवाय समानतेचा नैतिक अधिकार आहे.

**स्वातंत्र्याचा हक्क (Right to Freedom):**

- प्रत्येक व्यक्तीला विचार, अभिव्यक्ती, आणि कृतीचे स्वातंत्र्य आहे, जो नैतिक दृष्टिकोनातून ग्राह्य आहे.

**पर्यावरणाचा नैतिक हक्क (Right to a Clean Environment):**

- प्रत्येक व्यक्तीला शुद्ध पर्यावरणाचा नैतिक अधिकार आहे.

नैतिक हक्क हे व्यक्तीच्या जीवनाचा आणि मानवी मूल्यांचा पाया आहेत. ते कायद्याने संरक्षित असले पाहिजेत, परंतु त्यांचा आधार कायद्याच्या पलीकडे नैतिकतेवर असतो. नैतिक हक्क समाजात न्याय, समानता, आणि स्वातंत्र्याचा प्रसार करतात, ज्यामुळे व्यक्ती आणि समाज यांचे कल्याण साधले जाते.

### २. कायदेशीर हक्क/ वैधानिक हक्क

व्यक्तींना प्राप्त होणाऱ्या या अधिकारांची व्यवस्था राज्यांकडून केली जाते. या हक्कांना कायद्यांचे संरक्षण प्राप्त झाल्यामुळे या हक्कांना लागू करण्याची सर्व जबाबदारी ही राज्याची असते.जर एखाद्या व्यक्तीच्या हक्काचे उल्लंघन होत असेल तर त्यांना कायद्याचे संरक्षण या ठिकाणी मिळत असते. त्यामुळे व्यक्तीला कायदेशीर हक्काच्या रक्षणासाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठावता येतो. एकंदरीतच या हक्कांना कायद्याचे संरक्षण असल्यामुळे कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला संस्थेला न्यायालय शिक्षा करू शकते.

**कायद्यांच्या हक्काचे दोन प्रकारात विभाजन केले जाते.नागरिक आणि राजकीय हक्क.**

**१. नागरी हक्क (Civil Rights):**

नागरिक हक्क (Civil Rights) म्हणजे व्यक्तीला समाजात न्याय, समानता, आणि स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी दिलेले कायदेशीर व नैतिक अधिकार आहेत. हे हक्क कायद्याने संरक्षित असतात आणि व्यक्तीच्या सन्मान, समान वागणूक, आणि मूलभूत स्वातंत्र्यासाठी महत्त्वाचे आहेत. म्हणून व्यक्तीच्या मूलभूत गरजा पूर्ण करणारे हक्क म्हणून या हक्कांकडे पाहिल्या जाते. या हक्कांवर राज्यातील नागरिकांचा नैतिक, मानसिक आणि सामाजिक विकास होत असतो.

व्यक्तीला मिळालेल्या या नागरी हक्कांवर इतर व्यक्तीकडून किंवा राज्यसंस्थेकडून कधीही अतिक्रमण केल्या जात नाही कारण त्यांना कायद्याचे पाठबळ असते.नागरी हक्क संविधान, कायदे, आणि आंतरराष्ट्रीय मानवी हक्कांच्या तत्त्वांद्वारे संरक्षित केलेले असतात.

**नागरी हक्कांचे वैशिष्ट्ये :**

**समानतेवर आधारित (Based on Equality):**

- नागरी हक्कांचे मुख्य तत्त्व समानतेचे आहे.
- प्रत्येक व्यक्तीला लिंग, जात, धर्म, भाषा, वंश, किंवा इतर कोणत्याही आधारावर भेदभाव न करता समान वागणूक मिळावी.
- उदा.सार्वजनिक ठिकाणी प्रवेशाचा समान अधिकार.

**कायदेशीर संरक्षण (Legal Safeguards):**

- नागरी हक्क हे संविधान किंवा कायद्याच्या माध्यमातून संरक्षण प्राप्त करतात.
- एखाद्या व्यक्तीचे हक्क उल्लंघित झाल्यास त्याला न्यायालयात दाद मागण्याचा हक्क आहे.
- उदा.भारतात मूलभूत हक्क (Fundamental Rights) संविधानाद्वारे संरक्षित आहेत.

**स्वातंत्र्यावर भर (Focus on Liberty):**

- नागरी हक्क व्यक्तीला विचार, अभिव्यक्ती, धर्म, आणि चळवळीचे स्वातंत्र्य प्रदान करतात.
- हे हक्क व्यक्तीच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण करतात.
- उदा.अभिव्यक्ती स्वातंत्र्य (Freedom of Expression).

**व्यक्ती आणि राज्य यांच्यातील संबंध (Relationship Between Individual and State):**

- नागरी हक्क हे व्यक्तीला राज्याच्या व्यवस्थेमध्ये समान सहभागासाठी सक्षम करतात.
- ते राज्याच्या कायद्याच्या चौकटीत व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण करतात.
- राज्याच्या मान्यतेवर आधारित (State Recognition) हे हक्क असतात
- नागरिक हक्क संविधान व कायद्याच्या चौकटीत राज्याद्वारे मान्य व रक्षण केले जातात.

**सामाजिक न्यायाची ग्वाही (Ensures Social Justice):**

- नागरी हक्कांचे उद्दिष्ट समाजातील शोषित, वंचित, आणि भेदभावित गटांना न्याय देणे आहे.
- उदा.जातीय किंवा लिंगभेदविरोधी कायदे.

**अव्यक्त हक्क (Inalienable Rights):**

- नागरी हक्क काढून घेता येत नाहीत, जरी काही परिस्थितीत ते निलंबित केले जाऊ शकतात (उदा.आणीबाणीच्या वेळी).

**नागरिक हक्कांचे मुख्य तत्त्व:**

**समानता (Equality):** प्रत्येक व्यक्तीला समान संधी आणि वागणूक मिळाली पाहिजे.

**न्याय (Justice):** व्यक्तीच्या हक्कांचे उल्लंघन झाल्यास त्याला न्याय मिळाला पाहिजे.

**स्वातंत्र्य (Liberty):** व्यक्तीला तिच्या जीवनाचे निर्णय स्वायत्तपणे घेण्याचा अधिकार असावा.

**सहभाग (Participation):** प्रत्येक व्यक्तीला राज्याच्या लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्याचा अधिकार आहे.प्रत्येक व्यक्तीला समाजाच्या राजकीय आणि सामाजिक निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी नागरी हक्कांकडून उपलब्ध होते.

**व्यक्तीचे सन्मानाचे संरक्षण:** व्यक्तीला सन्मानपूर्वक जगण्याचा अधिकार नागरी हक्क देतात.

**समाजातील समता आणि शांतता प्रस्थापित करणे:** भेदभाव आणि अन्याय टाळून समाजात समतोल व स्थिरता राखणे.

**नागरी हक्कांचे महत्व**

**लोकशाहीचा पाया (Foundation of Democracy):**

- नागरिक हक्क लोकशाही व्यवस्थेचा मुख्य आधार आहेत, जे व्यक्तीला स्वातंत्र्य आणि समानतेचे आश्वासन देतात.
- नागरिक हक्क लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य, समानता, आणि न्याय प्रदान करतात.
- नागरिकांना त्यांच्या राज्यातील राजकीय आणि सामाजिक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्यासाठी सक्षम करतात.

**सामाजिक बदलांचा मार्ग (Instrument of Social Change):**

- वंचित गटांना न्याय आणि समान संधी मिळवून देण्यासाठी नागरिक हक्क समाज सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.
- नागरी हक्क समाजातील विविधतेला प्रोत्साहन देतात आणि शांततामय सहजीवनासाठी मार्ग मोकळा करतात.
- नागरी हक्क हे व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे, समानतेचे, आणि सन्मानाचे रक्षण करणारे महत्त्वाचे तत्त्व आहेत. ते व्यक्ती आणि राज्यामधील परस्परसंबंधाला सुसंवादी बनवतात. सामाजिक न्याय प्रस्थापित करून नागरी हक्क लोकशाही आणि समृद्ध समाजासाठी आधारस्तंभ ठरतात.

**मानवी सन्मानाचे रक्षण (Protection of Human Dignity):**

- हे हक्क व्यक्तीचे मानवी मूल्ये आणि तिच्या अधिकारांचे संरक्षण करतात.
- हे हक्क व्यक्तीला शोषणापासून मुक्त करतात आणि तिला सन्मानपूर्वक जगण्याचा अधिकार देतात.

**प्रमुख नागरी हक्क:**

**१. जीवन जगण्याचा हक्क**

जीवन जगण्याचा हक्क हा नैसर्गिक हक्क.

सर्व मानवी हक्कांपैकी, जीवन जगण्याचा अधिकार हा सर्वात मूलभूत अधिकार आहे, कारण या अधिकाराशिवाय इतर कोणत्याही अधिकाराची कल्पनाही करता येत नाही. जीवन जगण्याचा अधिकार म्हणजे प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा अधिकार आहे आणि राज्य अशी व्यवस्था करेल की इतर कोणतीही व्यक्ती किंवा राज्य व्यक्तीचे जीवन संपवू शकणार नाही. जगण्याच्या अधिकारात स्वसंरक्षणाचा अधिकारही अंतर्भूत आहे.प्रत्येक व्यक्ती हा समाजाचा अत्यावश्यक घटक आहे आणि व्यक्तीचे जीवन ही केवळ त्याची स्वतःची संपत्ती नसून संपूर्ण समाजाची मालमत्ता आहे, म्हणून जगण्याच्या अधिकारात ही वस्तुस्थिती समाविष्ट आहे की कोणतीही व्यक्ती स्वतःचे जीवन संपवू शकत नाही.

त्यामुळे हा हक्क व्यक्तीच्या अस्तित्वाचा, तिच्या सन्मानाचा, आणि सुरक्षिततेचा आधारस्तंभ मानला जातो. जीवन जगण्याचा हक्क हा व्यक्तीच्या इतर सर्व हक्कांचा पाया आहे, कारण इतर हक्कांचा उपभोग घेण्यासाठी जीवन जगणे आवश्यक आहे.जीवन जगण्याचा हक्क आंतरराष्ट्रीय पातळीवरही पुढील कायद्यांच्या आधारे मान्य केला आहे

**१. युनिव्हर्सल डिक्लरेशन ऑफ ह्युमन राइट्स (UDHR), १९४८:** अनुच्छेद ३: "प्रत्येक व्यक्तीला जीवन, स्वातंत्र्य, आणि सुरक्षा यांचा हक्क आहे."

**२. आंतरराष्ट्रीय नागरी व राजकीय हक्क करार (ICCPR), १९६६:** अनुच्छेद ६: "जीवनाचा हक्क सर्वांसाठी मूलभूत आहे."

**२. समानतेचा हक्क (Right to Equality)**

समानतेचा हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही प्रकारच्या भेदभावाशिवाय समान संधी आणि वागणूक मिळावी, हा मानवी जीवनातील मूलभूत तत्त्व आहे. हा हक्क व्यक्तीच्या सन्मानाचा, स्वातंत्र्याचा, आणि सामाजिक न्यायाचा आधार आहे. समानतेचा हक्क लोकशाही व्यवस्थेमध्ये सर्व नागरिकांना समानतेची हमी देतो.समानतेच्या हक्क पुढील बाबी अपेक्षित आहेत

**कायद्यापुढे समानता:** प्रत्येक व्यक्ती कायद्याच्या दृष्टीने समान आहे, आणि कोणालाही विशेष वागणूक दिली जात नाही.

**सामाजिक न्याय:** वंचित, शोषित, आणि मागासवर्गीय गटांना समान संधी मिळावी यासाठी विशेष तरतुदी केल्या जातात.

**भेदभावविरोधी तत्त्व:** व्यक्तीच्या धर्म, जात, लिंग, वंश, किंवा भाषेवर आधारित कोणताही भेदभाव करता येणार नाही.

**समान संधी:** प्रत्येक व्यक्तीला सार्वजनिक क्षेत्रात समान संधी मिळावी, हा समानतेचा मुख्य उद्देश आहे.

**मानवी सन्मानाचे संरक्षण:** अस्पृश्यतेसारख्या अन्यायकारक प्रथांचा नाश करून व्यक्तीच्या सन्मानाचे रक्षण केले जाते.

सोबतच सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रगतीसाठी समान संधी ही बाब या समानतेच्या अधिकारांमध्ये येताना दिसून येते. एकंदरीतच समानतेच्या हक्काच्या आधारित पुढील बाबी स्पष्ट होतात समानतेचा हक्क हा प्रत्येक व्यक्तीला कायद्यापुढे समान वागणूक आणि सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी समान संधी देतो. तो समाजातील भेदभाव, जातीवाद, आणि अस्पृश्यता यांचा नाश करून सामाजिक न्यायाची ग्वाही देतो. समानतेचा हक्क लोकशाही, मानवी सन्मान, आणि समतोल समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

### ३. स्वातंत्र्याचा अधिकार (Right to Freedom)

स्वातंत्र्याचा अधिकार हा प्रत्येक व्यक्तीचा एक मूलभूत अधिकार असून, तो व्यक्तीला आपले विचार, कृती, आणि जीवन स्वतंत्रपणे जगण्याचे स्वातंत्र्य देतो. हा अधिकार लोकशाही व्यवस्थेचा मुख्य आधार आहे. भारतीय संविधानाने अनुच्छेद १९ ते २२ मध्ये स्वातंत्र्याचा अधिकार दिला असून, तो व्यक्तीला तिच्या सन्मानपूर्वक जीवन जगण्याचे आणि स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य प्रदान करतो.प्रत्येक व्यक्तीला तिच्या इच्छेनुसार निर्णय घेण्याचे व्यक्ती स्वातंत्र्य या अधिकारात उपलब्ध होते.व्यक्तीचे स्वातंत्र्य हे सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी आणि इतरांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी कायद्याद्वारे काही बंधने जातात.स्वातंत्र्याचा अधिकार लोकशाही व्यवस्थेचे महत्त्वाचे अंग आहे.कारण सर्व नागरिकांना समान संधी देऊन न्यायाचा प्रचार लोकशाही व्यवस्थेत केला जातो.

**उदाहरणे:**

**१. भारतीय संदर्भ:**

- माध्यम स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आणि व्यवसायाचे स्वातंत्र्य भारतीय संविधानाने संरक्षित केले आहेत.

**२. जागतिक संदर्भ:**

- युनिव्हर्सल डिक्लरेशन ऑफ ह्युमन राइट्समध्ये व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा अधिकार मान्य केला आहे.

स्वातंत्र्याचा अधिकार हा व्यक्तीच्या वैयक्तिक आणि सामाजिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. तो व्यक्तीला तिचे विचार, कृती, आणि जीवन स्वतंत्रपणे जगण्याचे स्वातंत्र्य

देतो, तसेच लोकशाही आणि सामाजिक न्यायाचे रक्षण करतो. योग्य मर्यादांमध्ये हा अधिकार व्यक्ती आणि समाजाचा समतोल राखण्यासाठी अपरिहार्य आहे.

**४. मालमत्तेचा अधिकार (Right to Property)**

मालमत्तेचा अधिकार हा ऐतिहासिकदृष्ट्या व्यक्तीच्या आर्थिक स्वातंत्र्याचा आणि मालकी हक्काचा महत्त्वाचा भाग मानला जातो. मालमत्तेचा अधिकार व्यक्तीला तिच्या संपत्तीचा उपभोग घेण्याचा, त्याचा उपयोग करण्याचा, आणि इतरांना हस्तांतरित करण्याचा हक्क देतो.

**मालमत्तेच्या अधिकाराचे स्वरूप:**

**१. स्वतंत्र मालकी:**

- व्यक्तीला तिच्या संपत्तीवर मालकी हक्क आहे, आणि ती संपत्तीचा उपभोग घेऊ शकते.

**२. हस्तांतरणाचा अधिकार:**

- व्यक्तीला तिची मालमत्ता इतरांना विकण्याचा किंवा हस्तांतरित करण्याचा अधिकार आहे.

३**. कायदेशीर संरक्षण:**

- संपत्तीविरुद्ध केलेल्या कोणत्याही अनधिकृत हस्तक्षेपाविरोधात व्यक्तीला संरक्षण दिले जाते.

**४. मर्यादित हस्तक्षेप:**

- सार्वजनिक कल्याणासाठी राज्याने मालमत्ता अधिग्रहित करण्याची परवानगी आहे, परंतु योग्य नुकसानभरपाई दिली पाहिजे.

मालमत्तेचा अधिकार हा व्यक्तीच्या आर्थिक स्वातंत्र्याचा आधार असून, सार्वजनिक आणि खाजगी जीवनाचा महत्त्वाचा घटक आहे.

भारतीय संविधानाने याला मूलभूत अधिकारातून काढून टाकले असले तरी, अनुच्छेद ३००(A) अंतर्गत व्यक्तीला संपत्तीचा हक्क कायद्याने संरक्षित केला जातो. मालमत्तेचा अधिकार सामाजिक न्याय व आर्थिक विकास यांच्यात समतोल राखण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

**५. रोजगाराचा अधिकार**

एखाद्या व्यक्तीला स्वतःच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह, घर आणि शिक्षण यासाठी पैशाची आवश्यकता असते.एखाद्या व्यक्तीला काही प्रकारचे काम केल्याशिवाय ती आर्थिक शक्ती मिळू शकत नाही.

त्यामुळे सध्याच्या काळात माणसाला काम मिळण्याचा अधिकार मिळायला हवा आणि या कामाच्या बदल्यात त्या व्यक्तीला योग्य तो मोबदला मिळायला हवा. नैतिकदृष्ट्या, सध्याची

सर्व राज्ये या अधिकाराचे अस्तित्व मान्य करतात, परंतु भारतासारख्या अनेक राज्यांमध्ये आर्थिक संसाधनांच्या कमतरतेमुळे, राज्य नागरिकांना हा अधिकार कायदेशीर स्वरूपात प्रदान करू शकले नाही.

### ६. शिक्षणाचा अधिकार

शिक्षण हे माणसाचे मानसिक आणि आध्यात्मिक पोषण आहे तसेच व्यक्तिमत्वाचा विकास शिक्षणाच्या आधारेच शक्य आहे. त्यामुळे नागरिकांना शिक्षणाचा अधिकार मिळायला हवा, हे सध्याच्या समाजात सर्वत्र मान्य आहे. एवढेच नाही तर गरीब आणि श्रीमंत अशा दोघांनाही सरकारने शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. वाचन कक्ष, ग्रंथालये आणि संग्रहालये स्थापन करावीत. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे या अधिकारात अपेक्षित आहे.

### ७. कुटुंबाचा हक्क

राज्याप्रमाणेच कुटुंब ही देखील मानवी जीवनासाठी आवश्यक असलेली संस्था आहे. मानवजातीच्या विकासात कुटुंबाचे योगदान इतर कोणत्याही संस्थेपेक्षा कमी नाही. कुटुंबाचे अस्तित्व केवळ लैंगिक समाधान आणि मानवी वंशाच्या देखभालीसाठीच नाही तर नागरी सद्गुणांच्या विकासासाठी देखील आवश्यक आहे. त्यामुळे एखाद्या व्यक्तीला लग्न करण्याचा, कुटुंब निर्माण करण्याचा आणि मुलांचे संगोपन करण्याचा अधिकार असला पाहिजे आणि राज्याने या बाबतीत विनाकारण हस्तक्षेप करू नये असे या अधिकारात अपेक्षित आहे.

## २. राजकीय हक्क (Political Rights)

नागरिकांना राज्याच्या राजकीय दैनंदिन जीवनात सहभागी होता यावे म्हणून जे हक्क व्यक्तींना उपलब्ध होतात त्या हक्कांना राजकीय  हक्क असे म्हणतात. राजकीय हक्क हे व्यक्तीच्या राजकीय जीवनासाठी आवश्यक असतात. या हक्कांच्या माध्यमातून व्यक्तीचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रूपात शासनाशी संबंध येत असतो.राजकीय हक्क म्हणजे त्या अधिकारांचा संच जो प्रत्येक नागरिकाला शासनाच्या किमान एक भाग होण्याचा, आपल्या हक्कांची अभिव्यक्ती करण्याचा, आणि सरकारी धोरणांवर प्रभाव टाकण्याचा अधिकार देतो. राजकीय हक्कांमुळे लोकांच्यामध्ये राजकीय जागृती मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे लोक शासन व्यवस्थेच्या चांगल्या गुणदोषाची चर्चा ही राजकीय हक्काच्या माध्यमातून मतदानाचा अधिकार, निवडून येण्याचा अधिकार, सार्वजनिक पदग्रहण करण्याचा अधिकार याचा मोठ्या प्रमाणात वापर करून राजकीय जीवनात सहभागी होताना दिसून येतात.हे अधिकार व्यक्तीला लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्याची, निर्णय प्रक्रियेत आपला आवाज उठवण्याची, आणि स्वतःचे प्रतिनिधी निवडण्याची मुभा देतात. या अधिकारात व्यक्तींना पुढील अधिकार प्राप्त होतात.

### मतदानाचा अधिकार (Right to Vote):

प्रत्येक भारतीय नागरिकाला निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार आहे. भारतातील लोकसभा आणि राज्यसभा तसेच राज्य विधानसभांच्या निवडणुकांमध्ये मतदान करण्याचा अधिकार सर्व नागरिकांना दिला आहे.

**लोकप्रतिनिधी निवडण्याचा आणि निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार (right to elect representatives and stand for election):** नागरिकांना प्रतिनिधी म्हणून निवडले जाण्याचा हक्क आहे. लोकसभा, राज्यसभा, आणि राज्य विधानसभा इत्यादींमध्ये उमेदवार म्हणून निवडणुकीसाठी उभे राहता येते.उमेदवारांवरील अटींमध्ये निवडणुकीतील वय, नागरिकत्व, आणि शारीरिक स्थिती यांचा समावेश असतो.

**सार्वजनिक कार्यात भाग घेण्याचा अधिकार (Right to Participate in Public Affairs):** नागरिकांना सार्वजनिक कार्यांमध्ये सहभागी होण्याचा, सरकारशी संवाद साधण्याचा, आणि सरकारच्या कार्यप्रणालीवर प्रभाव टाकण्याचा अधिकार आहे. हे हक्क प्रत्यक्ष सरकारी कामकाजाच्या तपासणीसाठी किंवा सरकारविरोधी जनतेच्या हितासाठी वापरले जातात.

**राज्यघटनेत सुधारणा करणे (Right to Seek Constitutional Amendments):** नागरिकांना राज्यघटनेत सुधारणा करण्यासाठी संबंधित कायद्यांद्वारे अधिकार मिळतो. हे लोकशाही व्यवस्थेचे एक महत्त्वाचे तत्त्व आहे, ज्याद्वारे नागरिक राज्याच्या मूलभूत कायद्यांवर प्रभाव टाकू शकतात. कारण या राजकीय हक्काच्या आधारावर व्यक्तीने आपले लोकप्रतिनिधी निवडून दिलेले असतात किंवा ते स्वतः निवडून गेलेले असतात.

मानवाधिकार आणि हक्कांच्या संदर्भात सामाजिक वर्ग, आणि जातीय स्थिती याचा विचार करता अनेक समूहांमध्ये मोठ्या प्रमाणात सामाजिक भेदभाव हा दिसून येतो. त्यातून उच्च वर्ग किंवा वर्चस्व असलेल्या गटांच्या दृष्टिकोनातून हक्कांचा वापर शक्यतो दुसऱ्या गटाच्या विरुद्ध केला जातो.

**२. हक्कांचा अनियंत्रित वापर:**

हक्कांचे अमलात आणणे सर्वांसाठी योग्य असावे लागते, अन्यथा ते अराजकता निर्माण करू शकतात. त्यामुळे काही तत्त्वज्ञ आणि विचारवंत हक्कांच्या अयोग्य आणि अनियंत्रित वापरावर टीका करतात.

**कायद्याचे उल्लंघन:**

व्यक्ती आपल्या हक्कांचा वापर करतांना इतरांच्या हक्कांचा उल्लंघन करू शकतात. उदा., व्यक्तीने अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर करतांना इतरांच्या स्वाभिमानाला ठेस पोहोचवणे किंवा भ्रामक माहिती पसरवणे.

**सामाजिक अराजकता:**

जेव्हा व्यक्ती आपल्या हक्कांचा वापर दुसऱ्या व्यक्तीच्या अधिकारांच्या उल्लंघनाच्या स्वरूपात करतात, तेव्हा समाजात अराजकता आणि संघर्ष निर्माण होतो. उदा., लोकशाहीमध्ये मत व्यक्त करणे हक्क आहे, पण जेव्हा ते हिंसक वागणुकीत रूपांतरित होते, तेव्हा समाजावर वाईट परिणाम होऊ शकतात.

**३. हक्कांच्या असमान वितरणाची टीका:**

हक्कांचा असमान वितरण समाजात विषमता निर्माण करू शकतो. समाजातील वेगवेगळ्या गटांना समान हक्क मिळणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा काही गट वंचित राहू शकतात.

**वंचित गटांचे हक्क:**

आदिवासी, दलित, आणि महिला यांसारख्या वंचित गटांना आपल्या हक्कांचे पूर्ण संरक्षण मिळत नाही. त्यांच्यासाठी हक्कांचे आश्वासन कायद्यामध्ये असले तरी त्या गटांची वाईट स्थिती कायम राहते.

**आर्थिक विषमता:**

अनेक वेळा हक्क उपलब्ध असले तरी, गरिबी आणि आर्थिक परिस्थितीमुळे त्या हक्कांचा पुरेपूर वापर करणे कठीण होते.

**सामाजिक भेदभाव:**

काही गटांना विशेष हक्क (जसे की आरक्षण) मिळत असले तरी त्याच्याशी संबंधित असलेले भेदभाव आणखी टिकून राहतात, जसे की जातीयतेच्या कारणावरून भेदभाव. हे हक्कांच्या अनवट उपयोगाचे उदाहरण ठरते.

### ४. राजकीय हस्तक्षेप आणि शासनाचे वेगवेगळी धोरण :

राजकीय विचारधारा आणि धोरणे हक्कांच्या व्याख्येला प्रभावित करतात. कधी कधी राजकीय व्यवस्थेतील हस्तक्षेप हक्कांच्या बळकट करणाऱ्याऐवजी त्यांना मर्यादित करतो.

**सर्वोच्च शासकीय हक्क:**

राज्य आणि सरकारकडून हक्कांचे संरक्षण आणि अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, पण अनेक वेळा राजकीय लाभ उठवण्यासाठी  शासनाच्या वेगवेगळ्या आस्थापना हक्कांचे उल्लंघन करतात. उदा., आपत्कालीन परिस्थितीत व्यक्तींच्या अभिव्यक्ती हक्कांचे आणि निदर्शनांचे उल्लंघन केले जाते.

**आतंरिक सुरक्षा कायदे:**

सुरक्षा आणि राज्य नियंत्रणाच्या नावावर, काही वेळा हक्कांवर बंधनं लादली जातात. उदाहरणार्थ, सार्वजनिक शांतता राखण्यासाठी कधी कधी हक्कांचा वापर मर्यादित होतो.

### ५. हक्कांचे संरक्षण आणि प्रशासनातील कमकुवतपणा:

अनेक वेळा हक्कांचे पालन करणे, अंमलबजावणी करणे किंवा त्यांच्या उल्लंघनावर कारवाई करणे प्रशासनाच्या दृष्टीने तितके सोपे नसते कारण.

**वैयक्तिक आणि सामाजिक संरचनांची असमर्थता:**

प्रशासनाच्या आणि राज्याच्या पातळीवर हक्कांचे संरक्षण करणारे यंत्रणा अनेक वेळा कमी आणि अपुरे असतात. हक्कांचे उल्लंघन होणाऱ्या परिस्थितीमध्ये, काही वेळा न्याय देण्यासाठी यंत्रणांमध्ये कमकुवतपणा असतो.

**हक्कांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कार्यवाहीचा अभाव:**

प्रशासन किंवा कायद्यातील दुय्यम कार्यप्रणालीमुळे हक्कांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई होण्याची शक्यता कमी असते, त्यामुळे नागरिकांचा हक्क वाऱ्यावर जातो.

### ६. सामाजिक आणि धार्मिक प्रथांचा संघर्ष

हक्कांचा सिद्धांत प्रगतीवादी असला तरी त्याचा काही ठिकाणी पारंपारिक प्रथांसोबत संघर्ष होतो. यामुळे काही समाजांमध्ये हक्कांची समज जास्त असमान होऊ शकते.

**धार्मिक आणि सांस्कृतिक हक्क:**

काही समाजांमध्ये धार्मिक प्रथा आणि पारंपारिक संप्रदाय हक्कांच्या नियमांसोबत संघर्ष करू शकतात. उदा., महिलांना समान हक्क दिले जात असले तरी काही ठिकाणी पितृसत्ताक समाज ह्याच्याशी विरोध करू शकतो.

हक्कांवर होत असलेली टीका विविध स्तरांवर व्यक्त केली जात आहे. हक्काच्या संदर्भात सार्वत्रिक मान्यता, त्यांचा नियंत्रित आणि न्यायसंगत वापर, सामाजिक समानता, आणि

प्रशासनाची जबाबदारी यासारख्या मुद्द्यांवर टीका होऊ शकते. हक्कांचे सिद्धांत आणि त्यांची अंमलबजावणी सुसंगत आणि संतुलित असावी, जेणेकरून ते सर्वांगीण न्याय आणि सामाजिक समतेची भावना निर्माण करु शकतील.

**आपली प्रगती तपासा**

**१. हक्काच्या निर्मितीची/ विकासाची पार्श्वभूमी सांगा?**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**२. हक्काच्या सामाजिक कल्याणाच्या सिद्धांताची चर्चा करा?**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**३. हक्काच्या कायदेविषयक सिद्धांताची चर्चा करा?**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**४. वैयक्तिक आणि सामूहिक हक्काचे महत्व सांगा?**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ**

1. Dworkin, R. (1977). Taking rights seriously. Harvard University Press.

2. Rawls, J. (1971). A theory of justice. Harvard University Press.

3. Sen, A. (2009). The idea of justice. Belknap Press.

4. Kymlicka, W. (2002). Contemporary political philosophy: An introduction. Oxford University Press.

5. Nozick, R. (1974). Anarchy, state, and utopia. Basic Books.

6. Shue, H. (1996). Basic rights: Subsistence, affluence, and US foreign policy. Princeton University Press.

7. Habermas, J. (1996). Between facts and norms: Contributions to a discourse theory of law and democracy. MIT Press.

8. Nussbaum, M. (2011). Creating capabilities: The human development approach. Harvard University Press.

9. जैन पुखराज, फडिया बी.एल (२००४), आधुनिक राजनीतिक सिद्धांत, साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा.

❄❄❄❄❄❄❄

# ३

## समता

**घटक रचना:**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रास्ताविक

३.३ समतेची नकारात्मक व सकारात्मक संकल्पना

३.४ समता म्हणजे काय

३.५ समतेच्या व्याख्या

३.६ समतेच्या संकल्पनेचे विश्लेषण

३.७ समानतेचे प्रकार

३.८ समानतेवर आधारित स्पर्धा

३.९ स्वातंत्र्य व समता परस्परसंबंध

३.१० समता व न्याय

३.११ भारताच्या संदर्भात समता

३.१२ समताच का?

३.१३ समानता कशी मिळवायची?

३.१४ सारांश

३.१५ आपली प्रगती तपासा (प्रश्न)

## ३.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- समतेच्या तत्त्वाबाबतच्या विविध समस्यांची माहिती घेता येईल.
- व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी व सक्षम लोकशाही व्यवस्थेच्या अनुभवासाठी असलेले महत्त्व समजून घेता येते.
- समतेचे तत्त्व आचरणात आणण्यासाठी सोयीचे ठरेलं.
- समता प्रस्थापित करण्यासाठी केलेल्या उपाय योजना आवश्यक आहेत ते सांगता येईल.
- समतेच्या विविध पैलूंची ओळख होईल.
- समतेच्या तत्त्वाचे सर्वांगाने चिकित्सक परीक्षण करता येईल.
- समतेच्या समस्यांबाबतच्या विविध दृष्टिकोनांची ओळख होईल.

- समतेच्या तत्त्वाच्या प्रत्यक्ष व्यवहारात येणाऱ्या अनुभवाबद्दल जागरूक राहता येईल.
- समतेच्या तत्त्वाचा सद्यःस्थितीशी संबंध जोडता येईल.

## ३.२ प्रास्ताविक

समानता हा लोकशाहीच्या मूलभूत स्तंभांपैकी महत्वपूर्ण स्तंभ एक आहे. प्राचीन काळात समाज व्यवस्थेतील परंपरेमुळे समतेला महत्त्व नव्हते. परंतु १८ व्या शतकात, विशेषत: अमेरिकन स्वातंत्र्याच्या घोषणेनंतर आणि फ्रेंच क्रांतीनंतर, समानतेची संकल्पना अधिक लोकप्रिय झाली. ४ जुलै, १७७६ रोजी जारी करण्यात आलेल्या अमेरिकन स्वातंत्र्याच्या घोषणेद्वारे, अमेरिकनांनी म्हटले होते, "आम्ही हे सत्य स्वयंस्पष्ट मानतो की सर्व पुरुष समान आहेत." यानंतर फ्रेंच क्रांतिकारकांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचा नारा दिला होता आणि ही तत्त्वे फ्रेंच क्रांतीचा आधार बनली होती आणि फ्रेंच नॅशनल असेंब्लीने १७८९ मध्ये पुरुषच हक्कांच्या घोषणेद्वारे अगदी स्पष्टपणे सांगितले होते की, "पुरुष त्यांच्या हक्कांच्या बाबतीत नेहमीच मुक्त आणि समान राहतील." यानंतर, १९व्या आणि २०व्या शतकात विकासासह लोकशाही तत्त्वांमुळे समानतेची संकल्पना देखील अधिकाधिक लोकप्रिय होत गेली आणि सध्याच्या युगातील ते मूलभूत तत्त्व मानले जाते.

सामाजिक, आर्थिक, नैतिक आणि राजकीय तत्त्वज्ञानाच्या सर्व मूलभूत संकल्पनांपैकी, समानतेची संकल्पना गोंधळात टाकणारी नाही कारण ती न्याय, स्वातंत्र्य, हक्क, मालमत्ता इत्यादी इतर सर्व संकल्पनांमध्ये आढळते. गेल्या दोन हजार वर्षांमध्ये ग्रीक, स्टोईक्स, ख्रिश्चन यांनी समानतेचे अनेक पैलू स्पष्ट केले आहेत ज्यांनी स्वतंत्रपणे आणि एकत्रितपणे त्याच्या एका किंवा दुसऱ्या पैलूवर जोर दिला. उदारमतवाद आणि मार्क्सवादाच्या प्रभावामुळे, समानतेला पूर्णपणे भिन्न अर्थ प्राप्त झाला. स्त्रीवाद, पर्यावरणवाद यांसारख्या समकालीन सामाजिक चळवळी या संकल्पनेला नवा अर्थ प्रदान करू पाहत आहेत मुळात, समानता हे मूलत: आधुनिक आणि प्रगतीशील मूल्य आणि तत्त्व आहे. समतेची चर्चा जरी शतकानुशतके सुरू असली तरी आधुनिक समाजांचे वैशिष्ट्य म्हणजे आपण असमानता यापुढे गृहीत धरत नाही. आधुनिकीकरणाच्या संपूर्ण प्रक्रियेसाठी राजकीय समतावादाच्या रूपात समानतेचा वापर केला जातो. आधुनिक राजकारण आणि आधुनिक राजकीय संस्थांवर वांशिक, लैंगिक ओळख किंवा वयाची पर्वा न करता समान संधींचा विस्तार करण्यासाठी सतत सामाजिक दबाव आणला जातो. समता हे आधुनिक मूल्य आहे या अर्थाने की सार्वत्रिक नागरिकत्व हे आधुनिक औद्योगिक लोकशाहीतील सर्व राजकीय विचारसरणींचे मुख्य वैशिष्ट्य बनले आहे. समानता हा मूलगामी सामाजिक बदलाचा निकष म्हणूनही घेतला जाऊ शकतो. त्याचा संबंध लोकशाही राजकारणाच्या विकासाशी निगडित आहे. आधुनिक समाज समानतेच्या तत्त्वाशी बांधील आहे. अमेरिकन आणि फ्रेंच क्रांतीद्वारे प्रतिपादित समानतेचे तत्त्व सर्व आधुनिक सामाजिक बदलांचे आणि समाजांच्या पुनर्रचनेच्या सामाजिक चळवळींचे मध्यवर्ती केंद्र बनले आहे.

आधुनिक काळात लोकशाहीचा जसजसा विकास होत गेला तसतसे समतेचे महत्त्व वाढत गेले. फ्रेंच राज्यक्रांतीतून स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तत्त्वे निर्माण झाली. त्यातून आधुनिक लोकशाहीला प्रेरणा मिळाली. त्यापूर्वी म्हणजे मध्ययुगीन काळात या संकल्पनांचा अभाव होता. निरंकुश राजेशाही अस्तित्वात असल्याने राजाचा शब्द हा अंतिम आदेश म्हणून

पाळला जात असे. निरंकुश राजेशाहीत काही व्यक्तींना जन्मतः श्रेष्ठत्व दिले जात होते. १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीने आर्थिक विषमतेचा अंत झाला. राजकीय, सामाजिक क्षेत्रांमध्ये समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला गेला, समता हे लोकशाही जीवन पद्धतीचे प्रधान मूल्य असले तरी समतेचा खरा अर्थ काय याचाचत विचारवंतांत एकमत नाही. मात्र लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीने भारत आणि अमेरिकेच्या राज्यघटनेत समानतेच्या तत्त्वांचा समावेश केला गेला आहे. समानता ही केवळ राजकीय असून चालत नाही. त्यासाठी सामाजिक आणि आर्थिक समानतेवर भर दिला आहे. प्राचीन काळापासून अनेक धर्मातील साधू, संत यांच्या प्रवचनांतून समतेचे असलेले महत्त्व आपल्या लक्षात येते. जन्मतःच सर्व व्यक्ती समान आहेत. त्यांच्यात जात, धर्म, वंश, पंथ, लिंग, अर्थ वा अन्य बाबीवरून भेदाभेद करणे योग्य नाही. सर्व व्यक्तींना समान वागणूक देणे हा त्यामागचा अर्थ आहे

स्वातंत्र्याप्रमाणेच समता ही देखील राजकीय सिद्धान्तातील व चिंतनातील अतिशय महत्त्वाची संकल्पना आहे. समतेचा आदर्श हा बहुतांश सामाजिक आणि राजकीय चळवळींना प्रेरणादायी ठरला आहे. समतेची संकल्पना स्वातंत्र्य, हक्क, न्याय, सार्वजनिक हित अशा अन्य संकल्पनांच्या संदर्भाने समजावून घ्यावी लागते. हेरॉल्ड लास्कीच्या मते तर समता ही राज्यशास्त्राच्या परिपेक्षातील सर्वात अवघड संकल्पना आहे. समता हे एक असे मूल्य आहे की जे व्यक्ती, व्यक्तींचे गट, समाज व राज्यसंस्था यांच्यासाठी एक दिशादर्शक तत्त्व ठरते. भारताच्या संदर्भात आपणांस आर्थिक, शैक्षणिक, राजकीय या सर्व क्षेत्रांतील तसेच विविध जाती-जमाती, धर्म, स्त्री-पुरुष ह्या सर्वांच्या संदर्भात समतेचा विचार करावा लागतो. याशिवाय शहरी आणि ग्रामीण विकासाचा वेग, विविध प्रांतातील विकास प्रक्रियेतील समतेचा अभाव हाही भारतीय राजकारणासमोर फारच ज्वलंत प्रश्न उभा राहिला आहे.

### समतेचा अर्थ व स्वरूप

फ्रेंच राज्यक्रांतीमुळेचं स्वातंत्र्याबरोबर समतेच्या तत्त्वालाही महत्व प्राप्त झाले. समता हे मूलभूत तत्व आहे. बौद्धिक व शारीरिकदृष्ट्या व्यक्ती-व्यक्तीत जी विषमता आढळते ती नैसर्गिकच आहे अशी ग्राह्य धरावी, हा युक्तिवाद दुर्बलांना कायम स्वरूपी दुर्बल अवस्थेत ठेवू पाहणारा आहे. नैसर्गिक विषमतेबरोबर काही अंशी मानवनिर्मित विषमतेलाही जबाबदार ठरविताना **प्रा. सिरसीकर** म्हणतात, 'हिंदू समाजातील जातिव्यवस्थेमुळे विषमता दृढमूल झाली आहे. अस्पृश्य असणाऱ्यांच्या अनेक पिढ्यातील मुलांची बौद्धिक पातळी कमी असली तर त्याचा दोष निसर्गावर लादण्याऐवजी तो बऱ्याच अंशी मानवनिर्मित आहे, असेच मान्य करावे लागेल'.

समानतेच्या अर्थाबाबत वेगवेगळे विद्वानांनी वेगवेगळे मत मांडतात. सामान्य परिभाषेत समानता म्हणजे समान उत्पन्न, संपत्तीचे समान वितरण आणि प्रत्येक व्यक्तीशी समान वागणूक, पण हा समानतेचा योग्य अर्थ नाही कारण सर्व पुरुष समान नसतात. काही जास्त हुशार तर काही कमी हुशार, काही मेहनती तर काही आळशी आणि कंटाळवाणे असतात. त्यामुळे सर्वांशी समान वागणूक शक्य नाही कारण प्रामाणिक आणि अप्रामाणिक पुरुषांना समान वागणूक देता येत नाही. त्याचप्रमाणे संपत्तीची सर्वांमध्ये समान वाटप करता येत नाही. किंबहुना समानतेचा अर्थ राज्यात राहणाऱ्या सर्व व्यक्तींना समान संधी देणे असा आहे. याशिवाय समाजात सातत्याने आढळणारी व्यापक विषमता, विशेष अधिकारांचा अभाव,

व्यक्तीच्या मूलभूत गरजांची पूर्तता आणि सर्वांना त्यांच्या क्षमतेच्या आधारे समान संधी उपलब्ध करून देणे असाही समानतेचा अर्थ स्पष्ट होतो.

समता याचा अर्थ सारखेपणा होय, पण निसर्गान निर्माण केलेल्या विषमतेत सारखेपणा आणता येणे शक्य नाही उदा.आपल्या सभोवताली आपण, गुण, कर्तृत्व, वय, शक्ती, बुद्धिमत्ता सत्ताधारी अशी माणसे पाहत असतो त्यापैकी काहीजण निसर्गत: सुदृढ तर काही कमकुवत, काही उंच तर काही ठेंगू, काही काळे तर काही गोरे, काही कुशाग्र बुद्धी तर काही मतिमंद, काही मेहनती, काही आळशी, काही हरहुन्नरी तर काही ठीक सुमार, काही श्रीमंत, काही गरीब, काही उच्चशिक्षित तर काही निरक्षर, काही सामर्थ्यवान तर काही दुबळे. काही ग्रामीण तर काही शहरी, आपण जितके बारकाईने पाहू तितके माणसामाणसांमध्ये साम्याहून भेदच अधिक आढळून येतात. व्यक्ती तितक्या प्रवृत्तीचा आपला अनुभव असतो. व्यक्ती आपल्या गुणवैशिष्ट्ये मुळे अधिक असमानच बनल्या आहेत असे दिसते. अशा परिस्थितीत समतेच्या तत्त्वाचा नेमका अर्थ काय? व्यक्तींच्या गुणवैशिष्ट्यांमध्ये एवढी प्रचंड तफावत असताना समतेचा आग्रह धरणे न्याय आणि स्वातंत्र्य ह्या मूल्यांना बाधक ठरणार नाही का? विविध विचारवंत आणि अभ्यासकांनी समतेच्या तत्त्वाबाबत ह्या तात्त्विक समस्यांचा मागोवा वेगवेगळ्या दृष्टिक्षेत्रातून घेतल्याचे आढळते.

आधुनिक विचारवंतांमध्येही समतेच्या मूल्यासंदर्भात अनेक वेगवेगळे विचारप्रवाह आढळतात. उदारमतवादी विचारवंतांनी स्वातंत्र्यांचा आग्रह आणि समतेचा आदर्श ह्यांचा मेळ घालताना काहीशी कोंडी झाल्याचे दिसते. समाजवादी-मार्क्सवादी विचारवंत तर उदारमतवाद्यांची समतेची कल्पना केवळ पोकळ आहे अशी टीका करतात. भांडवलशाही पुरस्कृत व्यवस्थेत उत्पादनाची साधने अगदी संख्येने अल्प असणाऱ्या व्यक्तींच्या हाती एकवटलेली असतात त्याचबरोबर फार मोठ्या जनसमुदायाच्या हातात कोणतीच सत्ता अथवा उत्पादनाची साधने नसतात. अशा विषमतापूर्ण समाजात समता प्रस्थापित होऊ शकेल असे माननेच त्यांना हास्यास्पद वाटते.

समता ही अनेक संकल्पनांपैकी एक आहे (इतर म्हणजे हक्क, स्वातंत्र्य, न्याय इ.) समता ही एक महत्त्वाची संकल्पना आहे ज्या जगात पुरुषांमध्ये बरेच फरक आहेत. प्रत्येक आधुनिक राजकीय घटनेत मानवी समानतेची काही कल्पना मूलभूत कायदा म्हणून लिखित स्वरूपात असते, प्रत्येक राजकीय सिद्धांताने सामाजिक-आर्थिक समानतेच्या स्वरूपास आणि व्यवहार्यतेला हातभार लावला आहे. तथापि, समतेची स्पष्ट व्याख्या करणे जितके कठीण आहे तितकेच ते राजकीयदृष्ट्या साध्य करणे कठीण आहे. आधी सांगितल्याप्रमाणे, समानतेची संकल्पना सापेक्ष आहे आणि ती केवळ ठोस संदर्भात समजू शकते. निसर्गाने दिलेली असमानता ही एक अटळ वस्तुस्थिती आहे आणि ती समाजाने स्वीकारली पाहिजे. असमानतेला समान वागणूक दिल्याने जितका अन्याय होतो तितकाच समानतेने असमान वागणूक दिल्याने होतो. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, नैसर्गिक असमानतां व्यतिरिक्त, समाजाने निर्माण केलेल्या असमानता आहेत - जन्म, संपत्ती, ज्ञान, धर्म इत्यादींवर आधारित असमानता. धर्म, जात, लिंग, वंश या आधारावर भेदाभेद न करता प्रत्येकाला विकासाची समान संधी उपलब्ध करून देणे. समतेशिवाय स्वातंत्र्याला अर्थ नाही. भारतात घटनाकारांनी दर्जा, संधी याबाबत समतेचे आश्वासन उद्देशपत्रिकेत दिलेले आहे.

**समतेचा अर्थ स्पष्ट करताना विचारवंतांची मतमंत्तातरे -**

प्लेटो आणि ॲरिस्टॉटलसारख्यांनी सर्वच मानव सामाजिक व राजकीयदृष्ट्या समान मानले नाहीत. ॲरिस्टॉटलने गुलामगिरीची प्रथा नैसर्गिक आहे असे मानले आणि गुलामांना नागरिकांपेक्षा आणि स्त्रियांना पुरुषांपेक्षा हीन लेखले. प्लेटोने स्त्रिया पुरुषांच्या दुप्पट वाईट असतात असे मानले. मात्र स्टोईक तत्त्वचिंतकांनी आणि सिसेरोसारख्या रोमन तत्त्ववेत्त्याने 'मनुष्यस्वभाव मूलतः समान असल्याने सर्व माणसेही मुळातच समान आहेत' अशी भूमिका घेतली. नंतर ख्रिश्चन विचारवंतांनी सर्व माणसे एकाच ईश्वराची लेकरे असल्याने समान आहेत असे मानले.

समानतेचा अर्थ स्पष्ट करताना लास्की लिहितात की समानता म्हणजे:

i) विशेष विशेषाधिकारांची अनुपस्थिती. याचा अर्थ एकाची इच्छा दुसऱ्याच्या इच्छेइतकीच असते. याचा अर्थ हक्कांची समानता.

ii) पुरेशा संधी सर्वांसाठी खुल्या आहेत. हे नागरिकांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणावर अवलंबून असते. कारण शेवटी समाजात जी शक्ती मोजली जाते ती ज्ञानाचा उपयोग करण्याची शक्ती आहे; शिक्षणातील असमानतेचा परिणाम त्या शक्तीचा वापर करण्याच्या क्षमतेत असमानतेत होतो. प्रत्येकाला त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा अन्वयार्थ समजून घेण्याची संधी दिली पाहिजे.

iii) सर्वांना सामाजिक लाभ मिळणे आवश्यक आहे आणि कोणालाही कोणत्याही कारणास्तव प्रतिबंधित केले जाऊ नये. जन्मतः असमानता किंवा पालकत्व आणि आनुवंशिक कारणांमुळे असमानता अवास्तव आहे.

iv) आर्थिक आणि सामाजिक शोषणाचा अभाव.

**त्याचप्रमाणे, बार्कर लिहितात** 'की समतेचा मूळ हेतू व्यक्तिमत्त्वाची प्रगती करणे हा होय. ही प्रगती सर्वांची समान पातळीवर होणे आवश्यक असली तरी ती प्रत्येकाच्या स्वतंत्र व भिन्न मार्गाने होणार. मृतवत सारखेपणा निर्माण करण्याची कल्पना निश्चितपणे व्यक्तीच्या स्वयंस्फूर्त प्रगतीला, त्यांच्यातील विविधतेला मारक ठरणारी आहे'.

- **राफेलच्या मते**, योग्यतेचा हक्क.. मूलभूत मानवी गरजांच्या समान समाधानाचा हक्क आहे, ज्यात विशेषत: मानवी क्षमता विकसित करणे आणि वापरणे आवश्यक आहे'
- **सी एफ क्राईट च्या मते**, 'समता म्हणजे फक्त गरज, क्षमता यांसारख्या प्राधान्या व्यतिरिक्त इतर कारणांशिवाय पुरुषांना समान मानणे'.

अलीकडेच, **ब्रायन टर्नरने** त्याच्या Equality या पुस्तकात समकालीन जगाशी संबंधित समानतेचा व्यापक अर्थ दिला आहे. त्यांच्या मते, समानतेच्या संकल्पनेत खालील गोष्टींचा समावेश असावा:

i) व्यक्तींची मूलभूत समानता

ii) संधीची समानता

iii) परिस्थितीची समानता जिथे जीवनाच्या परिस्थिती समान करण्याचा प्रयत्न केला जातो

समानतेच्या अर्थाबाबत वेगवेगळे विद्वान वेगवेगळे मत मांडतात. सामान्य परिभाषेत समानता म्हणजे समान उत्पन्न, संपत्तीचे समान वितरण आणि प्रत्येक व्यक्तीशी समान वागणूक. पण हा समानतेचा योग्य अर्थ नाही कारण सर्व पुरुष समान नसतात. काही जास्त हुशार तर काही कमी हुशार, काही मेहनती तर काही आळशी आणि कंटाळवाणे असतात. त्यामुळे सर्वांशी समान वागणूक शक्य नाही कारण प्रामाणिक आणि अप्रामाणिक पुरुषांना समान वागणूक देता येत नाही. त्याचप्रमाणे संपत्तीची सर्वांमध्ये समान वाटप करता येत नाही. किंबहुना समानतेचा अर्थ राज्यात राहणाऱ्या सर्वांना समान संधी देणे असा आहे. याशिवाय समाजात आढळणारी व्यापक विषमता, विशेष अधिकारांचा अभाव, व्यक्तीच्या मूलभूत गरजांची पूर्तता आणि सर्वांना त्यांच्या क्षमतेच्या आधारे समान संधी उपलब्ध करून देणे असाही समानतेचा अर्थ होतो. त्याच्या अर्थाच्या संदर्भात समानतेचे दोन पैलू पुढे येतात ते खालीलप्रमाणे....

## ३.३ समतेची नकारात्मक व सकारात्मक संकल्पना

**नकारात्मक आणि सकारात्मक हे समानतेचे दोन पैलू आहेत :-**

I. **नकारात्मक पैलू-**समानतेच्या नकारात्मक पैलूद्वारे, आपला अर्थ असा आहे की निसर्गाने सर्वांना समान बनवले आहे, म्हणून, सर्वांशी समान वागणूक दिली पाहिजे, बुद्धिमत्ता, क्षमता, शिक्षण आणि वचनबद्धता इत्यादींच्या आधारावर भेदभाव करू नये. सर्वांना समान हक्क व सुविधा मिळाव्यात. परंतु प्रसिद्ध विचारवंत **अप्पाडोरल** यांच्या मते, "पृथ्वीचा पृष्ठभाग समतल असल्याने सर्व माणसे समान आहेत हे विधान चुकीचे आहे." तर, समानतेची नकारात्मक बाजू समानतेचा योग्य अर्थ देत नाही.

II. **सकारात्मक पैलू -**समानतेच्या सकारात्मक पैलूद्वारे, आमचा अर्थ समान प्रदान करणे होय प्रत्येकाला प्रगतीची आणि सर्वांशी समान वागणूक देण्याची संधी. पण याचा अर्थ असा नाही की वीटभट्टी, डॉक्टर किंवा इंजिनियर यांना समान पगार द्यावा. समानता म्हणजे प्रत्येक व्यक्तीला त्याच्या क्षमतेनुसार आणि पात्रतेनुसार समान संधी दिली जावी. प्रत्येकाला समान कामासाठी समान वेतन दिले पाहिजे आणि प्रत्येक व्यक्तीच्या मूलभूत गरजा पूर्ण केल्या पाहिजेत.पात्रता असूनही जात-पात, लिंग भेदांमुळे अडसर आल्यास तो दूर करणे, समान लायकीच्या व्यक्तींना विकासाची समान संधी उपलब्ध करून देणे म्हणजे समता होय. सारांश, प्रत्येक व्यक्तीला विकासासाठी योग्य संधी मिळण्याची तरतूद करणे हा समता तत्त्वाचा विधायक, सकारात्मक अर्थ ठरतो.-

## ३.४ समता म्हणजे काय (Meaning of Equality)

समतेचा नेमका अर्थ काय लावावा याबाबतीत विचारवंतानी काही मते मांडली आहेत त्याच मताच्या आधारे समतेबाबत विविध अर्थ समोर येतात ते अर्थ पुढीलप्रमाणे-

१) **समता म्हणजे सर्वांना समान संधी :** जन्मतः सर्व व्यक्ती समान मानल्या जात असल्या तरी समाजात मानवाकडूनच जाती, धर्म, अर्थ, लिंग या आधारावर भेदाभेद

केला जातो. समाज जीवनात काही जातींना श्रेष्ठ तर काहीं जातींना कनिष्ठ मानले जाते. जात ही जन्माहूनच ठरविली आते. त्यामुळे समाजातील काही व्यक्तींना सवलती अथवा समान संधी नाकारली जाते. तसेच धर्म, लिंग आणि अर्थाच्या बाबतीत आहे. समाजात स्त्रियांना अनेक वर्षापासून दुय्यम लेखले गेले. त्यामुळे त्या विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होऊ शकल्या नाहीत. आर्थिक बाबीचा विचार केल्यास ज्या पालकांकडे संपत्ती नाही. त्यांची मुले चांगले शिक्षण, पुरेशा अन्न वस्त्र निवाऱ्यांसह अन्य काही अधिकारांपासून वंचित राहतात. याउलट ज्यांच्या पालकांकडे संपत्ती अधिक प्रमाणात आहे त्यांना योग्य व पौष्टिक खाद्य, चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळते. परिणामी चांगली नोकरी आणि पैसा मिळतो. ही परिस्थिती समाजातील काहीच लोकांचा विकास घडवून आणते, जी लोकशाही मूल्यांना मारक आहे. म्हणून सर्वांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास विचारात घेऊन त्यांना समान संधी देणे म्हणजे समता होय असा अर्थ लावला गेला.

२) **समता म्हणजे सर्व बाबतीत सारखेपणा नव्हे :** समता म्हणजे सारखेपणा असे काही विचारवंतांना मान्य नाही. त्यांच्या मते निसर्गतःच सर्व व्यक्ती सारख्या नसतात. काही व्यक्ती काळ्या गोऱ्या, उंच ठेगूं , कमी बुद्धीच्या जास्त बुद्धीच्या असतात. यात समानता आणणे कदापिही शक्य नाही. मानव म्हणून सर्व व्यक्तीच्या खाण-पान, झोपणे व अन्य क्रियांच्या बाबतीत समानता वाटत असल्या तरी त्या सारख्याच असतात असे नाही. निसर्गाने मानवात केलेला भेद विचारात घेता सर्वांना समान शिक्षण, समान काम समान वेतन देणे याचा अर्थ समानता नव्हे. तेव्हा समानता याचा अर्थ सारखेपणा अथवा एकरूपता असा होत आसतो तसा अर्थ लावल्यास समाजातील विविधता नष्ट होऊन साचेबंद असा समाज निर्माण होऊ शकतो.

३) **समता म्हणजे मानवनिर्मिती विषमता नष्ट करणे :** समतेचा अर्थ निसर्गाने निर्माण केलेल्या विषमतेत सारखेपणा आणणे असा नसून मानवाने निर्माण केलेल्या विषमतेत सारखेपणा असा आहे. मानवाने जात, शिक्षण, पैसा, गावाचे स्वरूप आदी बाबींवरून श्रेष्ठ-कनिष्ठ, शिक्षित-अशिक्षित, श्रीमत-गरीब, शहरी-ग्रामीण असा भेदाभाव केला आहे, त्यामुळे व्यक्ती व्यक्तीत संघर्ष होऊन त्यांच्या विकासात अनेक अडथळे निर्माण झाले आहेत. आर्थिक विषमतेतून दारिद्रय वाढले, राजकीय विषमतेने हुकूमशाहीला जन्म दिला. अनियंत्रित व जुलमी सत्तेमुळे मानवाचे जीवन असाह्य कष्टप्रद बनले. अशा विषम परिस्थिती मुळे राज्यक्रांत्या झाल्या. म्हणून - विषमता नष्ट करणे हे मानवाचे आद्य कर्तव्य आहे. कारण मानवनिर्मिती विषमतेने मानवाच्या प्रगतीला खिळ बसली तसेच पुढे मानवाची अधोगती झाली.

मानवनिर्मित विषमतेत सारखेपणा आणणे हे मानवाच्या हातात आहे. या सारखेपणामुळे समाजाची प्रगती होईल. तेंव्हा मानवनिर्मित विषमता नष्ट करून मानवाच्या नैसर्गिक प्रवृत्तीप्रमाणे विविध प्रकारच्या विकासाची समान संधी उपलब्ध करणे म्हणजे समानता होय..

४) **समता म्हणजे विशेष हक्कांचा अभाव :** समता निर्माण करण्यासाठी विशेष हक्क नाहीसे करणे आवश्यक असते. विशेष हक्क कुणाचे असा प्रश्न उपस्थित केला जातो.

वास्तविक मानवाच्या सांस्कृतिक विकासामध्ये बहुतेक सर्व अवस्थांमध्ये मालमत्तेच्या आधारावर दोन वर्ग निर्माण झालेले आहेत. मालमत्ता ज्यांच्या ताब्यात आहे तो धनिकांचा एक वर्ग, याउलट मालमत्ता नसल्यामुळे केवळ आपल्या श्रमाच्या आधारावर जीवन जगणारा श्रमिकांचा दुसरा वर्ग असे हे दोन वर्ग आहेत. धनिकांनी संपत्तीच्या बळावर आर्थिक सत्तेच्या केंद्रिकरणाप्रमाणेच राजकीय सत्तेचे केंद्रिकरण केले आहे. या श्रीमंत वगनि आर्थिक आणि राजकीय सत्तेच्या साह्याने स्वतःसाठी काही विशेष हक्क निर्माण केले. ते हक आजही परंपरेने त्यांच्याकडे आहेत. या विशेष हकांचा परिणाम समाजात विषमता निर्माण होण्यावर झाला आहे.

या संदर्भात बोलतांना प्रा. लास्की असे म्हणतात की, जोपर्यंत समाजात काही व्यक्तींना जन्म, जात, भाषा, वंश, संपत्ती इत्यादीच्या आधारावर विशेषाधिकार मिळतात. हे अधिकार जोपर्यंत अस्तित्वात आहेत तोपर्यंत समानता प्रस्थापित होण शक्य नाही. तेंव्हा विषमतेला कारणीभूत ठरणारे विशेषाधिकार नष्ट करणे म्हणजेच समानता प्रस्थापित करणे होय.

५) **समता म्हणजे किमान गरजांची पूर्तता :** कोणत्याही समाजात सर्वप्रथम लोकांच्या अन्न, वस्त्र व निवारा या प्राथमिक गरजांच्या पूर्ततेची आवश्यकता असते. जर समाजातील काही लोकांच्या प्राथमिक गरजा भागत नसतांना काही व्यक्तींना विशेष हक्क उपभोगू देणे ही बाब सामाजिक, न्यायाशी विसंगत आहे. प्राथमिक गरजा पूर्ण झाल्यानंतरच आवश्यक असलेली कौशल्ये भिन्नता मान्य करावयास हवी. आवश्यकतेनुसार व्यक्तींना आपले कौशल्यो अभिव्यक्त करण्याची संधी, तसेच योग्य ते वातावरण उपलब्ध करून द्यावयास हवे, यासाठी किमान गरजांच्या पूर्ततेसाठी समता आणि त्यानुसार संधीची समानता निर्माण झाल्यास सामाजिक न्याय प्रस्थापित होण्यास मदत होईल.

६) **समता म्हणजे समतोल राखणारी प्रक्रिया :** समता याचा अर्थ सारखेपणा असा नाही. समाजातील सर्व व्यक्तींना एकाच पातळीवर आणल्याने विषमता नष्ट होते, मात्र व्यक्तीचे स्वातंत्र्य मर्यादित होत असते. तर दुसरीकडे व्यक्ती व्यक्तीत असलेल्या विषमतेमुळे समाजात संघर्ष निर्माण होण्याची भीती असते. परिणामी मानवजातीची हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून श्रीमंत गरीब, शिक्षित अशिक्षित, श्रेष्ठ व कनिष्ठ यांच्यातील विषमतेमुळे समाजात संघर्ष उद्भवतात. म्हणून लोकांमध्ये सुसंवाद प्रस्थापित करण्यासाठी, समूह हिताचे संरक्षण करण्यासाठी सर्वांना समान संधी देऊन समतोल राखणारी प्रक्रिया म्हणजे समता होय. त्यामुळे कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान असतात.

## ३.५ समतेच्या व्याख्या

समता या संकल्पनेच्या अनेक विचारवंतांनी वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या आहेत. या व्याख्यातून स्पष्ट होणारा समतेचा अर्थ समजून घेण्यापूर्वी आपण हे लक्षात घेतले पाहीजे की आधुनिक लोकशाही राजकीय व्यवस्थेत आणि आधुनिक समाज जीवनात समतेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हीच बाब लक्षात घेऊन भारतीय संविधानाने आपल्या नागरिकांना

मूलभूत हक्क देताना प्राधान्याने समतेच्या हक्काचा विचार केला आहे. भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेत दर्जा आणि संधीची समानता' असा उल्लेख आहे. माणसामाणसातील कृत्रिम भेद निर्माण करणाऱ्या सर्व विशेष अधिकारांचे समाज जीवनातून उच्चाटन झाले पाहिजे आसमती चा पहिला अर्थ असतो. तसेच प्रत्येक व्यक्तीला आपल्या व्यक्तित्वाचा विकास करण्यासाठी समान संधी उपलब्ध असेल. धर्म, जात, लिंग, भाषा, प्रदेश, वंश असे कोणतेही कारण व्यक्तीच्या विकासाच्या आड येणार नाही. समाजात श्रीमंत-गरीब यातील आर्थिक विषमता, स्त्री-पुरुष अशी लैंगिक विषमता उच्च-निच्च जातीतील सामाजिक विषमता एका मर्यादेपेक्षा जास्त असल्यास समतेला मारक ठरते. समाजातील विषमता समाजातील कोणत्याही व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासातील अडथळा असणार नाही, प्रत्येक व्यक्तीला व्यक्तिमत्व विकासासाठी समान संधी उपलब्ध असेल,

विषमतेच्या विषमतामुलक वटवृक्षाला प्रत्येक समाजात धर्म, संस्कृती, समाज परंपरा, चालीरीती, इ. द्वारे खतपाणी घातले जाते. त्यामुळे हजारो वर्ष ही अन्यायकारक विषमता समाजात मूळ धरून असल्याचे स्पष्ट दिसते, त्यासोबत तिचे उदात्तीकरणहि होताना आपण पाहतो. त्यामुळे अशी विषमता एकाएकी नष्ट होऊन सर्वांना व्यक्तिमत्व विकासाची समान संधी निर्माण होईल, अशी परिस्थिती सहज निर्माण होईल असे वाटतं नाही. त्यासाठी समाज प्रबोधना बरोबर समाजात अशा अन्यायकारक विषमतेला बळी ठरलेल्या वंचित, दुर्बल वर्गाला कायद्याचे संरक्षण देण्याबरोबरच या वर्गाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काही संविधानिक वैधानिक उपायोजना करणे आवश्यक असते. उदा. भारतात दिले जाणारे आरक्षण, अमेरिकेत कृष्णवर्णीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी असलेली Affirmative Action, अशा उपाययोजनांमुळे हजारो वर्षे विषमता प्रधान व्यवस्थेचा बळी ठरलेला वंचित- दुर्बल घटक मुख्य प्रवाहात येण्यास मदत होते. तात्पर्य याने स्वातंत्र्य व न्याय या तत्वांची योग्य ती सांगड घालून समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित करणे.

**व्याख्या:**

समतेचा अर्थ अधिक सखोल व सूक्ष्मपणे समजून घेण्यासाठी यासंबंधीच्या काही विचारवंतांचे व्याख्या लक्षात घेणे आवश्यक आहे.

१) **लास्की:** यांच्या मते समता ही मूलतः समतलन प्रक्रिया (Leveling process) असते." पुढे ते म्हणतात की, समता म्हणजे "कोणत्याही व्यक्तिला समाजात असे स्थान दिले जाणार नाही की जेणेकरून ती आपल्या शेजाऱ्यावर कुरघोडी करू शकेल आणि त्याला आपले नागरिकत्वाचे अधिकार नाकारतील."

लास्कीच्या या व्याख्याचा अर्थ असा की, समता ही समाजात समतलनाची प्रक्रिया असते आणि ती चिरंतन चालणारी न संपणारी प्रक्रिया असते. कारण कोणत्याही समाजात कधीही एकसारखेपणा नसतो. म्हणजेच समता म्हणजे एकसारखेपणा आणणे नव्हे किंवा भिन्नत्वाचा अभाव असणे नव्हे. किंबहुना समाजातील भिन्नता समाजाला सौंदर्य प्रदान करते. पण समता म्हणजे वरकरणी व्यक्तीव्यक्तीत प्रत्येक बाबतीत भिन्नता असली तरी विकास प्रक्रियेत भाग घेण्याची सर्वांना समान संधी उपलब्ध असणे विधिनियमांची समानता असणे अपेक्षित असते.

२) **बार्कर** यांच्या मते "समतेचे तत्व म्हणजे विकासाच्या ज्या संधी आणि अधिकाराची मला हमी देण्यात आली आहे, त्याच प्रकारच्या संधी आणि अधिकारांची हमी इतरांनाही द्यायला हवी. आणि इतरांनी ज्याची हमी देण्यात आली आहे ते मलाही प्राप्त व्हायला हवे. बार्करच्या समतेच्या व्याख्येचा अर्थ असा आहे की, राज्याद्वारे कायद्याची जी प्रस्थापित व्यवस्था आहे ति सर्वसाधारणपणे सर्वांना समान पद्धतीने राबवली जाईल. प्रत्येकाला आपल्या क्षमतेप्रमाणे आणि पात्रतेप्रमाणे आपला विकास करण्याची संधी उपलब्ध असेल.

३) **राफेल** यांच्या मते, "प्रत्येक व्यक्तीला आपल्या मूलभूत गरजांच समान समाधान करण्याचा अधिकार आणि आपल्या क्षमतांचा विकास आणि वापर करण्याची समान संधी असणे म्हणजे समता होय".

विचारवंतांच्या वरील व्याख्या व त्याचा अर्थ लक्षात घेतल्यास समता म्हणजे काय? तर -

i) समाजजीवनात सर्व व्यक्तिंना आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याची पर्याप्त संधी उपलब्ध असेल.

ii) कोणत्याही व्यक्ती वा गटाला जन्मसिद्ध विशेषाधिकार असणार नाहीत अधिकारांचे सर्व नागरिकांना समान वाटप झालेले असते.

iv) अधिकारपद प्राप्त करण्याची संधी प्रत्येकाला आपल्या क्षमता व पात्रतेनुसार सारख्या प्रमाणात उपलब्ध असते.

समता म्हणजे एकसारखेपणा नव्हे, समाजातील प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपासून भिन्न असते. परंतु ही-भिन्नता समतेच्या तत्वाला मारक असु शकत नाही. समाजात भिन्नता असते म्हणजे भेदभाव असणारच, समतेचा अर्थ एवढाच की हा भेदभाव विवेकनिष्ठ आधारावर केले गेले असले पाहिजेत. एकेकाळी वंश, लिंग, जात या आधारावर व्यक्ती-व्यक्तीत भेदभाव केला जात असे, परंतु हा भेदभाव विवेकनिष्ठ नव्हता. पुराण धर्मशास्त्र, रूढी, परंपरा या आधारे हा भेदभाव केला जात होता. अशा भेदभावातून अन्यायकारक विषमता निर्माण झाली. सध्याच्या काळात वंश, लिंग, जात या आधारावर भेदभाव केला जातो. त्याला कायदयाचे अधिष्ठान असते. उदा. मागासवर्गासाठी राखीव जात महिलांना विशेष सवलती, इत्यादी. परंतु या भेदभावाला विवेक निष्ठेचा आधार असल्यामुळे यातून अन्यायकारक विषमता निर्माण होत नाही, उलट अन्यायकारक विषमता निर्माण होऊ नये यासाठीच्या या उपाययोजना मानल्या जातात. म्हणजेच प्रभावातून समतेला जर बाधा येऊ नये असे वाटत असेल तर सर्वप्रथम त्या भेद भावांसाठी विवेकनिष्ठ आधार कोणते आहेत यावर समाजात एकमत असले पाहिजे, आणि त्या आधारावर करायच्या भेदभावाचे वाजवी प्रमाण किती असावे याबद्दल ही एक वाक्यता असली पाहिजे. त्यामुळे या आधारावर आणि विशिष्ट मर्यादेमध्ये केला जाणारा भेदभाव समतेला मारक न ठरता पोषक ठरेल.

## ३.६ समतेच्या संकल्पनेचे विश्लेषण

(१) सर्वच माणसांपाशी त्यांना प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ ठरवू शकेल इतकी प्रगल्भ बुद्धी असते. माणसा-माणसांच्या गुणवत्तेत जरी फरक आढळत असला तरी हा फरक केवळ मात्रेचा असतो. माणूस म्हणून माणसा-माणसांतील समतेस त्याने धक्का पोहचत नाही.

(२) माणसांमध्ये जरी खूपच भेद असला तरी हा उपजत भेद समाजाने निर्माण केलेल्या संधी व सुविधांचा लाभ घेण्याबाबत अडसर बनणे योग्य नाही. उपजत वा कृत्रिम सामाजिक भेदांमुळे समाजातील ह्या लाभापासून वंचित राहणार नाही हे समतेच्या तत्त्वात अभिप्रेत आहे.

(३) प्रत्येकाला सुसंस्कृत व विकासमान जीवनासाठी आवश्यक ते सर्व नक्की मिळेल ह्याची हमी असणे, त्याहून अधिक जे काही मिळायचे ते ज्याच्या त्याच्या कुवतीवर अवलंबून असणे, आणि कोणालाच विनाकारण सापत्न वागणूक वा विशेष हक्क न मिळणे असा समतेचा अर्थ आहे.

(४) व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या वागणुकीतील फरक त्यांच्यातील गुणात्मक तफावतीशी सुसंगत व त्या तफावतीतून प्रमाणातच असेल तरच तो समर्थनीय ठरेल व असा भेद करण्याने समतेच्या तत्त्वाला बाधा येणार नाही.

(५) प्रत्येकाला आपल्या कर्तृत्वामुळे मिळणारे लाभ घेताना इतरांना त्यांच्या लाभापासून व हक्कांपासून वंचित ठेवण्याची जराही संधी न मिळणे समतेत अभिप्रेत आहे. कमी-अधिक कर्तृत्वाच्या माणसांना समान लाभ मिळणे ह्यात अभिप्रेत नाही.

समता म्हणजे प्रत्येकाला आत्मविकासासाठी सारखीच परिस्थिती उपलब्ध असण्याची हमी. 'सर्वांनाच अगदी हुबेहूब सारखी वागणूक' इतका काटेकोर अर्थ समतेच्या मूल्यामध्ये अभिप्रेत नाही. जोपर्यंत माणसे असमान आहेत तोपर्यंत अगदी काटेकोरपणे दिलेली समान वागणूक ही हानीकारकच ठरण्याची शक्यता अधिक. समतेच्या आदर्शामध्ये विषमतेची दरी शक्य तितकी कमी होणे हे मात्र अभिप्रेत आहे. इतरांची वाट खुरटवण्यास कारणीभूत होईल अशा त-हेने केवळ स्वतःचाच विकास साधण्याची कोणासच परवानगी नसणे, आणि आत्मविकासाची पुरेशी संधी प्रत्येकाला उपलब्ध असणे, समतेच्या तत्त्वात अभिप्रेत आहे. प्रत्येकास पर्याप्त संधी मिळणे यालाच समान संधी मानले जाते.

## ३.७ समानतेचे प्रकार

### नैसर्गिक समता

नैसर्गिक समतेच्या संकल्पनेचा पुरस्कार करणारे निर्सगतः सर्व माणसे माणूस म्हणून समान आहेत असे मानतात. प्राचीन ग्रीसमध्ये पेन्टो आणि ॲरिस्टॉटल यांनी प्रतिपादिलेल्या नैसर्गिक विषमतेच्या तत्त्वाला पॉलिविषय व सिसेरो यांच्या विचारांनी छेद दिलेला आढळतो. त्यांनी माणसामाणसांमधील नैसर्गिक समतेवर भर दिला. नंतर सर्व माणसांना एकाच ईश्वराची लेकरे मानणाऱ्या ख्रिश्चन विचारवंतांनीही ह्याच तत्त्वावर भर दिला. आधुनिक काळात हॉब्ज, लॉक, रुसो या विचारवंतांनीही राज्यपूर्व अवस्थेतील मानवांमधील नैसर्गिक समतेची

संकल्पना मांडली. नैसर्गिक समतेच्या तत्त्वाचा अर्थ निसर्गाने सर्व माणसांना सारखीच क्षमता व गुणवत्ता बहाल केली आहे असा मात्र नव्हे. उपजत कमी जास्त क्षमतांच्या आधारे माणसांमध्ये भेदभाव केला जाऊ नये व सर्वांना अधिकाधिक आत्मविकासाची संधी समाजात उपलब्ध व्हावी हे त्यात अभिप्रेत आहे.

**सामाजिक समता**

सामाजिक समतेची संकल्पना सामाजिक विषमतेविरुद्ध उठाव म्हणून पुढे आली. ज्या देशात जातिव्यवस्था कठोर होती, धर्म, रंग, पंथ इत्यादींच्या आधारे भेदभाव केला जात होता, त्या देशांतील लोकांनी या भेदभावांविरुद्ध बंड केले. समाजातील असमानता दूर करण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी अनेक समाजसुधारणेच्या चळवळीही सुरू केल्या. शिक्षण आणि लोकशाहीच्या प्रसारामुळे समानतेच्या संकल्पनेला गती मिळाली आणि जात, रंग, पंथ इत्यादींच्या आधारे भेदभाव नाहीसा झाला. जगातील विविध राज्यघटनेंमध्ये सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. परंतु असे असूनही, सामाजिक विषमता अजूनही काही देशांमध्ये प्रचलित आहे. अनेक देशांमध्ये वर्णभेद अजूनही आहे आणि 'ब्रिटन श्वेत वर्णीय ' आणि 'आफ्रिका कृष्ण वर्णीय ' अशा घोषणा दिल्या जातात. दक्षिण आफ्रिकेत, कृष्णवर्णीयांना समान अधिकार दिले जात नाहीत जे गोऱ्यांना दिले जातात. मानवानी निर्माण केलेले आणि समाजाने कालबाह्य ठरवले तरी उच्च-नी भेद नाहीसे करून सर्व स्त्री-पुरुषांच्या घटकांची स्थापना सामाजिक समतेवर आहे. भारताच्या संदर्भात आपण विविध जाती उच्च-नीच भाव, स्त्री-पुरुष विषमता, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय विषयमतांचे अनेक स्तर पाहत असतो. या विषयावर दूरदृष्टी प्रत्येकाला आपले सामाजिक हक्क यथार्थपणे उपभोगता यावेत असे सामाजिक समतेत अभिप्रेत आहे.

स्वातंत्र्यापूर्वी आपल्या देशात अस्पृश्यता प्रचलित होती, परंतु स्वातंत्र्यानंतर अस्पृश्यता हा मानवतेविरुद्धचा गुन्हा म्हणून घोषित करण्यात आला. घटनेनुसार हा गुन्हा घोषित करण्यात आला आहे. सर्व समाजघटकांना समान सामाजिक दर्जा, समान सामाजिक हक्क उपलब्ध करून देणे हे राज्यसंस्थेचे आद्य कर्तव्य ठरते. कायद्याच्या माध्यमातून सामाजिक विषमता नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला जातो. उदाहरणार्थ, भारतात अस्पृश्यता निवारणासाठी, काही जमातींना जन्मजात गुन्हेगार ठरविण्याच्या दोषपूर्ण धोरणाचा शेवट करण्यासाठी कायदे करण्यात आले. अशा कायद्यांना अनुकुल प्रतिसादही मिळाला. तरीसुद्धा समाजपरिवर्तनासाठी कायद्यापेक्षा मतपरिवर्तनावर जादा भर देणे श्रेयस्कर ठरते.

**संधीबाबतची समता**

संधीची समता सामाजिक समतेत गृहीत धरली असली तरी सामाजिक समता केवळ तेवढ्यापुरतीच मर्यादित नाही. मुळात विषम पातळीवर असलेल्या व्यक्ती समान संधी मिळाल्या तरी परस्परांशी निकोप स्पर्धा करू शकतच नाहीत. एखाद्या सुशिक्षित मध्यमवर्गीय घरातील मूल शाळेत शिकत असेल तर त्याचा पोशाख, पुस्तके, आहार, पालकांकडून त्याच्या अभ्यासाकडे दिले जाणारे लक्ष ह्या साऱ्या गोष्टी त्यास उपलब्ध असतात. शाळा कॉलेज ह्यांच्या जोडीला खाजगी शिकवण्या, परीक्षेसाठी मार्गदर्शक पुस्तके असे सर्व अनुकूल वातावरण त्यास लाभते पण गरीब अशिक्षित कुटुंबातला मुलगा शाळेत पाठवला गेला तरी घरी अभ्यासाला पोषक वातावरण वा अनुकूल आर्थिक परिस्थिती आणि अभ्यासात मदत करू

शकणारे पालक या सर्व गोष्टींच्या अभावी, इतर सुस्थितीतील विद्यार्थ्यांच्या मानाने स्पर्धेत मागेच पडतो. अशा परिस्थितीत सर्वांना शिक्षणाची समान संधी आहे असे म्हणणे म्हणजे त्या गरीब विद्यार्थ्यांची क्रूर चेष्टाच ठरते.

जेव्हा सर्वजण समान तयारीनिशी स्पर्धेत उतरण्याच्या स्थितीत नसतात तेव्हा समान संधी उपलब्ध असल्यास व्यवहारात काहीच अर्थ नसतो. अनेक घरांतून बालपणापासूनच मुलास आणि मुलीस वाढविताना भेदभाव केला जातो. आहार, आरोग्य, खेळ खेळणी, शिक्षण, शिस्तविषयक निर्बंध, मोठ्यांकडून होणारे कोडकौतुक अशा सर्वच बाबतींत अनेकदा सख्ख्या आईवडिलांकडूनही मुलीवर अन्याय केला जातो. राज्यघटनेने स्त्री-पुरुषांत दुजाभाव केला नसला तरी व्यवहारात मात्र तीव्र विषमताच आढळून येते. परंपरेने दडपल्या गेलेल्या जाती, गरीब लोक, अपंग, वृद्ध, स्त्रिया, लहान मुले ह्यांना खरी संधी द्यायची असेल तर केवळ समान संधी पुरेशी नाही, त्यांच्यासाठी विशेष संधी द्यायला हवी. अशा विशेष तरतुदींमुळे समतेच्या तत्त्वास बाधा येत नाहीच, उलट समता प्रत्यक्षात उतरवली जाण्यासाठी त्या पूर्वअटीच असतात.

हेरॉल्ड लास्कीच्या मते ज्या गोष्टींच्या प्राप्तीशिवाय मानवी जीवन निरर्थक ठरते अशा गोष्टी कोणताही भेदभाव न करता सर्वांना प्राप्त व्हावयास हव्यात. तशी स्थिती जोपर्यंत आणली जात नाही तोपर्यंत मोजक्या काही व्यक्तींसाठी विशेष संधी प्राप्त होणे कदापि समर्थनीय ठरणार नाही. जर एखाद्याच्या चैनीमुळे दुसऱ्यास स्वतःची मूलभूत गरजही भागवता येत नसेल तर अशी चैन करण्याचा कोणालाच नैतिक अधिकार नाही.

## राजकीय समता

राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची सर्वांना समान संधी असणे ह्यातून सूचित होते. सर्वांना सारखेच राजकीय हक्क व स्वातंत्र्य उपभोगता येण्याजोगी परिस्थिती असेल तर राजकीय समता प्रस्थापित झाली आहे असे म्हणता येऊ शकते. सत्तास्थानी पोहोचण्याचे मार्ग सर्वांना सारख्याच प्रमाणात खुले असणे हा राजकीय समतेचा खरा अर्थ, संपत्ती, धर्म, वंश, वर्ण, लिंग, जात ह्यांमुळे जर कोणी राजकीय सत्तेत सहभागी होण्यावाचून वंचित राहत असेल तर राजकीय समता अस्तित्वात नाही असेच म्हणावे लागते. स्वीत्झर्लंडसारख्या लोकशाही राष्ट्रात अगदी अलीकडच्या काळापर्यंत स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता. इतरही लोकशाही देशांत पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना खूपच उशिरा राजकीय हक्क मिळाले आणि आज जरी सर्व लोकशाही राष्ट्रांमध्ये स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने राजकीय हक्क मिळाले असले तरी पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेमुळे प्रत्यक्ष प्रभावी राजकीय सत्ता स्त्रियांना मिळण्यात मोठेच अडसर अद्यापही टिकून आहेत. ही परिस्थिती विकसित, विकसनशील तसेच समाजवादी राष्ट्रांतही सार्वत्रिकपणे आढळते. लोकशाही राष्ट्रांतील निवडणूक मोहिमांत पैशांचा वापर इतका प्रचंड प्रमाणात होत असतो की त्यामुळे गरीब नागरिक मतदानाशिवाय अन्य हक प्रत्यक्षात उपभोगण्याचे स्वप्नही बघू शकत नाहीत. त्यामुळे त्यांचे अनेक राजकीय हक्क हे केवळ कागदोपत्रीच राहतात आणि राजकीय समताही केवळ प्रतिकात्मकच राहते. ब्रिटिश संसदेच्या उमरावगृहाचे सदस्यत्व अनेकांना वंशपरंपरेने मिळत असते. ही प्रथा राजकीय समतेच्या विरोधी आहे. आर्थिक व सामाजिक समतेअभावी ही राजकीय समता अस्तित्वात येऊच शकत नाही. आर्थिक समता नसेल तर सर्व सत्ता सधन वर्गांच्या हाती

राहते आणि निर्धन लोक सत्तेपासून वंचित राहतात. सामाजिक समता नसेल तर स्त्रिया तसेच नीच मानले जाणारे वर्ग यांना राजकीय समानतेचा अनुभव कधीच मिळू शकणार नाही. सामाजिक, आर्थिक व शारीरिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी केला जाणारा बचावात्मक भेदभाव हा सुद्धा समतेसाठी पोषकच असतो. विधिमंडळ, संसद यांतील मागासवर्गीयांसाठी असलेल्या राखीव जागा तसेच महिलांसाठी व मागासवर्गीयांसाठी स्थानिक स्वराज्य शासनसंस्थांतून असलेल्या राखीव जागा म्हणजे राजकीय समता व्यवहारात आणण्याच्या दृष्टीने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्त्वावर आधारित शासनसंस्था विविध स्तरांवर सक्रीय असणे राजकीय समतेस पोषक ठरू शकते. आपल्या जीवनावर परिणाम घडवून आणणारे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी सर्वांना सारखीच उपलब्ध असणे राजकीय समतेत अभिप्रेत आहे. या संधीचा लाभ उठवण्यासाठी आर्थिक व सामाजिक समता अत्यावश्यक आहे; अन्यथा वरिष्ठ वर्गांनाच त्याचा लाभ मिळेल,

प्रत्यक्ष व्यवहारात सर्व नागरिक राजकीय हक्कांचा समान प्रमाणात वापर करू शकत नाहीत. निवडणूक लढविण्याचा खर्च प्रचंड असल्यामुळे सामान्य लोक उभे राहत नाहीत. परिणामतः लोकशाहीच्या चौकटीत अल्पजनसत्ता, घराणेशाही दिसू लागते. लोकशाहीत प्रत्येक नागरिक हा राजकीय सत्तेचा वाटेकरी असतो आणि तो त्याच्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करून राजकीय सत्तेचा वाटेकरी बनतो. जनता ही राजकीय शक्तीचे केंद्र आहे आणि त्यांच्यापुढे सरकार जबाबदार आहे. गरज पडल्यास ते त्यांच्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करून सरकार बदलू शकतात.

१. **मतदानाचा अधिकार -** राजकीय समता प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येक नागरिकाला जात, धर्म, पंथ, रंग इत्यादी भेदभाव न करता मतदानाचा अधिकार दिला गेला पाहिजे. जवळपास प्रत्येक लोकशाही राज्यात मतदानाचा अधिकार मान्य करण्यात आला आहे. भारत, इंग्लंड, अमेरिका आणि जगातील इतर लोकशाही देशांमध्ये, प्रौढ मताधिकाराच्या तरतुदी संविधानांमध्ये केल्या आहेत.

२. **निवडणूक लढविण्याचा अधिकार -** राजकीय समानता प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येक नागरिकाला कोणताही भेदभाव न करता निवडून येण्याचा अधिकार दिला गेला पाहिजे. भारतात, प्रत्येक नागरिक ज्याचे वय २५ वर्षे आहे आणि कोर्टाने निवडणूक लढण्यास अपात्र घोषित केले नाही, तो राज्य विधानमंडळ आणि लोकसभेचा सदस्य होण्यासाठी निवडणूक लढवू शकतो.

३. **सार्वजनिक पद धारण करण्याचा अधिकार -** राजकीय समानता प्रस्थापित करण्यासाठी, प्रत्येक नागरिकाला सार्वजनिक पद धारण करण्याचा अधिकार देणे आवश्यक आहे. कोणतेही कार्यालय कोणत्याही विशिष्ट वर्गाची मक्तेदारी नसावे. भारतात, प्रत्येक नागरिकाला कोणतेही सार्वजनिक पद धारण करण्याचा अधिकार आहे, जर त्याने मूलभूत पात्रता पूर्ण केली असेल.

४. **याचिका करण्याचा अधिकार -** लोकशाहीत, लोकांना त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांसमोर याचिका करण्याचा अधिकार आहे. अशा

याचिका वैयक्तिकरित्या तसेच एकत्रितपणे देखील केल्या जाऊ शकतात आणि लोक त्यांच्या हिताच्या संरक्षणासाठी विचारू शकतात.

५. **सरकारवर टीका करण्याचा अधिकार -** राजकीय अधिकारांच्या यादीमध्ये, सरकारवर टीका करण्याच्या अधिकाराचे स्वतःचे महत्त्व आहे. हे सरकारला त्याच्या कर्तव्यांसाठी जबाबदार बनविण्यात मदत करते. तसेच नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करण्यात मदत होते.मात्र सरकारवर टीका करण्यासाठी घटनात्मक आणि कायदेशीर मार्गांचा वापर केला पाहिजे. सरकारवर टीका करण्यासाठी कोणत्याही हिंसक पद्धतीचा वापर करू नये आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होऊ नये.

६. **राजकीय पक्ष स्थापन करण्याचा अधिकार -** लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीला राजकीय पक्ष स्थापन करण्याचा आणि राजकीय पक्षांचा सदस्य होण्याचा अधिकार आहे. मानवाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी माणूस कोणत्याही संघटनेचा सदस्य होऊ शकतो.

थोडक्यात, आपण असे म्हणू शकतो की राजकीय समानता म्हणजे कोणत्याही भेदभावाची पर्वा न करता सर्व नागरिकांना समान राजकीय अधिकार देण्याची तरतूद करणे.

**आर्थिक समता**

आर्थिक समता हा राजकीय समतेचा पाया असतो. आर्थिक विषमतेमुळे समाज दुभंगला जातो. परंतु सर्वांना आर्थिक दृष्ट्या एका समान पातळीवर आणून संपूर्णतया आर्थिक समता निर्माण करणे अशक्य व अनावश्यक आहे. आर्थिक समतेचा अर्थ स्पष्ट करताना प्रा. लास्की म्हणतात, 'सर्व व्यक्तींना त्यांच्या जीवनावश्यक प्राथमिक गरजा पूर्ण होईपर्यंत आर्थिक समतेचा ध्यास घेणे आवश्यकच आहे. यापुढे व्यक्तीला आपल्या कर्तृत्वावर अधिक वेतन मिळविण्याचा अधिकार असावा. पण त्याचे हे वेतन त्याच्या कार्याच्या सामाजिक उपयुक्ततेवर अवलंबून राहील'. व्यक्तीचे कर्तृत्व अबाधित राखून सर्वांच्या किमान गरजा भागविल्या जाव्यात असे गृहीत तत्त्व आहे. हे तत्त्व स्पष्ट करताना बार्कर म्हणतो की, राज्यसंस्था सर्वांना मालमत्तेचा समान हक्क देते म्हणजे तिने सर्वांच्या वाट्याला समान मालमत्ता उपलब्ध करून द्यावी असे नव्हे तर सर्वांना पात्रतेनुसार मालमत्ता जमविण्याचा समान हक्क होय. आर्थिक विषमतेच्या गांभीर्याकडे लक्ष वेधताना मॅथ्यू अर्नोल्ड म्हणतो, 'आमची विषमता श्रीमंत वर्गाला विलासी बनविते, मध्यम वर्गाला लाचार बनविते आणि गरीब वर्गाला पशू बनविते'. आर्थिक समता म्हणजे सर्वांना सारखीच मालमत्ता मिळणे वा सारखेच वेतन मिळणे असा अर्थ नाही. आर्थिक समतेत सामान्यतः पुढील गोष्टी नमूद केल्या जातात :

(क) सुसंस्कृत समाजाचा घटक म्हणून योग्य प्रकारे जगता येण्यासाठी आवश्यक उत्पन्न नक्की व नियमित मिळेल याची हमी प्रत्येकाला असते.

(ख) प्रत्येकाच्या मूलभूत गरजा भागवल्यानंतरच कोणालाही विशेष कर्तृत्वाच्या जोरावर अधिक संपत्ती मिळविता येते.

(ग) अर्थार्जनाची साधने प्राप्त करण्याची संधी सर्वांना सारख्या प्रमाणात उपलब्ध असणे. त्यात जात-धर्म- लिंग-वंश-वर्ण अशा गोष्टींमुळे भेदभाव न होणे.

(घ) समान कामाबद्दल सर्वांना समान वेतन मिळणे.

(च) इतरांना त्यांच्या अत्यावश्यक उत्पन्नापासूनही वंचित ठेवू शकेल इतके उत्पादन साधनांचे केंद्रीकरण कोणाच्याच हाती न होणे.

समाजसत्तावाद्यांनुसार आर्थिक समतेसाठी वर्गविहिन समाज अस्तित्वात येणे हाच एक उपाय आहे. खाजगी मालमत्ता नष्ट होऊन उत्पादनसाधने सामूहिक मालकीची झाल्याखेरीज आर्थिक समता प्रस्थापित होणे शक्य नाही असे ते मानतात. वास्तवात मात्र जगात जिथे जिथे समाजवादी म्हणवणाऱ्या राजवटी स्थापन झाल्या तिथे तिथे राज्यकर्ते शोषणकर्तेच बनले आणि समतेचे स्वप्न फक्त घोषणांमध्येच राहिले असाच अनुभव आला आहे.

**कायद्यापुढे समानता**

कायदेशीर समानतेची संकल्पना राज्यातील सर्व नागरिक कायद्याच्या दृष्टीने समान आहेत याची पुष्टी करते. कायदा आणि न्यायव्यवस्था संपत्ती, रंग, जात, धर्म आणि पंथ यांच्या आधारावर भेदभाव करणार नाही. कायदे प्रत्येक नागरिकासाठी समान आहेत. राज्यात कायद्याचे राज्य असावे. अर्नेस्ट बार्करच्या म्हणण्यानुसार, "ती (कायदेशीर समानता) आम्हाला कायदेशीर व्यक्तिमत्त्व किंवा मुखवटे घालते.......या सखोल कारणास्तव, कायद्यापुढे कोणताही फरक असला तरी आपण सर्व समानतेने महत्त्वाचे आहोत."

कायदेशीर समानतेबद्दल आपले मत व्यक्त करताना जे.आर. लुकास म्हणाले, "कायद्यासमोरील समानता ही कायद्याद्वारे समान वागणूक मिळण्याची हमी देत नाही तर कायद्याच्या समान प्रवेशाची हमी देते... कोणीही इतका नीच नाही की न्यायालयाचा सहारा घेऊ नये, कोणीही इतके पराक्रमी नाही. न्यायालयांची जबाबदारी नसल्यामुळे कोणीही न्यायालयांची मदत रद्द करू शकते, प्रत्येकाने त्यांचे आज्ञाधारकपणे पालन केले पाहिजे."वर लिहिलेली मते वाचल्यानंतर, आम्ही असे म्हणू शकतो की समानतेच्या कायदेशीर पैलूंद्वारे आमचा अर्थ असा आहे की प्रत्येकाला कायद्यात समान प्रवेश आहे आणि कायद्यासमोर समान आहे आणि ते त्याच्या हक्क आणि स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी न्यायालयांमध्ये जाऊ शकतात आणि कायदा कोणत्याही भेदभाव करत नाही. कायद्याच्या समानतेनुसार पुढील बाबी समजून घेणे अत्यावश्यक ठरते.

१. **कायद्यासमोर समानता -** याचा अर्थ असा की समाजात एखाद्याचा दर्जा उच्च असला तरी कायद्यापुढे सर्व समान आहेत. कायदा जात, धर्म, रंग, पंथ किंवा लिंग या आधारावर भेदभाव करत नाही. याबद्दल प्रा. डायसी यांनी बरोबर म्हटले आहे की, "आमच्याकडे पंतप्रधानांपासून ते हवालदार किंवा कर जमा करणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्यावर कोणत्याही कायदेशीर औचित्याशिवाय केलेल्या प्रत्येक कृतीसाठी इतर नागरिकांप्रमाणेच जबाबदारी असते." भारतीय राज्यघटनेच्या कलम-१४ मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, "राज्य कोणत्याही व्यक्तीला कायद्यापुढे समानता किंवा भारताच्या हद्दीतील कायद्यांचे समान संरक्षण नाकारणार नाही."

२. **कायद्याचे समान संरक्षण -** याचा अर्थ प्रत्येक व्यक्तीला कायद्याने समान संरक्षण दिले पाहिजे. प्रत्येक नागरिकाला घटनात्मक उपायांचा अधिकार मिळाला पाहिजे. त्याबद्दल आपले मत व्यक्त करताना प्रा. डायसी म्हणाले की, "आमच्याकडे

पंतप्रधानांपासून ते हवालदार किंवा कर जमा करणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्यावर कायदेशीर अधिकार क्षेत्राशिवाय केलेल्या प्रत्येक कृतीसाठी इतर नागरिकांप्रमाणेच जबाबदारी असते." थोडक्यात, कायदा सर्वांना समान संरक्षण देतो आणि जात, रंग, धर्म, वंश किंवा सामाजिक स्थिती इत्यादींच्या आधारावर कोणताही भेदभाव करत नाही.

३. **समान कायद्यांची तरतूद -** कायदेशीर समानता म्हणजे सर्व नागरिकांसाठी समान कायद्यांची तरतूद. इव्होर जेनिंग्जच्या मते, "कायद्यासमोर समानता म्हणजे समानतेच्या लोकांमध्ये कायदा समान रीतीने प्रशासित केला गेला पाहिजे आणि सारख्यांना समान वागणूक दिली जावी."

४. **सर्व नागरिकांना समान हक्क -** समान हक्क प्रदान केले जावेत. जात, धर्म, रंग, पंथ इत्यादींच्या आधारावर कोणताही भेदभाव केला जाऊ नये. राज्यघटना हा देशाचा सर्वोच्च कायदा आहे आणि राज्यातील प्रत्येक नागरिकाला घटनेत समाविष्ट केलेले समान अधिकार आहेत.

५. **सार्वजनिक नियुक्तींमध्ये समान संधी -** कायद्यानुसार, प्रत्येक योग्य आणि पात्र उमेदवाराला सार्वजनिक सेवांमध्ये समान संधी आणि संधी दिल्या पाहिजेत. परंतु लक्षात ठेवा की राज्य वेगवेगळ्या नोकऱ्यांसाठी पात्रता निश्चित करू शकते.

६. **समाजातील दुर्बल घटकांसाठी विशेष तरतूद -** राज्यातील कायदे समाजातील दुर्बल घटकांसाठी विशेष विशेषाधिकार आणि सुविधा देतात. समाजातील दुर्बल घटकांना विशेष हक्क मिळावेत यासाठी घटनेत तरतूद करण्यात आली आहे. यामुळे त्यांचा समाजातील इतर घटकांप्रमाणे विकास होण्यास मदत होते.

७. **भेदभाव प्रतिबंध -** समानतेचा कायदेशीर परिमाण देखील अशी मागणी करतो की जात, वंश, धर्म, रंग, पंथ इत्यादींच्या आधारावर भेदभाव केला जाऊ नये. जेणेकरून असे भेदभाव समानतेच्या मार्गात कोणताही अडथळा बनू नयेत. भारतीय राज्यघटनेने अशा प्रकारच्या भेदभावांना प्रतिबंध केला आहे.

८. **विशेष विशेषाधिकारांची अनुपस्थिती -** समानतेची कायदेशीर बाब अशी मागणी करते की विशेष विशेषाधिकार असलेला कोणताही वर्ग नसावा, कारण विशेष विशेषाधिकार असमानता निर्माण करतात.

९. **भेदभावाचा तर्कसंगत आधार -** भेदभाव नसणे हे समानतेचे वैशिष्ट्य असले तरी, समाजातील दुर्बल आणि मागासलेले घटक, महिला आणि मुले इत्यादींच्या हिताच्या संरक्षणासाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्याला आहे. अशा तरतुदी तर्कसंगत असाव्यात.

अनेकदा कायदाच श्वेत-कृष्ण, स्त्री-पुरुष, सवर्ण-दलित यांत भेदभाव करताना आढळतो. मुळात जर कायदाच समतेच्या मूल्यावर आधारलेला नसेल तर तो विषमतेस अधिमान्यता मिळवून देणाराच ठरतो. अशा कायद्यापुढे विविध व्यक्तींना सारखी वागणूक मिळाली तरी ती निरर्थकच असते. हा मुद्दा स्पष्ट होण्यासाठी एक उदाहरण घेऊ दक्षिण आफ्रिकेत कायद्याच्या

आधारेच श्वेतवर्षीय व कृष्णवर्णीय यांच्यात वर्षानुवर्षे भेदभाव केला जात आहे. कायदा दोन श्वेतवर्णीयांत भेदभाव करत नसेल तर तो सर्व श्वेतवर्णीयांना समान लेखतो आहे असेच म्हणावे लागेल. कायद्यानेच नागरिकांची अशी वर्गवारी केली असताना केवळ एका वर्गातील अनेक नागरिकांमध्ये भेदभाव न करणे एवढाच अर्थ कायद्यापुढील समतेस उरतो व दोन भिन्न वर्गातील नागरिकांमध्ये भेदभाव करण्याचे समर्थनही देण्याची प्रवृत्ती आढळते. अनेक इस्लामी राष्ट्रांतून बिगर इस्लामी व्यक्तींबाबत दुजाभाव ठेवणारे कायदे आढळून येतात. अशा स्थितीत समता अशक्यच असते. भारतातही विविध धर्माच्या लोकांना त्या त्या धर्मानुसार फक्त विवाह, वारसा, घटस्फोट, पोटगी अशा काही बाबतींतच व्यक्तिगत कायदे लागू आहेत. समान नागरी कायद्याचा उल्लेख राज्यघटनेत राज्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे या भागामध्ये केलेला आहे. समाजातील दुर्बल घटकांना इतरांच्या बरोबरीला आणण्याच्या हेतूने भेदभाव मात्र समतेच्या तत्त्वास मारक न ठरता पोषकच ठरतो. कायद्यापुढे समता हे तत्त्व प्रत्यक्षात उतरण्यासाठी स्वतंत्र, निःपक्षपाती व निर्भीड न्यायदान यंत्रणा आवश्यक आहे.

थोडक्यात, आपण असे म्हणू शकतो की कायदेशीर समानता म्हणजे कायद्यासमोर समानता, प्रत्येक नागरिकासाठी एक कायदा, कायद्याच्या उल्लंघनावर समान शिक्षा इ.

### आंतरराष्ट्रीय समता

समतेच्या तत्त्वाचा आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यवहार होणे ह्यात अभिप्रेत आहे. सर्व माणसे जशी माणसे म्हणून समान व अन्य प्राण्यांपेक्षा वेगळी आहेत तशीच आंतरराष्ट्रीय समतेच्या संकल्पनेत सर्व राष्ट्रे ही स्वतंत्र, सार्वभौम अशी राष्ट्र म्हणून सामथ्र्यनि कमी अधिक असली तरीही दर्जानी समानच आहेत. असा भाव अभिप्रेत आहे. राष्ट्राराष्ट्रांचा भौगोलिक विस्तार, लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, वैज्ञानिक व सांस्कृतिक विकासाचा स्तर ह्यात फरक असला तरी त्यामुळे प्रगत राष्ट्रांना अप्रगत राष्ट्रांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा वा त्यांच्यावर वर्चस्व गाजवण्याचा अधिकार पोहोचत नाही. विविध राष्ट्रांना विज्ञान-तंत्रज्ञानातील नवनव्या संशोधनाची जी फळे मिळतील ती संपूर्ण मानवजातीस चाखता येणे हा आंतरराष्ट्रीय समतेत अभिप्रेत असलेला आदर्श आहे.सर्व राहे सार्वभौम म्हणून समान अपली तरी ह्या समतेची प्रत्यक्ष व्यवह रात अंमलबजावणी होते आहे हे पाहणारी कोणतीच यंत्रणा नसल्याने प्रत्येक राष्ट्राला स्वतःच्या सामर्थ्यावरच भिस्त ठेवावी लागते. विविध राष्ट्रांच्या सामर्थ्यात खूपच तफावत असते व त्यामुळे प्रत्यक्षात मात्र काही राष्ट्रे अन्य राष्ट्रांच्या धोरणांवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रभाव पाडतच असतात. अत्यंत गुंतागुंतीच्या वैश्विक रचनेत प्रत्येकच राष्ट्र अनेक गोष्टींबाबत इतर राष्ट्रांवर अवलंबून असते. त्यातही विकसनशील राष्ट्र विकसित राष्ट्रांवर विज्ञान, तंत्रज्ञान व व्यापारातील सहकार्याबाबत खूपच अवलंबून असतात व विकसित राष्ट्र निर्विवादपणे अधिक भक्कम पायावर उभी असतात

## ३.८ समानतेवर आधारित स्पर्धा (Contestations on Equality)

समता म्हणजे विविधतेचा अभाव नव्हे. समाजात विचारांची, गुणांची, प्रवृत्तीची आणि कला अविष्काराची विविधता आवश्यक असते. त्यातून समाजाची प्रगती होत असते. विकासाकरिता काही गोष्टींची आवश्यकता असते. प्रत्येकाने आपल्या प्रयत्नाने आपल्या क्षमतांचा वापर करून अशा गोष्टी प्राप्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण यासाठी व्यक्तिगत

प्रयत्न आणि कौशल्याशिवाय खुल्या सामाजिक वातावरणाची आवश्यकता असते. समाजातील स्पर्धाही बंदिस्त स्वरूपाची असेल तर व्यक्तिगत प्रयत्नांना मर्यादा पडतात. स्पर्धेचा बंदिस्तपणा आर्थिक-सामाजिक विषमतेमुळे, संसाधनांचे केंद्रीकरण झाल्यामुळे होत असते. उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेत खुल्या स्पर्धेवर अधिक भर दिला जातो. त्यातून खाजगी मालकी ला आणि अनिर्बंध आर्थिक स्वातंत्र्याला प्राधान्य दिले जात असल्यामुळे आर्थिक विषमतेला खतपाणी मिळते. अनिर्बंध आर्थिक स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वार्थी धनदांडगे प्रचंड धनसंचय स्वतःकडे करतात. अशा व्यक्तींचा अमर्याद धनसंचय समतेसाठी मारक ठरतो. मुक्त स्पर्धेचे आर्थिक धोरण निरंकुश अर्थव्यवस्थेवर आधारित असल्यामुळे विषमता वाढवण्यासाठी समान संधी" हे तिचे मुख्य सूत्र असते. जे मुळात विषम आहे त्यांना समान समजून, त्यांना आपल्या व्यक्तिगत विकासासाठी खुल्या स्पर्धेत सहभागी व्हा, असे सांगितले तर खुल्या आणि मुक्त स्पर्धेचा देखावा जरूर तयार होईल, परंतु त्यातून व्यक्तिमत्व विकासाच्या ऐवजी अन्यायकारक विषमता निर्माण होईल. अशा प्रकारची मुक्त स्पर्धा मूठभर लोकांचे विशेषाधिकार कायम ठेवेल. दुर्बल वंचित वर्गाला स्पर्धेच्या बाहेर ढकलून देईल. अशा प्रकारच्या मुक्त स्पर्धेतून केवळ विषमता निर्माण होत नाही तर, जुलूम, अत्याचार व शोषण करणारी व्यवस्था जन्माला येते.

साम्यवादी राजवटीत नेमके याच्या उलट घडते. साम्यवादी व्यवस्थेत लोकांच्या मूलभूत गरजा लक्षात घेऊन उत्पादनाचे अग्रक्रम ठरवले जातात. खाजगी मालकी नष्ट करून सार्वजनिक मालकी प्रस्थापित केली जाते. आर्थिक समता निर्माण करून मुक्त स्पर्धा संपुष्टात आणली जाते. परंतु सर्व उत्पादन साधने सार्वजनिक मालकीची करण्याचा परिणाम आर्थिक तसेच राजकीय सत्ता हुकूमशाही राजवटीच्या हाती केंद्रित होते. त्यामुळे लोक स्वातंत्र्य तर गमावून बसतातच पण त्याचबरोबर समता ही प्रस्थापित होत नाही. **भा. ल. भोळे म्हणतात त्याप्रमाणे " स्वातंत्र्य विरहित समता ही मालकाने गुलामांना दिलेली समता ठरते. त्या समतेचा अर्थ" सारखेच दास्य" असा होतो. समता मागण्यासाठी व मिळविण्यासाठी स्वातंत्र्य असावेच लागते. कोणाच्या तरी कृपेतून मिळालेली समता ही असून नसल्यासारखीच असते."** १९९० पूर्वीच्या रशियात तसेच सध्याच्या चीन आणि उत्तर कोरिया इत्यादी देशात साम्यवादाच्या नावाखाली हुकूमशाही निर्माण होऊन समतेच्या कल्पनेशी सर्वस्वी विरोधी कार्य करीत आहे. जन सत्तेचे प्रतीक होण्याऐवजी ती राज्य सत्तेची प्रतीके बनली आहेत.

भांडवल प्रधान उदारमतवादी लोकशाहीत व्यक्तीस्वातंत्र्य प्राधान्याने मान्य करून व्यक्तीच्या क्षमता, गुण, पात्रतांना वाव किंवा संधी देण्यासाठी मुक्त स्पर्धेचे समर्थन केले. ज्या देशात सामाजिक व आर्थिक बाबतीत टोकाची विषमता नसेल आणि समता स्थापन करण्यासाठी वैधानिक उपाय योजना केलेल्या असतील अशा देशात अशी खुली स्पर्धा समतेवर आधारित होते. त्यामुळे समाजातील सर्व घटकांना समान पद्धती ने आपल्या विकासाची संधी उपलब्ध होते. परंतु विकसनशील देशात जेथे जेथे टोकाची सामाजिक व आर्थिक विषमता असते, जेथे वर्षानुवर्षे एका विशिष्ट वर्गाची, जाती व वंशाचे वर्चस्व असते, जिथे उपजीविकेची साधने मोजक्याच वर्गात जातीकडे केंद्रित झालेली असते, अशा समाजव्यवस्थेत वैधानिक समता प्रस्थापित होऊनही खुली आणि मुक्त स्पर्धा निर्माण होऊन समता कधीच प्रस्थापित होऊ शकत नाही. म्हणजेच समतेवर आधारित स्पर्धा घडवून आणण्याची पूर्वअट ही सामाजिक व आर्थिक बाबतीत समता स्थापित करणे ही आहे. **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सविधान**

**सभेतील आपल्या शेवटच्या भाषणात भारतातील अशा विसंगतीवर बोट ठेवून ते बाबत चेतावणी दिली होती. ते म्हणाले होते की, "उद्यापासून आपण एका विसंगतीत पदार्पण करीत आहोत. कायद्यापुढे सर्व समान असणार आहेत आणि प्रत्येक व्यक्तीला समान मत असणार आहे, पण प्रत्येक व्यक्तीचे समान मूल्य मात्र असणार नाही. जर ही विषमता आणि विसंगती अशीच कायम राहिली तर एक दिवस असा येईल की लोक या विषमतेला कंटाळून राज्य घटनाच उलथून पाडतील."** ज्यातील सामाजिक आणि आर्थिक विषमता समतेवर आधारित स्पर्धा निर्माण करू शकत नाही. म्हणूनच डॉ.आंबेडकरांनी राजकीय लोकशाही सामाजिक व आर्थिक लोकशाहीत परावर्तित करण्याची आपण घाई करायला पाहिजे, असे प्रतिपादन केले होते.

भारत आणि इतर विकसनशील देशात अनेकांना आजही दारिद्र्यात जीवन जगावे लागत आहे. येथील जनतेला जीवनाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, स्वच्छ पाणी यांची हमी नाही. आजही निरक्षर बालकांची संख्या मोठी आहे. वेठ बिगारी, बाल कामगार सारख्या पद्धती आजही चालूच आहेत. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी वाढली आहे. एका बाजूला झोपडीत राहणाऱ्यांना तिथून हाकलले जाते तर दुसऱ्या बाजूला भ्रष्ट मार्गाने धनदांडग्यांनी जमिनी बळकावल्या आहेत. खाजगीकरणाच्या नव्या धोरणामुळे कमीत कमी लोकांना कामावर ठेवून, भांडवली गुंतवणूक वाढवून नकाशाचे प्रमाण वाढविण्यात गुंतले आहेत. त्यामुळे बेरोजगारीने भयानक रूप धारण केले आहे. मोठे भांडवल प्रधान प्रकल्प लोकांना विश्वासात न घेता स्वीकारले जात आहेत. त्या प्रकल्पामुळे लाखो लोकांना बेघर केले जात आहे. त्यांच्या पुनर्वसनाच्या योजना फक्त कागदावर दाखवल्या जातात. परकीय भांडवल गुंतवणुकी करता जे करार केले जातात, ते देशाच्या आणि लोकांच्या हिताचे नाही हे स्पष्टपणे दिसत असताना देखील देशावर लादले जात आहेत. लोकांनी त्यांच्या जीवनमानाशी संबंधित असलेल्या प्रश्नांकडे लक्ष देऊ नये आणि आणि आपल्या हक्कांबाबत आग्रही राहू नये यासाठी सत्ताधारी भावनिक प्रश्न उदा. **देशाची अस्मिता, जातीय- धार्मिक कट्टरता, मंदिर मशिदीचे प्रश्न, भाषिक प्रादेशिक अस्मितेचे प्रश्न, वांशिक प्रश्न उभे केले जात आहेत. अशा परिस्थितीत समता,, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय ही लोकशाही मूल्य केवळ नावापुरते शिल्लक राहतात**. अशा समाजव्यवस्थेत समतेवर आधारित स्पर्धा निर्माण होऊ शकत नाही.

समतेवर आधारित स्पर्धेसाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांची बांधिलकी असणारा नागरी समाज अभिप्रेत आहे. नागरी समाजच घटनेने स्थापित केलेल्या किंवा राज्यकर्त्यांनी क्षमतेसाठी अमलात आणलेल्या आरक्षण' किंवा सकारात्मक कृती (Affirmative Action) नीतिचा व्यवस्थित अमल होऊ शकतो. नागरी समाजाची मूल्य समाजात रुजलेली नसतील तर वर्चस्व असलेल्या जाती वर्गाची अशी भूमिका तयार होऊ शकते की, आतापर्यंत हे लोक (जाति, वंश, लिंग) आमच्या खाली होते, गुलाम होते. आता शासनाच्या नीतीमुळे (आरक्षण किंवा सकारात्मक कृती) आमच्या पुढे जात आहेत, आमची बरोबरी करीत आहेत. असा पारंपरिक मूल्य सांभाळून असलेल्या समाज समतेवर आधारित स्पर्धा निर्माण करण्याच्या नीती विरोधात जाऊ शकतो. तसेच वर्चस्व कायम राहावे यासाठी आरक्षण यासारख्या नीतीचा विरोध उभा किंवा आपले वर्चस्व कायम रहावे यासाठी आपल्या जाती वर्गासाठी आरक्षण किंवा सकारात्मक कृतीची मागणी करायला लागतो. म्हणूनच

समतेवर आधारित स्पर्धा निर्माण करण्यासाठी लोकशाही मूल्य रुजविणे बरोबरच नागरी समाजाची उभारणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

## ३.९ स्वातंत्र्य व समता परस्परसंबंध

समता व स्वातंत्र्य ह्या संकल्पनातील संबंध बराच गुंतागुंतीचा आहे. ह्या संबंधाबाबत दोन अगदी विरोधी भूमिका सामान्यतः घेतल्या जातात. काहींच्या मते ही दोन्ही मूल्ये मुळातच परस्परविरोधी आहेत तर अन्य काहींच्या मते ही मूल्ये परस्परपूरकच आहेत.आजवरच्या राजकीय चिंतनात प्रामुख्याने समतेच्या आर्थिक पैलूंवर व स्वातंत्र्याच्या राजकीय पैलूंवर भर देण्यात आला आहे. स्वातंत्र्याची संकल्पना राजकीय चिंतनाच्या इतिहासात अधिक प्राचीन काळापासून महत्त्वाची मानली गेली आहे. समतेविषयीचे चिंतन त्या मानाने नंतर सुरू झाल्याचे आढळते. प्राचीन ग्रीक विचारवंतांनी नागरिकांच्या स्वातंत्र्याचा विचार केला तरी गुलामांच्या स्वातीयाबाबत फार चिंतन केले नाही कारण गुलाम आणि नागरिक ह्यांतील विषमता त्यांनी नैसर्गिक मानली आणि तिचे जोरदार समर्थनच केले.**आधुनिक काळात जॉन लॉकने माणसाच्या नैसर्गिक हक्कात समतेचा समावेश केलेला नव्हता. हॉक्किलीने तर समता व स्वातंत्र्य ह्यांच्यापैकी कोणत्याही एकासाठीची आकांक्षा ही दुसऱ्याची प्राप्ती अधिक दुर्लभच बनवणारी आहे अशी ठाम भूमिका घेतली.** एखाद्याला आपला अधिकतम उत्कर्ष साधता येणे हे स्वातंत्र्याच्या तत्त्वात अपेक्षित असते, तर मोजक्याच काहींचा असा उत्कर्ष हा ते आणि इतर त्यांच्यातील दरी वाढवणारा, म्हणजेच विषमता आडवणारा ठरतो. ही दरी कमी करण्यासाठी कर्तृत्ववान माणसांवर काही निर्बंध घातले गेले तर त्यांचा विकास कुंठीत होण्याची शक्यता असते. समान संधी जरी दिली गेली तरी आधीच अनुकूल परिस्थितीत असलेल्या व्यक्तीच पुन्हा आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्याची शक्यता असते. खरी समता साधायची असेल तर काहींच्या विकासास थोडा लगाम घालून म्हणजेच एका अधनि, त्यांच्या स्वातंत्र्याचा संकोच करून आणि इतर काहींना अधिक प्रोत्साहन देऊनच साधता येते अशी भूमिका ह्याबाबत घेतली जाते.

ह्या भूमिकेच्या अगदी उलट भूमिका घेऊन हेरॉल्ड लास्लीने असे निदर्शनास आणून दिले की, प्रबंड आर्थिक विषमतेमुळे खरे स्वातंत्र्य अनुभवता येऊच शकत नाही. हॉल हाऊसनेह अशीच भूमिका घेतली. ह्या सर्वांनीही अशाच प्रकारे समतेचा आग्रह धरला. बर्लिन यांच्या मते मानवाची समता गृहीत धरून अंमलात आणल्याशिवाय स्वातंत्र्यासारख्या मूल्याचे समर्थन होऊ शकत नाही. सर्वजण समान आहेत अशी मानसिकता नसेल तर इतरांच्या स्वातंत्र्याचा आदर कोणीच करणार नाही. बर्लिन यांच्या मते समतेच्या मूल्यांचे मात्र वेगळे समर्थन करण्याची आवश्यकताच नाही. कारण समता हे मूल्य स्वतःच अन्य मूल्यांचे व कृतींचे समर्थन आहे. स्वातंत्र्याचा संकोच न करता वा स्वातंत्र्यावर घाला न घालता समता साधावयाची कशी ही एक कठीण समस्या आहे. काही जण अशी भूमिका घेतात की आर्थिक, राजकीय, सामाजिक सर्वच क्षेत्रांत व्यापक स्वातंत्र्य सर्वांना देण्यात यावे, त्यामुळे सर्वांना स्पर्धेची समान संधी मिळेल. समान योगदानास समान मोबदला अशा प्रकारची समता यातून प्रस्थापित होईल असे ते मानतात. पण या भूमिकेमुळे आणखीही काही तात्त्विक समस्या निर्माण होतात. आर्थिक क्षेत्रातील अशा स्वातंत्र्यातून खाजगी मालमत्तेतील विषमता निर्माण होते. ह्यामुळे स्पर्धेची समान संधी ही मुळातच कमी-अधिक खाजगी मालमत्ता असणाऱ्यांना मिळते व

त्यामुळे अधिक सुस्थितीतील लोकांनाच स्पर्धेत यश मिळण्याची शक्यता वाढते. यातून विषमतेलाच खतपाणी घातले जाते.

## ३.१० समता व न्याय

राजकीय चिंतनात समतेचे मूल्य हे केवळ वास्तवाचे वर्णन करताना वापरले जाणारे मूल्य असून 'काय आहे' यापेक्षा 'काय असायला हवे' याचा आदर्श रेखाटताना वापरली जाणारी ही संकल्पना आहे. सर्वांच्या काही मूलभूत गरजा असतातच. अन्न- वस्त्र-निवारा या सर्वांच्याच मूलभूत गरजा आहेत. पण याचा अर्थ सर्वांना एकाच प्रकारच्या अन्नाची समान प्रमाणात गरज आहे असा मात्र नाही. थंड प्रदेशात अधिक उबदार कपडे आणि अधिक उष्मांक असणाऱ्या अन्नाची गरज असेल तशी गरज उष्ण हवामानाच्या प्रदेशात राहणाऱ्या व्यक्तींची नसते. आजारी व्यक्तीची अन्नाबाबतची गरज काही वेगळी असेल. लहान मुले व वृद्ध माणसे यांची गरज आणखीनच वेगळी असेल.अनेकदा सर्वांना सारखेच कायदे व मापदंड लागू करणे हे समतेसाठी आवश्यक असले तरी न्याय्य असतेच असे नाही. कधी कधी तर कायदाच समतेची पायमल्ली करणारा असू शकतो. माणसामाणसांतील मानवनिर्मित व निसर्गनिर्मित भेदांमुळे कोणीही नागरी समाजाचा एक घटक या नात्याने मिळणाऱ्या आपल्या न्याय्य हक्कांपासून वंचित राहू नये अशी परिस्थिती निर्माण होणे हे समता व न्याय या मूल्यांचा परिपोषणासाठी आवश्यक असते.

## ३.११ भारताच्या संदर्भात समता

भारतीय समाज हा अगदी पुरातन काळापासूनच वर्ण आणि जाती यांच्या उतरंडीमध्ये विभागाला गेला आहे. या सामाजिक उतरंडीच्या शिखरावर असणाऱ्यांनाच गुणात्मक दृष्टीने अधिक चांगले जीवन वाट्यास येते आणि जसजसे या उतरंडीवरून खाली उतरत जावे तसतसे अधिक खालच्या स्तरांवरील लोक आर्थिक, शैक्षणिक, राजकीय ह्या सर्वच बाबतींत वंचित राहिल्याचे आढळून येते. कर्मफल आणि पुनर्जन्म ह्या भ्रामक सिद्धान्तांमुळे अनेक जाती-वर्णांतील लोकांवर होणाऱ्या अन्यायाचे मूळ प्रचलित समाजरचनेतील दोघांमध्ये न शोधता आधीच्या जन्मातील कर्माची फळे त्यांना ह्या जन्मात भोगावी लागत आहेत आणि या जन्मात नीट पुण्यसंचय केल्यास पुढच्या जन्मी त्यांच्या नशिबी अशी वाईट परिस्थिती येणार नाही असे मानण्याकडे कल होत गेल्याचे आढळते. सुरुवातीला कदाचित श्रमविभागणीच्या हेतूने निर्माण झालेली वर्णव्यवस्था कदाचित जन्माधिष्ठित नसून गुणधर्माधिष्ठित असेलही. पण कालांतराने जन्माधिष्ठित जातीव्यवस्था उदयाला आली आणि कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातींमधला मोठा जनसमुदाय तुलनेने अल्पसंख्य असलेल्या वरिष्ठत जातींकडून दडपला जाऊ लागला. उच्चवर्णीयांकडून कनिष्ठवर्णीयांना दडपले जात आणि प्रत्येक वर्णातील स्त्रिया त्या त्या वर्णातील पुरुषांपेक्षा आणि कदाचित पुरुषांकडूनही अधिक दडपल्या जाणे हे भीषण सामाजिक वास्तव बनले. हिंदू संस्कृतीतील हे दोष काढून टाकण्यासाठी सुधारणांच्या चळवळी प्रत्येक कालखंडात उभ्या राहिल्या. त्यांना कमी-अधिक प्रमाणात यशही मिळत राहिले आणि प्रखर विरोधालाही तोंड द्यावे लागले.

## ३.१२ समताच का?

खरोखरच समाजात समतेचे तत्त्व लागू करणे न्याय्य ठरेल काय? "व्यक्ती तितक्या प्रवृत्ती" या म्हणीप्रमाणे व्यक्ति-व्यक्तींत बौद्धिक आणि शारीरिक विषमता आढळून येते. नैतिक योग्यतेच्या दृष्टीने तर विषमतेचे प्रमाण अधिकच दिसून येते. जी गोष्ट व्यक्तींची तीच धर्म, जाती, समाज आणि सांस्कृतिक गट यांचीही सांगता येईल. काळे-गोरे अशी वर्णविषयक भिन्नता तर स्पष्टच दिसते. यावरूनच मानवामानवांत विषमता असणे ही एक नैसर्गिक घटनाच म्हंटली पाहिजे. ती बदलणे शक्य नाही. अशा स्थितीत समतेच्या तत्त्वाचा पुरस्कार करणे निसर्गक्रमाविरुद्ध ठरणार नाही काय?

वरील विषमतेचे तत्त्व एकदा मान्य केले म्हणजे समाजात सबलांनी दुर्बलांवर, पुढारलेल्या वर्गांनी मागासलेल्या वर्गावर, श्रीमंतांनी गरिबांवर, गोऱ्यांनी काळयांवर आणि बौद्धिक विकास करण्याची संधी मिळालेल्या शहाण्यांनी तशी संधी न मिळालेल्या लोकांवर सतत आणि कायमची सत्ता गाजविणे न्याय्य आहे, असेच म्हटले पाहिजे. या तत्त्वाप्रमाणे दुर्बलांना सबल होण्याची अधीच संधी मिळणार नाही; दरिद्री कायमचे त्याच अवस्थेत राहतील; जगावर सत्ता गाजविण्याची मिरासदारी गोऱ्या राष्ट्रांनाच असते, असे म्हणावे लागेल आणि बुद्धीचा विकास करून घेण्याची संधी मूठभर लोकांशिवाय इतरांना कधीच मिळणार नाही. या सर्व गोष्टी मान्य करणे म्हणजे जंगलचा न्याय मान्य करण्यासारखे आहे. मोठ्या माशाने लहान माशाला खावे तसे सबलांनी दुर्बलांना दडपून टाकावे, असा त्याचा अर्थ होतो. समाजातील विषमतेची दरी यामुळे अधिक रुंद होईल. विषमतेचा पुरस्कार करणारे प्रस्थापित समाजातील आहे तीच परिस्थिती गृहीत धरून तिला नैसर्गिक मानण्याची चूक करतात. वस्तुतः सामाजिक क्षेत्रातील विषमता मनुष्यानेच निर्माण केलेली नसते काय? मग ती दूर करण्याचे प्रयत्नही मनुष्याकडूनच झाले पाहिजेत. सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक विषमता निर्माण होण्यास आणि वाढण्यास मनुष्यच कारणीभूत असतो. प्रचंड उत्पादनसाधनांची खाजगी मालकी, समाजातील इतर घटकांपेक्षा जास्त राजकीय अधिकार मिळण्याची सोय, शिक्षण संपादण्याच्या खास सवलती, वंशपरंपरेने चालत आलेल्या संपत्तीच्या व प्रतिष्ठेच्या जोरावर प्राप्त झालेले मोठेपण इत्यादी कारणे समाजातील विषमता टिकवीत असतात. कुरूप मनुष्याला सुंदर करणे अथवा ठेंगू माणसाला उंच बनविणे हे मनुष्याच्या हाती नाही; पण अस्पृश्यतेसारखी कुरूपता आणि दारिद्र्यासारखा खुरटेपणा यांना समाजातून नष्ट करणे निश्चितपणे मनुष्याच्याच हाती आहे

## ३.१३ समानता कशी मिळवायची?

संशोधन विश्लेषण आपल्याला सांगते की जगभरातील समाज असमान आहेत. आपण सरंजामशाही युग असो किं भांडवलशाही युग असो, विषमतेचा मुद्दा नेहमीच उपस्थित होता. जर सरंजामशाहीच्या काळात, जन्माशी संबंधित विशेषाधिकार प्रचलित होते, तर भांडवलशाहीच्या काळात, मालमत्तेशी संबंधित विशेषाधिकार प्रचलित होते. परिणामी, मानवी इतिहास समानता मिळविण्यासाठी संघर्षांनी भरलेला आहे. तथापि, या टप्प्यावर एक वैचारिक वादविवाद आहे ज्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामाजिक समानता यांच्यात विरोधाभासी संबंध असल्याचे लक्षात आले आहे. या विरोधाभासासह जगायला शिकून, अनेक प्रगत लोकशाहीने 'संधीची समानता' प्राप्त केली आहे आणि बऱ्याच प्रमाणात 'परिस्थितीची समानता' देखील साध्य केली आहे. परंतु त्यांना

'परिणामांची समानता' प्राप्त करण्यासाठी खूप मोठा पल्ला आहे. मुलभूत शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सुरक्षेसाठी सार्वत्रिक तरतुदींचा क्रमिक विकास याने 'समानता' प्राप्त केली त्याचप्रमाणे उत्पादन प्रक्रियेत, अनेक उपलब्धी सूचीबद्ध करणे आवश्यक आहे. किमान वेतन, मर्यादित कामाचे तास, कामगार वर्गाला कायदेशीर संरक्षण इ.

वर सूचीबद्ध केलेल्या फायद्यांव्यतिरिक्त, आधुनिक औद्योगिक संस्था काही विशिष्ट वैशिष्ट्ये देतात जसे की उच्च पातळीची गतिशीलता ज्यामुळे पारंपारिक नियमांची अंमलबजावणी होत नाही. पितृसत्तेचेच उदाहरण घ्या. कालांतराने, अनेक स्त्रिया कामगारांमध्ये सामील झाल्या आहेत ज्यामुळे पितृसत्ताक अधिकार कमी झाले आहेत. त्याचप्रमाणे स्थलांतरामुळे विभक्त कुटुंबाचा उदय झाला. यामुळे आधुनिक समाजातील महिलांच्या स्थितीत आमूलाग्र बदल झाला आहे. यातून आधुनिक समतावादाचा उदय झाला. म्हणूनच आधुनिक समाज विरोधाभासांनी भरलेले चित्र देतात. एकीकडे, आपल्याला अनेक असमानता आढळतात. दुसरीकडे, असे ट्रेंड आहेत जे आपल्याला समानतेची व्यापकता दर्शवतात. एखाद्याला न्यायाबद्दल अधिकाधिक जागरूकता आढळते, हे सर्व सामाजिक संबंधांचे एक आवश्यक वैशिष्ट्य आहे. असमानतेच्या समर्थकांना त्यांच्या भूमिकेचा बचाव करणे कठीण आहे. त्याचप्रमाणे, लोकशाही अन्याय आणि असमानतेच्या संचावर संस्थात्मक नियंत्रण प्रदान करते. त्यानंतर मेधा पाटकर यांच्या नेतृत्वाखालील नर्मदा बचाव आंदोलन [NBA] सारख्या सामाजिक चळवळी आहेत ज्यांनी सर्वांना पर्यावरण आणि त्याच्या सततच्या ऱ्हासाची दखल घेण्यास भाग पाडले आहे. त्याचप्रमाणे स्त्रीवादी चळवळीने स्त्री-पुरुष समानता आणि लैंगिक न्यायाबाबत जनजागृती केली आहे.

## ३.१४ सारांश

(१) व्यक्ती-राज्य-समाजात जेव्हा सुसंवाद निर्माण होतो, तसेंच राज्यसंस्था जेव्हा जनकल्याणाचे साधन म्हणून कार्यरत असते तेव्हा व्यक्तिमत्व विकसित होते, समाज सुसंस्कृत बनतो, आणि पर्यायाने राज्याचा विकास होतो.

(२) राज्यसंस्थेतील स्वास्थ्यपूर्ण समाज व्यवस्थेसाठी राष्ट्रहितावर भर देणारे राजकीय पक्ष आवश्यक ठरतात. द्विपक्षपद्धती राजकीय स्थैर्य प्रदान करणारी ठरते. राजकीय पक्षांचा अंतिम हेतू सत्तासंपादनाचा असतो. सत्ता मूलतः वाईट नसते. सत्ताधारी सत्तेचा कसा वापर करतात त्यावर न्याय-अन्याय, आधारित असतात.

(३) सत्तेचा दुरुपयोग टाळता यावा म्हणून, लोकशाही नागरिकांच्या सहभागावर देते. राजकीय सहभागाकडे कर्तव्यदृष्टीने पाहणारे लोक आदर्श नागरिक मानले जातात. लोकशाही विकेंद्रीकरण, निवडणुका पक्षपद्धती नागरिकांच्या राजकीय सहभागाला चालना देतात.

(४) राज्यसंस्थेने लोककल्याणावर भर दिला तर नागरिकांचे जीवन सुरक्षित, आरोग्यपूर्ण, चिंतामुक्त बनते. आधुनिक शासनसंस्था म्हणूनचं लोककल्याणकारी राज्याला अनुकूलता दर्शवितात.

(५) लोककल्याणकारी राज्याच्या यशस्वीतेसाठी नागरिकांना स्वातंत्र, समता, बंधुता या तत्त्वांचे, डॉ.आंबेडकरांच्या भाषेत त्रिपुटीचे कळायला हवे. या तीन तत्त्वांपैकी एक तत्त्व जरी दुर्लक्षित होत असले तरी लोककल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट यशस्वी होत नाही. तसेंच लोकशाहीला बळकटी प्राप्त होत नाही.

समता म्हणजे सारखेपणा नव्हे. समतेच्या तत्त्वाशी माणसाचे कर्तृत्व आणि समाजरचनेत त्याने स्वकर्तृत्वावर मिळविलेले स्थान यांच्याशी सांगड घालायला हवी. सर्व माणसांच्या मूलभूत गरजा भागल्यानंतर त्यांच्यात जर भेदभाव होत असेल तर तो त्यांच्या व्यावसायिक स्थानाच्या गरजेनुसारच व्हावा. त्यांच्या जन्माधिष्ठित बाबींमुळे होऊ नये. शिवाय कोणत्याही स्वरूपाचा अपरिहार्य भेदभाव करतानाही तो अंतिमतः समाजहितास पोषक असेल तरच करावा. समतेचा व्यवहार हा व्यक्तींच्या निकोप आत्मविकासाला पोषकच असायला हवा. समतेचा अतिरेकी आग्रह मात्र व्यक्तींना एकाच साच्यात बसवण्याची शक्यता असते.

## ३.१५ खालील प्रश्नाआधारे आपली प्रगती तपासा

१. समता म्हणजे काय ते सांगून समतेच्या विविध प्रकारची चर्चा करा.

२. समता म्हणजे सारखेपणा नव्हे स्पष्ट करा.

३. स्वातंत्र्य आणि समता परस्पर सहसंबंध स्पष्ट करा.

४. राजकीय समानतेवर भाष्य करा.

५. समतेच्या संकल्पनेचे थोडक्यात विश्लेषण करा.

**अधिक वाचनासाठी ग्रंथसंपदा**


१) लास्की हेरॉल्ड, अग्रामर ऑफ पोलिटिक्स, जॉर्ज अलेन लंडन १९२५

२) भोळे भा,ल, राज्यशास्त्र सिद्धांत आणि विश्लेषण, पिपळापुरे पब्लिशर्स नागपूर २००८

३) हेडली बूल, द कन्ट्रोल ऑफ आर्म्स रेस, लंडन. १९६१

४) पामर आणि पार्किन्स, इंटरनॅशनल रिलेशन्स, दिल्ली, सीबीएस पब्लिशर्स.१९८५

५) महेंद्रकुमार, थेरॉटिकल अस्पेक्टस् ऑफ इंटरनॅशनल पॉलिटिक्स, दिल्ली, शिवलाल अग्रवाल ॲन्ड कंपनी.१९८२

६) तारकुंडे व्ही. एम., कर्णिक द्वा. म. (अनु); मूलगामी मानवतावाद; श्रीविद्या प्रकाशन; पुणे-१९८५

७) जावडेकर शरद, वसुधा जोशी, लता जाधव, रवींद्र म्हसदे (संपा); सामाजिक परिवर्तन चिकित्सा आणि भवितव्य; सुगावा प्रकाशन, पुणे- २००९


❄❄❄❄❄❄❄

# ४

# न्याय

**घटक रचना:**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.३.१ न्यायाची संकल्पना

४.३.२ प्रक्रियात्मक आणि वितरणात्मक न्याय

४.३.३ जॉन रॉल्स आणि रॉबर्ट नॉजिक यांचे न्याय विषयक विचार.

४.३.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अमर्त्य सेन ह्यांची सामाजिक न्यायाची कल्पना

## ४.१ उद्दिष्टे

**न्याय** या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. न्यायाचे स्वरूप, प्रकार, महत्त्व सांगता येईल.

२. जॉन रॉल्स, रॉबर्ट नॉजिक यांचे न्याय विषयक विचार सांगता येतील.

३. सामाजिक न्यायाची संकल्पना सांगता येईल.

## ४.२ प्रास्ताविक

राज्यातील नागरिकांनी त्यांच्या जीवनात राज्याने निर्माण केलेल्या कायद्यांचे पालन करावे अशी अपेक्षा सर्वत्र बाळगली जाते. त्यासाठी राज्य आपल्या नागरिकांच्या जीवनावर नियंत्रण ठेवण्यासाठी वेगवेगळे कायदे नियम बनवतात. हे कायदे नियम राज्यातील व्यक्तींनी पाळणे आवश्यक असते. जर एखाद्या व्यक्तीने त्याचे पालन केले नाही तर, व्यक्तीला राज्याकडून शिक्षा दिली जाते. राज्य आपल्या नागरिकाकडून ज्या अपेक्षा बाळगतात त्या अपेक्षेच्या परिपुर्ततेसाठी राज्याने सुद्धा व्यक्तीला जे काही हक्क अधिकार दिले जातात त्या हक्क अधिकाराची अंमलबजावणी करणे हे राज्याचे काम आहे. परंतु काही कारणास्तव राज्यातील नागरिकांच्या हक्क अधिकारावर ज्यावेळेस गदा येते, त्यावेळेस त्या हक्क आणि अधिकाराचे रक्षण करण्यासाठी राज्याला पुढाकार घ्यावा लागतो. त्यामुळे मानवी कल्याणासाठी राज्याने योग्य व्यवस्था निर्माण करावी हे राज्याचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. त्या दृष्टिकोनातून राज्य आपल्या नागरिकांना स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय देण्यासाठी कटिबद्ध असतात. एकंदरीतच स्वातंत्र, समता, बंधुता, न्याय या संकल्पना एकमेकांशी परस्पराशी संबंधित आहेत. कारण ज्या राज्यात नागरिकांना नागरिकत्व दिल्या जाते त्या राज्यात नागरिकांना स्वातंत्र्य, समता बंधुत्व, हक्क याचा उपभोग घेण्यासाठी न्याय व्यवस्था आणि न्यायिक

वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. जर राज्यामध्ये विषमतापूर्ण वातावरण असेल तर त्या राज्यातील नागरिकांना स्वतंत्र, समता, हक्क याचा उपभोग घेता येणार नाही. म्हणून राज्यातील नागरिकांना स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाचा उपभोग घेण्यासाठी न्यायावर आधारित समताधिष्ठित समाज आवश्यक असतो. त्या दृष्टिकोनातून न्याय ही संकल्पना या घटकात आपण पाहणार आहोत.

## ४.३ विषय विवेचन

ईश्वराची सर्वश्रेष्ठ निर्मिती ही मनुष्य आहे. या मनुष्यानेच आवश्यकतेनुसार आपल्याला ज्या बाबी आवश्यक आहेत त्या बाबी संदर्भात विचार विनिमय करून पुढचे पाऊल टाकलेले आहे. त्यातून स्वातंत्र्य, समता, बंधुता, हक्क, कर्तव्य या संकल्पना विकसित झाल्या.राज्य आणि समाजात सर्वात आवश्यक आणि अनेकदा चर्चिले जाणारी बाब म्हणून न्याय या संकल्पनेकडे पाहिले जाते. माणसाच्या सुव्यवस्थित जगण्याचा तो पाया आहे. न्याय सर्वांसाठी समान वितरण, संपूर्ण समानता आणि न्याय्य लाभ घेण्याच्या बाबींवर अवलंबून असतो. न्याय ही संकल्पना मानवजातीच्या सामाजिक, नैतिक आणि कायदेशीर प्रवृत्तींचा परिणाम म्हणून विकसित झाली आहे. न्याय या संकल्पनेच्या विकासाचा अभ्यास वेगवेगळ्या ऐतिहासिक टप्प्यांच्या माध्यमातुन करता येतो.

### ४.३.१ न्यायची संकल्पना

स्वातंत्र्य आणि समतेप्रमाणे न्यायाची संकल्पना स्थळ, काळ आणि परिस्थितीनुसार त्या संकल्पनेचे स्वरूप बदलत असते.प्रत्येक काळात न्यायाची संकल्पना वेगवेगळ्या अर्थाने वापरली गेली आहे. विविध विचारवंतांनी, अभ्यासकांनी या संकल्पनेचा वेगवेगळ्या पद्धतीने अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्या दृष्टीने न्यायाच्या संकल्पनेचा विचार हा आपल्याला प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत कसा होते गेला याबद्दल विचार करणे गरजेचे आहे.

प्राचीन काळातील न्यायाची संकल्पना मुख्यतः नैतिकता, धर्म, आणि सामाजिक रूढींवर आधारित होती. त्या काळातील न्याय संकल्पनेचा आधार कायद्याऐवजी नैतिकता, परंपरा, आणि अधिकाराचा सन्मान यावर होता. प्राचीन न्यायाची संकल्पना विविध संस्कृतींमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने विकसित झाली.

**नैसर्गिक न्याय (Natural Justice):**

प्राचीन काळात न्याय म्हणजे नैसर्गिक तत्त्वांचा अवलंब, जसे की सर्वांसाठी समानता, नैतिक वागणूक, आणि नैतिक संतुलन. न्याय म्हणजे "जे योग्य आहे ते करणे" अशी साधी समजूत होती.संघर्षांचे निराकरण नैसर्गिक नियमांवर आणि सामूहिक निर्णयांवर आधारित असे.मानवाच्या प्राथमिक अवस्थेत नैसर्गिक न्याय ही संकल्पना होती. समाजात कोणत्याही प्रकारच्या नियमाशास्त्राची गरज नव्हती; नैसर्गिक संसाधनांचा समान उपभोग आणि शारीरिक सामर्थ्याच्या आधारे संघर्ष सोडवले जात. जसा मानव समाजात राहू लागला, तसा न्याय हा समूहाच्या गरजा आणि समस्या सोडवण्यासाठी आवश्यक ठरला.

**धर्मावर आधारित न्याय:**

प्राचीन काळात धर्म आणि न्याय एकत्र जोडलेले होते. न्याय म्हणजे ईश्वराच्या आदेशांचे पालन करणे मानले जाई.विविध धर्मांमध्ये न्यायाचे स्वरूप पुढील प्रमाणे होते.

**हिंदू धर्म:** धर्मशास्त्र, वेद, पुराण इत्यादीतून न्यायाची तत्त्वे मांडली गेली. उदाहरणार्थ, कर्म आणि धर्म यावर आधारित न्याय.

**इस्लाम:** न्यायाचे स्वरूप शरिया कायद्यावर आधारित होते.

**ग्रीक धर्म:** न्याय म्हणजे देवतांचा आदेश. उदा. झ्यूस आणि देवी थीमिस यांना न्यायाचे प्रतीक मानले जात असे.

**ज्यू धर्म:** न्याय हिब्रू धर्मग्रंथांमधून ईश्वराच्या आज्ञांवर आधारित होता.

धार्मिक नियमांवर आधारित न्यायाचे स्वरूप पाहता न्यायाचे नियम धर्मग्रंथांमध्ये लिपिबद्ध झाले. उदा. हिंदू धर्मातील धर्मशास्त्र, इस्लाममधील शरिया, ख्रिश्चन धर्मातील बायबलच्या शिकवणी. यामध्ये नैतिकता आणि धर्माचे तत्त्व न्यायनिर्णयात महत्त्वाचे ठरले.

**प्राचीन न्यायव्यवस्थेचे प्रमुख स्वरूप:**

**हम्मुराबीचा कोड (Babylonian Law):** बॅबिलोनियन राजा हम्मुराबीने न्यायाचे पहिले लिखित नियम तयार केले (इ.स.पू. १७५४)."डोळ्यासाठी डोळा, दातासाठी दात" ही न्यायाची तत्त्वे होती.

सामाजिक स्थानानुसार वेगळे नियम होते, उदा. उच्च वर्गासाठी वेगळे आणि गुलामांसाठी वेगळे.

भारतीय न्याय परंपरेत वर्णव्यवस्थेनुसार (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र) न्याय दिला जात असे.न्याय धार्मिक, नैतिक, आणि सामाजिक तत्त्वांवर आधारित होता.तसेच पंचमुखी परमेश्वर न्यायाची संकल्पना ही भारतीय तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्राशी निगडीत आहे. पंचमुखी परमेश्वर म्हणजेच "पाच मुखांचा देव" या संकल्पनेतून परमेश्वराच्या सर्वव्यापकता, सर्वज्ञता, आणि सर्वसामर्थ्यशीलतेची रूपे वर्णन केली जातात. या पाच मुखांच्या प्रतीकात्मकतेतून न्यायाची व्यापक आणि सर्वसमावेशक भूमिका स्पष्ट केली जाते.

पंचमुखी परमेश्वराचे पाच मुख आणि न्यायाची संकल्पना:

१. **सृष्टि मुख (निर्माण आणि सर्जनशीलता):** हे मुख परमेश्वराच्या सर्जनशील आणि निर्मितीक्षम भूमिकेचे प्रतीक आहे.

   न्यायाच्या दृष्टीने, सृष्टीतील प्रत्येक घटकाला त्याचे योग्य स्थान मिळावे आणि सृष्टीतील संतुलन टिकावे, हे न्यायाचे मुख्य तत्त्व आहे.

२. **स्थिती मुख (संरक्षण आणि पालन):** हे मुख परमेश्वराच्या पालनकर्त्या रूपाचे प्रतीक आहे.न्यायासाठी, समाजातील स्थैर्य आणि शांतता राखणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या गरजेनुसार संरक्षण आणि सहाय्य मिळाले पाहिजे.

३. **संहार मुख (नाश आणि नवी सुरुवात):** हे मुख परमेश्वराच्या विध्वंसक शक्तीचे प्रतीक आहे, जी अन्यायाचा नाश करण्यासाठी उपयोगी ठरते.न्यायाच्या संदर्भात, अन्याय, अधर्म, आणि पापांचा नाश करून समाजात नवा संतुलन प्रस्थापित करणे हा न्यायाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

४. **ज्ञान मुख (सर्वज्ञता आणि प्रज्ञा):** हे मुख ज्ञान आणि सत्यतेचे प्रतीक आहे.न्याय नेहमी सत्यावर आधारित असावा, आणि निर्णय घेण्यासाठी ज्ञान, प्रज्ञा, आणि विवेक वापरला गेला पाहिजे.

५. **अशीर्वाद मुख (क्षमाशीलता आणि कृपा):** हे मुख क्षमा, कृपा, आणि उदारतेचे प्रतीक आहे.न्यायाच्या प्रक्रियेत, केवळ कठोर दंड नव्हे तर क्षमा आणि सुधारणा यांना महत्त्व दिले गेले पाहिजे.

पंचमुखी परमेश्वर न्यायाची संकल्पना ही भारतीय तत्त्वज्ञानातील न्यायाच्या व्यापक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनाची ओळख करून देते. ती न्यायाच्या पाच प्रमुख तत्त्वांवर आधारित असून, त्याचा उद्देश सृष्टीत संतुलन, स्थैर्य, आणि मानवतेचा विकास घडवणे आहे.

**रोमन कायदा (Roman Law):**

रोमन साम्राज्यात न्यायसंस्था अधिक प्रगत होती. "सर्वांसाठी समान कायदा" (Equality Before Law) ही संकल्पना रोमन कायद्यात दिसते.

रोमन साम्राज्याने न्यायसंस्थेची पायाभरणी केली. रोमन कायद्याच्या (Roman Law) तत्त्वांवर आधारित आधुनिक कायद्याच्या प्रणाली विकसित झाल्या.

ग्रीक तत्त्वज्ञानी, जसे की सॉक्रेटीस, प्लेटो, आणि ॲरिस्टॉटल, यांनी न्यायाला नैतिक आणि तात्त्विक आधार दिला.

पाश्चिमात्य राजकीय विचारांच्या न्यायाचा अभ्यास प्लेटो यांच्या विचारधारेपासून सुरू करता येतो. प्लेटो यांच्या प्रसिद्ध 'रिपब्लिक' या ग्रंथात सर्वात महत्त्वाचा विषय म्हणजे आदर्श राज्याचे चित्र रेखाटले आहे, तसेच याच ग्रंथाला न्यायासंबंधीचा ग्रंथ Concerning justice असेही म्हणतात. न्याय हा प्लेटोच्या रिपब्लिक या ग्रंथाचा मुख्य विषय आहे. प्लेटोच्या रिपब्लिक या ग्रंथाची व्यापती शासन व्यवस्थेला सामावून त्यातील न्यायाशी संबंधित आहे. प्लेटोने न्याय हा शब्द केवळ वैज्ञानिक अर्थाने नाही तर नैतिक अर्थाने वापरलेला आहे. प्लेटोच्या मते, न्याय ही एक नैतिक मूल्य असलेली संकल्पना आहे.

ॲरिस्टॉटल (Aristotle) याने न्यायाची संकल्पना सखोलपणे मांडली होती. त्याच्या मते, न्याय म्हणजे नैतिकता, समानता, आणि समाजाच्या कल्याणासाठी योग्य संतुलन राखणे. ॲरिस्टॉटलने न्यायाची व्याख्या व्यापक तत्त्वज्ञानाच्या अनुषंगाने केली, ज्यामध्ये कायदे, नैतिकता, आणि व्यवहारातील सराव यांचा समावेश होता.

ॲरिस्टॉटलच्या मते, सर्वसाधारण न्याय म्हणजे नैतिक आचरण.व्यक्तीने सामाजिक आणि कायदेशीर जबाबदाऱ्या पार पाडल्या तर तो न्यायी ठरतो.ॲरिस्टॉटलने न्याय दोन प्रकारांत विभागला:

**समान न्याय (Distributive Justice):** हा न्याय संसाधनांचे वितरण करण्यासंबंधी आहे.समाजातील व्यक्तींना त्यांच्या योग्यतेनुसार (Merit) आणि त्यांच्या योगदानानुसार संसाधने वाटली पाहिजेत.उदा. उच्च योगदान देणाऱ्या व्यक्तीला अधिक संसाधने दिली पाहिजेत, परंतु गरजू व्यक्तींचाही विचार केला पाहिजे.

**सुधारक न्याय (Corrective Justice):**हा न्याय व्यक्तींच्या वागण्यामधील चूक सुधारण्यासंदर्भात आहे.एखाद्याने इतरांवर अन्याय केल्यास, नुकसान भरून देण्याची जबाबदारी टाकली जाते.हा न्याय दोन व्यक्तींमधील व्यवहार संतुलित करण्याचा प्रयत्न करतो.ॲरिस्टॉटलच्या मते, न्यायाचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे सर्वांसाठी सुख-समृद्धी (Eudaimonia) प्राप्त करणे.समाजातील संतुलन राखणे आणि व्यक्तींच्या नैतिकतेला प्रोत्साहन देणे हे न्यायाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

सेंट ऑगस्टीन (Saint Augustine) हा ख्रिश्चन तत्त्वज्ञ आणि धर्मगुरू होता. त्याने न्याय (Justice) या संकल्पनेवर धार्मिक आणि तात्त्विक दृष्टिकोनातून विचार केला. ऑगस्टीनच्या मते, न्याय हे नैतिकता आणि ईश्वराच्या तत्त्वांशी घट्टपणे जोडलेले आहे. त्याच्या न्यायविषयक विचारांचा आधार ख्रिश्चन धर्माचे तत्त्वज्ञान, बायबलमधील शिकवणी, आणि त्याच्या स्वतःच्या नैतिक चिंतनात आहे.

ऑगस्टीनच्या न्यायविषयक विचारांमध्ये

खरा न्याय हा ईश्वराच्या इच्छेवर आधारित असतो.मानवाने स्वतःच्या अहंकाराला बाजूला ठेवून ईश्वराच्या तत्त्वांचे पालन केले पाहिजे."न्याय म्हणजे ईश्वराला त्याचे हक्क देणे आणि माणसाला त्याचा योग्य हक्क देणे" असे त्याने म्हटले आहे.मानवी न्याय हा अपूर्ण आणि मर्यादित असतो कारण तो मानवी तर्कशक्तीवर आधारित असतो.तर देवाचा न्याय हा परिपूर्ण, शाश्वत, आणि सर्वांसाठी समान असतो कारण तो ईश्वराच्या अनंत ज्ञानावर आधारित आहे.ऑगस्टीनच्या मते, मानवाच्या पापी स्वभावामुळे (Original Sin) पृथ्वीवरील न्याय सदोष आहे.पापामुळे मानवाच्या न्यायनिर्णय क्षमतेवर मर्यादा येतात. म्हणून, खरा न्याय फक्त देवाच्या मार्गदर्शनातून मिळू शकतो. ऑगस्टीनने राज्यसंस्थेवर (State) न्यायाच्या दृष्टीने विचार केला आहे.त्याच्या मते, "देवाशिवाय राज्य हे केवळ मोठे लुटारू टोळके आहे."राज्याला न्यायिक असण्यासाठी देवाच्या तत्त्वांशी अनुरूप राहावे लागते.खरा न्याय हा देवाच्या आदेशांचे पालन करून मिळतो, आणि तोच खऱ्या शांततेचा पाया आहे.या दृष्टिकोनातून, न्याय हा आध्यात्मिक आणि नैतिक स्वरूपाचा आहे.

थॉमस एक्वीनास (Thomas Aquinas) हा १३व्या शतकातील प्रख्यात ख्रिश्चन तत्त्वज्ञ आणि धर्मशास्त्रज्ञ होता. त्याने न्यायावर (Justice) सखोल विचार मांडले, ज्याचा पाया ॲरिस्टॉटलच्या नैतिक तत्त्वज्ञानावर आधारित होता, पण त्याला ख्रिश्चन धर्माच्या तत्त्वांशी जोडले. त्याच्या मते, न्याय म्हणजे नैतिकतेचा आवश्यक भाग, आणि ते देवाच्या शाश्वत तत्त्वांशी सुसंगत असले पाहिजे.

एक्वीनासच्या मते, "न्याय म्हणजे प्रत्येक व्यक्तीला त्याचा योग्य हक्क देणे."न्याय हा व्यक्तींमधील संतुलन राखण्याचा गुण आहे, जो त्यांच्या नैतिक आणि सामाजिक कर्तव्यांशी संबंधित आहे.एक्वीनासच्या मते, न्यायाचा मूळ पाया नैसर्गिक कायद्यांत (Natural Law)

आहे, जो देवाच्या शाश्वत तत्त्वांवर आधारित आहे.नैसर्गिक न्याय म्हणजे समानतेचे आणि नैतिकतेचे तत्त्व, जे मानवाच्या तर्कशक्तीने ओळखले जाऊ शकते.

न्याय हा केवळ कायदेशीर किंवा सामाजिक तत्त्व नाही, तर तो व्यक्तीच्या नैतिकतेशी आणि सद्गुणांशी (Virtues) संबंधित आहे.न्याय हा एक नैतिक गुणधर्म आहे, जो इतर नैतिक गुणांच्या आधारावर समाजातील संतुलन राखतो.

मध्ययुगात न्यायव्यवस्था स्थानिक राजे आणि सामंतांवर अवलंबून होती. यामध्ये सामाजिक दर्जावर आधारित न्याय दिला जात असे.

जॉन लॉक, थॉमस हॉब्स, आणि जीन-जॅक रूसो यांनी सामाजिक कराराच्या (Social Contract) तत्त्वाद्वारे न्यायाचा नव्याने विचार मांडला.

१८व्या आणि १९व्या शतकांमध्ये फ्रेंच राज्यक्रांती आणि अमेरिकन राज्यघटनेच्या प्रभावामुळे समानता, स्वातंत्र्य, आणि बंधुत्व या तत्त्वांवर आधारित न्यायाची संकल्पना रुजली.

२०व्या शतकात न्यायामध्ये सामाजिक समानतेचा समावेश झाला. समाजातील दुर्बल घटकांसाठी विशेष सुविधा आणि हक्कांचा विचार होऊ लागला. समाजातील लोकांमध्ये हक्क आणि कर्तव्यांचे संतुलन ठेवणे हा न्यायाचा उद्देश होता. वर्ण, वर्ग, आणि लिंग यावर आधारित भेदभाव पाहायला मिळत असला, तरी समाजातील स्थिरतेसाठी न्याय महत्त्वाचा मानला गेला.

जागतिक पातळीवर संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क जाहीरनाम्याने (UDHR) न्यायाचे सार्वत्रिक तत्त्व प्रस्थापित केले.

आधुनिक काळातील न्याय प्रणाली

आता अधिकाधिक पारदर्शक, तंत्रज्ञानाधारित आणि लोकाभिमुख होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि आधुनिक तंत्रज्ञान न्याय प्रक्रियेत वापरले जात आहे.

प्राचीन न्याय हा मुख्यत धर्म, नैतिकता, आणि सामाजिक परंपरांवर आधारित होता. त्या काळातील न्यायव्यवस्था आजच्या तुलनेत अधिक रूढीवादी आणि वर्ग आधारित होती, परंतु ती समाजाच्या शांततेसाठी आणि स्थैर्यासाठी महत्त्वाची होती.न्यायाची संकल्पना कालांतराने विकसित होत गेली आहे. नैसर्गिक गरजांपासून ते सामाजिक, नैतिक, कायदेशीर आणि जागतिक स्तरावरील न्यायापर्यंतचा हा प्रवास मानवाच्या प्रगतीचे प्रतीक आहे.

**न्यायाचा अर्थ**

न्यायाला इंग्रजीमध्ये 'जस्टीस' (Justice) असे म्हणतात. जस्टीस हा शब्द लॅटिन भाषेतील 'जस (Jus) या शब्दापासून आलेला असून त्याचा लॅटिन भाषेतील शब्दाशः अर्थ जोडणे, एकत्र बांधणे, बसवणे असा होतो.

न्याय म्हणजे सत्य, समानता, आणि नैतिकता यांच्यावर आधारित निर्णय प्रक्रिया, जी प्रत्येक व्यक्तीला त्याचा योग्य हक्क आणि वागणूक देते. न्यायाचा उद्देश समाजातील संतुलन, सुव्यवस्था, आणि शांती प्रस्थापित करणे हा आहे.

**न्यायाच्या व्याख्या**

न्यायाच्यि व्याख्या विविध विचारवंतांनी त्यांच्या तत्त्वज्ञानानुसार केल्या आहेत. प्रत्येक विचारवंताच्या व्याख्येत न्यायाचे स्वरूप, उद्देश, आणि त्याचे समाजातील महत्त्व वेगवेगळ्या पद्धतीने मांडलेले आहे.

प्रमुख विचारवंत आणि त्यांच्या न्यायाच्या व्याख्या:

**प्लेटो (Plato):** प्लेटोच्या मते, "न्याय म्हणजे प्रत्येकाने त्याचे काम योग्यप्रकारे आणि इतरांच्या कार्यात हस्तक्षेप न करता करणे."त्याच्या "रिपब्लिक" ग्रंथात न्यायाची व्याख्या समाजातील सुसंवाद आणि वर्गीय संतुलनावर आधारित आहे.व्यक्तिगत आणि सामाजिक न्याय यावर प्लेटोने भर दिला आहे.

**ॲरिस्टॉटल (Aristotle):** ॲरिस्टॉटल म्हणतो, "न्याय म्हणजे समानांना समान आणि असमानांना असमान वागणूक देणे." त्याने न्यायाचे दोन प्रकार सांगितले:

१. समान न्याय (Distributive Justice): संसाधनांचे योग्य वितरण.

२. सुधारात्मक न्याय (Corrective Justice): नुकसान किंवा अन्यायाची भरपाई.

**सिसेरो (Cicero):** "न्याय म्हणजे नैसर्गिक कायद्यांचे पालन करणे आणि इतरांशी प्रामाणिक वागणे."

सिसेरोने नैतिकता आणि नैसर्गिक तत्त्वांवर आधारित न्यायावर भर दिला.

**थॉमस एक्वीनास (Thomas Aquinas):** एक्वीनासच्या मते, "न्याय म्हणजे प्रत्येकाला त्याचा योग्य हक्क देणे."

त्याने नैसर्गिक कायद्यांशी (Natural Law) न्यायाला जोडले. त्याच्या विचारांमध्ये नैतिकता आणि धर्माचा प्रभाव आहे.

**जॉन रॉल्स (John Rawls):** रॉल्स म्हणतो, "न्याय म्हणजे समान स्वातंत्र्याचा आणि संधीचा तत्त्व म्हणून स्वीकार."

**हॉब्स (Thomas Hobbes):** हॉब्सच्या मते, "न्याय म्हणजे कायद्यांचे पालन करणे."त्याच्या दृष्टिकोनानुसार, कायदा आणि सुव्यवस्था न्यायाचे प्राथमिक तत्त्व आहेत.

**लॉक (John Locke):** "न्याय म्हणजे व्यक्तीचे नैसर्गिक हक्क जसे की जीवन, स्वातंत्र्य, आणि संपत्ती यांचे संरक्षण करणे."

**रूसो (Jean-Jacques Rousseau):** रूसोच्या मते, "न्याय म्हणजे लोकसत्ता आणि समानतेच्या तत्त्वांवर आधारित समाजव्यवस्था."

**कांट (Immanuel Kant):** "न्याय म्हणजे व्यक्तीने दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आदर करून आपले कर्तव्य पार पाडणे."त्याच्या विचारांमध्ये नैतिकता आणि स्वातंत्र्याचा आदर यांना महत्त्व आहे.

**ऑगस्टीन (Saint Augustine):** "न्याय म्हणजे देवाच्या इच्छेप्रमाणे जगात नैतिकता आणि शांती प्रस्थापित करणे."

**जेरेमी बेंथम (Jeremy Bentham):** बेंथमच्या मते, "न्याय म्हणजे जास्तीत जास्त लोकांसाठी जास्तीत जास्त आनंद निर्माण करणे."

**स्टुअर्ट मिल (John Stuart Mill):** "न्याय म्हणजे व्यक्तीचे अधिकार संरक्षित करून समाजात जास्तीत जास्त आनंद निर्माण करणे."

**अर्नोल्ड ब्रेख्त:** "न्याय ही एक गतिमान व बदलणारी संकल्पना असून त्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता, अधिकार, या मूल्यांचा योग्य समन्वय साधने यास न्याय असे म्हणतात."

वेगवेगळ्या विचारवंताच्या न्यायाच्या व्याख्या पाहता प्लेटो आणि ॲरिस्टॉटल न्यायाचे तत्वज्ञानात्मक स्वरूप मांडतात.थॉमस एक्वीनास आणि ऑगस्टीन न्यायाला धार्मिक आधार देतात.रॉल्स, बेंथम, आणि कांट आधुनिक न्यायाच्या नैतिक आणि सामाजिक स्वरूपावर भर देतात. एकंदरीतच विचारवंतांच्या दृष्टिकोनांनुसार न्यायाचे तत्त्व समानतेचे, नैतिकतेचे, आणि सामाजिक कल्याणाचे आहे.

**न्यायाचे प्रकार**

न्याय एक अशी संकल्पना आहे की तिचा विचार सामाजिक क्षेत्रात अत्यंत प्राचीन काळापासून केलेला आहे. ऐतिहासिकदृष्ट्या न्यायाचे अनेक व्याख्या वेगवेगळे विचारवंतांनी केलेल्या आहेत. त्या दृष्टिकोनातून विचार करता मनुष्याच्या सामाजिक जीवनात त्याला आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा वेगवेगळ्या प्रकारच्या क्षेत्रात काम करताना त्या क्षेत्रात त्याला न्याय हवा असतो. त्या दृष्टिकोनातून न्यायाच्या संकल्पनेचा विचार करता स्वातंत्र्य आणि समानता या दोन गोष्टीचा प्रामुख्याने विचार केला जातो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य आणि समानता उपभोगण्यासाठी वेगवेगळ्या न्यायाची गरज असते. त्यामुळे न्यायाची वर्तमान कालीन स्थितीत वेगवेगळे प्रकार पडतात ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. **नैसर्गिक न्याय:** नैसर्गिक न्याय ही एक नैतिक संकल्पना आहे, जी व्यक्तीच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी आणि न्यायाची निष्पक्षता सुनिश्चित करण्यासाठी तयार केली गेली आहे. न्यायाच्या नैसर्गिक तत्त्वांवर आधारित ही प्रक्रिया न्यायालयीन आणि प्रशासकीय कार्यांमध्ये वापरली जाते. नैसर्गिक न्यायाची मूळ प्रेरणा सत्य, नैतिकता, आणि तर्कशुद्धतेवर आधारित निष्पक्ष निर्णय घेणे ही आहे.नैसर्गिक न्याय ही न्यायाची एक मूलभूत आणि नैतिक संकल्पना आहे, जी व्यक्तीच्या अधिकारांचे संरक्षण करते आणि निर्णय प्रक्रियेतील निष्पक्षतेला प्रोत्साहन देते. न्यायाच्या या तत्त्वांमुळे केवळ कायद्याचे पालनच होत नाही, तर मानवी नैतिकता आणि गरजाही पूर्ण होतात. त्यामुळे न्यायव्यवस्थेत नैसर्गिक न्यायाला अत्यंत महत्त्व आहे.

२. **कायदेशीर न्याय:** कोणत्याही राज्याची न्याय विषयक भूमिका ही त्याचा राज्याच्या संविधान, कायदे आणि त्या अंमलबजावण्यासाठी जी काही विविध धोरणे तयार केलेली आहेत यावरून त्या राज्याची न्यायविषयक भूमिका आपल्या लक्षात येते. कायदेविषयक न्यायाच्या धोरणातून कायद्याच्या आधारे समाजात सुव्यवस्था व प्रस्थापित करणे अपेक्षित आहे. कायदेविषयक विषयक न्यायाच्या माध्यमातून व्यक्ती व समाजाच्या हक्काचे रक्षण करणे, कायद्याचा आणि पक्ष आणि तात्विक अंमल करणे, अन्याय अपराध आणि स्वैराचाराला आळा घालुन सुव्यवस्था व शांतता सुनिश्चितता करणे अपेक्षित आहे. कायदेविषयक न्याय कायद्याच्या निश्चित नियमाच्या अशा अंमलबजावणीवर आधारित असतो. कायदा कायद्याच्या राज्यात सर्वांसाठी समान असतो. व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थानामुळे कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही. हे कायद्याच्या राज्यात अपेक्षित आहे.

३. **राजकीय न्याय:** राज्याच्या शासन व्यवस्थेच्या निर्णय प्रक्रियेत सर्वांना सहभागी करून घेण्याच्या प्रक्रियेला राजकीय न्याय असे म्हणतात. राजकीय न्यायाद्वारे सर्वांना समान संधी प्राप्त व्हावी यासाठी राज्याने सार्वजनिक सत्तेचा वापर सार्वजनिक हितासाठी केला पाहिजे.

राजकीय न्यायात राजकीय प्रक्रियांत समानता, स्वतंत्रता, आणि न्याय सुनिश्चित करणे. यामध्ये नागरिकांना त्यांच्या राजकीय अधिकारांचा योग्य प्रकारे उपभोग करण्याची संधी मिळते. राजकीय न्याय हा लोकशाही व्यवस्थेचा मूलभूत घटक आहे, ज्याचा उद्देश सर्व नागरिकांसाठी समतोल आणि न्यायसंगत राजकीय वातावरण निर्माण करणे हा आहे.राजकीय न्यायाचे मुख्य तत्त्व समानता (Equality), स्वातंत्र्य (Liberty) अधिकारांचे संरक्षण (Protection of Rights), लोकशाही प्रक्रिया (Democratic Process), पारदर्शकता (Transparency) ही आहेत.

संविधान हे राजकीय न्यायाचे मूलभूत दस्तऐवज आहे, जे नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करते आणि शासनाची मर्यादा ठरवते.राजकीय न्याय हा लोकशाही व्यवस्थेचा पाया आहे. तो प्रत्येक व्यक्तीला समान राजकीय हक्क, स्वातंत्र्य, आणि समान संधी प्रदान करतो. मात्र, पारदर्शकता, निष्पक्षता, आणि सुसंवादाची जोड असल्याशिवाय राजकीय न्याय पूर्णतः यशस्वी होऊ शकत नाही. राजकीय न्यायासाठी समाजातील सर्व घटकांना समानतेच्या तत्त्वावर आणण्याची आवश्यकता आहे.

४. **आर्थिक न्याय:** आर्थिक न्याय म्हणजे संपत्ती, संसाधने, आणि संधींच्या समानतेवर आधारित न्याय. यामध्ये समाजातील सर्व घटकांना आर्थिक हक्क, संधी, आणि संसाधने मिळावीत याची हमी दिली जाते. आर्थिक न्यायाचा उद्देश गरिबीचे निर्मूलन, आर्थिक विषमता कमी करणे, आणि समाजातील सर्वसामान्यांच्या जीवनमानाचा विकास करणे आहे.अमर्त्य यांच्या मते "आर्थिक न्याय म्हणजे प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे आर्थिक जीवन उभारण्याची समान संधी देणे."हे आर्थिक न्यायात अपेक्षित आहे.

आर्थिक न्यायाच्या तत्त्वात प्रामुख्याने

संपत्ती आणि संसाधने समाजात समान पद्धतीने वाटप केली जावीत. तसेच

प्रत्येक व्यक्तीला आर्थिक क्षेत्रात समान संधी मिळावी, जसे की रोजगार, शिक्षण, आणि व्यवसाय इ.क्षेत्रात.समाजातील वंचित वर्गांना आर्थिक संरक्षण आणि प्रोत्साहन मिळावे.आर्थिक विषमता कमी करणे, ज्यामुळे काही मोजक्या लोकांकडे संपत्ती केंद्रीत होणार नाही.गरिबांसाठी पेन्शन, बेरोजगारी भत्ता, आणि इतर आर्थिक सहाय्य ह्या बाबी या आर्थिक न्यायाच्या तत्त्वात अपेक्षित आहेत.

आर्थिक न्याय हा सामाजिक न्यायाचा महत्त्वाचा भाग आहे. तो केवळ गरिबांचे जीवनमान उंचावतो नाही, तर समाजात समानता आणि स्थैर्य प्रस्थापित करतो. मात्र, यासाठी पारदर्शक अंमलबजावणी, भ्रष्टाचारावर नियंत्रण, आणि लोकांच्या सक्रिय सहभागाची आवश्यकता आहे. आर्थिक न्यायाशिवाय खऱ्या अर्थाने सामाजिक आणि राजकीय न्याय शक्य नाही.

५. **सामाजिक न्याय:** सामाजिक स्थितीच्या आधारावर कोणताही भेदभाव नसावा आणि प्रत्येक व्यक्तीला आत्मविकासाच्या पूर्ण संधी मिळाव्यात ह्या बाबी सामाजिक न्यायात अभिप्रेत आहेत. राजकीय सत्तेकडून सामाजिक न्यायाच्या संकल्पनेत हे अंतर्भूत आहे की एखाद्या व्यक्तीला चांगल्या जीवनासाठी आवश्यक परिस्थिती मिळणे आवश्यक आहे आणि या संदर्भात समाजाची अपेक्षा आहे की समाज त्याच्या विधायी आणि प्रशासकीय कार्यक्रमांद्वारे असा समाज स्थापित करेल जो समानतेवर आधारित असेल. वर्तमान काळात सामाजिक न्यायाची कल्पना खूप लोकप्रिय आहे त्यात सामाजिक न्यायावर भर दिल्याने, जगभरातील लाखो लोकांनी मार्क्सवाद किंवा समाजवादाचे इतर काही स्वरूप स्वीकारले आहे. सामाजिक न्यायाशिवाय समता आणि स्वातंत्र्याचे आदर्श पूर्णपणे निरर्थक ठरतात त्यामुळे सामाजिक न्यायाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

**न्यायाचे प्रमुख तत्वे :**

- **समानता (Equality):** प्रत्येक व्यक्तीला समान वागणूक मिळणे.सर्व व्यक्तींना समान वागणूक मिळावी. जात, धर्म, लिंग, आर्थिक स्थिती इत्यादी कोणत्याही आधारावर भेदभाव होऊ नये.

- **स्वातंत्र्य (Freedom):** व्यक्तीला त्याच्या हक्कांमध्ये आणि जीवन जगण्याच्या पद्धतीत स्वातंत्र्य असावे, जोपर्यंत तो इतरांच्या हक्कांमध्ये हस्तक्षेप करत नाही.

- **निष्पक्षता (Impartiality):** न्यायप्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह किंवा पक्षपातीपणा नसावा.

- **योग्यते नुसार वाटप (Distributive Justice):** प्रत्येक व्यक्तीच्या गुण, कर्तव्य, आणि गरजेनुसार योग्य निर्णय घेणे.तसेच संसाधनांचे आणि संधींचे वाटप योग्य व न्याय्य पद्धतीने होणे आवश्यक आहे.

- **शाश्वतता (Sustainability):** न्याय प्रणाली भविष्यातील पिढ्यांसाठीही टिकणारी आणि उपयोगी ठरावी.
- **उत्तरदायित्व (Accountability):** न्यायालये आणि न्यायाधीशांना त्यांच्या निर्णयांसाठी जबाबदार धरले पाहिजे.
- **सुधारणात्मकता (Reformative Justice):** गुन्हेगारांना सुधारणे आणि समाजात पुन्हा एकत्र करणे यावर भर दिला जावा.
- **तटस्थता (Neutrality):** न्याय नेहमी पक्षपाताशिवाय आणि निष्पक्ष असावा.
- **सत्य (Truth}) :** निर्णय नेहमी सत्य आणि तत्त्वांवर आधारित असावा.

**न्यायाची उद्दिष्टे:**

- समाजातील सर्व स्तरांमध्ये सामाजिक समानता आणणे.
- व्यक्तींच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे आणि त्याचा आदर राखणे.
- समाजात शांतता, सौहार्द आणि सुसंवाद निर्माण करणे.
- जाती, धर्म, लिंग, वंश इत्यादींवर आधारित भेदभाव दूर करणे.
- कायद्याचे पालन सुनिश्चित करून गुन्हेगारी टाळणे.
- गुन्हेगारांना शिक्षा देतानाच त्यांना सुधारणेची संधी देणे.
- वैयक्तिक आणि सामूहिक हितसंबंध यांच्यात समतोल राखणे.
- न्यायाचा आदर करून प्रत्येक व्यक्तीला शांततेत जगण्याचा अधिकार प्रदान करणे.
- अन्यायाचे निराकरण करणे.

न्याय म्हणजे प्रत्येकाला त्याचा योग्य हक्क देण्याची प्रक्रिया, जी सत्य, समानता, आणि नैतिकतेच्या आधारावर कार्य करते. न्याय हा समाजातील शांती व स्थैर्यासाठी आवश्यक तत्त्व आहे.

## ४.३.२ प्रक्रियात्मक आणि वितरणात्मक न्याय (Procedural and Distributive justice)

न्याया संकल्पनेकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन आहेत. त्यापैकी प्रक्रियात्मक आणि वितरणात्मक न्याय हा महत्त्वाचा ठरतो.

### प्रक्रियात्मक न्याय (Procedural Justice)

प्रक्रियात्मक न्याय (Procedural Justice) या संकल्पने मध्ये, न्यायप्रक्रियेमध्ये पारदर्शकता, समानता, आणि निष्पक्षतेवर आधारित न्याय या बाबी समाविष्ट आहेत. या

संकल्पनेचा उद्देश म्हणजे व्यक्तींना न्याय मिळण्याच्या प्रक्रियेत विश्वास वाटावा आणि त्यांना हे जाणवावे की त्यांच्याशी योग्य आणि समान व्यवहार होत आहे.

प्रक्रियात्मक न्यायात विवादाची सोडवणूक आणि संसाधनाचे वाटप करताना रास्त प्रक्रियेची मागणी करतो. तसेच निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता यावी यासाठी कायद्याच्या विहित प्रक्रियेचा वापर केला जावा हे प्रक्रियात्मक न्यायात अभिप्रेत आहे.

प्रक्रियात्मक न्याय म्हणजे कायदे, नियम, आणि सामाजिक न्यायाशी संबंधित इतर कोणत्याही धोरणांची निर्मिती आणि अंमलबजावणी करताना मूलभूत नियम आणि प्रक्रियात्मक व्यवस्थांच्या संदर्भाचा संच म्हणून प्रक्रियात्मक न्यायाकडे पाहिल्या जाते.

प्रक्रियात्मक न्याय (Procedural Justice) ही न्यायाची संकल्पना प्रक्रिया किंवा पद्धतींवर आधारित आहे, ज्याद्वारे संसाधने किंवा हक्कांचे वाटप केले जाते. प्रक्रिया योग्य आणि निष्पक्ष असेल तरच परिणाम न्याय्य मानले जाऊ शकतात, असा यामागील मुख्य तत्त्व आहे. यावर विविध राजकीय विचारवंतांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

**जॉन रॉल्स (John Rawls)**

रॉल्सने प्रक्रियात्मक न्यायाचे तत्त्व स्पष्ट करताना "परिपूर्ण प्रक्रियात्मक न्याय" (Perfect Procedural Justice) संकल्पना मांडली.त्याच्या मते, जर एखाद्या प्रक्रियेत सर्व लोकांना समान संधी आणि निष्पक्ष वागणूक दिली जाते, तर त्याद्वारे मिळालेला निकाल न्याय्य मानला जाऊ शकतो."व्हील ऑफ इग्नोरन्स" (Veil of Ignorance): संसाधनांचे वितरण करताना निर्णय घेणाऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक स्थितीचे ज्ञान नसावे; यामुळे प्रक्रिया निष्पक्ष राहते. यावर भर दिला आहे.

**थॉमस हॉब्स (Thomas Hobbes)**

हॉब्सने न्यायाच्या प्रक्रियेसाठी सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला.न्याय मिळवण्यासाठी व्यक्तींनी एक केंद्रीय प्राधिकरण स्वीकारले पाहिजे, जो त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी न्याय्य प्रक्रिया सुनिश्चित करेल.त्याच्या मते, नियमांचे पालन करून प्रक्रिया पूर्ण केली तरच न्यायाची अपेक्षा करता येते.

**इमॅन्युअल कांट (Immanuel Kant)**

कांटच्या मते, न्याय हा प्रक्रियेतून उगम पावतो.त्याच्या "Categorical Imperative" सिद्धांतानुसार, प्रत्येकाने अशा नियमांचे पालन करावे, जे सर्वांसाठी सार्वत्रिक असू शकतात.त्याच्यामते प्रक्रियात्मक न्यायात नैतिकता आणि स्वातंत्र्य या घटकांना महत्त्व दिले जाते.

**जेरेमी बेंथम (Jeremy Bentham)**

बेंथमच्या उपयुक्ततावादाने प्रक्रियेपेक्षा परिणामावर अधिक भर दिला जातो.मात्र, तो म्हणतो की, न्याय्य निर्णय घेण्यासाठी प्रक्रिया अशी असावी की ती जास्तीत जास्त लोकांसाठी आनंद

निर्माण करणारी असेल.न्यायाची प्रक्रिया एक साधन म्हणून वापरली पाहिजे, ज्यामुळे समूहाचे कल्याण वाढेल.

**जॉन स्टुअर्ट मिल (John Stuart Mill)**

मिलने समानता आणि स्वातंत्र्याचा समतोल राखणाऱ्या प्रक्रियेस महत्त्व दिले.त्याच्या मते, न्याय्य प्रक्रिया ही अशी असावी जी व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करते आणि समाजाच्या सामूहिक हिताला चालना देते.

**कार्ल मार्क्स (Karl Marx)**

मार्क्सच्या मते, प्रक्रिया निष्पक्ष दिसण्यापेक्षा वास्तविक शोषण संपवणे अधिक महत्त्वाचे आहे.तो प्रक्रियात्मक न्यायावर टीका करतो, कारण पूंजीवादी व्यवस्थेत प्रक्रिया भेदभावपूर्ण असते आणि कामगार वर्गाचा फक्त दिखाऊ न्याय केला जातो.त्याच्या मतानुसार, खऱ्या न्यायासाठी प्रक्रिया नव्हे तर संपत्तीचे सामूहिकीकरण आवश्यक आहे.

**अमर्त्य सेन (Amartya Sen)**

सेन यांनी प्रक्रियात्मक न्यायावर भाष्य करताना त्याच्या "Capability Approach" वर भर दिला.त्याच्या मते, प्रक्रिया केवळ नियमांवर आधारित न राहता व्यक्तीच्या जीवनातील वास्तविक संधी आणि स्वातंत्र्य वाढवणारी असावी.न्याय्य प्रक्रिया ही अशा पद्धतीने डिझाइन केली पाहिजे की ती व्यक्तीच्या क्षमतेला चालना देईल.

**फेड्रिक हेयक(Friedrich Hayek)**

हायएकच्या मते, न्यायाची प्रक्रिया नियमांच्या स्वाभाविक उत्क्रांतीवर आधारित असली पाहिजे.तो म्हणतो की, "न्याय ही प्रक्रिया आहे, परिणाम नाही."जर प्रक्रिया स्वाभाविक आणि अनैच्छिक असेल तरच ती न्याय्य ठरते.

**रॉबर्ट नॉजिक (Robert Nozick)**

नॉजिकच्या अधिकार सिद्धांत (Entitlement Theory) नुसार, जर संपत्ती किंवा संसाधने न्याय्य प्रक्रियेद्वारे संपादित केली गेली, तर ती वैध मानली पाहिजेत.तो प्रक्रियात्मक न्यायाला समर्थन देतो, पण त्यात राज्याचा हस्तक्षेप कमी असावा, असा आग्रह धरतो.

प्रक्रियात्मक न्यायाच्या संदर्भात विचारवंतांचे मत प्रक्रिया, निष्पक्षता, आणि नैतिकतेवर आधारित आहे. रॉल्स आणि कांट यांचा दृष्टिकोन आदर्शवादी आहे, तर मार्क्स आणि सेन यांचा दृष्टिकोन प्रक्रिया सुधारण्याऐवजी वास्तव बदलांवर भर देतो. हायएक आणि नॉजिक यांसारखे विचारवंत प्रक्रिया नैसर्गिक असावी, असा आग्रह धरतात. परिणामी, न्याय्य प्रक्रियेचा अर्थ सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक संदर्भात बदलतो.

**मुख्य तत्त्वे**

**सुनावणीचा हक्क:** प्रत्येक व्यक्तीला त्यांची बाजू मांडण्याची आणि योग्यरित्या सादर करण्याची संधी मिळाली पाहिजे.

**निष्पक्षता:** निर्णय घेणारी प्राधिकरण कोणत्याही पक्षपाताशिवाय वागली पाहिजे.

**पारदर्शकता:** न्यायप्रक्रिया खुली आणि पारदर्शक असावी, ज्यामुळे निर्णयांची विश्वासार्हता वाढते.

**समान वागणूक:** सर्वांसोबत समान वागणूक केली जावी, भेदभाव टाळला जावा.

**तर्कसंगत निर्णय:** निर्णय हे पुराव्यांवर आधारित, स्पष्ट आणि तर्कशुद्ध असले पाहिजेत.

**महत्त्व**

- व्यक्तींना न्यायव्यवस्थेत विश्वास वाटतो.
- समाजातील स्थैर्य आणि शांतता टिकवली जाते.
- व्यक्तींना न्याय मिळाल्याची भावना निर्माण होते.

**प्रक्रियात्मक न्यायाचा प्रभाव**

- प्रशासन आणि न्यायव्यवस्थेमध्ये विश्वास निर्माण होतो.
- लोकांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना वाढते.
- व्यक्ती व संस्थांमधील नाती अधिक मजबूत होतात.

## वितरणात्मक न्याय

